# १

# भारतीय परराष्ट्र धोरणाची उत्क्रांती (विकास)

**घटक रचना**

१.१ उद्दिष्टे

१.२ प्रास्ताविक

१.३ विषय विवेचन

- १.३.१ परराष्ट्र धोरण
- १ ३.२ परराष्ट्र धोरणाच्या व्याख्या
- १.३.३ परराष्ट्र धोरणाची उद्दिष्टे
- १.३.४ परराष्ट्र धोरणाचे निर्धारक घटक
- १.३.५ परराष्ट्र धोरणाचे महत्त्व
- १.३.६ परराष्ट्र धोरण सिद्धांत
- १.३.७ परराष्ट्र धोरण महत्वाचे मुद्दे

१.४ भारतीय परराष्ट्र धोरणाची वाटचाल

- १.४.१ स्वातंत्र्यपूर्व कालखंड १८८५-१९४७
- १.४.२ स्वातंत्र्योत्तर कालखंड १९४७-९०
- १.४.३ भारताच्या परराष्ट्र धोरणाची मूलभूत तत्वे
- १.४.४ भारतीय परराष्ट्र धोरणाची उद्दिष्टे:
- १.४.५ उदारमतवादी टप्पा-नेहरू आणि अलिप्ततावाद
  - १.४.५.१ नेहरूंचे परराष्ट्र धोरण
- १.४.६ पंडित नेहरूंच्या परराष्ट्र धोरणांची वैशिष्ट्ये
  - १.४.६.१ पंडित नेहरूंच्या परराष्ट्र धोरणांतील नकारात्मक बाजू
- १.४.७ अलिप्ततावाद
  - १.४.७.१ अलिप्तवादी चळवळीचे प्रमुख कार्य गट
  - १.४.७.२ अलिप्ततावाद  धोरण आणि भारत

१.५ नेहरूत्तर कालखंडातील भारतीय परराष्ट्र धोरण

१.६ शीतयुद्ध समाप्तीचा आणि जागतिकीकरणाचा भारतीय परराष्ट्र धोरणावरील प्रभाव

- १.६.१ शीतयुद्ध कालखंड
- १.६.२ शीतयुद्ध समाप्तीचा कालखंड
- १.६.३.१ जागतिकीकरण महत्वाचे मुद्दे
- १.६.४  शीतयुद्ध समाप्तीचा आणि जागतिकीकरणाच्या काळात भारतीय परराष्ट्र धोरणाचे बदलते स्वरूप

१.७ भारतीय परराष्ट्र धोरणाचे मूल्यांकन

संदर्भ ग्रंथसूची

## १.१ उद्दिष्टे

'भारतीय परराष्ट्र धोरणाची उत्क्रांती' या घटकाच्या अभ्यासाची पुढील उद्दिष्ट निश्चित केलेली आहेत.

१. परराष्ट्र धोरण समजून घेणे.
२. परराष्ट्र धोरण निर्धारित करणाऱ्या घटकांची माहिती घेणे.
३. भारतीय परराष्ट्र धोरणाच्या उत्क्रांतीचा अभ्यास करणे.
४. भारतीय परराष्ट्र धोरणाच्या उदारमतवादी कालखंडाचा व नेहरूंच्या प्रभाव समजून घेणे.
५. भारतीय परराष्ट्र धोरणावरील नेहरूत्तर कालखंडाचा अभ्यास करणे.
६. भारतीय परराष्ट्र धोरणावरील जागतिकीकरणाच्या प्रभाव समजून घेणे.

## १.२ प्रास्ताविक

आधुनिक राजकीय व्यवस्थेमध्ये जगातील सर्वच राष्ट्र आपले राष्ट्र हित साधण्याचा प्रयत्न करतात.राष्ट्रहित साध्य करताना प्रत्येक राष्ट्र एकमेकाला नियंत्रित करण्याचा प्रयत्न करताना दिसून येतात.आज राष्ट्रहित साधण्यासाठी परराष्ट्र धोरणला अनन्यसाधारण महत्त्व प्राप्त झालेले आहे. म्हणून भारतीय परराष्ट्र धोरणाची उत्क्रांती पाहतांना आपल्याला भारतीय परराष्ट्र धोरणाचा जो विकास झाला त्यामध्ये प्रामुख्याने १८८५ ते १९४७ स्वातंत्र्यपूर्वीचा कालखंड, स्वातंत्र्य प्राप्तीनंतरचा कालखंड, आणि जागतिकीकरणाचा कालखंड या तीन कालखंडाचा प्रामुख्याने विचार करणे गरजेचे ठरते.कारण जागतिक राजकारणात भारताची भूमिका पाहताना अनेकवेळा जागतिक राजकारणात अनेक राष्ट्रा- राष्ट्रांमध्ये संघर्ष निर्माण होतात.अशावेळी भारताने आपल्या परराष्ट्र धोरणाची जी तत्वे निर्धारित केलेली आहेत त्या तत्त्वाचा विचार करूनच भारताने आपली राजकीय वाटचाल आज पर्यंत केलेली आहे.भारतीय परराष्ट्र धोरणाच्या विकासाचा विचार करताना भारतीय परराष्ट्र धोरणांवर देशाचे पहिले पंतप्रधान पंडित नेहरू यांचा मोठा प्रभाव असल्याचे दिसून येते.भारताने स्वीकारलेल्या लोकशाही व्यवस्थेमुळे देशात शांततामय मार्गाने सत्तांतरे होत असतात. देशात होणाऱ्या सत्तांतराच्या कालखंडामध्ये भारतीय परराष्ट्र धोरणाचे स्वरूप बदलत गेले आहे. एकंदरीतच भारतीय परराष्ट्र धोरणाची उत्क्रांती या घटकात आपण प्रामुख्याने भारतीय परराष्ट्र धोरणाची उद्दिष्टे, नेहरूकालीन भारतीय परराष्ट्र धोरण, नेहरूत्तर कालखंडातील भारतीय परराष्ट्र धोरण, आणि जागतिकीकरण कालखंडातील भारतीय परराष्ट्र धोरणाचा अभ्यास करणार आहोत.

## १.३ विषय विवेचन:

### १.३.१ परराष्ट्र धोरण:

माहिती तंत्रज्ञानाचा प्रसार आणि प्रचार पाहाता आधुनिक राजकीय व्यवस्थेमध्ये आज जग अतिशय छोटे झालेले आहे. जगातील कोणत्याही राष्ट्रांमध्ये घडलेल्या घटनांचा प्रभाव हा प्रत्येक देशाच्या राज्य व्यवस्थेमध्ये पर्यायाने परराष्ट्र धोरणावर होत असतो. त्यामुळे आजची

जागतिक व्यवस्था पाहता आज जगातील प्रत्येक स्वतंत्र राष्ट्रांना परस्पराशी आपले संबंध ठेवावे लागतात. माहिती-तंत्रज्ञानाच्या काळातही जगातील कोणतेही राष्ट्र आज स्वयंपूर्ण नाही ही वस्तुस्थिती आहे.म्हणूनच प्रत्येक राष्ट्राला आपला विकास घडवून आणण्यासाठी आज परस्परांशी सामाजिक,आर्थिक,सांस्कृतिक,शैक्षणिक राजनयिक असे अनेक प्रकारचे संबंध ठेवावे लागतात. प्रत्येक राष्ट्राला हे संबंध जपण्यासाठी आणि वृद्धिंगत करण्यासाठी परराष्ट्र धोरण आखावे लागते.कारण प्रत्येक राष्ट्राच्या परराष्ट्र धोरणामुळेच या संबंधांना एक दिशा प्राप्त होते. म्हणजेच प्रत्येक देशाच्या परराष्ट्र धोरणावरच देशाच्या विकासाचे भवितव्य अवलंबून असते हे निश्चित आहे.म्हणून परराष्ट्र धोरणाच्या संदर्भात आपल्याला असे म्हणता येईल की परराष्ट्रधोरण हे प्रत्येक राष्ट्राने दुसऱ्या राष्ट्राशी व्यवहार करण्यासाठी स्वीकारलेली एक विचारधारा होय.त्यामुळे प्रत्येक राष्ट्र आपले हितसंबंध जोपासण्याच्या दृष्टीकोनातून आपले परराष्ट्र धोरण आखताना दिसून येतात.

**१.३.२ परराष्ट्र धोरणाच्या व्याख्या**:

**प्रो.चार्लस बर्टन मार्शल,**

"परराष्ट्र धोरण म्हणजे राजकीय सत्तेने आपल्या क्षेत्राबाहेरील राजकीय वातावरणाला प्रभावित करण्यासाठी केलेली वाटचाल होय".

"Foreign policy is the course of action undertaken by authority of the state and intended to affect situation beyond the span of it's jurisdiction"

**जॉर्ज मॉडेल्सकी,**

"प्रत्येक स्वतंत्र राष्ट्राने आपल्या इच्छेनुसार इतर राष्ट्रांनी व्यवहार करावा किंवा आपल्या व्यवहाराशी जुळवून घेण्यास अनुकूल करणारी आंतरराष्ट्रीय पद्धती म्हणजेच परराष्ट्र धोरण होय".

“the system of activities evolved by communities for changing the behaviour of other states and for adjusting their own activities to the international environment"

**जोसेफ फ्रँकेल**,

"परराष्ट्र धोरणात निर्णय आणि कृतींचा समावेश असतो, ज्यामध्ये काही प्रमाणात एक राज्य आणि इतर यांच्यातील संबंधांचा समावेश असतो".

"foreign policy consists of decisions and actions , which involves to some appreciable extent relations between one state and others"

वरील सर्व व्याख्यावरुन असे निदर्शनास येते की परराष्ट्र धोरण हे देशाचे इतर राष्ट्रांसोबतचे संबंध व्यवस्थापित करण्यासाठी पूर्व-स्थापित धोरणांचा एक संच आहे. ज्याची रचना आणि अंमलबजावणी पद्धतशीरपणे केली जाते तसेच आंतरराष्ट्रीय व्यवहारांचे संचलन केले जाते.

munotes.in

एकंदरीतच परराष्ट्र धोरणात पुढील बाबींचा समावेश होतो आंतरराष्ट्रीय संबंधांमध्ये राष्ट्राने स्वीकारलेली आणि पाळलेली तत्त्वे, धोरणे आणि निर्णयांचा संच, राष्ट्रीय हिताची उद्दिष्टे जी सुरक्षित करायची आहेत,राष्ट्रीय हिताची उद्दिष्टे साध्य करण्यासाठी वापरले जाणारे साधन,आंतरराष्ट्रीय संबंध आयोजित करण्यासाठी व्यापक धोरण तत्त्वे आणि निर्णय,राष्ट्रहिताच्या उद्दिष्टांच्या संदर्भात राष्ट्राच्या नफ्याचे आणि अपयशाचे मूल्यांकन,आंतरराष्ट्रीय संबंधांमध्ये सातत्य किंवा बदल किंवा दोन्ही राखण्यासाठी धोरणे, निर्णय आणि कृती-कार्यक्रम इ.

### १.३.३ परराष्ट्र धोरणाची उद्दिष्टे:

- राष्ट्रीय प्रतिष्ठेचे रक्षण करणे आणि राष्ट्रीय शक्ती विकसित करणे.
- राज्याची अखंडता राखणे.
- सामान्य हिताचा प्रचार करणे.
- राष्ट्रीय सुरक्षा प्रदान करणे.
- जागतिक सुव्यवस्था राखणे.
- आंतरराष्ट्रीय सद्भावना,एकता आणि राष्ट्रीय विकासासाठी समर्थन विकसित करणे.
- आर्थिक विकास साधणे.
- आंतरराष्ट्रीय राजकारणामध्ये आपल्या राष्ट्राची राष्ट्र प्रतिष्ठा वाढवणे.
- विचारधारा प्रसारित करणे.
- राज्यांच्या सीमांचा विस्तार करणे.
- आंतरराष्ट्रीय समाजाची नवनिर्मिती करणे.
- शांततामय मार्गाने अंतर्गत व जागतिक राजकारणातील वाद सोडवणे.

### १.३.४ परराष्ट्र धोरणाचे निर्धारक घटक :

परराष्ट्र धोरणाची निर्धारक घटक हे काही वेळेस कायमस्वरूपी असतात तर काही वेळेस ते तात्कालिक स्वरूपाचे असतात. म्हणून परराष्ट्र धोरण निर्धारित करताना प्रत्येक राष्ट्राला राष्ट्राचे राष्ट्रीय हित, अंतर्गत आणि बाह्य वातावरण, राष्ट्रीय मूल्ये, परराष्ट्र धोरणाची उद्दिष्टे आणि इतर राष्ट्रांचे निर्णय आणि आंतरराष्ट्रीय सत्ता रचनेचे स्वरूप विचारात घेऊनच आपले परराष्ट्र धोरण निर्धारित करावे लागतात.

१. **भौगोलिक तत्व** :

परराष्ट्र धोरण निर्धारित करणाऱ्या सर्वात महत्त्वाच्या घटकांपैकी भौगोलिक घटक हा महत्त्वाचा ठरतो. जागतिक राजकारणाचा विचार करता अनेक राष्ट्रांना आपल्या भौगोलिक स्थितीचा आणि वातावरणाचा विचार करता अनेक वेळा फायदा आणि नुकसान होताना दिसून होतो. अमेरिकेच्या परराष्ट्र धोरणावर अटलांटिक

महासागराचा प्रभाव नेहमीच राहिला आहे. भारतीय परराष्ट्र धोरणावर आता निश्चितपणे हिंद महासागरातील सर्वात मोठे तटीय राज्य म्हणून भारताच्या भौगोलिक स्थानाचा प्रभाव आहे.तसेच भारताचे आशिया खंडातील स्थान पाहता भारतास साम्यवादी राष्ट्राच्या सीमा भिडलेल्या असतांना ही तत्कालीन परिस्थितीचा विचार करता भारताने अलिप्ततेचे धोरण स्वीकाराले आहे.

२. **नैसर्गिक साधने**:

नैसर्गिक साधनामध्ये अन्नधान्य, खनिज द्रव्य, धातु, पेट्रोल इत्यादीचा प्रामुख्याने समावेश होतो. कारण देशाची अर्थव्यवस्था या नैसर्गिक साधनांवर अवलंबून असते. त्यामुळे आर्थिक विकासासाठी नैसर्गिक साधन संपत्तीचा मोठ्या प्रमाणात उपयोग होतो.एखाद्या राष्ट्राची नैसर्गिक संसाधने आणि अन्न उत्पादन क्षमता त्याच्या भूगोलाशी थेट जोडलेली असते. महत्त्वपूर्ण नैसर्गिक संसाधने खनिजे, अन्न आणि ऊर्जा संसाधनांचे पुरेसे अस्तित्व यूएस आणि रशियन परराष्ट्र धोरणांना मदत करणारे घटक आहेत.1950 आणि 1960 च्या दशकात अन्नाचा तुटवडा हा भारतीय परराष्ट्र धोरणावर मर्यादा आणणारा होता.मोठ्या प्रमाणातील तेलामुळे पश्चिम आशियाई आणि आखाती राष्ट्रांना त्यांच्या परराष्ट्र धोरणांचे साधन म्हणून तेल मुत्सद्देगिरीचा अवलंब करणे शक्य झाले आहे.

३. **सांस्कृतिक आणि ऐतिहासिक घटक** :

एखाद्या राष्ट्राचा सांस्कृतिक वारसा आणि इतिहास हे त्याच्या परराष्ट्र धोरणाचे महत्त्वाचे आणि मौल्यवान घटक असतात. तसेच एखाद्या राज्याच्या लोकांच्या जीवनाचे वैशिष्ट्य दर्शविणारे नियम आणि परंपरा हे त्याच्या परराष्ट्र धोरणाचे अत्यंत प्रभावशाली घटक असतात.प्रत्येक देशाची सांस्कृतिक एकता ही त्यांच्यासाठी नेहमीच शक्तीचा स्रोत असते.आशियाई आणि आफ्रिकन राज्यांच्या परराष्ट्र धोरणांची कमकुवता मुख्यत्वे त्यांच्या लोकांमधील अंतर्गत मतभेद आणि संघर्षांच्या उपस्थितीमुळे आहे.ऐतिहासिक पार्श्वभूमी आणि सांस्कृतिक दुवे त्यांना इतर राष्ट्रांशी संबंधांचे स्वरूप आणि व्याप्ती यांचे विश्लेषण आणि मूल्यांकन करण्यास मदत करतात. शेजारील राष्ट्रांमधील संबंध ठरवण्यासाठी इतिहास हा महत्त्वाचा घटक ठरतो. भारत आणि पाकिस्तान यांच्यातील परराष्ट्र धोरणातील परस्परसंवाद हा बहुतांशी भूतकाळातील इतिहासाचा वारसा आहे. तसेच १९६२ च्या इतिहासाची सावली अजूनही चीन-भारतीय संबंधांवर प्रभाव टाकताना आजही दिसून येते.भारताची संस्कृती, ही इतिहास, तत्त्वज्ञान आणि परंपरांनी विकसित झालेली आहे. महात्मा गांधींचे अहिंसा तत्वज्ञान, नैतिक वर्तन आणि सत्याग्रहाचे तत्वज्ञान हे भारताच्या नैतिक, आणि तात्विक परंपरा जोपासना करतात.

४. **औद्योगिक आणि आर्थिक विकास**:

विकसित राष्ट्राची परराष्ट्र धोरण हे औद्योगिक आणि आर्थिक विकास आणि प्रभावित झालेले आहे. आज जागतिक राजकारणाचा विचार करता अमेरिका ही एकच महाशक्ती आहे. आज अनेक अविकसित राष्ट्रांना आपल्या औद्योगिक आणि आर्थिक



munotes.in

विकासासाठी अमेरिकेच्या आर्थिक मदतीवर अवलंबून राहावे लागते. परिणामी ती आर्थिक मदत ज्या राष्ट्रांना मिळाली आहे त्या राष्ट्राचे परराष्ट्र धोरण हे अमेरिका प्रभावित करताना आपल्याला दिसून येते. चीनच्या आर्थिक मदतीने श्रीलंकेची झालेली अवस्था ही आपल्या डोळ्यासमोर आहेच. आज आशियाई देशाचे नेतृत्व करण्याची आणि महासत्ता म्हणून वावरण्याची चीनची भूमिका ही औद्योगिक आणि आर्थिक विकासावर अवलंबून असल्याचे आपल्याला दिसून येते.

५. **लष्करी शक्ती** :

जागतिक राजकारणाचा विचार करता आज प्रत्येक राष्ट्राचा दर्जा हा त्याच्या सैन्य शक्तीवर अवलंबून असतो. सैनिकी शक्ती हा घटक ही कायमस्वरूपी नाही. तर त्यामध्ये अनेक वेळा बदल होताना आपल्याला दिसून येतात. स्पेन, पोर्तुगाल, फ्रान्स, ब्रिटन, एकेकाळी जगातील प्रमुख सैन्य शक्ती होत्या परंतु आज त्यांचे महत्त्व संपुष्टात आल्याचे आपल्याला दिसून येते. आज अमेरिका,चीन, रशियासारखे देश हे सैनिक शक्तीच्या बाबतीत विकसित झाल्याचे आपल्याला दिसून येते. आज माहिती तंत्रज्ञानाच्या काळात युद्धतंत्र आणि युद्धविषयक तंत्रामध्ये झालेले बदल पाहता आज अनेक राष्ट्रांकडे अनुशक्ती उपलब्ध झालेली आहे. त्यामुळे आज जगाला आण्विक युद्धाचा धोका निर्माण झाल्याचे दिसून येते.

६. **लोकसंख्या** :

लोकसंख्येचा विचार करता आज परराष्ट्र धोरणावर लोकसंख्येचा सकारात्मक आणि विपरीत परिणामही दिसून येतो. मोठ्या लोकसंख्येच्या राष्ट्रांत आज विचार करता भारत चीन सारख्या विशाल लोकसंख्येच्या देशांना आज आशियाच्या राजकारणात महत्वपूर्ण स्थान निर्माण झालेले असले तरीसुद्धा भारतात गरिबी, दारिद्र्य, शिक्षण हे अनेक प्रश्न अद्यापही सुटू शकले नाहीत ही वस्तुस्थिती आहे.

७. **लोकमत** :

जागतिक राजकारणाचा विचार करता जर प्रत्येक राष्ट्राने लोकमताचा विचार केला नाही तर त्या राष्ट्राला परराष्ट्र धोरण आखताना अनेक समस्या निर्माण होताना आपल्याला दिसून येतात. परंतु लोकशाही शासन व्यवस्थेमध्ये लोकमताचा आदर करावाच लागतो.भारतामध्ये शेतकरी कायदे, नोटाबंदी, अग्निपथ या बाबतीत लोकमताचा विचार शासनास करावाच लागला. लोकमताचा विचार करता शासनाला आपल्या भूमिका वेळोवेळी बदलाव्या लागल्या. परिणामी ह्या लोकमताचा भारतीय परराष्ट्र धोरणावर मोठा प्रभाव पडताना दिसून येतो.

८. **नेतृत्व** :

प्रत्येक राष्ट्राच्या परराष्ट्र धोरणात त्याच्या राष्ट्रातील नेतृत्वाचा प्रभाव हा मोठ्या प्रमाणावर दिसून येतो.भारताच्या परराष्ट्र धोरणाचा विचार करता भारताच्या परराष्ट्र धोरणावर पंडित नेहरूंचा प्रभाव हा जाणवतो. रशिया आणि यूक्रेन युद्धाचा विचार करता रशियन आणि युक्रेनच्या नेतृत्वाचा विचार करता रशिया आणि युक्रेन युद्धाच्या

काळात तेथील नेतृत्वाचा प्रभाव हा त्या राष्ट्रांच्या परराष्ट्र धोरणावर पडल्याचे आपल्याला दिसून येते. कारण परराष्ट्र धोरण निर्धारण करताना नेतृत्व आपल्या कल्पना, विचार, उपलब्ध साधन सामग्री याचा विचार करून परराष्ट्र धोरण आखताना आपल्याला दिसून येतात.

९. **विचारधारा** :

परराष्ट्र धोरण हे राष्ट्रहिताची उद्दिष्टे पूर्ण करण्यासाठी राष्ट्राने स्वीकारलेली कृती योजना आहे. त्या कृतीला नेहमीच वैचारिक आशय असतो. आपल्या वैचारिक ध्येयास समर्थन मिळवण्यासाठी तसेच इतर राष्ट्रांनी आपली वैचारिक भूमिका स्वीकारावी यासाठी प्रत्येक राष्ट्र प्रयत्न करताना आपल्याला दिसून येतात. जगात भांडवलशाही आणि साम्यवाद या दोन्हीच्या साम्राज्यवाद धोरणातून वेगळे राहण्यासाठी अलिप्ततावाद ही एक तिसरी विचारधारा जगानतील अनेक राष्ट्रानी स्वीकारलेली आहे.

### १.३.५ परराष्ट्र धोरणाचे महत्त्व:

आधुनिक काळात कोणतेही राज्य आंतरराष्ट्रीय क्षेत्रातील आपला सहभाग टाळू शकत नाही. हा सहभाग पद्धतशीरपणे काही तत्त्वांवर आधारित असतो.कारण प्रत्येक राज्याची राजकीय भूमिका ही वेगवेगळ्या स्वरूपाची असते. त्यामुळे प्रत्येक राष्ट्रांच्या व्यवहाराचे प्रतिबिंब त्याच्या परराष्ट्र धोरणात दिसून येते. म्हणून परराष्ट्र धोरणाचे महत्त्व सर्वत्र स्वीकारले जाते. कारण ते प्रत्येक राष्ट्राचा इतर राष्ट्राकडे पाहण्याचा दृष्टिकोन विकसित करत असते.

परराष्ट्र धोरणाने देशाच्या प्रादेशिक अखंडतेचे रक्षण केले पाहिजे आणि देशाच्या आत आणि बाहेरील नागरिकांच्या हिताचे रक्षण केले पाहिजे. हे प्रत्येक राष्ट्राच्या परराष्ट्र धोरणाचे सामान्यतः उद्दिष्ट असते आणि प्रत्येक राष्ट्र आपल्या परराष्ट्र धोरणात या घटकाला प्राधान्य देतात.परराष्ट्र धोरणाचे उद्दिष्ट पाहता आंतरराष्ट्रीय समुदायाच्या इतर सदस्यांशी संबंध राखणे आणि त्यांच्या स्वतःच्या हितसंबंधांना प्रोत्साहन देण्यासाठी संघर्ष किंवा सहकार्याचे धोरण स्वीकारण्या सोबतच देशाच्या परराष्ट्र धोरणाने देशाच्या राष्ट्रीय हितसंबंधांना प्रोत्साहन आणि पुढे नेण्याचा प्रयत्न केला पाहिजे. तसेच प्रत्येक राज्याचे प्राथमिक हितसंरक्षण, सुरक्षा आणि नागरिकांचे कल्याण हे आहे. परराष्ट्र धोरण हे देशाच्या आर्थिक हितसंबंधांना चालना देते. त्यामुळे देशाची जागतिक राजकारणातील स्थिती मुख्यत्वे त्याच्या आर्थिक स्थितीवरून निर्धारित केली जाते म्हणून, त्याकरिता परराष्ट्र धोरण अत्यंत महत्त्वाचे ठरते. परराष्ट्र धोरणाचा उद्देश राज्याच्या प्रभावाचे क्षेत्र वाढवून किंवा दुसऱ्या राज्यावरील अवलंबित्वाच्ये प्रमाण कमी करून आपला प्रभाव वाढवणे हा असतो.कोणतेही देशाला त्याचे राष्ट्रीय हित योग्यरित्या जपता आले नाही आणि त्याचा पाठपुरावा करता आला नाही तर परिणामी तो देश आंतरराष्ट्रीय क्षेत्रात तो कमजोर राहतो.

देशाच्या परराष्ट्र धोरणावर परिणाम करणारे वेगवेगळे घटक असतात. प्रथमतः एखाद्या राज्याच्या प्रदेशाचा आकार आणि तिची लोकसंख्या त्याच्या परराष्ट्र धोरणावर खूप प्रभाव पाडते. तसेच एखाद्या देशाचा भूगोल, त्याची सुपीकता, हवामान, इतर भू-लोकांच्या संबंधातील स्थान आणि जलमार्ग इत्यादींचाही देशाच्या परराष्ट्र धोरणावर प्रभाव पडतो.

कारण देशाची स्वयंपूर्णता ठरवण्यासाठी हा एक प्रमुख घटक आहे. त्याचबरोबर देशाच्या सांस्कृतिक आणि ऐतिहासिक परंपरांचाही परराष्ट्र धोरणावर खोलवर परिणाम होतो. सामान्यतः एकसमान समान संस्कृती आणि ऐतिहासिक अनुभव असलेले लोक समान मूल्ये आणि स्मृती सामायिक करणाऱ्या समाजाच्या सर्व घटकांच्या समर्थनामुळे प्रभावी परराष्ट्र धोरणाचा अवलंब करू शकतात. दुसरीकडे, जो देश सांस्कृतिक आणि ऐतिहासिकदृष्ट्या खंडित झाला आहे तो तितकेच प्रभावी परराष्ट्र धोरण राबवू शकत नाही.प्रत्येक देशाच्या परराष्ट्र धोरणावर बाह्य घटक देखील प्रभाव टाकत असतात. समकालीन राजकीय व्यवस्थेत आंतरराष्ट्रीय संस्था देशाच्या परराष्ट्र धोरणावर खूप प्रभाव टाकतात.आपले परराष्ट्र धोरण ठरवताना देशाला आंतरराष्ट्रीय कायदा, आणि करार लक्षात घ्यावे लागतात. कोणताही देश स्वतःच्या हितसंबंधांना धक्का न लावता या घटकांकडे दुर्लक्ष करू शकत नाही.जागतिक स्तरावरील संरचनेव्यतिरिक्त, प्रादेशिक आणि उप-प्रादेशिक स्तरावरील संरचना देखील देशाच्या परराष्ट्र धोरणावर खूप प्रभाव पाडताना आज दिसून येते. म्हणून परराष्ट्र धोरणाची उद्दिष्ट्ये लक्षात घेता जागतिक राजकारणाचा विचार करून प्रत्येक राष्ट्राला आपले परराष्ट्र धोरण आखावे लागते. परराष्ट्र धोरणाची उद्दिष्टांची जर पूर्तता एखादा राष्ट्राकडून होणार नसेल तर ते राष्ट्र नेहमीच इतर राष्ट्रांच्या दबावाखाली कायमस्वरूपी राहाताना दिसून येते म्हणून परराष्ट्र धोरण हा प्रत्येक देशाचा आत्मा असतो. म्हणून कोणतेही स्वतंत्र राष्ट्र परराष्ट्र धोरणाला नाकारू शकत नाही.

### **१.३.६ परराष्ट्र धोरण सिद्धांत** :

परराष्ट्र धोरणाच्या अभ्यासासाठी अनेक सिद्धांत उदयास आलेले आहेत.वास्तववाद, उदारमतवाद, आर्थिक संरचनावाद, मानसशास्त्रीय सिद्धांत आणि रचनावाद हे प्रचलित परराष्ट्र धोरणाचे सिद्धांत आहेत.

#### **वास्तववाद**

वास्तववाद असे सांगते की हितसंबंध नेहमी शक्तीच्या दृष्टीने निर्धारित केले जातात आणि राज्ये नेहमीच त्यांच्या सर्वोत्तम हितानुसार कार्य करतील. शास्त्रीय वास्तववाद 16व्या शतकातील राजकीय सिद्धांतकार निकोलो मॅकियाव्हेलीच्या परराष्ट्र धोरण पुस्तकातील प्रसिद्ध कोट "द प्रिन्स" चे अनुसरण करतो "प्रेमापेक्षा घाबरणे अधिक सुरक्षित आहे." यावरून असे दिसून येते की जग अराजकतेने भरलेले आहे कारण मानव अहंकारी आहेत आणि शक्ती मिळविण्यासाठी काहीही करू शकतात. वास्तववादाचे संरचनात्मक स्वरूप, व्यक्तीपेक्षा राज्यावर अधिक लक्ष केंद्रित करते त्यामुळे सर्व सरकारे दबावांना त्याच प्रकारे प्रतिक्रिया देतील कारण त्यांना सत्तेपेक्षा राष्ट्रीय सुरक्षेची अधिक काळजी असते हे वास्तववादी धोरण सांगते.

#### **उदारमतवाद**

परराष्ट्र धोरणाचा उदारमतवादाचा सिद्धांत सर्व पैलूंमध्ये स्वातंत्र्य आणि समानतेवर भर देतो आणि विश्वास ठेवतो. की व्यक्तीचे हक्क राज्याच्या गरजांपेक्षा श्रेष्ठ आहेत.आंतरराष्ट्रीय सहकार्य आणि जागतिक नागरिकत्वाने जगाची अराजकता शांत केली जाऊ शकते.

आर्थिकदृष्ट्या उदारमतवाद हा मुक्त व्यापाराला महत्त्व देतो आणि असे मानतो की राज्याने आर्थिक समस्यांमध्ये क्वचितच हस्तक्षेप केला पाहिजे. **आर्थिक संरचनावाद**

आर्थिक संरचनावाद, किंवा मार्क्सवाद, कार्ल मार्क्सने प्रवर्तित केला होता, ज्यांचा असा विश्वास होता की भांडवलशाही अनैतिक आहे कारण ती काही लोकांद्वारे अनेकांचे अनैतिक शोषण करते. व्लादिमीर लेनिन यांनी हे विश्लेषण आंतरराष्ट्रीय स्तरावर आणले की साम्राज्यवादी भांडवलशाही राष्ट्रे आर्थिकदृष्ट्या कमकुवत राष्ट्रांमध्ये त्यांची अतिरिक्त उत्पादने टाकून यशस्वी होतात, ज्यामुळे किंमती कमी होतात आणि त्या क्षेत्रातील अर्थव्यवस्था आणखी कमकुवत होते. मूलत:, भांडवलाच्या या एकाग्रतेमुळे आंतरराष्ट्रीय संबंधांमध्ये समस्या उद्भवतात आणि बदल केवळ सर्वहारा वर्गाच्या कृतीतूनच होऊ शकतो.

**मानसशास्त्रीय सिद्धांत**

मानसशास्त्रीय सिद्धांत आंतरराष्ट्रीय राजकारण  हे अधिक वैयक्तिक पातळीवर स्पष्ट करतात आणि एखाद्या व्यक्तीचे मानसशास्त्र त्यांच्या परराष्ट्र धोरणाच्या निर्णयांवर कसा परिणाम करू शकते हे समजून घेण्याचा प्रयत्न करतात.

**रचनावाद**

रचनावादाचा असा विश्वास आहे की कल्पना ओळखीवर प्रभाव पाडतात आणि स्वारस्य वाढवतात. सध्याच्या रचना केवळ अस्तित्वात आहेत कारण अनेक वर्षांच्या सामाजिक सरावाने ते तसे केले आहे. एखाद्या परिस्थितीचे निराकरण करणे आवश्यक असल्यास किंवा व्यवस्था बदलणे आवश्यक असल्यास, सामाजिक आणि वैचारिक चळवळींमध्ये सुधारणा घडवून आणण्याची शक्ती आहे. रचनावादाचे मुख्य उदाहरण म्हणजे मानवी हक्क, जे काही राष्ट्रांनी पाळले आहेत. गेल्या काही शतकांमध्ये, मानवी हक्क, लिंग, वय आणि वांशिक समानतेच्या आसपासच्या सामाजिक कल्पना आणि मानदंड विकसित झाल्यामुळे, या नवीन सामाजिक नियमांचे प्रतिबिंबित करण्यासाठी कायदे बदलले आहेत.

**१.३.७ परराष्ट्र धोरण महत्वाचे मुद्दे**:

- परराष्ट्र धोरणामध्ये रणनीती आणि प्रक्रियेचा समावेश असतो ज्याद्वारे राष्ट्र स्वतःचे हित साधण्यासाठी इतर राष्ट्रांशी संवाद साधते.
- प्रत्येक देशाच्या हितानुसार परराष्ट्र धोरणांची वेगवेगळी उद्दिष्टे असतात.
- परराष्ट्र धोरण मुत्सद्देगिरी किंवा इतर थेट माध्यमांचा वापर करू शकते जसे की, लष्करी शक्तीचा वापर.
- युनायटेड नेशन्स सारख्या आंतरराष्ट्रीय संस्था, राजनैतिक मार्गाने देशांमधील संबंध सुरळीत करण्यास मदत करतात.
- वास्तववाद, उदारमतवाद, आर्थिक संरचनावाद, मानसशास्त्रीय सिद्धांत आणि रचनावाद हे प्रमुख परराष्ट्र धोरण सिद्धांत आहेत.

- प्रत्येक देशाचा इतर जगाशी संवाद साधण्याच्या पद्धतीचे नियमन करणे, देशांतर्गत घडामोडी, बाहेरील लोकांपासून योग्यरित्या संरक्षित केल्या जातील आणि इतर राष्ट्रांची व्यवहार करण्याचे उद्दिष्टे साध्य होतील याची हमी देणे हा परराष्ट्र धोरणाचा उद्देश असतो.
- प्रत्येक देशाच्या सर्वोच्च कार्यकारी अधिकार्याद्वारे नियुक्त केलेल्या परराष्ट्र धोरणाच्या समस्यांसाठी स्वतंत्र मंत्रालय असते.
- इतर देशांशी व्यवहार करण्याचे सरकारचे जे धोरण असते ते परराष्ट्र धोरणातून स्पष्ट होत असते.

एखाद्या राज्याच्या परराष्ट्र धोरणामध्ये ते त्याच्या आंतरराष्ट्रीय आणि देशांतर्गत हितसंबंधांचे संरक्षण करण्यासाठी वापरत असलेल्या धोरणांचा समावेश करते आणि ते इतर राज्य आणि गैर-राज्य कलाकारांशी संवाद साधण्याचा मार्ग ठरवते. परराष्ट्र धोरणाचा मुख्य उद्देश एखाद्या देशाच्या राष्ट्रीय हिताचे रक्षण करणे हा आहे, जे अहिंसक किंवा हिंसक मार्गांनी असू शकते.

**सारांश** :

परराष्ट्र धोरण  देशाच्या मूलभूत सुरक्षा आणि विकासाच्या प्राधान्यांशी जोडलेले असते.परराष्ट्र धोरणातून प्रत्येक राष्ट्र  त्याचे इतर देशांशी असलेले संबंध इत्यादींवर प्रकाश टाकतो. परराष्ट्र धोरणात राष्ट्रीय हिताला महत्त्व दिले जाते. प्रत्येक राष्ट्राला आपलं राष्ट्रीय हित जोपासावे लागते. त्यामुळे परराष्ट्र धोरण निर्मिती प्रक्रिया ही एक सर्वसमावेशक प्रक्रिया आहे. ती केवळ एका देशापुरती किंवा एका मंत्रालयापुरती मर्यादित नाही तर त्या परराष्ट्र धोरणाच्या प्रक्रियेमध्ये जे घटक महत्त्वाचे आहेत त्या घटकांचाही अभ्यास करणे अपेक्षित असते.

**आपली प्रगती तपासा**

१. परराष्ट्र धोरण म्हणजे काय ते स्पष्ट करा.

___

___

___

___

२. परराष्ट्र धोरण निर्धारण करणारे घटक स्पष्ट करा.

___

___

___

___

## १.४ भारतीय परराष्ट्र धोरणाची वाटचाल

### १.४.१ स्वातंत्र्यपूर्व कालखंड १८८५-१९४७

भारत स्वतंत्र होण्यापूर्वी ब्रिटिश साम्राज्यवादाचा एक घटक म्हणून अस्तित्वात होता.ब्रिटिशांच्या साम्राज्यवादापासुन स्वतंत्र होण्यासाठी भारतात अनेक समाज सुधारक, क्रांतिकारीक तसेच संघटना या ठिकाणी कार्यरत होत्या. परंतु खऱ्या अर्थाने राष्ट्रीय काँग्रेसच्या स्थापनेपासून स्वातंत्र्याची चळवळ ही मोठ्या प्रमाणात व्यापक करण्यात आली. ब्रिटिशांच्या साम्राज्यवादाची भूमिका आणि स्वरूप लक्षात घेता ब्रिटिशांचे विस्तारवादी धोरण त्या काळामध्ये व्यापक स्वरूपात सुरू होते. त्या काळात भारतातून मिळणारा पैसा हा लष्कराच्या आधुनिकीकरणासाठी ब्रिटिश प्रशासनाकडून मोठ्या प्रमाणात खर्च केला जात असे. एकंदरीतच ब्रिटिशांच्या या विस्तारवादी धोरणाला राष्ट्रीय काँग्रेसने विरोध करण्यास सुरुवात केली. त्यातूनच ब्रिटिशांच्या परराष्ट्र धोरणावर आणि संरक्षण नीतीवर काँग्रेसचे नेते भाष्य करू लागलेत. त्याच काळात जगात पहिले महायुद्ध सुरू झाले. पहिल्या महायुद्धाच्या पार्श्वभूमीचा विचार करता साम्राज्यवादाला आणि वसाहतवादाला धक्का बसण्यास सुरुवात झाली.त्यातून साम्राज्यवाद किंवा वसाहतवाद पूर्णपणे नष्ट झाले नाहीत, पण या बसलेल्या धक्क्यातून सावरण्यासाठी ब्रिटिशांना आपल्या धोरणात बदल करावे लागले. एकंदरीत पहिल्या महायुद्धाच्याकाळात वसाहतवादाला विरोध आणि जगात निर्माण झालेले हुकूमशहा याचाही विरोध करण्याचे काम या काळात काँग्रेसने केले. याच काळात काँग्रेसचे नेते महात्मा गांधीज,पंडित जवाहरलाल नेहरू आणि स्वातंत्र्य संग्रामातील अनेक नेत्यांच्या आदर्शवादी व मूल्याधिष्ठित राजकारणाच्या भूमिकेतून वंशवाद, वसाहतवाद,शस्त्रास्त्र स्पर्धेला विरोध, शांततेच्या मार्गाने जगाशी संबंध जोडणे, इतर राष्ट्रांवर आक्रमण न करणे हे विचार प्रवाह रुजवली गेली त्यातूनच या वैचारिक पार्श्वभूमीतून तयार झालेल्या भारतात स्वतंत्र असा परराष्ट्र धोरण अस्तित्वात नव्हते. एकंदरीतच या कालखंडामध्ये राष्ट्रीय काँग्रेसचे नेते तत्कालीन परिस्थितीचा विचार करून स्वातंत्र्य चळवळ पुढे कशी नेता येईल याचा प्रामुख्याने विचार करत होते त्यामुळे या काळातील परराष्ट्र धोरणाची अशी स्पष्ट अशी रूपरेषा आणि एक सैद्धांतिक चौकट या काळात विकसित होऊ शकली नाही.

### १.४.२ स्वातंत्र्योत्तर कालखंड १९४७-९०

१९४७ मध्ये ब्रिटीश वसाहतवादी राजवट संपल्यानंतर भारतीयांनी देशाच्या परराष्ट्र धोरणावर त्यांचे नियंत्रण मिळवले ते स्वातंत्र्यानंतरच भारताने आपले परराष्ट्र धोरण निर्धारित करताना भारताचा ऐतिहासिक सांस्कृतिक वारसा आहे तो जोपासण्याचे काम परराष्ट्र धोरणातून केलेले आहे. भारत ज्यावेळी स्वतंत्र झाला त्यावेळी जगाची विभागणी भांडवलवाद आणि साम्यवाद या दोन गटांमध्ये प्रामुख्याने झाली होती. ऑगस्ट १९४७ मध्ये स्वातंत्र्य मिळण्यापूर्वीच, सप्टेंबर १९४६ मध्ये नेहरूंच्या नेतृत्वाखाली एक अंतरिम सरकार स्थापन करण्यात आले होते.सप्टेंबर १९४६ मध्ये अंतरिम सरकार स्थापन झाल्यानंतर लगेचच भारताने सर्व देशांशी मैत्रीपूर्ण संबंध प्रस्थापित करण्यासाठी पावले उचलली.अंतरिम सरकारच्या कार्यकाळात भारताने राजनैतिक संबंध प्रस्थापित केले आणि यूएसए, यूएसएसआर, चीन आणि इतर काही देशांशी राजदूतांची देवाणघेवाण केली.भारताचे पहिले पंतप्रधान जवाहरलाल नेहरू द्विधा मनस्थितीत होते. पाश्चिमात्य शिक्षित असले तरी

ते व्यक्तिश: रशियाच्या विकासावादी धोरणाने भारावून गेले होते.परंतु जगातील या दोन गटा पैकी एका गटात सामील होणे म्हणजे नव्याने मिळालेले स्वातंत्र्य गमावणे होय हा विचार करून पंडित नेहरुंनी भारताला दोन्ही शक्ती गटांपासून दूर ठेवण्याचा आणि स्वतंत्र परराष्ट्र धोरणाचा अवलंब करण्याचा निर्णय घेतला. पंडित नेहरूंच्या या विचाराला अलिप्ततावाद या नावाने ओळखले जाते. भारताच्या परराष्ट्र धोरणाच्या या दुसऱ्या टप्प्यास शीतयुद्ध कालीन परराष्ट्र धोरण किंवा नेहरुंचे परराष्ट्र धोरण असे म्हणतात. भारताच्या परराष्ट्र धोरणावर नेहरूंचा प्रभाव पडण्याचं कारण म्हणजे नेहरू यांनी पंतप्रधानपदा सोबतच जवळपास सोळा वर्ष परराष्ट्र मंत्रालय हे खाते सुद्धा आपल्याकडेच ठेवले होते. एकंदरीतच स्वतंत्र भारताचे नवीन परराष्ट्र धोरण ठरवण्या मध्ये पंडित नेहरूंचा वाटा हा सर्वाधिक असल्याचे आपल्याला दिसून येते म्हणून भारताच्या परराष्ट्र धोरणाचे शिल्पकार म्हणून नेहरूंना ओळखल्या जाते.

### **१.४.३ भारताच्या परराष्ट्र धोरणाची मूलभूत तत्वे** :

स्वतंत्र भारताचे परराष्ट्रमंत्री नेहरू असल्यामुळे नेहरूंनी भारतीय परराष्ट्र धोरणांच्या संदर्भातील जे काही तत्व आहेत त्या तत्त्वांचा पुरस्कार हा जागतिक राजकारणाच्या व्यासपीठांवरून अनेक वेळा केला ती तत्वे पुढीलप्रमाणे सांगता येतील.

१. **अलिप्ततेचे धोरण**:

दुसऱ्या महायुद्धानंतर जगाची विभागणी ही प्रामुख्याने दोन गटात झाली होती. जगातील नवोदित स्वतंत्र राष्ट्रांना आपल्याकडे आकर्षित करण्याचे काम हे दोन्ही गट त्या काळामध्ये करत होते. एकंदरीतच पंडित नेहरूनी या दोन्ही गटांपासून स्वतंत्र राहून आपलं अस्तित्व कायम ठेवण्याचा प्रयत्न केला त्या धोरणाला अलिप्ततावाद या नावाने ओळखल्या जाते. अलिप्ततेच्या धोरणाचा पुरस्कार करणारा भारत हा पहिला देश ठरतो. अलिप्तवादी धोरणाच्या आधारावर दोन्ही महासत्तांच्या शस्त्रस्पर्धा पासून स्वतःला अलग ठेवण्याचे व एकमेकांशी परस्पर सहकार्याने आंतरराष्ट्रीय वाद सोडवण्याची भूमिका ही अलिप्ततावादी राष्ट्र घेताना दिसून येतात. कारण जागतिक शांतता प्रस्थापित करणे हे भारताच्या परराष्ट्र धोरणाचे उद्दिष्ट असल्याने स्वातंत्र्यप्राप्तीनंतर भारताच्या आर्थिक, सामाजिक, विकासासाठी कोणत्याही महासत्ताच्या गटात सामील न होता दोन्ही महासत्ताकडून मदत घेऊन आपला विकास घडवून आणण्यासाठी भारताने अलिप्ततावादाचे धोरण स्वीकारले आहे.

२. **साम्राज्यवाद व वसाहतवादाला विरोध**:

भारत हा साम्राज्यवाद आणि वसाहतवादाचा बळी ठरलेला होता.साम्राज्यवाद वसाहतवाद या धोरणामुळे भारताचे आर्थिक सामाजिक शोषण हे ब्रिटीशांनी मोठ्या प्रमाणात केल्यामुळे ब्रिटिशांच्या साम्राज्यवादी धोरणाबद्दल भारतीयांच्या मनात मोठा असंतोष होता. म्हणून जागतिक राजकारणात आपल्या परराष्ट्र धोरणाची भूमिका मांडताना साम्राज्यवाद आणि वसाहतवाद या घटकांना भारताने विरोध केल्याचे दिसून येते.भारताच्या वसाहतवाद व साम्राज्यवादाला विरोध या भूमिकेमुळे अनेक नवोदित स्वतंत्र राष्ट्रांनी आपले स्वतःचे अस्तित्व कायम राखले आहे.

३. **वर्णभेदाचा विरोध** :

महात्मा गांधी यांना आफ्रिकेमध्ये वर्णभेदाच्या समस्येला सामोरे जावे लागले होते. या वर्णभेदाच्या माध्यमातून काळा आणि गोरा असा भेद आफ्रिकन व अप्रगत देशात पाश्चिमात्य राष्ट्र मोठ्या प्रमाणात करत होते. वास्तविक पाहता ईश्वराची सर्वश्रेष्ठ निर्मिती हा मनुष्य आहे आणि त्या मनुष्य जातीमध्ये  काळा आणि गोरा असा भेद करणे हे नैसर्गिक न्याय तत्त्वाला धरून नाही. एकंदरीतच या वर्णभेदाच्या समस्येतून गोऱ्या लोकांनी काळ्या लोकांचा अमानुष छळ केला आणि म्हणूनच हा गोरा काळा भेद कुठेतरी थांबला पाहिजे हा विचार डोळ्यासमोर ठेवून जागतिक राजकारणाच्या व्यासपीठावर भारताने वेळोवेळी वर्णभेदाच्या धोरणाच्या विरोधात आपली भूमिका मांडलेली आहे.

४. **अशिया आफ्रिकन राष्ट्रात मैत्री भाव** :

आशिया आफ्रिका खंडातील बहुतेक अनेक राज्य साम्राज्यवादी राज्यांच्या वसाहती होत्या. साम्राज्यवादी राज्यांनी या वसाहतीचे अनेक मोठ्या प्रमाणात शोषण केल्यामुळे ही राज्य विकासापासून कोसो दूर होती. आशिया व आफ्रिका खंडातील अनेक राष्ट्रांनी भारतीय स्वातंत्र्य आंदोलनापासून प्रेरणा घेऊन आफ्रिका आशिया खंडात स्वातंत्र्य आंदोलनाच्या संदर्भात मोठ्या प्रमाणात जागृती झाली. भारताने स्वातंत्र्य झाल्यानंतर आशिया आफ्रिकन राष्ट्रांच्या स्वातंत्र्यलढ्याच्या आंदोलनाला पाठिंबा दिला. त्यातूनच आशिया आफ्रिकन राष्ट्राच्या संदर्भात भारताचा एक मैत्री भावाचा दृष्टीकोन त्या काळामध्ये तयार झाल्याचे दिसून येते.

५. **सुरक्षितता आणि जागतिक शांतता** :

जगाची विभागणी दोन गटात झाल्यामुळे अनेक नवोदित राष्ट्र या दोन गटांच्या संघर्षामध्ये भरडल्या जात होती. जगात महासत्तांची शस्त्रनिर्मितीची  सुरू असलेली स्पर्धा लक्षात घेता अण्वस्त्रांची निर्मिती मोठ्या प्रमाणात होऊ लागली. त्यातून जगामध्ये एक असुरक्षिततेचे वातावरण आणि जगाचा विनाश होण्याची शक्यता त्या काळामध्ये निर्माण झालेली होती. द्वितीय महायुद्धामध्ये  अण्वस्त्रांचा वापर करण्यात आला. त्यातून जगापुढे सुरक्षितता आणि शांतता या दोन घटकांचे महत्त्व वाढू लागले.एकंदरितच भारतावर  गौतम बुद्धांच्या विचारांचा मोठा पगडा असल्यामुळे जगात जी असुरक्षितता निर्माण झालेली आहे ती असुरक्षितता नष्ट करण्यासाठी सुरक्षितता आणि शांतता या दोन मार्गांचा अवलंब करणे गरजेचे आहे हे भारताला महत्त्वाचे वाटू लागले त्यामुळे जगातील संघर्षमय प्रश्न हे युद्धाच्या मार्गाने सुटणार नाही तर ते शांततेच्या आणि वाटाघाटीच्या माध्यमातून सुटतील हा विचार डोळ्यासमोर ठेवून भारतीय परराष्ट्र धोरणात सुरक्षितता आणि जागतिक शांततेवर भर दिला आहे.

६. **संयुक्त राष्ट्र आणि आंतरराष्ट्रीय संघटनांना सहकार्य**:

पहिले महायुद्धात झालेला मानवी संहार पाहता प्रेसिडेंट विल्सन यांच्या ठरावानुसार ११ नोव्हेंबर १९१८ ला पहिले महायुद्ध संपुष्टात आले. युद्धसमाप्तीनंतर जगात शांतता प्रस्थापित करणे हे कठीण काम होते. त्या काळात विल्सन यांनी लोकशाहीच्या

स्थापनेसाठी जगाला सुरक्षित करू या हे घोषवाक्य उच्चारून लोकांची मन त्या काळात जिंकली. त्यातूनच जागतिक शांतता स्थापन करणे व विश्व संघटनेची स्थापना करण्याच्या कल्पना त्यांनी मांडल्यामुळे जग त्यांना शांततेचा दूत म्हणून पाहू लागले. पॅरिस शांतता संमेलनातून राष्ट्रसंघाची निर्मिती झाली. तसेच दुसरे महायुद्ध चालू असतांनाच मित्र राष्ट्रांनी नवीन जागतिक संघटना स्थापन करण्याचे ठरविले. कारण राष्ट्रसंघ शांतता निर्माण करण्यात अपयशी ठरल्यामुळे आंतरराष्ट्रीय संस्था, व्यक्तीचे अधिकार व स्वातंत्र्य यांच्या संरक्षणार्थ संयुक्त राष्ट्रसंघ ही संस्था स्थापन करण्याचे ठरले. एकंदरीतच संयुक्त राष्ट्राचे उद्दिष्टे पाहता आंतरराष्ट्रीय सुरक्षितता व शांतता याला प्राधान्य देण्यात आल्यामुळे भारताने संयुक्त राष्ट्र आणि आंतरराष्ट्रीय संघटनांना सहकार्य करण्याचे धोरण स्वीकारले आहे.

७. **पंचशील तत्व** :

पंचशील ही बौद्ध धर्मातील एक महत्त्वाची संकल्पना आहे.शील म्हणजे सद्वर्तन. ही कल्पना केवळ धर्मकारणांपुरतीच मर्यादित न ठेवता आधुनिक राजकारणातही तिचा उपयोग केला असता, सहजीवन व शांततेचा प्रसार होईल, या विचाराने इंडोनेशियाचे अध्यक्ष सूकार्णो यांनी प्रथम तिचा उद्घोष केला. पुढे भारत व चीन या देशांत तिबेटसंबंधी २९ एप्रिल १९५४ रोजी जो करार झाला, त्याच्या प्रास्ताविकात नमूद केलेली पाच तत्त्वे 'पंचशील' म्हणून प्रसिद्ध पावली. ती तत्वे पुढीलप्रमाणे(१) परस्पर देशांच्या प्रादेशिक अखंडतेला व राजकीय सार्वभौमत्वाला मान्यता देणे, (२) कोणीही कोणावर आक्रमण न करणे, (३) एकमेकांच्या अंतर्गत बाबतींत हस्तक्षेप न करणे, (४) एकमेकांविषयी समभाव बाळगणे व परस्परांच्या हिताची जपणूक करणे आणि (५) शांततामय सहअस्तित्व आंतरराष्ट्रीय राजकारणात भारताची भूमिका निश्चित करताना जागतिक शांततेला प्राधान्य देण्यात भारताने अग्रक्रम ठेवला आहे.त्यातूनच भारतीय परराष्ट्र धोरणासाठी पंडित नेहरूनी पंचशील तत्व स्वीकारलेली आहेत.

८. **गुजराल सिद्धांत**

भारताचे तत्कालीन पंतप्रधान इंद्रकुमार गुजराल यांनी भारताच्या शेजारी राष्ट्राशी संबंध कसे असावेत या संदर्भात महत्त्वाचे मार्गदर्शन केले आहे. शीतयुद्धानंतरच्या बदललेल्या आंतरराष्ट्रीय वातावरणाच्या संदर्भात गुजराल सिद्धांत हा भारतीय परराष्ट्र धोरणाचा एक महत्त्वाचा सिद्धांत बनला आहे.भारत शेजारी राष्ट्रांशी असलेले वाद मिटवून मैत्रीपूर्ण संबंध जोपासत नाही, तोवर जागतिक राजकारणात देशाला मानाचे स्थान प्राप्त होणार नाही अशी परराष्ट्र धोरणाच्या संदर्भात महत्त्वाची भूमिका मांडलेली आहे. शेजारील राष्ट्रांशी आपले संबंध राखतान इंद्रकुमार गुजराल यांनी याविषयी काही तत्व मांडलेली आहेत ती पुढीलप्रमाणे,

- भारताने मालदीव, बांगलादेश, नेपाळ, श्रीलंका आणि भूतान या शेजारी देशांशी विश्वासार्ह संबंध निर्माण केले पाहिजेत, त्यांच्याशी असलेले वाद संवादाने सोडवावेत आणि कोणत्याही मदतीच्या बदल्यात ताबडतोब काहीतरी मिळावे ही अपेक्षा नसावी हा गुजराल सिद्धांताचा मूळ मंत्र होता. त्याच वेळी, नैसर्गिक, राजकीय आणि आर्थिक संकट सोडवण्यासाठी मदत केली पाहिजे.

- कोणत्याही दक्षिण आशियाई देशाने आपल्या भूभागाचा वापर दुसऱ्या देशाच्या विरोधात करण्याची परवानगी देऊ नये
- कोणत्याही देशाने दुसऱ्याच्या अंतर्गत बाबींमध्ये हस्तक्षेप करू नये
- सर्व दक्षिण आशियाई देशांनी एकमेकांच्या प्रादेशिक अखंडतेचा आणि सार्वभौमत्वाचा आदर केला पाहिजे
- सर्व दक्षिण आशियाई प्रदेशातील वाद शांततेने सोडवतील व सर्व वाद शांततापूर्ण द्विपक्षीय वाटाघाटीतून सोडवले जावेत

भारताच्या परराष्ट्र धोरणाची मूलभूत तत्वे पहातांना भारताच्या परराष्ट्र धोरणावर प्रभाव टाकणाऱ्या घटकांचा विचार केला असता भारताच्या परराष्ट्र धोरणावर महात्मा गांधीजींचा अहिंसावाद आणि शांततेचा पुरस्कार, रवींद्रनाथ टागोर यांच्या आंतरराष्ट्रीयवादाचा संकल्पनेचा आणि महर्षी अरविंदो यांच्या अध्यात्मवादी विचाराचा प्रभाव मोठ्या प्रमाणात पडलेला आहे. सोबतच पंडित नेहरूंच्या लोकशाही समाजवादाचा प्रभाव ही परराष्ट्र धोरणावर जाणवतो.

### **१.४.४ भारतीय परराष्ट्र धोरणाची उद्दिष्टे** :

भारत स्वातंत्र्य झाल्यानंतर तत्कालीन परिस्थितीचा विचार करता भारताच्या परराष्ट्र धोरणाची उद्दिष्टे कोणती असावीत, परराष्ट्र धोरणावर परिणाम करणारे घटक कोण कोणते आहेत, भारताच्या विविध देश व आंतरराष्ट्रीय संघटना, संस्था यांच्याबरोबरच्या द्विपक्ष व बहुपक्ष पातळीवरील संबंध कसे असावेत यावर विचारमंथन होऊन भारतीय परराष्ट्र धोरणाची पुढील उद्दिष्टे निर्धारीत करण्यात आलेली आहेत.

१. **भारताच्या प्रादेशिक अखंडतेचे रक्षण आणि परराष्ट्र धोरणाचे स्वातंत्र्य** :

प्रादेशिक अखंडता आणि परकीय आक्रमणापासून राष्ट्रीय सीमांचे संरक्षण हे राष्ट्राचे मुख्य धेय्य आहे. कारण भारत हा अनेक दशके साम्राज्यवाद आणि वसाहतवादाचा बळी ठरला असल्याने तसेच जगातील दोन महासत्ताच्या गटापैकी कोणत्याही एका गटात सामील झाल्यास पुन्हा एकदा भारताच्या अखंडतेचा भंग होईल, तसेच परराष्ट्र धोरण ठरवतांना आपण ज्या गटात सामील आहोत त्या गटाचा प्रभाव आपल्या परराष्ट्र धोरणावर पडेल याचा विचार करून आपल्या देशाचे प्रादेशिक अखंडत्व आणि देशाचे परराष्ट्र धोरण स्वतंत्र कसे राहील याचा विचार भारतीय परराष्ट्र धोरणाच्या संदर्भात करण्यात आलेला आहे.

२. **आंतरराष्ट्रीय शांतता आणि सुरक्षेला प्रोत्साहन देणे**:

नवीन स्वतंत्र आणि विकसनशील देश म्हणून भारताला आंतरराष्ट्रीय शांतता आणि विकास परस्परसंबंधित असल्याची जाणीव होती.त्यातूनच भारताने निशस्त्रीकरणावर भर आणि लष्करी युतीपासून दूर राहण्याचे धोरण जागतिक शांततेला प्रोत्साहन देण्यासाठी स्वीकारले आहे.

**३. भारताचा आर्थिक विकास** :

स्वातंत्र्याच्या प्राप्तीनंतर जलद विकास ही भारताची मुलभूत गरज होती. देशातील लोकशाही आणि स्वातंत्र्य बळकट करण्यासाठी जगातील दोन्ही गटा पासून अलिप्त राहून त्यांच्याकडून आर्थिक संसाधने आणि तंत्रज्ञान मिळविण्यासाठी आणि विकासावर आपली ऊर्जा केंद्रित करण्यासाठी भारताने महासत्ताच्या राजकारणात उडी घेतली नाही. त्यामुळे भारताच्या आर्थिक विकासासाठी दोन्ही गटाकडून वेळोवेळी मदत झाल्याचे आपल्याला दिसून येते.

**४. अनिवासी भारतीयांच्या हिताचे संरक्षण** :

भारताच्या परराष्ट्र धोरणात जे भारतीय परदेशात स्थायिक झालेले आहेत त्यांच्या हिताचे संरक्षण करण्याचे प्राधान्य दिलेले आहे. आज अशिया, आफ्रिका, अमेरिका, युरोप या वेगवेगळ्या भागात अनेक भारतीय शिक्षण,उद्योग,रोजगार यांच्या निमित्ताने त्या ठिकाणी स्थायिक झालेले आहेत. अनेक देशांमध्ये अनिवासी भारतीयांना काही वेळा अनेक बाबीचा त्रास सहन करावा लागतो. तो त्रास त्यांना होऊ नये या दृष्टिकोनातून त्यांच्या संरक्षणाची जबाबदारी करण्यास भारतीय परराष्ट्र धोरणामध्ये प्राधान्य देण्यात आलेले आहे.२०२२ मध्ये रशिया युक्रेन युद्धाच्या वेळी अनेक भारतीय विद्यार्थी युक्रेनमध्ये अडकले होते.भारत सरकारने युक्रेनमध्ये अडकलेल्या भारतीय विद्यार्थी व नागरिकांच्या सुटकेसाठी 'ऑपरेशन गंगा' ही मोहीम राबवून भारतीय विद्यार्थ्यांना व नागरिकांना सुखरूप मायदेशी आणलेले आहे.

**५. आशिया व आफ्रिकातील वसाहतवाद नष्ट करणे** :

भारत हा वसाहतवादाचा बळी ठरल्यामुळे भारतीयांची झालेली अवस्था लक्षात घेता आफ्रिकन व आशियाई देशांतील वसाहतवाद नष्ट करण्यासाठी मोठ्या प्रमाणात प्रयत्न केले आहेत.एकंदरीतच आशिया आफ्रिका खंडातील अनेक गुलाम राष्ट्रांना भारतीय स्वातंत्र्य लढ्या पासून प्रेरणा घेऊन वसाहतवादापासून स्वातंत्र्य मिळवण्याचे प्रयत्न केले आहेत.सोबतच आफ्रो आशियायी राष्ट्रांना संघटित करून त्यांच्या सामूहिक विकासासाठी प्राधान्य देण्याचं काम ही भारतीय परराष्ट्र धोरणाच्या माध्यमातून केल्या जात आहे. त्यातूनच आशिया आणि आफ्रिका खंडातील राष्ट्रांत सोबत मैत्रीचे आणि सहकार्याचे संबंध भारताने दृढ केल्याचे आपल्याला दिसून येते.

**६. शांतता व सहकार्याच्या माध्यमातून राजकीय प्रश्न सोडवणे** :

महाशक्तीचा उदय आणि त्यांचा जागतिक राजकारणावरील होणारा परिणाम पाहता त्यातून निर्माण होणारी अशांतता आणि अनेक राजकीय प्रश्न मोठ्या प्रमाणात निर्माण झाले या प्रश्नाच्या संदर्भात भारताने सुरुवातीपासूनच हे सर्व प्रश्न शांतता व सहकार्याच्या माध्यमातून सोडवण्याची भूमिका घेतलेली आहे.

एकंदरीतच भारतीय परराष्ट्र धोरणाची जी मूलभूत तत्वे आहेत त्या तत्त्वाला अनुसरूनच भारतीय परराष्ट्र धोरणाची उद्दिष्टे ठरवली जातात.

**सारांश :**

भारतीय परराष्ट्र धोरणाची रूपरेषा पाहतांना भारतीय परराष्ट्र धोरणावर वेगवेगळ्या विचार प्रवाहाचा मोठ्या प्रमाणात पगडा जाणवतो.स्वातंत्र्यपूर्व कालखंडात ब्रिटिश साम्राज्यवादाचा प्रभाव हा भारतीय परराष्ट्र धोरणावर राहिलेला आहे.भारतीय परराष्ट्र धोरण तयार करताना राष्ट्रीय काँग्रेस आणि राष्ट्रीय काँग्रेसच्या नेत्यांची भूमिका ही महत्त्वपूर्ण राहिलेली आहे. एकंदरीत जागतिक राजकारणाचा विचार करून भारताने आपल्या परराष्ट्र धोरणाची मूलभूत तत्वे विकसित केलेली आहेत.

**आपली प्रगती तपासा**

१.भारतीय परराष्ट्र धोरणाची वाटचाल स्पष्ट करा.

___________________________________________

___________________________________________

___________________________________________

___________________________________________

२. भारतीय परराष्ट्र धोरणाच्या मुलभूत तत्त्वांची चर्चा करा.

___________________________________________

___________________________________________

___________________________________________

___________________________________________

**१.४.५ उदारमतवादी टप्पा-नेहरू आणि अलिप्ततावाद** :

**१.४.५.१ नेहरूंचे परराष्ट्र धोरण**

व्यक्तिस्वातंत्र्याचा पुरस्कार करून व्यक्तीस जास्तीत जास्त स्वातंत्र्य मिळाले पाहिजे हा विचार डोळ्यासमोर ठेवून व्यक्तींची प्रतिष्ठा लक्षात घेता व्यक्तीवर लादलेली बंधने ही व्यक्ती विकासात नैसर्गिक न्याय तत्त्वाला अनुसरून नाहीत म्हणून परराष्ट्र धोरणात राष्ट्राच्या प्रतिष्ठा सोबतच व्यक्तीची प्रतिष्ठा महत्त्वाची आहे हे लक्षात घेऊन भारतीय परराष्ट्र धोरणाची आखणी पंडित नेहरूनी केलेली आहे.भारताच्या परराष्ट्र धोरणाचला आकार देताना मुख्यत्वे दुसऱ्या महायुद्धानंतरच्या आंतरराष्ट्रीय विकासाचा, साम्राज्यवादाच्या शक्तींचा कमकुवतपणा आणि लोकशाही आणि नवोदित राष्ट्राची होणारी वाढ व त्याचा आंतरराष्ट्रीय राजकारणावरील पडणारा प्रभाव ह्याचा विचार प्रामुख्याने नेहरू कालीन परराष्ट्र धोरणात



munotes.in

केलेला आहे.भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्षाने १९२०च्या दशकात शेजारील देशांशी सहकार्य प्रस्थापित करण्याची इच्छा व्यक्त करण्याचा ठराव स्वीकारला होता.पण त्यावेळी भारताची अंतर्गत परिस्थितीने त्यांनी आंतरराष्ट्रीय घडामोडींवर लक्ष देण्याची परवानगी दिली नाही.परंतु नेहरूंच्या प्रयत्नांमुळे विसाव्या दशकाच्या मध्यापासून काँग्रेस पक्ष आंतरराष्ट्रीय घडामोडींमध्ये रस घेऊ लागला.

काँग्रेसने स्वातंत्र्य आणि समतेच्या लढ्यात लोकसहभाग वाढवण्यावर भर दिला.तसेच जगभरातील वांशिक भेदभावाचा निषेध करण्याचे ठरवले. १९२७ नंतर नेहरूंनी काँग्रेसचे परराष्ट्र धोरण तयार करण्यात सक्रिय सहभाग घेतला होता.काँग्रेसच्यावतीने नेहरूंनी अनेक आंतरराष्ट्रीय परिषदांमध्ये भाग घेतला. ज्यामध्ये १९२६ मध्ये ब्रुसेल्स येथे झालेल्या एका परिषदेत साम्राज्यवादाशी लढा देण्याचे उद्दिष्ट घोषित केले होते.जवाहरलाल नेहरूंच्या नेतृत्वाखाली काँग्रेसने नव्याने मुक्त झालेल्या देशांना आणि साम्राज्यवादाविरुद्धच्या त्यांच्या संघर्षाला सतत पाठिंबा दिला.

स्वातंत्र्यानंतर नेहरू भारताच्या परराष्ट्र धोरणाचे शिल्पकार ठरले कारण त्यांच्या मार्गदर्शनाखाली आंतरराष्ट्रीय संबंधांच्या इतिहासात नवे धोरण राबवणारे भारत हे पहिले राष्ट्र बनले. १९४७ च्या सुरुवातीला, भारताच्या पुढाकाराने, दिल्ली येथे आशियाई परिषद भरवण्यात आली जिथे स्वतंत्र भारताच्या परराष्ट्र धोरणाची तत्त्वे घोषित करण्यात आली. यात २९ देशांचे प्रतिनिधी उपस्थित होते. परिषदेने सर्व आशियाई देशांची एकता मजबूत करण्यास मदत केली.नेहरूंनी १९५५ मध्ये बांडुंग येथे झालेल्या आफ्रो-आशियाई परिषदेतही भाग घेतला आणि तेथे अलिप्तवादाचे धोरण लोकप्रिय केले. आर्थिक आणि सांस्कृतिक सहकार्य, मानवी हक्क आणि आत्मनिर्णयाचा आदर आणि शेवटी जागतिक शांतता आणि सहकार्याचा प्रचार हा या परिषदांचा अजेंडा होता.

एकंदरीतच नेहरूंचे असंख्य प्रशंसक आणि समीक्षक मात्र एका गोष्टीवर सहमत आहेत ते म्हणजे नेहरू हे भारताच्या आंतरराष्ट्रीय संबंधांच्या आचरणात 'आदर्शवादी' होते. अँड्र्यू बी. केनेडी यांनी ऑक्सफर्ड हँडबुक ऑन इंडियन फॉरेन पॉलिसीमध्ये दिलेल्या योगदानात असा युक्तिवाद केला आहे की नेहरूंच्या जागतिक दृष्टिकोनात वास्तववाद आणि आदर्शवाद हे दोन्ही ही जोडले गेले आहेत.

आदर्शवाद हा नेहरूंच्या जागतिक दृष्टिकोनाचा एक मजबूत घटक होता.नेहरू सत्तेच्या राजकारणावर टीका करत होते. तसेच त्यांनी सामूहिक सुरक्षा व्यवस्था मजबूत आंतरराष्ट्रीय संस्थांद्वारे पार पाडण्याचे आवाहन ही केले होते. नेहरूंसाठी “एक जग” हे भारतासाठी महत्त्वाचे राष्ट्रीय ध्येय होते.त्याच वेळी नेहरूंनी अशिया उपखंडात भारतीय प्राबल्य ही कल्पना स्वीकारली. त्यांनी आशिया आणि हिंदी महासागरासाठी भारतीय "मोनरो सिद्धांत" बद्दल विचार केला. गोव्याला पोर्तुगीज राजवटीपासून मुक्त करण्यासाठी त्यांनी बळाचा वापर केल्याने पाश्चिमात्य देशांकडून बरीच टीका झाली, तर चीनसोबतच्या सीमा विवादाकडे त्यांचा दृष्टिकोन पाहता भारत-चीन संबंधांमध्ये न संपणारा त्रास ते सोडवू शकले नाहीत ही वस्तुस्थिती आहे. २०व्या शतकाच्या मध्यात आपण नेहरूंकडे दोन अतिशय भिन्न विचारप्रवाहांचे वारसदार म्हणून पाहिले पाहिजे.एकाला विस्तारित भारतीय राष्ट्रीय चळवळीतून वारसा मिळाला होता, जिथे 'आदर्शवादी' प्रवाह आणि 'नैतिक राजकारण' मोठ्या

प्रमाणावर होते.दुसरा ब्रिटिश राजवटीचा मुत्सद्दी वारसा होता, जो भारताच्या भू-राजकीय गरजांमध्ये रुजलेला होता. विशेषत: आशिया आणि हिंदी महासागरातील शेजारी देशांशी व्यवहार करताना भारताची धोरणे आखण्यात त्यांनी विशेष लक्ष दिलं आहे. याच काळात हिमालयातील संरक्षण व्यवस्था सुरू ठेवण्याचा नेहरूंच्या निर्णयाने तिबेटचा ताबा घेणाऱ्या नव्या एकात्म चीनच्या सामर्थ्यामध्ये समतोल राखण्याची गरज दिसून आली. १९५०च्या दशकाच्या उत्तरार्धात जेव्हा चीनशी संबंध तुटण्यास सुरुवात झाली,तेव्हा नेहरूंनी सोव्हिएट रशियाशी कायमस्वरूपी संरक्षण संबंधांचा पाया घातला आणि सुरक्षा भागीदारीसाठी अमेरिकेशी संपर्क साधला.

**१.४.६ पंडित नेहरूंच्या परराष्ट्र धोरणांची वैशिष्ट्ये** :

- आदर्शवादी विचारासोबतच नैतिक मूल्यांना महत्त्व देण्यात आले.
- पंडित नेहरुंच्या परराष्ट्र धोरणामध्ये हितसंबंधाच्या रक्षणापेक्षा विचारसरणीला अधिक महत्त्व दिले गेले. त्यामुळे पंडित नेहरुंचे परराष्ट्र धोरण हे लोकशाही समाजवादाच्या तत्त्वावर उभे राहिले आहे.
- पंडित नेहरूंच्या परराष्ट्र धोरणामध्ये राष्ट्रीय सुरक्षेप्रमाणेच मानवी सुरक्षेला अधिक महत्त्व होते.
- नेहरूंच्या परराष्ट्र धोरणामध्ये देशांच्या सीमारेषा संरक्षित करण्याबरोबरच माणसाच्या मूलभूत गरजा अन्न, वस्त्र, निवारा यांच्या संदर्भातही परराष्ट्र धोरण परिपूर्ण करणे यावर त्यांचा भर राहिला आहे.
- नेहरुंनी आपल्या परराष्ट्र धोरणामध्ये संरक्षण सज्जता सोबतच आर्थिक विकासाला मोठ्या प्रमाणात प्राधान्य दिलेले आहे.
- नेहरूंनी जगातील लोकशाही, धर्मनिरपेक्ष असणाऱ्या राष्ट्रांबरोबर भारताचे संबंध दृढ करण्यावर भर दिला.
- नेहरूंच्या परराष्ट्र धोरणामध्ये केवळ भारतीय परराष्ट्र धोरणाचाच विचार केला गेला नाही तर भारतीय परराष्ट्र धोरणाच्या माध्यमातून आशिया खंडातील राजकारण कसे साधता येईल, सोबतच आशियाचे नेतृत्व भारताने करावे याचाही विचार नेहरूंच्या परराष्ट्र धोरणामध्ये प्रामुख्याने केलेला आहे.
- पंडित नेहरूंनी परराष्ट्र धोरणामध्ये अलिप्तवादी धोरणाचा स्विकार केला आहे .
- पंडित नेहरूंच्या परराष्ट्र धोरणामध्ये पंचशील तत्त्व हे अत्यंत महत्त्वपूर्ण असून याद्वारे जागतिक शांतता निर्माण करण्याचे उद्दिष्ट होते .
- वंशभेदाला विरोध करणे,साम्राज्यवादाला विरोध करणे,निःशस्त्रीकरण, दक्षिण दक्षिण सहकार्य यावर भर देण्याचे मूलभूत तत्वे नेहरूंनी परराष्ट्र धोरणात अंगीकारले आहेत.
- पंडित नेहरुंनी आपल्या परराष्ट्र धोरणाच्या माध्यमातून आशिया आफ्रिका व अमेरिका या तिसऱ्या जगातील राष्ट्रांचे हितसंबंध जोपासण्यासाचे काम मोठ्या प्रमाणात केले आहे.

munotes.in

- सत्ता संघर्षाच्या काळात महासत्ताकडून निर्माण झालेल्या शीतयुद्धजन्य परिस्थितीचा विचार करता जगात निर्माण होणाऱ्या वेगवेगळ्या लष्करी संघटना, त्यातून केली जाणारी महासत्तांच्या सत्ता संघर्षाच्या ध्रुवीकरणाचा विरोध करण्याचे काम नेहरूच्या परराष्ट्र धोरणाने मोठ्या प्रमाणात केले आहे.

- नेहरूंचे परराष्ट्र धोरण हे शांतता, विकास, निशस्त्रीकरण आणि परस्परावलंबित्व या चार घटकांवर अवलंबून आहे.

### १.४.६.१ पंडित नेहरूंच्या परराष्ट्र धोरणांतील नकारात्मक बाजू :

जॉन एफ केनेडी त्यांच्या सहाय्यकांना म्हणायचे की घरगुती घडामोडींतील चूकीतुन काही जीव जाऊ शकतात. परंतु परराष्ट्र व्यवहारातील चूक संपूर्ण राष्ट्राचा नाश करू शकते. केनेडी अर्थातच अण्वस्त्रांवर विचार करत होते. परंतु परराष्ट्र व्यवहारातील चुकीच्या निर्णयांमुळे कधीही भरून न येणारे नुकसान होऊ शकते, असे त्यांच्या विचाराचे सार आहेत. त्यामुळे, केनेडीचे मापदंड लागू करायचे झाल्यास, नेहरूंच्या परराष्ट्र धोरणात काही चुका झाल्या आहेत का? याचे उत्तर ही आपल्याला तपासणे गरजेचे आहे.नेहरुंच्या परराष्ट्र धोरणाची उद्दिष्टे पाहता नेहरुंनी आपल्या परराष्ट्र धोरणाच्या माध्यमातून भारताची आंतरराष्ट्रीय राजकारणात एक स्वतंत्र अस्तित्वाची प्रतिमा निर्माण केली हे खरे असले तरी नेहरुंच्या परराष्ट्र धोरणावर काहीवेळा टीका केली जाते. त्यामुळे नेहरूंच्या परराष्ट्र धोरणाच्या नकारात्मक बाजूवर ही आपल्याला चर्चा करणे क्रमप्राप्त ठरते.

- परराष्ट्र धोरण निर्माण करणे ही एक संस्थात्मक प्रक्रिया आहे. त्यामुळे परराष्ट्र धोरण निर्माण करताना देशातील विविध घटकांचा विचार करून त्यांना सहभागी करून घेणे क्रमप्राप्त असते. एकंदरीतच देशातील परिस्थितीचा विचार करता देशात असलेले वेगवेगळे विचार समूह, सामाजिक समूह, दबावगट,लोकमत यांच्या इच्छा-आकांक्षाचे प्रतिबिंब हे परराष्ट्र धोरणात उमटणे गरजेचे आहे. त्यामुळे परराष्ट्र धोरण ठरवतांना परराष्ट्र धोरण ठरवणारी यंत्रणा ही एक संस्थात्मक यंत्रणा असते. पण नेहरूच्या काळात या संस्थात्मक यंत्रणेचा फारसा विचार न करता भारतीय परराष्ट्र धोरणावर पंडित नेहरूंचाच प्रभाव राहिलेला आहे. त्यामुळे एकंदरीतच भारतीय परराष्ट्र धोरण हे संस्थावादी न होता नेहरूवादी झाल्याचे दिसून येते.

- जागतिक पातळीवर आंतरराष्ट्रीय राजकारणामध्ये आपले अस्तित्व निर्माण करण्यासाठी प्रत्येक राष्ट्राला परराष्ट्र धोरण आखताना देशाच्या तत्कालीन परिस्थितीचा विचार करावा लागतो. देशातील तत्कालीन परिस्थितीचा विचार करता देशातील अंतर्गत परिस्थितीसाठी एक वेगळी भूमिका आणि आंतरराष्ट्रीय पातळीवर एक वेगळी भूमिका अशा दोन वेगवेगळ्या भूमिका प्रत्येक राष्ट्राला निश्चित कराव्या लागतात. आज जागतिक पातळीचा विचार करता अमेरिका, चीन ह्याच्या परराष्ट्र धोरणाच्या संदर्भात विचार करता हे देश परराष्ट्र धोरणाच्या संदर्भात जागृत असल्याचे दिसून येते.त्या दृष्टिकोनातून परराष्ट्र धोरणाच्या संदर्भात भारतही जागृत आहे. पण भारत परराष्ट्र धोरण आखताना भारतातील अंतर्गत परिस्थितीचा सारासार विचार करूनच आपले परराष्ट्र धोरण ठरवताना दिसते. त्यामुळे भारताच्या परराष्ट्र धोरणात अंतर्गत धोरण आणि परराष्ट्र धोरण यांची घुसळण झाल्याचे चर्चेला नेहमीच येते.

त्यामुळेच अंतर्गत राजकारणाचा विचार करता भारताला भारत-पाकिस्तान, भारत-बांगलादेश सारख्या अनेक समस्यांना तोंड द्यावे लागले आहे.

- परराष्ट्र धोरण ठरवतांना सुरक्षा धोरण यशस्वीपणे राबविण्याच्या नेहरूंच्या क्षमतेची पहिली चाचणी स्वातंत्र्यानंतर दोन महिन्यांनी झाली, जेव्हा पाकिस्तानने काश्मीरवर हल्ला केला. नेहरू हे वास्तववादी नसून आदर्शवादी होते हे उघड झाले. त्यांच्या आदर्शवादी आंतरराष्ट्रीयवादामुळेच त्यांनी १९४८ मध्ये युद्धविराम करण्याचे आदेश दिले आणि प्रकरण संयुक्त राष्ट्राकडे नेले. नेहरूंनी युद्धविरामाचा आदेश दिल्याने सशस्त्र दलांनीही नाराजी व्यक्त केली. त्याला संयुक्त राष्ट्राकडून अनुकूल प्रतिसादाची अपेक्षा होती कारण काश्मीर भारतात सामील झाल्यापासून पाकिस्तान आक्रमक होता. नेहरू विसरले होते की संयुक्त राष्ट्र संघ ही एक राजकीय संस्था आहे ते न्यायालय नाही. म्हणून प्रचलित शीतयुद्धाच्या परिस्थितीचा विचार करता संयुक्त राष्ट्राची सुरक्षा परिषद अमेरिकेशी जुळवून घेतलेल्या पाकिस्तानला आक्रमक म्हणून पाहण्यास तयार नव्हती.हे केवळ नेहरुंच्या आदर्शवादामुळे झाले आहे ही नेहरुंच्या परराष्ट्र धोरणाची चूक होती अशीही टीका नेहरुंच्या परराष्ट्र धोरणावर केली जाते.

- नेहरू अहिंसा, शांतता आणि सहिष्णुतेच्या गांधीवादी विचारसरणीसाठी वचनबद्ध होते, तर चीन स्वत: ला  अविकसित देशातून एक मजबूत, सैन्यदृष्ट्या शक्तिशाली निरंकुश राज्य बनवू पाहत असताना नेहरूंनी चीनवर विश्वास ठेवला.चीन स्वत:च्या राष्ट्रहिताच्या पूर्ततेसाठी मैत्री चिरडून टाकू शकतो हा विचारही नेहरूंच्या मनात आला नाही.सरदार वल्लभभाई पटेल यांनी चीनवर विश्वास ठेवू नका, असा स्पष्ट इशारा दिला होता. चीनने सुरुवातीपासूनच आपला प्रभाव वाढवण्याचा निर्धार केला होता. एक कट्टरपंथी, क्रांतिकारी राष्ट्र आंतरराष्ट्रीय राजकारणात लढाऊ शक्ती वापरण्यास इच्छुक आहे, तर भारताने मध्यस्थी, अलिप्तता आणि शांततापूर्ण राहण्याचा अधिक रचनात्मक मार्ग निवडल्यामुळे चीन सारख्या राष्ट्राशी नेहमीच देशाच्या सीमा सुरक्षित ठेवताना मोठ्या प्रमाणात काळजी घ्यावी लागते याचा दोष नेहरुंच्या परराष्ट्र धोरणाला दिला जातो.

- अणुऊर्जा आणि शस्त्रांच्या विकासाच्या क्षेत्रात नेहरूंनी विज्ञान आणि तंत्रज्ञानाचा पाया घातला. परंतु शांतता आणि अहिंसेवरील त्यांचा दृढ विश्वास त्यांना आण्विक निःशस्त्रीकरण स्वीकारण्यास प्रवृत्त करताना दिसतो.अण्वस्त्र निशस्त्रीकरणाचे धोरण त्यांनी कधीच बदलले नाही.चीनने ऑक्टोबर १९६४ मध्ये आण्विक चाचण्या घेतल्यानंतर, भारतानेही त्याचे अनुकरण केले असते, तर ते अण्वस्त्र नसलेले देश म्हणून स्वाक्षरी करण्याऐवजी १९६८ मध्ये एनपीटीचे सदस्य झाले असते. म्हणजेच नेहरूंनी निशस्त्रीकरणाच्या संदर्भातच जोर दिल्यामुळे चीनसारखा देश अण्वस्त्र संपन्न झाला ही नेहरूच्या परराष्ट्र धोरणाची चूक होती असे नेहरुंच्या परराष्ट्र धोरणावर टीका केली जाते.

- नेहरुंनी आपल्या परराष्ट्र धोरणामध्ये सर्वसमावेशकतेचे तत्त्व स्वीकारल्यामुळे पाकिस्तानबद्दलच्या त्यांच्या मवाळ दृष्टिकोनामुळे मंत्रिमंडळातील अनेक ज्येष्ठ सदस्य नाराज झाले होते परिणामी श्याम प्रसाद मुखर्जी आणि निओगी यांनी जून १९५० मध्ये राजीनामा दिला.कारण त्यांना असे वाटत होते की की राष्ट्राने महत्त्वाच्या राष्ट्रीय

हितसंबंधांची देवाणघेवाण करू नये. डॉ बी.आर आंबेडकर हे परराष्ट्र धोरणातील अपयशाचे कारण सांगून राजीनामा देणारे आणखी एक मंत्रिमंडळ सदस्य होते. त्यामुळे डॉ. बी. आर आंबेडकर, श्याम प्रसाद मुखर्जी सारखे सहकारी त्यांना गमवावे लागली अशी ही त्यांच्या परराष्ट्र धोरणावर टीका केली जाते.

- परराष्ट्र धोरण ठरवत असताना परराष्ट्र धोरणाची जी मार्गदर्शक तत्वे असतात त्या तत्त्वाचा विचार करता भारतीय परराष्ट्र धोरण हे नेहरू काळात वास्तववादी न होता आदर्शवादी राहिल्याचे दिसून येते अशी ही नेहरूंच्या परराष्ट्र धोरणावर टीका केली जाते. कारण आंतरराष्ट्रीय राजकारणात व्यवहार करताना राष्ट्रहित जोपासण्यासाठी वास्तविकतेवर भर देणे गरजेचे असते. परंतु नेहरूंनी राज्यघटनेतील स्वातंत्र्य, समता, बंधुता या आदर्शवादी तत्त्वाचा विचार आपले परराष्ट्र धोरण आखताना केलेला आहे. त्यामुळे परराष्ट्र धोरण आखताना नेहरुंनी केवळ आदर्शवादी मूल्यावरच भर दिलेला आहे. एकंदरीतच ही आदर्शवादी मूल्य अंतर्गत राजकारणासाठी उपयुक्त आहेत.

- नेहरूंना आशिया खंडाचे नेतृत्व करण्याची जी एक देशाची आदर्शवादी प्रतिमा तयार केली ती प्रतिमा ही स्वप्न रंजक असल्याचे दिसून येते. कारण  ज्यावेळी आपणास आशिया खंडाचे नेतृत्व करायचे असते त्यावेळेस नेतृत्व करत असताना केवळ आदर्शवादी विचाराचा विचार करून चालत नाही तर आंतरराष्ट्रीय राजकारणातील वास्तविक परिस्थितीचा अंदाज घेऊन आपले धोरण आखावे लागते यात नेहरू कुठेतरी कमी पडले अशी नेहरूंच्या भारतीय परराष्ट्र धोरणावर टीका होते.

- नेहरूंच्या परराष्ट्र धोरणाचे मुख्य सूत्र म्हणजे अलिप्ततावाद हे होते. एकंदरीतच अलिप्ततावादामुळे आंतरराष्ट्रीय राजकारणात भारताची प्रतिष्ठा जरी वाढली असली तरी अलिप्ततावादामुळे भारताच्या सामारिक हितसंबंधांची जपणूक आणि संरक्षित होणारी नव्हती. कारण राष्ट्रीय हितसंबंध हे आंतरराष्ट्रीय राजकारणात अलिप्त राहून ते जोपासता येत नाहीत तर त्यासाठी प्रत्यक्षात राष्ट्रीय हितसंबंध जोपासण्यासाठी वास्तववादी भूमिका घेऊन आंतरराष्ट्रीय परिस्थितीचा विचार करून धोरण आखावे लागते या ही धोरणात नेहरू कुठेतरी कमी पडले अशी नेहरुंच्या परराष्ट्र धोरणावर टीका केली जाते.

### १.४.७ अलिप्ततावाद

अलिप्तता हे दुसऱ्या महायुद्धानंतर उदयास आलेला आंतरराष्ट्रीय राजकारणाती एक महत्त्वाचा सिद्धांत आहे.शीतयुद्धाच्याकाळात जगातील भांडवलशाही आणि साम्यवादी विचाराच्या दोन महासत्ताशी  औपचारिकपणे जुळवून  न घेण्याचा प्रयत्न करणाऱ्या राज्यांची चळवळ म्हणून अलिप्ततावादाकडे पाहिल्या जाते.तत्कालीन युगोस्लाव्हियाचे अध्यक्ष जोसिप ब्रोझ टिटो यांच्या पुढाकाराने,शीतयुद्धादरम्यान अलिप्ततावाद चळवळीची स्थापना झाली असली तरी इजिप्तचे तत्कालीन राज्यप्रमुख आणि सरकार प्रमुख गमाल अब्देल नासेर, घानाचे क्वामे एनक्रुमा, भारताचे  पंडित जवाहरलाल नेहरू, इंडोनेशियाचे अहमद सुकर्णो आणि युगोस्लाव्हियाचे जोसिप ब्रोझ टिटो यांनी महत्त्वाची भूमिका बजावली होती, जे नंतर संस्थापक झाले. अलिप्ततावादाचा  मुळ उद्देश म्हणजे दोन्ही महासत्ता पासून आपले अस्तित्व

स्वतंत्र किंवा तटस्थ ठेवणे हा आहे. इंडोनेशिया येथे झालेल्या आशिया-आफ्रिका बांडुंग परिषदेत झालेल्या चर्चेदरम्यान या गटाची मूळ संकल्पना १९५५ मध्ये पुढे आली. त्यानंतर, ५-१२ जून १९६१ या कालावधीत कैरो, इजिप्त येथे झालेल्या परिषदेत सहभागींनी अलिप्ततावाद धोरणाच्या उद्दिष्टांवर चर्चा करून अलिप्ततावादी चळवळीचे पुढील उद्दिष्ट ठरवण्यात आले आहेत.

- वेगवेगळ्या राजकीय आणि सामाजिक व्यवस्थेसह राज्यांच्या सहअस्तित्वावर आधारित आणि असंलग्नतेवर आधारित स्वतंत्र धोरण देशाने स्वीकारले पाहिजे किंवा अशा धोरणाच्या बाजूने कल दर्शविला पाहिजे.
- राष्ट्रीय स्वातंत्र्याच्या चळवळींना संबंधित देशाने सातत्याने पाठिंबा दिला पाहिजे.
- महासत्तांनी स्थापन केलेल्या बहुपक्षीय लष्करी संघटनांचा सदस्य होऊ नये.
- अलिप्ततावादात शांततेसाठी सक्रीय प्रयत्न केले जातील.
- शीतयुद्ध बंद करण्यासाठी प्रयत्न करणे.
- कोणत्याही अटी न स्वीकारता वसाहतवाद नष्ट करण्यासाठी प्रयत्न करणे.
- परकीय सैन्यास वसाहती सोडून जाण्यास भाग पाडणे.
- अलिप्ततावादी राष्ट्रांच्या आर्थिक स्थिती सुधारण्याचा प्रयत्न करणे.
- वसाहतवाद साम्राज्यवादाखली दबलेल्या राष्ट्राच्या स्वातंत्र्य चळवळीच्या आंदोलनास पाठिंबा देणे.
- राष्ट्रीय स्वयं निर्णयाचा हक्क सर्व राष्ट्रांना उपलब्ध करून देणे.
- वर्णभेदाच्या धोरणाचा विरोध करणे.
- प्रत्येक राष्ट्राच्या स्वातंत्र्य व सार्वभौमत्वचा आदर करणे.
- निशस्त्रीकरणाच्या कामास सहकार्य करणे.
- अनुशक्तीचा शांततेसाठी उपयोग करणे.
- परकीय राज्यांचे सैनिकी तळ नष्ट करणे.
- अलिप्ततावादातुन जागतिक राजकारणात असा एक स्वतंत्र मार्ग तयार करणे अपेक्षित होते ज्यामुळे सदस्य राष्ट्रे प्रमुख शक्तींमधील संघर्षात प्यादे बनणार नाहीत.
- आंतरराष्ट्रीय आर्थिक व्यवस्थेची मांडणी नव्याने करणे.
- आपल्या आर्थिक विकासासाठी भांडवल व तांत्रिक कौशल्य दोन्ही गटाकडून प्राप्त करणे.

अलिप्ततावादी राष्ट्रांची पहिली शिखर परिषद सप्टेंबर १९६१ मध्ये बेलग्रेड, युगोस्लाव्हिया येथे झाली.अलिप्ततावाद चळवळीत निर्णय सर्वसंमतीने घेतले जातात.प्रत्येक शिखर परिषदेत, एक नवीन राज्य प्रमुख अलिप्ततावादाचा अध्यक्ष बनतो आणि पुढील शिखर

munotes.in

परिषदेपर्यंत ते स्थान स्वीकारतो. अलिप्ततावादाची तत्त्वे आणि क्रियाकलापांना चालना देण्यासाठी अध्यक्ष जबाबदार आहेत.

**१.४.७.१ अलिप्तवादी चळवळीचे प्रमुख कार्य गट** :

अलिप्ततावादी चळवळीचे कार्य गट, संपर्क गट, आणि समित्या आवश्यक तितक्या वेळा एकमेकांची भेट घेऊन सहकार्य करतात.

- संयुक्तराष्ट्रा सोबत काम करण्यासाठी उच्च-स्तरीय कार्य गट.
- मानवाधिकारां वर्किंग ग्रुप
- शांततेसाठी वर्किंग ग्रुप
- कार्यपद्धती ठरवण्यासाठी मंत्री समिती
- नोकरशहाचा कार्य गट
- नि:शस्त्रीकरणासाठी वर्किंग ग्रुप
- सुरक्षा परिषद
- आर्थिक सहकार्यासाठी कृती कार्यक्रमाचे समन्वयक देश; आणि आर्थिक सहकार्यासाठी स्थायी मंत्रिस्तरीय समिती
- वेगवेगळ्या राष्ट्रासाठी टास्क फोर्स
- संयुक्त समन्वय समिती ७७ सदस्यांचा समूह आंतरराष्ट्रीय समुदायातील विकसनशील देशांच्या हितसंबंधांमध्ये समन्वय साधण्यासाठी आणि त्यांना प्रोत्साहन देण्यासाठी न्यूयॉर्कमध्ये नियमितपणे भेटत असते तिची स्थापना १९९४ मध्ये झाली.
- शिखर परिषद, मंत्री परिषदाचे आयोजन

अलिप्ततावादी चळवळ ही प्रामुख्याने नवोदित राज्याचा आर्थिक विकास घडवून आणणे व राजकीय स्वातंत्र्य कायम ठेवणे या तत्त्वावर आधारलेली आहे.आशिया, आफ्रिका आणि लॅटिन अमेरिकेतील बहुतेक नव्याने स्वातंत्र्य मिळालेल्या राज्यांच्या परराष्ट्र धोरणाचा दृष्टीकोन आणि तसेच अलिप्ततावादी चळवळ ही आंतरराष्ट्रीय संबंधांचा एक महत्त्वाचा घटक होता.अलिप्ततावादी चळवळीमुळे जागतीक शांततेचा प्रयत्नांना मजबूत करता आले. साम्राज्यवाद वसाहतवाद, वंशवादाच्या विरुद्ध लढा देता आला. साम्राज्यवादाने वसाहतवाद आणि वसाहतीतील लोकांशी केलेल्या अन्याय पूर्ण करारांना अलिप्तवादी चळवळीमुळे विरोध करता आला.सोबतच अलिप्तपदी राष्ट्रांनी संयुक्त राष्ट्राला वेळोवेळी सहकार्य केलेले आहे. तसेच अलिप्ततावादी चळवळीमुळे नवीन आर्थिक व्यवस्थेची मागणी केल्यामुळे विकसनशील राष्ट्रांच्या आर्थिक उन्नतीवर भर देण्यास अलिप्ततावादी राष्ट्रांना यश मिळाले आहे.एकंदरीतच अलिप्ततावादी चळवळीने शीतयुद्ध परिस्थिती आणि जगात निर्माण झालेली द्विध्रुवी महासत्ताच्या सत्ता संघर्षापासून नवोदित स्वतंत्र राष्ट्रांना स्वतंत्र ठेवून त्यांचे अस्तित्व कायम ठेवले आहे.

### १.४.७.२ अलिप्ततावाद धोरण आणि भारत

द्वितीय विश्वयुद्धाच्या समाप्तीनंतर आणि शीतयुद्धाच्या सुरुवातीच्या काळात अनेक देशांना भांडवलशाही व साम्यवादी या दोन विचारधारांच्या नेतृत्वाखालील गटांमध्ये बाजू घेण्यास भाग पाडले गेले. अशा वेळी या दोन महासत्तांच्या संघर्षात एका महासत्तेची बाजू घेणे भारताच्यादृष्टीने संयुक्त नव्हते. म्हणून भारताने पर्यायाने पंडित नेहरूंनी अलिप्तता धोरणाचा स्वीकार केला.अलिप्ततेच्या धोरणासमुळे भारताला महासत्ता राष्ट्रांद्वारे खेळल्या जाणाऱ्या पॉवर गेम्सपासून समान अंतरावर राहण्यास मदत झाली. तसेच कृषी, शिक्षण, लष्करी आणि अन्नधान्य या क्षेत्रातील विकासासाठी स्वत: च्या गरजांसाठी दोन्ही बाजूंनी भारताला फायदा झाला. जसजसा भारत स्वावलंबी होऊ लागला तसतसे देशाच्या भविष्यासाठी व गुंतवणूक करण्यासाठी दोन्ही शक्तींची गरज भारताला होतीच. त्याच पद्धतीने हिंद महासागर हे राजकीय व सैनिक हालचालीसाठी एक महत्त्वाचं क्षेत्र बनलेले असताना, महाशक्तीच्या अण्वस्त्र सज्ज नौकांमुळे हिंद महासागरात अनेक वेळा तणावाची परिस्थिती निर्माण झाली, त्याचा विशेषता आंतरराष्ट्रीय राजकारणावर आणि भारतावर मोठा परिणाम झाल्याचे आपणास दिसून येते. अशा परिस्थितीत अलिप्त राष्ट्रानी हिंद महासागर हे क्षेत्र शांततेचा क्षेत्र असावे अशी मागणी वेळोवेळी केलेली आहे. भारताने स्वीकारलेल्या अलिप्ततेचा संदर्भात नेहरू स्पष्ट म्हणतात की अलिपता म्हणजे तटस्थता नव्हे. आमच्या स्वातंत्र्यास ज्यावेळी धोका निर्माण झाला असेल अशा वेळी आम्ही तटस्थ राहणार नाही म्हणून आमची अलिप्तता ही निष्क्रिय तटस्थता नाही. याची प्रचिती नेहरूंनी वेळोवेळी करून दिलेली आहे.१९६२च्या चीन युद्धाच्या वेळी भारताने पाश्चात्य राष्ट्राकडून शस्त्रास्त्रांची मदत घेतली. १९६५ च्या वेळी रशियाने सुरक्षा मंडळात भारताच्या बाजूने व्हेटोचा वापर केला. १९७१मध्ये भारत व रशिया यांच्या मध्ये वीस वर्षाचा भारत-रशिया मित्रत्वाचा करारही करण्यात आला.शीतयुद्धाचा अंत आणि सोव्हिएत युनियनच्या पतनाने अलिप्ततावादी चळवळीची मूळ भूमिका बदलत जाऊ लागली. कारण १९९१ नंतर युनायटेड स्टेट्स ऑफ अमेरिका ही एकमेव महासत्ता बनली.अमेरिकेने सुरुवातीपासून भारताबद्दल संशय व्यक्त केला असला तरी सोव्हिएट युनियन भारताचा कट्टर समर्थक असल्याचे सिद्ध झाले आहे. म्हणून भारताच्या अलिप्ततावादी धोरणावर अनेक वेळा टीका करण्यात आलेली आहे. परंतु संकटकाळी परकीय मदत घेऊनही भारताने कोणत्याही अटी लादून घेतल्या नाहीत किंवा परकीययांना आपल्या भूमीवर सैन्यतळ स्थापन करू दिले नाही हे केवळ अलिप्ततेच्या धोरणामुळे शक्य झाले. नेहरू आणि नंतर इंदिरा गांधी यांनी सोव्हिएट युनियनशी विशेष संबंध जोपासले ज्यामुळे भारताला मदत झाली. १९७१च्या भारत-पाकिस्तान युद्धादरम्यान सोव्हिएट युनियनसोबत केलेले सामरिक सहकार्य विसरता येणार नाही.सोव्हिएट युनियनच्या समाप्तीनंतर, रशियाने भारतासोबतचे आपले उबदार संबंध चालू ठेवले, तरीही त्याने अमेरिकेसोबत भारताच्या वाढत्या भागीदारीबद्दल चिंता व्यक्त केली. जागतिक पातळीवर अण्वस्त्र निर्मितीची स्पर्धा लागली होती त्या स्पर्धेतून जागतिक शांतता धोक्यात आली. त्यावेळी अण्वस्त्र निर्मितीवर मर्यादा याव्यात यासाठी अनेक करार करण्यात आले. प्रामुख्याने १९९६ मध्ये सर्वसमावेशक चाचणी प्रतिबंधात्मक करार (सीटीबीटी) चा भारताने विरोध केलेला आहे. त्यामुळे सिटीबीटीवर स्वाक्षरी करण्यासाठी भारतावर अमेरिकेकडून दबाव येऊनही भारताने स्वाक्षरी केली नाही हे सुद्धा अलिप्ततावादी धोरणामुळे शक्य झाले. २००८ मध्ये यूएसएने भारतासोबत आण्विक करारावर स्वाक्षरी केल्यामुळे रशिया एक विश्वासू मित्र म्हणून बाजूला गेला असला तरीही रशिया भारताचा सर्वात मोठा

शस्त्रास्त्र पुरवठादार बनला होता हे नाकारून चालणार नाही.काश्मीरबाबत भारताच्या भूमिकेला रशियाचा अढळ पाठिंबा आहे. तैवान, दक्षिण चीन समुद्र, लडाख आणि अरुणाचल प्रदेशात चीनचे रशियन आक्रमण आणि रशियाच्या आक्रमणावर इतर देशांच्या प्रतिक्रियेवर चीन बारकाईने लक्ष ठेवून असतो अशा परिस्थितीत भारताला चीन आणि पाकिस्तानच्या दुहेरी धोक्याच्या विरोधात रशियाच्या पाठिंब्याची गरज आणि मदतही वेळोवेळी मिळालेली आहे हेच भारताच्या तत्कालीन अलिप्ततावादी धोरणाची यश म्हणता येईल.नेहरूंच्या असंलग्न चळवळीची मुख्य तत्त्वे भारताला पुन्हा स्वतंत्र राहण्यासाठी, कोणत्याही प्रस्थापित किंवा उदयोन्मुख महासत्तेशी अलिप्त राहण्यासाठी, परंतु मित्रत्वाची भूमिका निभावण्यासाठी सर्व देशांशी मैत्री करण्याचे संकेत देतात.एका जागतिक महासत्तेशी एकतर्फी सोबत साधून राहणे हे तत्कालीन परिस्थितीचा विचार करता भारतासाठी प्रतिकूल राहिले असते. कारण महासत्ता स्वार्थासाठी हेराफेरी करतात.

शीतयुद्धाच्या काळात चळवळीची लोकप्रियता आणि त्याची वाढती सदस्यता असतानाही द्विध्रुवीय सत्ता संघर्षाने आंतरराष्ट्रीय राजकारणाच्या प्रत्येक पैलूना आकार दिला. शीतयुद्धाने वेगवेगळ्या राष्ट्रांना विचारसरणीच्या आधारावर विभागले.द्विध्रुवीय सत्ता संघर्षात देशांतर्गत राजकारण, आंतरराज्य संघर्ष, संसाधने, युद्धे आणि उद्योग यासह जवळजवळ सर्व गोष्टींचा समावेश होतो.दक्षिण आशियामध्ये, काश्मीरमधील संघर्ष या द्विध्रुवीय दृष्टीकोनातून देखील पाहिला गेला.एक गट काश्मीरमधील संघर्षाबाबत भारतीय भूमिकेचे समर्थन करतो, तर दुसरा गट पाकिस्तानच्या भूमिकेचे समर्थन करतो.संयुक्त राष्ट्र संघ आंतरराष्ट्रीय शांतता आणि सुरक्षेचा सर्वोच्च संरक्षक मानला जात असला तरी काश्मीर संघर्षाच्या राजकारणाचा रंगमंच म्हणून वापरला गेला आहे.

भारताचे परराष्ट्र व्यवहार मंत्री, एस. जयशंकर यांनी काही दिवसांपूर्वी संसदेत केलेले वक्तव्य हे युक्रेनमधील युद्धाबाबत भारताचे असंलग्न धोरण प्रतिबिंबित करते. जयशंकर यांनी सहा तत्त्वे स्पष्ट केली, ज्यात शत्रुत्वाची तात्काळ समाप्ती, संवाद आणि मुत्सद्देगिरीवर भर, आंतरराष्ट्रीय सुव्यवस्था आणि संयुक्त राष्ट्रांसारख्या संस्थांचा आदर, प्रत्येक राष्ट्राच्या सार्वभौमत्वाचा आणि प्रादेशिक अखंडतेचा आदर, मानवतावादी सहाय्य आणि शांतता प्रस्थापित म्हणून भारताची भूमिका यांचा समावेश होतो. गेल्या काही दिवसांत भारताने अमेरिका, ब्रिटन, रशिया आणि चीनचे नेते नवी दिल्लीला जाताना पाहिले, जे भारताच्या वाढत्या प्रभावाचे प्रतीक आहे. भारतीय नेतृत्वाने हे स्पष्टपणे मांडलेले दिसते की भारत आपले राष्ट्रीय हित वैचारिक विचारांपुढे ठेवणार आहे.

एकंदरीतच सात दशकांपूर्वी आणि आताच्या भारताच्या असंलग्नतेमध्ये फरक आहे. कारण आज भारताची पूर्व स्थिती राहिलेली नाही. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर तत्कालीन परिस्थितीचा विचार करता भारत राजकीय आणि आर्थिकदृष्ट्या कमकुवत होता, परंतु २१ व्या शतकातील भारत कमकुवत नाही ही वस्तुस्थिती आहे. म्हणूनच आज शांततापूर्ण परराष्ट्र धोरणाचा वारसा असलेला एक शक्तिशाली देश म्हणून, भारतामध्ये युक्रेनमध्ये शांतता प्रस्थापित करण्यासाठी सकारात्मक भूमिका बजावण्याची क्षमता आहे.

**सारांश**

भारतीय परराष्ट्र धोरणांवर नेहरूंचा मोठा प्रभाव राहिलेला आहे.त्यामुळे भारताच्या परराष्ट्र धोरणाचे शिल्पकार म्हणून पंडित नेहरूना ओळखल्या जाते. पंडित नेहरूनी परराष्ट्र धोरणात आदर्शवादी विचारासोबतच नैतिक मूल्यांना महत्त्व देण्यात आले.पंडित नेहरुंच्या परराष्ट्र धोरणामध्ये हितसंबंधाच्या रक्षणापेक्षा विचारसरणीला अधिक महत्त्व दिले गेले. त्यामुळे पंडित नेहरुंचे परराष्ट्र धोरण हे लोकशाही समाजवादाच्या तत्त्वावर उभे राहिले आहे.पंडित नेहरूंच्या परराष्ट्र धोरणामध्ये राष्ट्रीय सुरक्षेप्रमाणेच मानवी सुरक्षेला अधिक महत्त्व होते. तसेच आंतरराष्ट्रीय राजकारणात वावरताना भारताने अलिप्तवादांचा पुरस्कार केला हे ही महत्त्वाचे आहे.

**आपली प्रगती तपासा**

1. पंडित नेहरूंच्या परराष्ट्र धरणाची भूमिका स्पष्ट करा.

२. अलिप्ततावाद चळवळीची प्रासंगिकता स्पष्ट करा?

## १.५ नेहरूत्तर कालखंडातील भारतीय परराष्ट्र धोरण:

### १. लाल बहादुर शास्त्री कालीन भारतीय परराष्ट्र धोरण :

लाल बहादूर शास्त्री यांनी नेहरूंचे अलिप्ततेचे धोरण पुढे चालू ठेवले असले तरी सोव्हिएट युनियनशी घनिष्ठ संबंध निर्माण केले.१९६२ च्या चीन-भारत युद्धानंतर त्यांच्या सरकारने देशाच्या संरक्षण बजेटचा विस्तार करण्याचा निर्णय घेतला.१९६४ मध्ये, शास्त्री यांनी श्रीलंकेतील भारतीय तमिळांच्या स्थितीबाबत श्रीलंकेचे पंतप्रधान सिरिमावो बंदरनायके यांच्याशी एक करार केला,ज्याला सिरिमा-शास्त्री करार किंवा बंदरनायके-शास्त्री करार म्हणून ओळखले जाते (या कराराच्या अटींनुसार, ६००००० भारतीय तमिळ परत पाठवले, तर ३७५०० श्रीलंकेचे नागरिकत्व दिले जाणार होते).१९६२ च्या लष्करी उठावानंतर आणि १९६४ मध्ये बर्माने अनेक भारतीय कुटुंबांना परत पाठवल्यानंतर भारताचे बर्माशी संबंध ताणले गेले होते. डिसेंबर १९६५ मध्ये, शास्त्री यांनी आपल्या कुटुंबासह रंगून, बर्मा येथे अधिकृत भेट दिली आणि देशाच्या जनरल ने विन यांच्या लष्करी सरकारशी पुन्हा सौहार्दपूर्ण

संबंध प्रस्थापित केले.१९६५ चे भारत-पाक युद्ध आणि त्यांची भूमिका पाहता अर्ध्या कच्छ द्वीपकल्पावर दावा सांगून, पाकिस्तानी सैन्याने ऑगस्ट १९६५ मध्ये भारतीय सैन्याशी चकमक केली. १९६५ मध्ये पाकिस्तानशी झालेल्या २२ दिवसांच्या युद्धादरम्यान, १९ ऑक्टोबर १९६५ रोजी शास्त्रींनी अलाहाबादमधील उरवा येथे 'जय जवान जय किसान' हा नारा दिला जो राष्ट्रीय नारा बनला.त्यांनी भारताच्या रक्षणासाठी सैनिकांना उत्तेजित करण्याचा नारा दिला आणि त्याचबरोबर आयातीवरील अवलंबित्व कमी करण्यासाठी अन्नधान्याचे उत्पादन वाढवण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करण्यासाठी शेतकऱ्यांना प्रोत्साहित केले. भारताने युद्धविराम रेषा (आताची नियंत्रण रेषा ) ओलांडून आपले सैन्य पाकिस्तान मध्ये पाठवले आणि सामान्य स्तरावर युद्ध सुरू असताना लाहोरजवळील आंतरराष्ट्रीय सीमा ओलांडून पाकिस्तानला धमकी दिली.भारतीय सैन्याने काश्मीरमधील हाजी पीर येथील प्रमुख चौकी ताब्यात घेतली.भारत-पाक युद्ध २३ सप्टेंबर १९६५ रोजी संयुक्त राष्ट्रांच्या आदेशानुसार युद्धविरामाने संपले. १९६५ मध्ये पाकिस्तानसोबत युद्धविराम घोषित केल्यानंतर, शास्त्री आणि पाकिस्तानचे तत्कालीन अध्यक्ष अयुब खान यांनी ताश्कंद अलेक्सी कोसिगिन यांनी आयोजित केलेल्या शिखर परिषदेत भाग घेतला १० जानेवारी १९६६ रोजी शास्त्री आणि अयुब खान यांनी ताश्कंद जाहीरनाम्यावर स्वाक्षरी केली.

**२. इंदिरा गांधी कालीन भारतीय परराष्ट्र धोरण** :

१९६६ मध्ये इंदिरा गांधी पंतप्रधान झाल्या तेव्हा जग द्विध्रुवीय होते.काँग्रेसमध्ये दुफळी माजली होती आणि लोकांचा पाठिंबा गमावला होता हे १९६७ च्या निवडणुकीतून दिसून आले.देशाला सततच्या दुष्काळचा सामना करावा लागला. भारत संपूर्णपणे अमेरिकेकडून धान्य आयातीवर अवलंबून होता. शास्त्री यांनी आधीच जागतिक बँक आणि आंतरराष्ट्रीय नाणेनिधी यांच्याकडून आर्थिक मदतीबाबत बोलणी केली होती.१९६६मध्ये इंदिराजींना भारतीय रुपयाचे अवमूल्यन करावे लागले आणि त्यामुळे जनक्षोभ निर्माण झाला.मार्च १९६६ मध्ये आर्थिकदृष्ट्या अडचणीत असलेल्या देशाचे पंतप्रधान म्हणून इंदिरा गांधींनी पहिला वॉशिंग्टनचा दौरा केला. भारताला हरित क्रांतीसाठी नवीन कृषी तंत्रज्ञान आणि संकरित बियाण्यांच्या हस्तांतरणासाठी युनायटेड स्टेट्सचा पाठिंबा मिळू शकला. तथाकथित " शिप टू माउथ " ऑपरेशन्समध्ये भारताला अन्नधान्याच्या शिपमेंटमध्ये अमेरिकेचा पाठिंबा मिळवण्यातही त्या यशस्वी झाल्या होत्या.सोबतच त्यांनी अमेरिकेच्या हितासाठी भारतीय धोरणांमध्ये बदल करण्यास नकार दिला. व्हिएतनाममधील अमेरिकेच्या धोरणांवर त्यांनी टीका केली आणि १९६६ मध्ये मॉस्कोमधून "दक्षिण पूर्व आशियातील साम्राज्यवादी " या शीर्षकाने एक संयुक्त निवेदन जारी करून अमेरिकेला संतप्त केले. यामुळे अमेरिका भारतापासून दूर झाली परंतु अमेरिकेने अन्नधान्याची वाहतूक थांबवली नाही. १९६७ मध्ये, युनायटेड स्टेट्सने नवीन शस्त्रास्त्र धोरण जाहीर केले आणि भारत आणि पाकिस्तान या दोन्ही देशांना लष्करी पुरवठा बंद केला हा इंदिराजींचा हा एका अर्थाने मुत्सद्दी विजय होता.१९६८ मध्ये, रशियन पंतप्रधानांनी पाकिस्तानला भेट दिली आणि त्या देशाला लष्करी आणि आर्थिक मदत करण्याचे आश्वासन दिले.१९६९ मध्ये जेव्हा चिनी आणि सोव्हिएट सैन्य त्यांच्या सीमेवर भिडले, तेव्हा भारताने मौन पाळले. ऑगस्ट १९७१ मध्ये, भारत आणि यूएसएसआरने शांतता, मैत्री आणि सहकार्याच्या इंडो-सोव्हिएट करारावर स्वाक्षरी केली.या करारामुळे यूएस-चीनचे वाढते सहकार्य, अमेरिकेचा दबाव आणि अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष निक्सन यांचा पाकिस्तानला वाढलेला पाठिंबा यामुळे भारताला रावळपिंडी-बीजिंग-वॉशिंग्टन

संबंध उदयास येण्याची भीती निर्माण झाली. १९७१ च्या भारत-पाकिस्तान युद्धातुन बांगलादेशचा जन्म झाला.पूर्व पाकिस्तानमधून सुमारे १कोटी लोक भारतात आले. तेव्हा गांधींना नवीन परिस्थितीला तोंड देण्यासाठी धोरण तयार करण्यास भाग पाडले गेले तेव्हा त्यांनी सावध आणि सक्षमपणे निर्णय घेतले. बांगलादेशच्या जन्माने आता धोरणात्मक वातावरण बदलले होते.भारत दक्षिण आशियातील एक मोठी शक्ती म्हणून उदयास आला होता.पाकिस्तान आणि भारताला समान स्थितीत ठेवण्याच्या अमेरिकेच्या धोरणाला धक्का बसला आणि संबंध कटू झाले. १९७३ मध्ये युनायटेड स्टेट्सने भारतावर अन्नधान्याच्या आयातीतून जमा होणारे प्रचंड कर्ज प्रभावीपणे माफ केले. इंदिरा गांधींनी बांगलादेशातून सैन्य मागे घेतले आणि मुजीबुर रहमान सरकारशी शांतता आणि मैत्रीचा दीर्घकालीन करार केला आणि बांगलादेशला उदार आर्थिक मदत दिली. तथापि, १९७५ मध्ये ढाका येथे झालेल्या रक्तरंजित बंडाने भारताचे बांगलादेशशी संबंध काही अंशी बिघडले. बांगलादेशात युद्धात विजय मिळाल्यानंतर पाकिस्तान सोबत शिमला करार करण्यात आला.इंदिरा गांधींचे पंतप्रधान काळातील श्रीलंकेशी संबंध पाहता पंतप्रधान सिरिमावो बंदरनायके यांच्याशी गांधींचे संबंध सौहार्दपूर्ण होते. सरकारला राजकीय आपत्तीपासून वाचवण्यासाठी, भारताने श्रीलंकेला कचाथीवू बेट दिले. तथापि, ज्युनियस जयवर्धनेच्या नेतृत्वाखाली श्रीलंका समाजवादापासून दूर गेल्यावर संबंध बिघडले. गांधींनी त्यांना पाश्चिमात्य कठपुतली म्हटले, तर श्रीलंकेने भारतावर तामिळ राष्ट्रवादाला समर्थन दिल्याचा आणि लिट्टे अतिरेक्यांना पाठिंबा दिल्याचा आरोप केला.शिमला करारानंतरही भारताचे पाकिस्तानशी संबंध ताणले गेले. १९७४ मध्ये भारताने अणुचाचण्या घेतल्या तेव्हा पाकिस्तानने याला धमकावण्याचे कृत्य म्हटले होते. परंतु असे असले तरी, दोन्ही देशांनी १९७८ मध्ये राजनैतिक आस्थापने पुन्हा सुरू करण्याचा निर्णय घेतला. परंतु लवकरच पाकिस्तान लष्करी राजवटीत आला आणि झिया-उल-हक यांच्या राजवटीत त्यांचे संबंध खालावले.

भारताच्या परराष्ट्र धोरणासाठी इंदिराजींचा काळ हा एक महत्त्वाचा काळ होता ज्यामुळे भारताची दक्षिण आशियामध्ये प्रादेशिक शक्ती म्हणून स्थापना झाली. इंदिरा गांधींच्या परराष्ट्र धोरणातील काही प्रमुख यशांमध्ये बांगलादेशची निर्मिती (१९७१) आणि दक्षिण आशियामध्ये भारतीय सत्तेचे वर्चस्व असल्याचे प्रतिपादन; शिमला कराराद्वारे पाकिस्तानशी संबंध सामान्यीकरण (१९७२); चीनशी संबंध सुधारणे; श्रीलंकेसोबत सीमा आणि सागरी क्षेत्र करार (१९७४ आणि१९७६)इराणशी मैत्री, सिक्कीमचे भारतीय संघराज्याचे २२ वे राज्य म्हणून विलीनीकरण (१९७५)  आण्विक धोरण आणि आण्विक चाचणी हे इंदिरा गांधींच्या परराष्ट्र धोरणाचे यश म्हणावे लागेल.

एकंदरीतच १९५० ते १९७६ या कालखंडात पंडित नेहरूंनी आखलेल्या परराष्ट्र धोरणचीच वाटचाल लालबहादूर शास्त्री आणि इंदिरा गांधीच्या काळात झाल्याचे दिसून येते.

### ३. जनता पक्षाचे सरकार आणि परराष्ट्र धोरण :

पंतप्रधान मोरारजी देसाई म्हणाले  होते की, त्यांचे सरकार एका बाजूला किंवा दुसऱ्या बाजूला न घाबरता, आलिप्तता धोरणाचे पालन करेल.जनता पक्षाने आपल्या निवडणूक जाहीरनाम्यात "कोणत्याही शक्ती गटाशी संलग्नता न ठेवता खऱ्या अर्थाने असंलग्नतेसाठी वचनबद्ध आहोत तसेच देशाचे प्रबुद्ध हित आणि त्यांच्या आकांक्षा आणि प्राधान्यक्रम हे

प्रतिबिंबित करेल. ते सर्व प्रकारच्या वसाहतवाद, नववसाहतवाद आणि वंशवादाला विरोध करेल असा उल्लेख केला होता. एकंदरीतच काँग्रेसच्या काळातील विरोधी पक्ष नेते अटल बिहारी वाजपेयी यांनी भारत-रशिया संबंधावर भरपूर टिका त्या काळात केली होती.ते जनता पक्षाच्या राजवटीत परराष्ट्रमंत्री होते. आलिप्तता चळवळीचा पुरस्कार, महासत्ताशी पुर्वी प्रमाणेच संबंध हे भारतीय परराष्ट्र धोरण राहील अशी घोषणा केली होती. म्हणून या काळात त्यांनी रशियाची ही मित्रत्वाचे संबंध पूर्वीसारखे ठेवले व अमेरिकेशी बिघडलेल्या संबंधात सुधारणा करण्याचे प्रयत्न या कालखंडामध्ये काही प्रमाणात झाल्याचे दिसून येते.एकंदरीतच जनता पक्षाचे शासन आर्थिक विकासावर लक्ष केंद्रित करू शकला नाही. त्यांनी औद्योगीकरणाच्या माध्यमातून विकासाचे नेहरूवादी मॉडेल नाकारले होते पण त्याला प्रभावी पर्याय तयार करता आला नाही. महागाई२०% वर पोहोचली होती, सततच्या गटबाजीने जनता खचली होती. मित्रपक्षांनी भांडण केले आणि मध्यावधी निवडणुकांना भाग पाडून पाठिंबा काढून घेतला.

**४. राजीव गांधी कालीन भारतीय परराष्ट्र धोरण** :

राजीव गांधींना भारताच्या पूर्वीच्या परराष्ट्र धोरणात सातत्य ठेवण्याचे वचन दिले होते. ते म्हणाले, जवाहरलाल नेहरूंनी आम्हाला परराष्ट्र धोरण दिले होते, जे इंदिरा गांधींनी कल्पकतेने समृद्ध केले. मी ते पुढे नेईन. (टाइम्स ऑफ इंडिया, नोव्हेंबर १२, १९८४) त्यांनी २१ मे ते २६ मे १९८५ या काळात सोव्हिएट युनियनला भेट दिली. कोणत्याही देशाची त्यांची पहिली अधिकृत भेट. मिखाईल गोर्बाचेव्ह यांच्यासोबतच्या मेजवानीत त्यांनी दक्षिण आशियाला बाह्य प्रभावापासून मुक्त पाहण्याची इच्छा व्यक्त केली.

गोर्बाचेव्ह यांनी मे १९८६ मध्ये भारताला भेट दिली, परिणामी भारताला त्याचे तंत्रज्ञान आणि ऊर्जा क्षेत्र वाढवण्यासाठी हमी दिली.अमेरिकेसह पाश्चात्य शक्तींसोबत राजीव यांनी स्वतंत्र, तरीही खुले आणि रचनात्मक संबंध जोपासले. त्यांनी महत्त्वाच्या पाश्चात्य राजधान्यांना भेटी दिल्या आणि अनेक करारांवर स्वाक्षरी केली ज्यात वैज्ञानिक आणि तांत्रिक सहकार्यावर त्यांचा भर होता. प्रगत तंत्रज्ञान आणि आधुनिकीकरणाची ही इच्छा राजीव यांच्या भारतासाठीच्या स्वप्नांची गुरुकिल्ली होती आणि त्यांच्या परराष्ट्र धोरणातील पुढाकारांमध्ये यावर जोर देण्यात आला.भारताचे अमेरिकेसोबतचे संबंध पुनर्संचयित करण्यासाठी ते उत्सुक होते.त्यांनी १९८५ आणि १९८७ मध्ये दोन अत्यंत यशस्वी भेटी अमेरिकेला दिल्या. त्यांनी तंत्रज्ञानाच्या हस्तांतरणासाठी करार केले.१९८७ मध्ये त्यांच्या भेटीनंतरच्या भाषणात रेगन यांनी राजीव यांनी हळूहळू आण्विक नि:शस्त्रीकरणासाठी घेतलेल्या महत्त्वावर भर दिला.त्यांनी संरक्षण क्षेत्राच्या विकासात सहकार्यासाठी सामंजस्य करारही केला. राजीव गांधी हे खरेच पहिले पंतप्रधान होते ज्यांनी भारताला पाश्चिमात्य जगाशी जोडून आपले तंत्रज्ञान क्षेत्र उभारण्याची गरज आहे यावर भर दिला. त्यांनी अमेरिका आणि फ्रान्समधील उच्च तंत्रज्ञान सुविधांना भेट दिली. त्यांच्या आवडीमुळेच भारताचा नवीन माहिती तंत्रज्ञान उद्योग उदयास आला आणि भारतीय विज्ञान आणि अभियांत्रिकी जगाच्या नकाशावर आणली,भारताला सॉफ्टवेअर दिग्गज आणि बेंगळुरूला आंतरराष्ट्रीय शहर बनवले. ही कदाचित त्यांची देशाला दिलेली सर्वात मोठी भेट होय.ऑपरेशन कॅक्टस दरम्यान, भारताने १९८८ मध्ये राष्ट्राध्यक्ष मौमून अब्दुल गयूम यांच्या विरोधात उठाव हाणून पाडण्यासाठी मालदीवमध्ये सैन्य पाठवले. त्याचप्रमाणे, फ्रान्सचे अध्यक्ष अल्बर्ट रेने यांच्या सरकारच्या

विरोधात उठाव टाळण्यासाठी भारतीय नौदलाला सेशेल्समध्ये पाठवण्यात आले. १९८६ मध्ये हिंद महासागर क्षेत्रात भारताची स्वतःची क्षमता तर दिसून आलीच पण या प्रदेशात लोकशाही पद्धतीने निवडून आलेल्या सरकारांच्या देखभालीसाठी आपले सैन्य मदत करण्यास तयार असल्याचे सिद्ध झाले.राजीव गांधीचे श्रीलंका धोरण पाहता श्रीलंकेचे अध्यक्ष जे.आर. जयवर्धने यांच्याशी १९८८ ला त्यांनी जो करार केला तो करार पाहता भारतीय हितांचे रक्षण केले,जाफना येथील तमिळ लोकसंख्येसाठी जागा सुरक्षित केली. दुर्दैवाने, शांतता करार राखण्यात मदत करण्यासाठी श्रीलंकेतील भारतीय सैन्याच्या सहभागामुळे, लिबरेशन टायगर्स ऑफ तमिळ इलमपासून दूर गेले, ज्यामुळे १९९१ मध्ये राजीवचा जीव घेणारा दहशतवादी हल्ला झाला, ज्यामुळे भारताला एक परिपक्व, लोकशाहीवादी आणि आंतरराष्ट्रीय नेत्याला भारत मुकला.भारताचा पारंपारिक शत्रू पाकिस्तानशी ही राजीव यांच्या नेतृत्वाखाली संबंध सुधारले. १९८८ मध्ये त्यांनी चीनला भेट दिली, १९५५ मध्ये नेहरूंच्या चीन भेटीनंतर भारतीय पंतप्रधानांनी केलेली ही पहिली भेट होय. या भेटीत एकमेकांशी संवाद, व्यापार आणि सांस्कृतिक संपर्कांची परस्पर देवाण-घेवाणीचा रस्ता तयार झाला.

राजीव गांधींच्या एकूण परराष्ट्र धोरणाच्या भूमिकेने त्यांनी भारतात तांत्रिक क्रांती आणली, तंत्रज्ञान क्षेत्राला प्रोत्साहन देणे आणि दक्षिण आशियातील भारताची सुरक्षा आणि प्रमुखता मजबूत करण्यावर भर दिला.अमेरिका आणि पाकिस्तानशी संबंध सुधारण्यासाठी आणि श्रीलंकेतील तमिळ-सिंहली संघर्ष सोडवण्यासाठी राजीव गांधींच्या काळात प्रयत्न झाल्याची दिसून येतात.त्यांनी सोव्हिएट युनियनसोबत भारताची विशेष भागीदारी सुरू ठेवली, सोबतच अमेरिका आणि चीनशी संबंध पुन्हा स्थापित करण्याचा प्रयत्न केला.

**सारांश :**

एकंदरीतच भारतीय परराष्ट्र धोरणाच्या दुसऱ्या टप्प्यात म्हणजेच १९४७ ते १९९०च्या कालखंडापर्यंत पंतप्रधान पंडित नेहरूनी जे काही भारतीय परराष्ट्र धोरण तयार केले त्याच परराष्ट्र धोरणाला या काळात पुढे नेण्याचा प्रयत्न करण्यात आला. भारतीय परराष्ट्र धोरणाचा दुसरा महत्त्वाचा टप्पा आहे तो म्हणजे स्वातंत्र्यानंतरचा आहे.जगात या काळात शीतयुद्धकालीन परिस्थिती निर्माण झालेली होती. या काळात भारताच्या परराष्ट्र धोरणात प्रामुख्याने नववसाहतवादाला विरोध, वंशवादाला विरोध, शस्त्रास्त्र स्पर्धेला विरोध, अण्वस्त्रांना विरोध, अणुचाचण्यांना विरोध या प्रमुख तत्वा बरोबरच शांतता, आंतरराष्ट्रीय सहकार्य, आर्थिक व सामाजिक विकास साधने यावरच या काळात मोठा भर दिला गेला आहे.

**आपली प्रगती तपासा**

१. नेहरूत्तर कालखंडातील भारतीय परराष्ट्र धोरणाची चर्चा करा.

_______________________________________________
_______________________________________________
_______________________________________________
_______________________________________________
_______________________________________________

## १.६ शीतयुद्ध समाप्तीचा आणि जागतिकीकरणाचा भारतीय परराष्ट्र धोरणावरील प्रभाव :

भारतीय परराष्ट्र धोरणाच्या विकासातील तिसऱ्या टप्प्यात शीतयुद्धोत्तर काळातील म्हणजे १९९१ पासून ते आजपर्यंत भारतीय परराष्ट्र धोरणाची होत असलेली वाटचाल ह्याचा विचार करणे क्रमप्राप्त ठरते. या टप्प्याला पोस्ट नेहरूवियन पॉलिसी म्हणतात. या काळात आंतरराष्ट्रीय राजकारणाची समीकरणे आणि पार्श्वभूमी संपूर्णतः बदलत गेली.

### १.६.१ शीतयुद्ध कालखंड

शीतयुद्धाची खऱ्या अर्थाने १९१७ मधील रशियातील क्रांती नंतरच सुरुवात झाली.परंतु जागतिक राजकारणात द्वितीय महायुद्धाच्या समाप्तीनंतर १९४६ मध्ये शीतयुद्धाला प्रारंभ झाला.शीतयुद्धाच्या माध्यमातून जागतिक राजकारणावर प्रभाव पाडणे व जगाचे नेतृत्व करणे हा शीतयुद्धाचा मुख्य उद्देश आहे हे प्रथमतः आपल्याला लक्षात घेणे गरजेचे आहे. दुसऱ्या महायुद्धानंतर जगाची विभागणी दोन गटात झाल्याने दोन्ही गट आपापल्या समर्थक राष्ट्रांवर प्रभाव टाकण्याचा प्रयत्न करू लागले. त्यातूनच शीतयुद्धाचे स्वरूप हे व्यापक प्रमाणात वाढल्या गेले. शीतयुद्धामुळे राष्ट्रा- राष्ट्रांमध्ये गैरसमज निर्माण झाले. जगाची विभागणी दोन गटात झाली. शीतयुद्धामुळे निशस्त्रीकरणाच्या मार्गात मोठे अडथळे निर्माण झाले. त्यातून दोन महासत्तांमध्ये शस्त्रास्त्रं निर्माण करण्याची स्पर्धा लागली. जागतिक शांतता भंग झाली.संयुक्त राष्ट्र संघा सारखी आंतरराष्ट्रीय संस्था युद्धामुळे अपयशी ठरली परिणामी आंतरराष्ट्रीय पातळीवर आलिप्ततावादांचा उदय झाल्याचे आपल्याला दिसून येते.शीतयुद्धाच्या काळात युद्धाचे स्वरूप बदलले बड्या राष्ट्रातील तणाव शैथिल्याने आंतरराष्ट्रीय वातावरण हे अधिकच अनिश्चित स्वरूपाचे झाल्याचे दिसून येते.

### १.६.२ शीतयुद्ध समाप्तीचा कालखंड:

१९८५ मध्ये जेव्हा मिखाईल गोर्बाचेव्ह यांनी सोव्हिएट युनियनमध्ये सत्तेची सूत्रे हाती घेतली, तेव्हा ते कोणत्या सुधारणा घडवून घडवून आणतील याचा अंदाज कोणीही बांधला नव्हता. गोर्बाचेव्ह यांनी आपला सुधारणावादी सिद्धांत अमलात आणण्याची योजना आखली.गोर्बाचेव्ह हे पहिल्यापासूनच कट्टर साम्यवादाचे विरोधक म्हणून ओळखले जात होते. त्यांनी सोव्हिएटसंघात अंतर्गत बदल करण्यासाठी पेरिस्त्रोईका( परिवर्तन) आणि ग्लासनोस्त ( खुले वातावरण) हे दोन सिद्धांत मांडले. या सिद्धांताच्या माध्यमातून सोव्हिएट संघामध्ये लोकशाही तत्त्वांचा उदय झाला. नागरिकांना काही प्रमाणात स्वातंत्र्य मिळाले. लोक आपले विचार मांडण्यासाठी पुढे येऊ लागले. पण हे सुधारणावादी धोरण प्रखर साम्यवादी नेत्यांना मान्य नव्हते.सोव्हिएट संघराज्यात वातावरण दूषित होऊ लागले. परिणामी त्या ठिकाणी हळूहळू अंतर्गत धुसफूस वाढल्या गेली. यातूनच पुढच्या काळात सुधारणावादी व कट्टर साम्यवादी यांच्यात संघर्ष झाला.१९८९ हंगेरी, झेकोस्लोव्हाकिया आणि स्वतः पोलंडमध्ये पूर्वीच्या सोव्हिएत लष्करी हस्तक्षेप असूनही, मतदारांनी त्यांच्या विधानसभेत गैर-कम्युनिस्ट विरोधी सरकार निवडले. त्याच वर्षी जर्मन सैन्याच्या क्रूने बर्लिनची भिंत पाडली.सोव्हिएट संघराज्यातील घटक राज्य संघराज्यातून फुटून बाहेर पडू

लागली परिणामी १९९१ मध्ये सोव्हिएट संघराज्य साम्राज्य संपुष्टात आले. जगात द्विध्रुवी राजकारणातून एकाधिकारशाही राजकारणाची वाटचाल सुरु झाल्याने शीतयुद्धाची समाप्ती झाली.

**१.६.३ जागतिकीकरण** :

जागतिकीकरण हा जागतिक अर्थव्यवस्था, संस्कृती आणि लोकसंख्येच्या वाढत्या परस्परावलंबनाचे वर्णन करण्यासाठी वापरला जाणारा शब्द आहे, वस्तू आणि सेवा, तंत्रज्ञान, आणि गुंतवणूक, लोक आणि माहिती यांच्या सीमापार व्यापारामुळे उद्भवते. जागतिकीकरण म्हणजे उत्पादनांचा, तंत्रज्ञानाचा, माहितीचा आणि नोकऱ्यांचा राष्ट्रीय सीमा आणि संस्कृतींमध्ये प्रसार. आर्थिक दृष्टीने, हे मुक्त व्यापाराद्वारे जगभरच्या राष्ट्रांच्या परस्परावलंबनाचे वर्णन करते.अनेक शतकांपासून या हालचाली सुलभ करण्यासाठी देशांनी आर्थिक भागीदारी निर्माण केली आहे. परंतु १९९० च्या दशकाच्या सुरुवातीला शीतयुद्धानंतर या शब्दाला लोकप्रियता मिळाली, कारण या सहकारी व्यवस्थेने आधुनिक दैनंदिन जीवनाला आकार दिला आहे. जागतिकीकरणाचे व्यापक परिणाम गुंतागुंतीचे आणि राजकीयदृष्ट्या आकारलेले आहेत. मोठ्या तांत्रिक प्रगतीप्रमाणे, जागतिकीकरणामुळे संपूर्ण समाजाला फायदा होतो, तर काही विशिष्ट गटांना हानी पोहोचते.

**१.६.३.१ जागतिकीकरण महत्वाचे मुद्दे** :

- जागतिकीकरण म्हणजे उत्पादनांचा, तंत्रज्ञानाचा, माहितीचा आणि नोकऱ्यांचा राष्ट्रांमध्ये प्रसार.
- विकसित राष्ट्रांमधील कॉर्पोरेशन जागतिकीकरणाद्वारे स्पर्धात्मक धार मिळवू शकतात.
- विकसनशील देशांना जागतिकीकरणाद्वारे देखील फायदा होतो कारण ते अधिक किफायतशीर असतात आणि त्यामुळे नोकऱ्या आकर्षित करतात.
- जागतिकीकरणाच्या फायद्यांवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे कारण ते सकारात्मक परिणामांचे समान वितरण करत नाही.
- जागतिकीकरणाचा एक स्पष्ट परिणाम असा आहे की एका देशातील आर्थिक मंदी त्याच्या व्यापार भागीदारांद्वारे डोमिनो इफेक्ट तयार करू शकते.
- जागतिकीकरण ही एक सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय आणि कायदेशीर घटना आहे.
- सामाजिकदृष्ट्या, यामुळे विविध लोकसंख्येमध्ये अधिक परस्परसंवाद होतो.
- सांस्कृतिकदृष्ट्या, जागतिकीकरण हे संस्कृतींमधील कल्पना, मूल्ये आणि कलात्मक अभिव्यक्तीची देवाणघेवाण दर्शवते.
- जागतिकीकरण देखील एकाच जागतिक संस्कृतीच्या विकासाकडे प्रवृत्ती दर्शवते.

munotes.in

- राजकीयदृष्ट्या, जागतिकीकरणाने संयुक्त राष्ट्र (UN) आणि जागतिक व्यापार संघटना (WTO) सारख्या संस्थांकडे लक्ष वळवले आहे .

थोडक्यात, जागतिकीकरणाद्वारे जग हे अधिकाधिक एकमेकांशी जोडलेले गेले आहे. हवाई प्रवास, कंटेनरयुक्त समुद्र शिपिंग, आंतरराष्ट्रीय व्यापार करार आणि कायदेशीर करार आणि इंटरनेट यांसारख्या कारणांमुळे देश आज पूर्वीपेक्षा अधिक जोडलेले आहेत. व्यवसायाच्या जगात, जागतिकीकरण आउटसोर्सिंग, मुक्त व्यापार आणि आंतरराष्ट्रीय पुरवठा साखळी यांसारख्या ट्रेंडशी संबंधित आहे.आजच्या काळात जागतिकीकरण महत्त्वाचे आहे कारण ते आधुनिक जगावर परिणाम करणाऱ्या सर्वात शक्तिशाली शक्तींपैकी एक आहे.जागतिकीकरण समजून घेतल्याशिवाय जगाचा अर्थ काढणे कठीण होऊ शकते. उदाहरणार्थ, जगातील बऱ्याच मोठ्या आणि सर्वात यशस्वी कॉर्पोरेशन बहुराष्ट्रीय संस्था आहेत, ज्याची कार्यालये आणि पुरवठा साखळी जगभर पसरलेली आहे. जागतिकीकरणामुळे शक्य झालेल्या व्यापारी मार्ग, आंतरराष्ट्रीय कायदेशीर करार आणि दूरसंचार पायाभूत सुविधांचे जटिल नेटवर्क नसल्यास या कंपन्या अस्तित्वात राहू शकणार नाहीत. महत्त्वाच्या राजकीय घडामोडी, जसे की युनायटेड स्टेट्स आणि चीनमध्ये सुरू असलेल्या व्यापार संघर्षाचाही थेट संबंध जागतिकीकरणाशी येतो.

### १.६.४ शीतयुद्ध समाप्तीचा आणि जागतिकीकरणाच्या काळात भारतीय परराष्ट्र धोरणाणाचे बदलते स्वरूप:

१९९१ च्या नंतर आंतरराष्ट्रीय राजकारणात सत्ता संघर्षाचे स्वरूप बदलले गेले.जगातील दोन महासत्ता पैकी एका महासत्तेचा अस्त झाला. त्यामुळे भारताला आपल्या परराष्ट्र धोरणामध्ये प्रामुख्याने बदल करावा लागला.याची सुरुवात पी. व्ही. नरसिंहराव यांच्या काळापासून झालेली आहे. जागतिकीकरणामुळे भारतीय अर्थव्यवस्था मुक्त झाली.जागतिकीकरण ही एक सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय आणि कायदेशीर घटना आहे. त्यामुळे जागतिकीकरणाचा विचार करता देशाला आपले परराष्ट्र धोरणही जागतिकीकरणाच्या काळात टिकणारे ठेवणे गरजेचे ठरते. शीतयुद्धोत्तर भारतीय परराष्ट्र धोरणाचा अभ्यास करताना असे लक्षात येते की या परराष्ट्र धोरणात विचारसरणीपेक्षा राष्ट्रीय हितसंबंधांना अत्यंत महत्त्वाचं स्थान देण्यात आलेले आहे. सोबतच राजकीय हितसंबंधा पेक्षा आर्थिक हितसंबंधांना या परराष्ट्र धोरणात महत्त्व प्राप्त झालेले आहे. म्हणून जागतिकीकरणाच्या काळात परराष्ट्र व्यापार वाढवणे, परकीय गुंतवणूक वाढवणे यावर प्रामुख्याने भर देण्यात आलेला आहे. त्यामुळे शीतयुद्धोत्तर काळात भारतीय परराष्ट्र धोरण हे समाजवादाकडून भांडवलवादाकडे वळल्याचे आपल्याला दिसून येते.

#### १. पी. व्ही नरसिंहराव यांचे परराष्ट्र धोरण :

अलिप्ततावादी चळवळ तसेच आपल्या परराष्ट्र धोरणावरील आर्थिक सुधारणांसारख्या विविध देशांतर्गत घटकांचा प्रभाव लक्षात घेता पी.व्ही नरसिंहराव यांनी आपल्या परराष्ट्र धोरणात कोणत्या घटकाला महत्त्व दिले हे पाहणे क्रमप्राप्त ठरते.अर्थशास्त्र हा परराष्ट्र धोरणाचा भागअसतो. १९९१ते १९९६ पर्यंत देशाचे नेतृत्व करणारे नरसिंहराव यांनी भारताची अर्थव्यवस्था अपयशी ठरत असताना आणि भौगोलिक राजकीय स्थिती सर्वात कमकुवत असताना पंतप्रधानपदाची सूत्रे हाती घेतली. १९९१हे जागतिक व्यवस्थेतील

गोंधळाचे वर्ष होते. कुवेतमधून सद्दाम हुसेनच्या नेतृत्वाखाली इराकी सैन्याला मागे ढकलण्यासाठी ऑपरेशन डेझर्ट स्टॉर्म सुरू करणाऱ्या अमेरिकेच्या नेतृत्वाखालील जागतिक युतीच्या हस्तक्षेपाने आखाती युद्ध भडकले होते. काही आठवड्यांत, इराकने केवळ कुवेतच नव्हे तर त्याच्या स्वतःच्या प्रदेशाचा काही भाग सोडत, माघार घेत स्वत:ला लांबवले. अमेरिकेने निर्णायकपणे विजय मिळवला आणि पराभूत झालेल्या सद्दामवर कठोर शांतता लादली. परंतु दिवसाला ४.३ दशलक्ष बॅरल तेलासाठी जबाबदार असलेल्या दोन देशांमधील संघर्ष-अनिवार्यपणे जागतिक तेल पुरवठ्याला नाट्यमय धक्का बसला असताना पूर्वेकडे पहा या  धोरणाचा भारतीय अर्थव्यवस्थेवर मोठा प्रभाव पडला आहे.भारताच्या विकासात दक्षिण पूर्व आशियातील राष्ट्राची आर्थिक भागीदार मोठ्या प्रमाणात वाढवण्याचे श्रेय पी. व्ही नरसिंहराव यांना जाते.सीमेच्या मुद्द्यांवर आर्थिक सहकार्य करण्यात चीनला गुंतवून ठेवण्यात यशस्वी झाले. सार्क राष्ट्रांवर त्यांचा प्रभाव पडला, भारत हा प्रबळ भागीदार असला तरी मैत्रीपूर्ण आहे याची खात्री जगाला दिली.अमेरिकेशी भारताच्या वाढत्या जवळीकतेचे काम या काळात झाले.नरसिंहराव यांनी देशाच्या परराष्ट्र धोरणात वास्तववाद आणताना भारताचे शेजारी देशांशी संबंध सुधारण्याचा प्रयत्न केला. नरसिंहरावांच्या काळातच बॅलिस्टिक क्षेपणास्त्र तंत्रज्ञान कार्यक्रम सुरू करण्यात आला, याशिवाय संवर्धित उपग्रह प्रक्षेपण वाहनाची यशस्वी चाचणी घेण्यात आली. तसेच या सरकारने युरोपीय राजाचे संबंध सुधारत असताना शेजारील राष्ट्रांबरोबर असलेले वाद शांततेच्या मार्गाने सोडण्याची घोषणा या काळात केल्याचे दिसून.

**२. अटल बिहारी वाजपेयी यांचे परराष्ट्र धोरण** :

१९९८ मध्ये भारताने इतिहासात दुसऱ्यांदा अणुचाचण्या घेतल्या तेव्हा भारताने उच्चभ्रू आंतरराष्ट्रीय क्लबमध्ये प्रवेश केला.पोखरणमध्ये अत्यंत विवेकबुद्धीने केलेल्या स्फोटांनी त्यावेळी जागतिक व्यवस्थेला हादरे बसले. त्यामुळे भारतावर अनेक आर्थिक बंधने व वेगवेगळ्या स्वरूपाची निर्बंध लादल्या गेली. जगातील कोणत्याच निर्बंध आला न घाबरता अटल बिहारी वाजपेयी यांनी जगाला भारताच्या परराष्ट्र धोरणाची प्रचिती करून दिली.वाजपेयींनी भारताविषयीची दृष्टी आणि त्यांचे जागतिक दृष्टिकोन समोर आणताना वास्तववाद आणि आदर्शवादाची उत्कृष्ट पद्धतीने गुंफण केलेली आहे.त्यातूनच जागतिक स्तरावर भारताच्या हितसंबंधांना पुढे नेण्यासाठी व्यावहारिक दृष्टिकोनाचा प्रथमच वापर केला गेला.एक वास्तववादी म्हणून, त्यांनी १९९८ च्या भारताच्या आण्विक चाचण्यांना दक्षिण आशियातील वाढत्या भू-राजकीय अस्थिरता आणि चीनच्या उदयादरम्यान सुरक्षा हितसंबंधांचे रक्षण करण्यासाठी समर्थन दिले. अण्वस्त्रे बाळगण्याच्या तसेच “प्रथम वापर नाही” धोरणाला सहमती देण्याच्या आपल्या भूमिकेवर ठाम राहण्याच्या भूमिका सहज आणि सक्षमपणे पेलली.भारताचे दोन शेजारी, चीन आणि पाकिस्तान यांच्याकडून वाढत्या संभाव्य धोक्यांना अणुचाचण्या खरोखरच आवश्यक होत्या हे जगाला त्यांनी दाखवून दिले. वाजपेयींना हे भू-राजकीय वास्तव समजले असतानाच, त्यांनी भारत-चीन संबंध मजबूत करण्यासाठी धोरणात्मक गरज म्हणून प्रयत्न केले.नरसिंहराव यांच्या एका दशकानंतर चीनला भेट देणारे पहिले पंतप्रधान म्हणून वाजपेयीकडे पाहिले जाते.वाजपेयींच्या आशावादामुळे विविध आत्मविश्वास निर्माण करण्याच्या उपाययोजना झाल्या. भारत आणि चीनने पंचशील पुनरुज्जीवित करण्याच्या त्यांच्या वचनबद्धतेची पुष्टी केल्यामुळे, वाजपेयींनी विशेष प्रतिनिधी म्हणून दोन्ही देशांच्या मुत्सद्दींमधील संवादाचा पुढाकार घेताना भारत-चीन

सीमा विवाद सोडवण्याच्या दिशेने एक उल्लेखनीय पाऊल म्हणून पाहिले गेले. याचा सर्वात ठळक परिणाम म्हणजे सिक्कीमला चीनने भारतीय राज्य म्हणून मान्यता दिली.वाजपेयींनी चीन आणि पाकिस्तानसोबतच्या संबंधांना दुजोरा देण्याचा प्रयत्न केल्यामुळे त्यांची दृष्टी केवळ शेजार्यापुरती मर्यादित नव्हती तर ती पूर्व आणि पश्चिम अशा दोन्ही बाजूंनी विस्तारली होती. पश्चिम आशियामध्येच वाजपेयींच्या मुत्सद्दी दृष्टिकोनामुळे भारतासाठी या प्रदेशाचे सामरिक महत्त्व लक्षात घेऊन नवीन संबंध प्रस्थापित झाले. २००१मध्ये वाजपेयींच्या इराण भेटीमुळे दोन्ही देशांदरम्यान पाकिस्तानमार्गे गॅस पाइपलाइनची कल्पना पुढे आली. २००२ मध्ये इराणचे माजी राष्ट्रपती मोहम्मद खातमी हे प्रजासत्ताक दिनाच्या सोहळ्याचे प्रमुख पाहुणे म्हणून भारत दौऱ्यावर आले तेव्हा भारत-इराण राजनैतिक संबंधांना एक नवीन आयाम प्राप्त झाला. वाजपेयी हे एक रणनीतीकार असल्याने त्यांनी इस्त्रायलशीही संबंध दृढ केले. २००३ मध्ये, एरियल शेरॉन भारताला भेट देणारे इस्त्रायलचे पहिले पंतप्रधान बनले. तेव्हापासून भारत-इस्त्रायल सामरिक भागीदारी लक्षणीयरीत्या मजबूत झाली आहे.पहिले गैर-काँग्रेस परराष्ट्र मंत्री आणि नंतर पंतप्रधान म्हणून, वाजपेयींची धोरणात्मक दृष्टी आणि त्यांचा जागतिक दृष्टीकोन त्यांच्या पूर्वसुरींचा आदर्शवाद आणि त्यांच्या उत्तराधिकाऱ्यांसाठी भारताचे लष्करी आणि आर्थिक वर्चस्व मजबूत करण्याच्या वास्तववादाचा समतोल साधला. त्यामुळे पहिल्यांदाच भारतीय परराष्ट्र धोरणात संदर्भात नेहरूंचा प्रभाव कमी करण्याचा प्रयत्न हा वाजपेयींच्या काळात झाला गेला. त्याच सोबत अटल बिहारी वाजपेयी यांनी पी ५ ही एक संकल्पना आपल्या परराष्ट्र धोरणात मांडण्याचा प्रयत्न केला त्यामध्ये प्रामुख्याने संयुक्त राष्ट्रसंघाच्या सुरक्षा परिषदेतील पाच कायम सदस्य असलेल्या राष्ट्र सोबत भारताने आपले संबंध विकसित करण्याचे प्रयत्न करावेत ही मांडणी पी ५ या संकल्पनेद्वारे केली आहे.

१९९६ ते २००४ हा भारतीय राजकारणातला अस्थिरतेचेचा काळ होता या काळात देशाने अटल बिहारी वाजपेयी, एच.डी देवेगौडा, इंद्रकुमार गुजराल सारखे पंतप्रधान देशाला मिळाले त्यामुळे या काळातील काही परराष्ट्र धोरणावर प्रामुख्याने अटल बिहारी वाजपेयी आणि इंद्रकुमार गुजराल यांचा प्रभाव राहिल्याचे दिसून येते.

### ३. इंद्रकुमार गुजराल यांचे परराष्ट्र धोरण

एचडी देवेगौडा सरकारमध्ये केंद्रीय परराष्ट्र मंत्री असताना माजी पंतप्रधान गुजराल यांनी 'गुजराल सिद्धांत' मांडला होता.तो भारताच्या परराष्ट्र धोरणातील हा एक मैलाचा दगड मानला जातो. कारण पहिल्यांदाच भारताच्या परराष्ट्र धोरणास एक सैद्धांतिक रूप देण्यात आले.गुजराल सिद्धांत हा पाच-बिंदूंचा रोडमॅप होता ज्याने भारत आणि त्याच्या शेजारी राष्ट्रांमध्ये विश्वास निर्माण करण्याचा आणि राजनयिक संबंधात तात्काळ उदासीनता दूर करण्याचा प्रयत्न केला.दक्षिण आशियातील एक मोठा देश या नात्याने भारताने आपल्या छोट्या शेजाऱ्यांना एकतर्फी सवलत दिली पाहिजे आणि त्यांच्याशी सौहार्दपूर्ण संबंध ठेवले पाहिजेत, असे सिद्धांत सांगतो. सोबतच गुजराल यांनी भारत-पाकिस्तान संबंध सुधारण्यासाठी काश्मीर हा प्रश्न जो की कळीचा आहे त्यासंदर्भात परराष्ट्र धोरण आखताना काश्मीर प्रश्न हा थोडा वेळ बाजूला ठेवून त्या प्रश्नांच्या व्यतिरिक्त जे काही प्रश्न असतील त्या प्रश्नाची सोडवणूक करून एकमेकांस सहकार्य करण्याची सुरुवात केली जावी हा एक महत्त्वाचा विचार भारतीय परराष्ट्र धोरणाला दिला. एकमेकांच्या सहकार्याच्या माध्यमातून ज्यावेळेस

दोघांमध्ये विश्वास निर्मिती होईल त्यावेळेस काश्मीर सारखे जटील प्रश्न हे सुटू शकतात ही बाब गुजराल यांनी अतिशय प्रामाणिकपणे समजावून सांगण्याचा प्रयत्न केलेला आहे.

**४. डॉ.मनमोहन सिंग यांचे परराष्ट्र धोरण** :

डॉ. मनमोहन सिंग यांनी एनडीएचे पंतप्रधान वाजपेयी यांची पाकिस्तान बरोबरची शांतता प्रक्रिया सुरू ठेवली आहे. भारत-पाकिस्तानमधील सीमा विवाद, चीन सोबतचा सीमा विवाद सोडवण्यासाठी त्यांच्याकडून अनेक प्रयत्न करण्यात आले आहेत. चीनचे राष्ट्राध्यक्ष हू जिंताओ नोव्हेंबर २००६ मध्ये भारत भेटीवर आले होते आणि डॉ. मनमोहन सिंग यांनी जानेवारी २००८ मध्ये बीजिंगला भेट दिली होती.चीन-भारत संबंधांमधील एक मोठा विकास म्हणजे २००६ मध्ये चार पेक्षा जास्त कामांसाठी बंद केल्यानंतर नाटुला पास पुन्हा देण्यात येऊ लागली. २०१० मध्ये, पीपल्स रिपब्लिक ऑफ चायना भारताचा दुसरा सर्वात मोठा व्यापार भागीदार बनला.अफगाणिस्तानचे अध्यक्ष हुमिद करझाई यांनी ऑगस्ट २००८ मध्ये नवी दिल्लीला भेट दिली. डॉ. सिंग यांनी शाळा, आरोग्य दवाखाने, पायाभूत सुविधा आणि संरक्षण विकासासाठी सर्वात मोठा आर्थिक दाता म्हणून हात पुढे केला.डॉ. सिंग यांच्या नेतृत्वाखाली भारत अफगाणिस्तानला सर्वात मोठी मदत देणाऱ्यांपैकी एक देश म्हणून उदयास आला आहे.जुलै २००५ मध्ये, त्यांनी भारत-अमेरिका नागरी अणु करारावर वाटाघाटी सुरू करण्यासाठी अमेरिकेला भेट दिली.त्यानंतर IAEA आण्विक पुरवठादार गट आणि यूएस काँग्रेसच्या मंजुरीनंतर, भारत आणि यूएसने १० ऑक्टोबर २००८ रोजी प्रणव मुखर्जी यांनी भारताचे प्रतिनिधीत्व करून करारावर स्वाक्षरी केली. भारत अमेरिका संबंध विकसित करण्यावर खूप मोठा भर मनमोहन सिंग सरकारच्या काळात दिला गेला.जपान आणि यूके, फ्रान्स आणि जर्मनी या युरोपीय देशांशी संबंध सुधारले आहेत. इराणशी संबंध कायम ठेवले आणि इराण-पाकिस्तान-भारत गॅस पाइपलाइनवर वाटाघाटी झाल्या आहेत. एप्रिल २००६ मध्ये, भारताने भारत-आफ्रिका शिखर परिषदेचे आयोजन केले होते आणि १५ व्या आफ्रिकन देशांनी या परिषदेत भाग घेतला होता. मनमोहन सिंग यांनी इतर विकसनशील देशांशी विशेषतः ब्राझील आणि दक्षिण आफ्रिकेसोबतचे संबंध सुधारण्यासाठी प्रयत्न केले आहेत. तसेच २००३ मध्ये "ब्रासीलिया घोषणा" आणि IBSA संवाद मंच स्थापन झाल्यानंतर स्थापित केलेली गती पुढे नेली. पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंग यांनी संयुक्त राष्ट्रांच्या अनेक शांतता अभियानांमध्ये भाग घेतला आहे.

**५. नरेंद्र मोदी यांचे परराष्ट्र धोरण** :

नरेंद्र मोदी हे भारताच्या परराष्ट्र धोरणासाठी आतापर्यंतचे सर्वात 'नॉन-नेहरूवादी' पंतप्रधान आहेत. तरीही पहिल्या पंतप्रधानांपेक्षा स्वतःला वेगळे करण्याचा जाणीवपूर्वक प्रयत्न करूनही मोदींनी नेहरूंच्या आंतरराष्ट्रीय संबंधातील काही तत्त्वे कायम ठेवली आहेत.मोदींचा मुख्य भर भारताला 'अग्रणी शक्ती' बनवण्यावर आहे.भारताचे दक्षिण आशियातील वर्चस्व पुनर्संचयित करण्यावर मोदींचे लक्ष आहे. 'ऍक्ट ईस्ट' धोरणाच्या नावाने भारताच्या आशियाई सहभागाला नवसंजीवनी देण्याचा मोदींचा प्रयत्न आहे. भारताच्या परराष्ट्र धोरणाच्या सुरुवातीच्या काळात नेहरूंनी आशियाशी जोडलेल्या केंद्रस्थानावर आधारित आहे. दक्षिण आशियाच्या संदर्भात नरेंद्र मोदी आपल्या परराष्ट्र धोरणाला का महत्व देतात तर त्याचा महत्त्वाचा उद्देश म्हणजे जर भारताचा आर्थिक विकास आणि अंतर्गत सुरक्षा जर राखायची

असेल तर शेजारी राष्ट्रांमध्ये शांतता, लोकशाही सोबतच, राजकीय स्थैर्य ह्या गोष्टी टिकल्या तरच भारतात शांतता आणि स्थैर्य निर्माण होईल याची पूर्ण जाणीव पंतप्रधान नरेंद्र मोदींना आहे.

एकंदरीतच भारताच्या परराष्ट्र धोरणाचा ज्यावेळेस आपण विचार करतो त्यावेळेस भारताने आपल्या परराष्ट्र धोरणाचा उद्देशच आर्थिक विकास हा आहे. त्यासाठी शेजारी राष्ट्रांबरोबर आर्थिक संबंध वाढवण्यासाठी नरेंद्र मोदी प्रयत्न करताना दिसत आहेत. नरेंद्र मोदी आपल्या परराष्ट्र धोरणामध्ये आर्थिक विकासाला प्राधान्य, परदेशी गुंतवणुकीला प्रोत्साहित करून आकर्षित करणे, परदेशी भांडवलाचा ओघ वाढवून तंत्रज्ञानावर भर देणे, आरोग्य क्षेत्रात सुधारणा, राष्ट्रीय सुरक्षा व हितसंबंध जोपासणे यावर प्रखरतेने प्रकाश टाकत आहेत. सोबतच आंतरराष्ट्रीय राजकारणामध्ये आपली एक वेगळी छबी निर्माण होण्यासाठी इतर राष्ट्रांशी व राष्ट्रप्रमुख सोबत सौजन्याचे आणि सहकार्याचे संबंध नरेंद्र मोदी हे त्यांच्या परराष्ट्र धोरणाच्या माध्यमातून ठेवत आहेत. राष्ट्रीय हित साध्य करण्यासाठी नरेंद्र मोदी यांच्या परराष्ट्र धोरणात प्रखर राष्ट्रवाद हा ठासून भरलेला आहे हे ही त्यांच्या परराष्ट्र धोरणाचे वैशिष्ट्य सांगता येईल.२०१४ मध्ये पदभार स्वीकारल्यापासून, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी अत्यंत प्रभावी परराष्ट्र धोरणासह भारताला एक धोरणात्मक खेळाडू बनवले आहे. असंलग्नतेच्या जुन्या रणनीतीपासून काही अंशी दूर होत, महान आणि मध्यम आकाराच्या शक्तींसोबत मजबूत संबंधांचा मार्ग मोकळा करून दिला आहे. त्याच्या देखरेखीखाली, भारताने वाढत्या चीनचा समतोल राखण्याच्या प्रयत्नात युनायटेड स्टेट्स आणि त्याच्या इंडो-पॅसिफिक रणनीतीचा स्वीकार केला आहे आणि हा प्रदेश बळजबरीपासून मुक्त आणि खुला ठेवला आहे. दहशतवादाच्या अरिष्टाचा सामना करण्यासाठी पारंपारिक पद्धतींच्या पलीकडे जाण्याची आपली तयारी दर्शवण्यासाठी पूर्व आणि पश्चिम दोन्ही बाजूंनी सीमेपलीकडे सर्जिकल स्ट्राइक करून दहशतवाद खपवून घेतला जाणार नाही हे सांगण्याचा प्रयत्न करण्यात नरेंद्र मोदी यशस्वी झालेले आहेत. मोदी सरकारचा परस्पर वाढ आणि विकासासाठी परकीय राष्ट्रांशी चिरस्थायी संबंध प्रस्थापित करणे हा परराष्ट्र धोरणाचा एक पैलू होता. दुसरे महत्त्वाचे म्हणजे परदेशात संकटात सापडलेल्या भारतीयांची सुरक्षा सुनिश्चित करण्यासाठी मोदी सरकारचा परराष्ट्र धोरण कटिबद्ध असल्याचे दिसून येते.

**सारांश** :

शीतयुद्धाच्या समाप्तीनंतर जगातील अनेक राष्ट्रांना आपल्या परराष्ट्र धोरणामध्ये बदल करावा लागला.जागतिक राजकारणाचा रंगमंच हा द्विध्रुवी व्यवस्थेकडून एकध्रुवी व्यवस्थेकडे वळला होता.त्यामुळे प्रत्येक राष्ट्रांना आपल्या आर्थिक विकासासाठी आपल्या परराष्ट्र धोरणामध्ये बदल करावा लागला. याच काळात जागतिकीकरणामुळे जग हे एक खेडे झाले आणि त्यामुळे जगात घडलेल्या प्रत्येक घटनेचा परिणाम हा प्रत्येक समूहावर होऊ लागला आणि त्याचा विचार करता जागतिकीकरणामध्ये आपले अस्तित्व टिकवण्यासाठी प्रत्येक राष्ट्रांना आपल्या धोरणांमध्ये वेगवेगळ्या पद्धतीने बदल करावे लागले.

**आपली प्रगती तपासा**

१. जागतिकीकरण म्हणजे काय?

_______________________________________________
_______________________________________________
_______________________________________________
_______________________________________________
_______________________________________________

२.जागतिकीकरणाच्या काळातील भारतीय परराष्ट्र धोरणाची चर्चा करा?

_______________________________________________
_______________________________________________
_______________________________________________
_______________________________________________
_______________________________________________

## १.७ भारतीय परराष्ट्र धोरणाचे मूल्यांकन :

भारतीय परराष्ट्र धोरणाचे मूल्यांकन करताना भारतात अनेक वर्ष कॉंग्रेस पक्षाची राजवट होती. मधल्या काळात राजकीय अस्थिरतेच्या काळात याठिकाणी विरोधी पक्षांचे सरकार काही काळ अस्तित्वात आली. पण खऱ्या अर्थाने गैर कॉंग्रेसेत्तर पक्षाला प्रथमच २०१४ आणि २०१९ मध्ये पहिल्यांदा बहुमत मिळाले. परराष्ट्र धोरणाचा विचार करता भारताच्या आर्थिक विकासासाठी प्रयत्न करणे प्रत्येक सरकारचे धोरण असते. त्या दृष्टिकोनातून भारत स्वतंत्र झाला तेव्हापासून आजतागायत पर्यंत भारतीय परराष्ट्र धोरणाची ठरवलेली उद्दिष्टे किती प्रमाणात साध्य झाली? त्याचबरोबर भारतीय परराष्ट्र धोरणात काही नवे विचारप्रवाह स्वीकारलेत का? आंतरराष्ट्रीय स्तरावर भारतीय परराष्ट्र धोरणामुळे भारताचे किती महत्त्व वाढवले? भारताचे शेजारील राष्ट्रांशी संबंध कोणत्या प्रकारचे आहेत व त्याचा भारतीय विकासावर काय परिणाम झाला?याचाही विचार आपल्याला परराष्ट्र धोरणाचे मूल्यांकन करताना करणे अभिप्रेत आहे.

**भारतीय परराष्ट्र धोरणाचे यश**

- अलिप्तता धोरणामुळे भारताची जागतिक प्रतिष्ठा ही वाढलेली आहे.
- अलिप्ततेच्या धोरणामुळे शीतयुद्धाच्या काळात भारतास दोन्ही महाशक्तीकडून संरक्षणासाठी अनेक वेळा मदत झालेली आहे.
- भारताच्या औद्योगिक, कृषी, आर्थिक विकासासाठी बड्या राष्ट्राकडून अनेक वेळा मदत झालेली आहे.
- भारताच्या परराष्ट्र धोरणांच्या तत्त्वाचा विचार करता भारताने जगाला शांततेचा संदेश दिला.

- अलिप्तेच्या धोरणामुळे वेळप्रसंगी महासत्तांनी केलेल्या लष्करी कारवाईंचा व हस्तक्षेपाचा ही विरोध भारताला अनेक वेळा करता आला.
- सुरुवातीच्या काळात भारतीय परराष्ट्र धोरण हे आदर्शवादी होते.भारतावर ज्यावेळी परकीय आक्रमणे झाली त्यावेळेस पासून भारतीय परराष्ट्र धोरणाची कुह ही बदलून वास्तवाकडे झुकलेली आहे.
- भारताने अणुचाचण्या करून आणुशक्तीचा शांततेसाठी वापर केला जाईल अशी भूमिका घेतल्यामुळे आंतरराष्ट्रीय राजकारणात भारताची प्रतिष्ठा वाढली आहे.
- आंतरराष्ट्रीय राजकारणात आज शांततापूर्ण व सहजीवनाचा मार्ग दाखवल्यामुळे भारतास अनेक मित्र मिळाले आहेत.
- भारताने जागतिक पातळीवरील आंतरराष्ट्रीय संघटनांचे म्हणजेच संयुक्त राष्ट्र संघाचे वेळोवेळी समर्थन केले आहे.
- भारतीय परराष्ट्र धोरणामुळे भारतीय शेजारी राष्ट्राशी संबंध वाढवण्यात यश मिळालेला आहे.
- भारतीय परराष्ट्र धोरणाचा बदलत्या स्वरूपाची चर्चा करत असताना भारतीय परराष्ट्र धोरणात लोकशाहीकरण होताना दिसून येत आहे.
- भारतीय परराष्ट्र धोरणातून सांस्कृतिक क्षेत्राच्या विकासाच्या संदर्भात मोठी पावले आता उचलली जाऊ लागली आहेत.
- भारताने आपल्या परराष्ट्र धोरणामध्ये दक्षिण आशियावर लक्ष केंद्रित केलेले आहे. भारताच्या आर्थिक विकासाला हातभार लागलेला आहे.

**भारतीय परराष्ट्र धोरणातील उणीवा**

- भारतीय परराष्ट्र धोरणात राष्ट्र हितापेक्षा जागतिक हितास महत्त्वाचे स्थान दिले गेल्यामुळे भारताची ज्या पद्धतीने प्रतिष्ठा वाढणे गरजेचे होते त्या प्रमाणात प्रतिष्ठा वाढली नाही.
- आंतरराष्ट्रीय राजकारणात भारतास  अलिप्ततेच्या धोरणामुळे मित्रापेक्षा शत्रुत्वाचे प्रमाण वाढलेले आहे.
- भारतात आपल्या शेजारी राष्ट्रांशी संबंध वाढवता आले नाहीत.
- काश्मीरचा प्रश्न संयुक्त राष्ट्र संघात  जाऊनही तो प्रश्न  अद्यापही सोडवता आलेला नाही.
- भारत-चीन सीमा प्रश्न, भारत-पाकिस्तान वाद प्रश्नही आतापर्यंत सुटू शकले नाहीत.

**भारतीय परराष्ट्र धोरणा पुढील आव्हाने**

- जागतिक राजकारणाचा विचार करता आशिया आफ्रिका खंडाला आता महत्त्वाचे स्थान असल्याने हिंद महासागरातील प्रभावक्षेत्र लक्षात घेता भारतास परराष्ट्र धोरणाची रूपरेषा काही अंशी बदलणे गरजेचे आहे.
- अलिप्तता चळवळीचे भवितव्य काय याचा विचार करून भारतास आपली विदेश निती ठरवावी लागणार आहे.
- चीनची होणारी आर्थिक वाढ, व जगाचे नेतृत्व करण्याची महत्वकांक्षा यामुळे भारतास आपल्या परराष्ट्र धोरणात बदल करणे अभिप्रेत आहे.
- भारतातील अंतर्गत राजकारण व शेजारी राष्ट्रातील संबंध ह्याचा विचार करता भारतास आपले परराष्ट्र धोरण आखताना या दोन्ही बाबींचा विचार करणे अधिक गरजेचे आहे.
- भारतास आपली आंतरराष्ट्रीय राजकारणात प्रतिष्ठा वाढविण्यासाठी जागतिक पातळीवरील संबंध सदृढ करून हे संबंध वाढविणे गरजेचे आहे.
- भारताचे परराष्ट्र धोरण आखताना लोकराजनय किंवा पब्लिक डिप्लोमासी यामध्ये सुद्धा बदल करणे गरजेचे आहे.
- देशाच्या अंतर्गत आणि बाह्य सुरक्षेशी निगडित आव्हानांचे व्यवस्थापन भारतीय परराष्ट्र धोरणास करणे गरजेचे आहे.
- भारतीय परराष्ट्र धोरणाचा विचार करता प्रखर राष्ट्रवाद हा भारतीय औद्योगिक विकासात काही ठिकाणी खीळ घालू शकतो त्यामुळे प्रखर राष्ट्रवादाचा ही विचार करता परराष्ट्र धोरणामध्ये आपल्या भूमिका काही वेळा बदलणे गरजेचे आहे.

## अधिक वाचनासाठी संदर्भ ग्रंथ सूची:

Balakrishnan T. K.2010. Foreign Policy of India : Problems and Paradoxes.New Delhi : Mohini Publishers and Distributors .

Dikshit , Pratima . 2002. Dynamics of Indian Export Trade . New Delhi : Deep and Deep Publications .

Dunn M. Robert and Ingram C. James . 1996. International Economics . New York : Wiley .

Engelmeier Tobias.2009. Nation - Building and Foreign Policy in India : An Identity - Strategy Conflict . New Delhi : Cambridge University Press .

Elrod, Richard B. “The Concert of Europe: A Fresh Look at an International System.” World Politics, vol. 28, no. 2, 1976,JSTOR, JSTOR, www.jstor.org/stable/2009888.

Ganguly Sumit.2011 .India's Foreign Policy . New Delhi : Oxford University Press.

Garg Anand . 2015. Foreign Trade Policy with Handbook of Procedures ( Vol.1 ) . Delhi : BPP "The Cuban Missile Crisis, October 1962." U.S. Department of State, U.S. Department of State, history.state.gov/milestones/1961-1968/cuban-missile-crisis.

Khanna V. N. 2010. Foreign Policy of India.Noida, India : Vikas Publishing House Pvt . Ltd.

Kumar Satish .1987. Developing Countries in International Trade Relations . Allahabad : Chugh Publications .

Mathur Vibha . 2006. Foreign Trade of India 1947 to 2007- Trends , Policies and Prospects . New Delhi : New Century Publications

Muni S. D. 2009. India's Foreign Policy : The Democracy Dimension . Foundation Books .

Reddy K. Raja . 2012. Foreign Policy of India and Asia - Pacific . New Delhi : New Century Publications .

Sikri Rajiv.2009. Challenge and Strategy : Rethinking India's Foreign Policy . New Delhi : Sage Publications India Limited .

दत्त पी . व्ही .२०१२. बदलती दुनियामें भारत की विदेश नीती, दिल्ली,माध्यम कार्यान्वये विदेशालय.

देवळाणकर शैलेंद्र.२०१७. भारताचे परराष्ट्र धोरण नवीन प्रवाह, पुणे, सकाळ पेपर्स प्रायव्हेट लिमिटेड.

देवळाणकर शैलेंद्र.२०१०. भारतीय परराष्ट्र धोरण :पुणे,सातत्य आणि स्थित्यंतर, प्रकाशक प्रतिमा प्रकाशन .

वेदालंकार हरिदत्त.१९७१. आंतरराष्ट्रीय संबंध, दिल्ली, सरस्वती सदन.

भोगले शांताराम .१९८२.भारताचे परराष्ट्र धोरण , नागपूर, विद्या प्रकाशन.

❄❄❄❄❄❄❄

# २

# परराष्ट्र धोरण निर्मितीची प्रक्रिया

**घटक रचना**

२.० घटकाची उद्दिष्टे
२.१ प्रस्तावना
२.२ परराष्ट्र धोरणाच्या व्याख्या
२.३ परराष्ट्र धोरण: संरचना आणि प्रक्रिया
२.४ कार्यकारी मंडळाची भूमिका : राजकीय कार्यकारी मंडळ आणि नोकरशाही
२.५ परराष्ट्र धोरणाची निर्मिती: संसदेची भूमिका
२.६ भारताचे परराष्ट्र धोरण : राजकीय पक्ष, दबाव गट आणि प्रसारमाध्यमांची भूमिका
२.७ सारांश
२.८ संदर्भ सूची

## २.० घटकाची उद्दिष्टे

आणि त्यांना धोरण निर्मात्यांपर्यंत अधिक प्रवेश आहे, तर इतर गट अनौपचारिक आहेत परंतु प्रभावशाली माध्यमातील लेखनासह विविध माध्यमांद्वारे त्यांची मते जाणून घेण्याद्वारे प्रामुख्याने प्रभाव पाडतात. तसेच मासिके आणि अलीकडे सोशल मीडियाद्वारे सुद्धा परराष्ट्र धोरणावर प्रभाव टाकणे शक्य झाले आहे. बहुतेक प्रभावशाली दबाव गट हे प्रामुख्याने आपल्या आर्थिक मागण्या मान्य करवून घेण्यास आग्रही असतात. त्यांचा आर्थिक हितसंबंधांवर अधिक भर असलेला दिसून येतो.

नवीन आर्थिक धोरण स्वीकारल्यानंतरच्या काळात, FICCI, CII, ASSOCHAM, NASSCOM इत्यादीसारख्या व्यावसायिक संस्थांना यूएस लॉबी गटांसारखेच मानले जाऊ शकते, जे त्यांच्या सदस्यांच्या हितासाठी अनुकूल व्यावसायिक वातावरण निर्माण करण्यासाठी सरकारशी संलग्न असतात. भारताच्या स्थूल राष्ट्रीय उत्पादन (GDP) चा एक घटक म्हणून परकीय व्यापार आणि गुंतवणूक १९९० च्या दशकापासून वाढत आहे. साहजिकच या परस्परसंवादाचा बराचसा भाग भारतीय निर्यातदार, आयातदार, प्रत्यक्ष विदेशी गुंतवणूक प्राप्तकर्ते आणि परदेशात भारतीय गुंतवणुकीला अनुकूल अशी धोरणे स्वीकारण्यासाठी सरकारला प्रभावित करण्याचा प्रयत्न करतो.

भारतात राजकीय विचारवंतांनी दबाव गटाच्या अभ्यासक्रमांमध्ये विशेष लक्ष दिले नाही असे काही तज्ज्ञांचे मत आहे. भारतीय परराष्ट्र धोरणाशी संबंधित हितसंबंधांच्या गटांचा अभ्यास पूर्णपणे दुर्लक्षित होताना दिसतो आहे. याचा अर्थ असा नाही की असे गट भारतात सक्रिय नाहीत किंवा त्यांनी भारतीय परराष्ट्र व्यवहार स्वीकारण्यासाठी प्रभाव पाडण्याचा प्रयत्न केला नाही. या संघटनांपैकी एक प्रमुख प्रभावशाली गट व्यावसायिक संस्था म्हणून FICCI ची भूमिका महत्वाची आहे. या संघटनांमधील प्रमुख स्वारस्य गट आता फेडरेशन ऑफ इंडियन चेंबर्स ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्री, नवी दिल्ली असल्याचे दिसते. ३० वर्षांहून अधिक वर्षांपूर्वी संघटित, मध्यवर्ती स्थित FICCI ची झपाट्याने वाढ झाली आहे आणि तिच्या अनेक सदस्य संस्थांमध्ये जुन्या भारतीय व्यापारी चेंबर बॉम्बे, सदर्न इंडियन चेंबर ऑफ कॉमर्स, मद्रास आणि बंगाल नॅशनल चेंबर ऑफ कॉमर्स यासारख्या महत्त्वाच्या प्रादेशिक व्यावसायिक संघटनांचा समावेश आहे. देशांतर्गत आणि परकीय व्यापार आणि वाहतूक, उद्योग आणि उत्पादन, वित्त आणि इतर सर्व आर्थिक विषयांमध्ये भारतीय व्यवसायाला प्रोत्साहन देण्यासाठी FICCI ने सर्व विषयांवर संघटित कृती सुरक्षित करण्यासाठी आणि कायदेशीर मार्गांनी आवश्यक असलेली सर्व पावले उचलण्याचे धाडस केले आहे. उपरोक्त आर्थिक हितसंबंधांना प्रभावित करणाऱ्या कायद्याचे समर्थन किंवा विरोध करण्यासाठी किंवा इतर कृतींना प्रोत्साहन देण्यासाठी FICCI नेहमी प्रयत्नशील राहिली आहे.

**प्रसार माध्यमे आणि परराष्ट्र धोरण**

लोकशाहीत परराष्ट्र धोरणाच्या मुद्द्यांवर जनमत तयार करण्यात माध्यमांची स्पष्ट आणि स्वतंत्र भूमिका असते. तथापि, परराष्ट्र धोरणावरील माध्यमांचा प्रभाव दोन महत्त्वाच्या घटकांद्वारे आकारला जातो: प्रथम, देशांतर्गत राजकीय असहमतीची व्याप्ती किंवा परराष्ट्र धोरणाच्या मुद्द्यांवर एकमत; आणि दुसरे, तत्कालीन सरकार आणि प्रसार माध्यमे यांच्यातील संबंध.

स्वातंत्र्यानंतरच्या सुरुवातीच्या वर्षांमध्ये भारतीय परराष्ट्र धोरणात देशांतर्गत राजकीय नेत्यांची सहमती उच्च दर्जाची होती. राष्ट्रीय पत्रकारितेतील काहींनी जवाहरलाल नेहरूंच्या एकूण परराष्ट्र धोरणाबाबत प्रश्नचिन्ह उपस्थित केले. शीतयुद्धाच्या काळात प्रेसमध्ये ही एकमते कमकुवत झाली होती, काहींनी पाश्चिमात्य देशांशी जवळचे संबंध ठेवण्यास आणि इतरांनी मजबूत "साम्राज्यवाद विरोधी" भूमिकेची बाजू घेतली होती. भारतातील मुख्य प्रवाहातील सार्वजनिक आणि राजकीय मतांनी शीतयुद्धात नेहरूंच्या "अलिप्ततावाद" च्या मार्गाला अनुकूलता दर्शविली.

परराष्ट्र मंत्रालयाने पारंपारिकपणे प्रभावशाली संपादक आणि स्तंभलेखकांसोबत जवळचे संबंध ठेवले आहेत. काही पत्रकार याकडे खोल संशयाने पाहतात आणि माध्यमांच्या स्वातंत्र्याचे रक्षण करण्याचा एक मार्ग म्हणून सरकारी आदरातिथ्य स्वीकारण्यासही नकार देऊ शकतात, परंतु माध्यमांवर त्यांच्या दृष्टिकोनानुसार विजय मिळवण्यात सरकारचे यश तसेच अतिशयोक्ती असू नये. प्रसारमाध्यमांमध्ये वृत्तपत्रे, आकाशवाणी, दूरदर्शन इत्यादींचा प्रामुख्याने अंतर्भाव होतो. आधुनिक काळातील तंत्रज्ञानाच्या प्रगतीमुळे प्रसारमाध्यमात मोलाचे बदल झालेले आहेत. स्वातंत्र्यपूर्व काळात तसेच स्वातंत्र्यानंतरही वृत्तपत्रांनी प्रबोधन कार्याला प्राधान्य देऊन निरनिराळ्या राजकीय सामाजिक व सांस्कृतिक प्रश्नांवर लोकांमध्ये जागृती निर्माण करून देशाची प्रगती करण्यात महत्त्वाचा वाटा उचलला आहे. यामध्ये सुरुवातीस भारतामध्ये अनेक वर्ष साक्षरतेचे प्रमाण कमी असल्यामुळे एकंदरीत देशातील बहुसंख्य लोक हे राजकीय क्षेत्रापासून तसेच चर्चापासून वंचित राहिले असे असले, तरीही आज माध्यमांमध्ये झालेले अमुलाग्र बदल व त्यांचा भारताच्या परराष्ट्र धोरणावर प्रभाव आपणास नाकारता येत नाही. जनमानसावर असलेला अनेक माध्यमांचा प्रभाव हा लोकमत निर्मितीस महत्वाची भूमिका बजावतो. त्यामुळे लोकशाही व्यवस्थेत माध्यमांचा प्रभाव दुर्लक्षित करता येत नाही.

भारतातील प्रसारमाध्यमांनी परराष्ट्र धोरणातील वेगवेगळ्या संवेदनशील प्रश्नांची योग्य पद्धतीने दखल घेतली आहे. भारताचे असणारे विविध देशांची सहकार्य पूर्ण तसेच संघर्षमय संबंधांचा आढावा घेण्याचे कार्य प्रसार माध्यमे करत असतात. अलीकडील काळात माहिती तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात झालेल्या क्रांतीमुळे प्रसारमाध्यमे ही लोकांच्या दैनंदिन जीवनाचा अविभाज्य भाग बनली आहेत. भारताच्या वाढत्या विस्कळीत राजकीय वातावरणात आणि खाजगी माध्यम संस्थांचे वाढणारे अर्थसंकल्प पाहता, प्रमुख धोरणात्मक मुद्द्यांवर, विशेषत: इलेक्ट्रॉनिक माध्यमांच्या वाढीनंतर आणि टेलिव्हिजन चॅनेलच्या प्रसारानंतर, माध्यमांच्या भूमिका वाढल्या आहेत.

संसदेच्या कामकाजमध्ये इलेक्ट्रॉनिक माध्यम हे एक भिन्न क्षेत्र बनले आहे ज्यामध्ये परराष्ट्र धोरणावरील पक्षीय राजकीय मतभेद माध्यमाच्या स्वरूपामुळे अधिक जोरदारपणे व्यक्त केले जातात. खरं तर, टीव्ही न्यूज चॅनेलने परराष्ट्र धोरणावरील सार्वजनिक विसंवाद वाढवण्यास हातभार लावणे अपेक्षित आहे मात्र सर्व "चर्चा" जाणूनबुजून अनेकदा विवादित "विरोध आणि विरुद्ध' वादविवादांमध्ये अडकवल्या जातात. एकमताची सोय करण्याऐवजी अशा "वादावादी" वादविवादामुळे भिन्नता निर्माण होते. दर्शकांचे लक्ष वाढवण्यासाठी आणि बातम्यांना अधिक "मनोरंजक" बनवण्यासाठी टेलिव्हिजन या पद्धतीचा अवलंब करत असल्यामुळे, यामुळे

munotes.in

परराष्ट्र धोरणाच्या मुद्द्यांवर राजकीय विचारांना आकार देण्यात माध्यमांची भूमिका वाढली आहे.

त्यामुळे गेली दोन दशके परराष्ट्र धोरणाला आकार देण्याच्या माध्यमांच्या भूमिकेला एक महत्त्वाचे वळण देणारी आहे. हे तीन अतिशय भिन्न घटकांमुळे आहे: (१) परराष्ट्र धोरणावरील देशांतर्गत राजकीय सहमती हळूहळू नष्ट होणे, माध्यमांना मध्यस्थ आणि राजकीय विचारांना विरोध करणारे स्वतंत्र विश्लेषक म्हणून भूमिका देणे; (२) प्रसारमाध्यम क्रांती आणि विस्तार, दूरचित्रवाणी आणि व्यावसायिक पत्रकारितेच्या वाढीसह आणि खाजगी कॉर्पोरेट जाहिरातींच्या महसुलाचे वाढते महत्त्व, माध्यमांच्या अर्थशास्त्रावर प्रभाव पाडण्यासाठी माध्यमांना सरकारी समर्थनाच्या विरोधात वापरणे; आणि (३) माध्यमांमध्ये मध्यमवर्ग आणि व्यापारी वर्गाच्या वाढत्या प्रभावामुळे परराष्ट्र धोरणावर माध्यमांच्या विचारसरणीवरही परिणाम झाला आहे.

देशांतर्गत राजकीय विसंवादाच्या संदर्भात, परराष्ट्र आणि धोरणात्मक धोरणाच्या मुद्द्याबाबत जनमत आणि सरकारी धोरणाला आकार देण्यासाठी माध्यमे महत्त्वाची भूमिका बजावत असल्याचे पहिले उदाहरण म्हणजे १९९६ मध्ये द टाइम्स ऑफ इंडियाने या विषयावर घेतलेली भूमिका. भारत सर्वसमावेशक चाचणी बंदी करार (CTBT) करारावर स्वाक्षरी करत आहे. टाइम्स ऑफ इंडियाने संपादकीयरित्या भारताने सर्वसमावेशक चाचणी बंदी करार ज्या स्वरूपात प्रस्तावित केला होता त्या स्वरूपात नाकारण्याची मागणी केली. भारत केवळ एक मान्यताप्राप्त अण्वस्त्र शक्ती म्हणून स्वाक्षरी करणारा असू शकतो, शस्त्र नसलेले राज्य म्हणून नाही. हे शेवटी अधिकृत स्थान भारताने स्वीकारले.

संपूर्ण मुख्य प्रवाहातील प्रसारमाध्यमे नागरी अणुऊर्जा क्षेत्रातील सहकार्यावरील भारत-अमेरिका कराराचे मजबूत आणि सातत्यपूर्ण समर्थक आहेत. द हिंदू आणि द एशियन वृत्तपत्रांचा अपवाद वगळता नागरी आण्विक करारासाठी प्रचंड, माध्यमांच्या पाठिंब्याने, डाव्या आणि उजव्या विरोधकांच्या राजकीय टीकेच्या विरोधात, आपल्या मुद्द्यांचा राजकीय बचाव करण्यासाठी सरकारचा हात मजबूत झाला. या काळात छपाई माध्यमांपेक्षा, दूरदर्शनने आण्विक करारासाठी सार्वजनिक समर्थन निर्माण करण्यात अत्यंत प्रभावशाली भूमिका बजावली. कोणत्याही मोठ्या टीव्ही वृत्तवाहिनीने कराराच्या विरोधात प्रचार केला नाही, तर अनेकांनी जोरदार समर्थनीय भूमिका घेतली.

**प्रसार माध्यमे भूमिका : एक मूल्यांकन**

परराष्ट्र धोरणावरील माध्यमांचा प्रभाव देशांतर्गत प्रेक्षकांना परकीय देश आणि त्यांच्या परराष्ट्र धोरणाची समज प्रदान करण्यात माध्यमांच्या मोठ्या भूमिकेपासून सुरू होऊ शकतो. एखाद्या देशाची किंवा प्रदेशाची प्रतिमा, माध्यमांचे अहवाल आणि समालोचनाद्वारे तयार केली जाते, परंतु देशाच्या परराष्ट्र धोरण निर्मितीचा एक प्रमुख घटक असू शकत नाही.

भारताच्या परराष्ट्र धोरणाच्या निर्मितीमध्ये प्रसारमाध्यमांनी मुख्यतः प्रशंसनीय भूमिका बजावली होती कारण स्वातंत्र्योत्तर कालखंडातील बहुतेक काळात धोरणाबाबत सर्वसाधारण एकमत होते. तथापि, परराष्ट्र धोरणाची मुख्यत्वे सहमतीपूर्ण शैली बदलण्यात आली आहे जी केवळ भिन्न ते पक्षपाती आणि वैचारिक असण्यापर्यंत भिन्न आहे, जसे की आपण भारत-

अमेरिका अणुकरार पाहिला आहे. सहमतीपूर्ण परराष्ट्र धोरणाच्या युगाच्या समाप्तीसह, माध्यमे राजकीय विचारांना विरोध करण्यासाठी पत्रकाराऐवजी लवादाची भूमिका बजावतात. विवादित दृश्यांची मध्यस्थी करणे आणि विशिष्ट दृष्टिकोनाचे समर्थन करणे यामधील विभाजन रेषा खूपच पातळ आहे. दरम्यान, एकूणच माध्यमे मोठ्या गुंतवणुकीला आकर्षित करणारी एक महत्त्वाची व्यावसायिक संधी म्हणून उदयास आली आणि त्याचा बहुतांश जाहिरातींचा महसूल खाजगी क्षेत्राकडून प्राप्त झाला.

टीव्ही न्यूज चॅनेल बहुधा अजेंडा ठरवत नसतात, परंतु त्यांनी निश्चितपणे मुद्दे तयार करण्याची नवीन शैली अवलंबली आहे. उदाहरणार्थ, न्यूजकास्ट्स कमी, परस्पर व्यक्तिमत्वातील संघर्ष, वादविवादासाठी आणि विरुद्ध, स्टार अँकरद्वारे कडकपणे नियंत्रित करतात. तथापि, प्रत्यक्षात धोरणावर प्रभाव टाकण्याची त्यांची नोंद काही वेळा उदासीन असलेली दिसून येते.

त्यामुळे परराष्ट्र धोरणाच्या चर्चेची माहिती देण्यात, आकार देण्यात किंवा त्यामध्ये माध्यमे महत्त्वाची भूमिका बजावतात यात थोडीशी शंका असली तरी, माध्यमे खरोखरच निवडलेल्या परराष्ट्र धोरणांच्या निर्णयांना स्वीकारण्यासाठी, सुधारण्यासाठी किंवा बदलण्यासाठी सरकारचे नेतृत्व करू शकतात की नाही याबद्दल शंका आहे. भारतीय माध्यमांचा अभ्यास करणारे विचारवंत म्हणतात की त्यांच्या निष्कर्षांवरून असे दिसून आले आहे की 'भारतीय माध्यमांनी परराष्ट्र धोरणाच्या सूत्रीकरणावर किमान आणि अनेकदा प्रतीकात्मक पद्धतीने परिणाम केला'. त्या पुढे भूमिका घेतात की प्रसार माध्यमांमध्ये परिपक्वता नसल्याची धारणा दीर्घकालीन धोरणात्मक बदलांवर प्रभाव टाकण्याच्या त्यांच्या क्षमतेपासून कमी झाली आहे.

अशा प्रकारे, प्रसारमाध्यमांचा सरकारी धोरणावर किती प्रभाव पडतो हे बहुतांशी सरकारवरच मोठ्या प्रमाणात अवलंबून असते. सुसंगत धोरण असलेले एक मजबूत सरकार माध्यमाच्या वादळांना तोंड देऊ शकते, तर सरकारमधील एक अनिश्चित मार्ग धोरणाच्या जहाजाला एका दिशेने किंवा दुसऱ्या दिशेने नेऊ शकतो किंवा ते थांबवू शकते. विशेष समस्यांवरील अहवालात कौशल्याचा अभाव, खराब संपादकीय पर्यवेक्षण किंवा दर्शकसंख्या टिकवून ठेवण्याचे आणि अभिसरण वाढवण्याचे एक साधन म्हणून जाणीवपूर्वक भावनांना वाव देण्याची निंदक रणनीती यासारख्या माध्यमांच्या समस्यांचा आढावा घेता येईल.

## २.७ सारांश

परराष्ट्र धोरण निर्मितीच्या प्रक्रियेमध्ये अनेक बाबी मुलभूत ठरतात. त्यामध्ये संसदेची भूमिका ही अतिशय महत्वपूर्ण असते. संसद आपल्या विविध सामित्याद्वारे परराष्ट्र धोरण निर्मितीचे कामकाज पाहत असते. त्याशिवाय राजकीय कार्यकारी मंडळ आणि नोकरशाहीची भूमिका, त्यांनी पार पाडलेल्या जबाबदाऱ्या तसेच राष्ट्राप्रती केलेले नेतृत्व यांचा देखील महत्वपूर्ण वाटा आहे हे विसरून चालणार नाही. भारतासारख्या लोकशाहीप्रधान देशात प्रबळ राजकीय व विरोधी पक्ष तसेच प्रसार माध्यमांची भूमिका देखील महत्वाची आहे. वरील मुद्द्यांखेरीज परराष्ट्र धोरणाची निर्मिती होत असताना अनेक घटक प्रभाव टाकत असतात. त्यामध्ये राजकीय नेतृत्व, राजकीय व सामरिक भूगोल, राष्ट्राची राजकीय व्यवस्था, अर्थकारण, जनमत यांसारख्या इतर अनेक गोष्टी परिणामकारक ठरतात. एकंदरीत परराष्ट्र धोरण निर्मितीची प्रक्रिया वरील घटकांतून स्पष्ट होते.

## २.८ संदर्भ सूची


१. सिकरी, राजीव. (२०१७). *“भारताच्या परराष्ट्र धोरणाचा पुनर्विचार आव्हाने आणि नीती”,* सेज प्रकाशन, नवी दिल्ली.

२. पाटील, वा. भा. (फेब्रुवारी, २०१७). *“भारताचे परराष्ट्रीय धोरण”,* प्रशांत प्रकाशन.

३. देवळाणकर, शैलेन्द्र. (डिसेंबर, २०१७). *“भारताचे परराष्ट्र धोरण नवीन प्रवाह”* सकाळ पेपर्स प्रा. लि. प्रकाशन, पुणे

४. तोडकर, बी. डी. (जुलै, २०२२). भारत आणि जग, डायमंड प्रकाशन, पुणे

५. पाटील, व्ही. बी. *“भारताचे परराष्ट्र धोरण”,* के'सागर प्रकाशन


❊❊❊❊❊❊❊

munotes.in

# ३

# राष्ट्रीय सुरक्षा

**घटक रचना**

३.१ उद्दिष्टये

३.२ राष्ट्रीय सुरक्षा संकल्पना

३.३ राष्ट्रीय सुरक्षा विकास व बदलते स्वरूप

३.४ राष्ट्रीय सुरक्षा तयारी / सज्जता भारतीय संदर्भ

३.५ अण्वस्त्र धोरण

३.६ भारताची संरक्षण सज्जता

३.७ सारांश

३.८ आपण काय शिकलो?

३.९ संदर्भ सूची

## ३.१ उद्दिष्टये :-

भारतामध्ये अत्यंत महत्वाच्या परंतु दुर्लक्षित केल्या गेलेल्या बाबींमध्ये राष्ट्रीय सुरक्षा या संपल्पनेचा अंतर्भाव करावा लागेल. स्वातंत्र्य समता व न्याय या संकल्पनांना जसे स्वत:चे एक मूल्य आहे तसेच मूल्य राष्ट्रीय संकल्पनेस ही आहे. समकालीन संदर्भात आंतरराष्ट्रीय राजकारणातील तो परवलीचा शब्द आहे. १६४८ च्या वेस्टफॉलियाच्या तहानंतर राष्ट्रराज्य व्यवस्था असस्तित्वात आली. त्याबरोबरच राष्ट्रीय सुरक्षा हा विचारही रूजण्यास सुरूवात झाली. सुरूवातीच्या काळात राष्ट्रीय सुरक्षेची संकल्पना ही युद्धाशी व पर्यायाने सत्ता व बळाचा वापर याबाबींशी निगडीत होती. १९५०च्या दशकात जॉर्ज हर्ज यांनी प्रथम राष्ट्रीय सुरक्षेची संकल्पना मांडली. त्यानंतर रॉबर्ट जर्वीस अरनॉल वोल्कर, जेट क्रेल, हेडली बुल, फ्रँक ट्रेझर, फ्रॉक सिमोनी इत्यादी तत्ववेत्यांनी राष्ट्रीय सुरक्षाच्या संकल्पनेचा विकास केला. त्यामुळेच आपल्या देशाचे सार्वभौमत्व टिकविणे व या मार्गात येणाऱ्या सर्व धोक्यांना आपल्या क्षमतेनुसार उत्तर देणे इथपासून अन्नसुरक्षा, ऊर्जा सुरक्षा इथपर्यंत राष्ट्रीय सुरक्षेचा विकास झाला आहे. राष्ट्रीय सुरक्षेची संकल्पना ही विकसित, विकसनशील व अविकसित राष्ट्रांच्या दृष्टीकोनातून केलेली आहे. यासंदर्भात भारतीय दृष्टीकोन व त्या अनुषंगाने राष्ट्रीय सुरक्षेचे बदलते संदर्भ अधोरेखित करणे हे या घटकाचे प्रमुख उद्दिष्ट आहे. त्याचबरोबर भारताने राष्ट्रीय सुरक्षिततेच्या दृष्टीने केलेली तयारी व घेतलेली काळजी या घटकांचा आढावा घेवून भारताचे आण्विक धोरण अवलोकन करणे हे ही या घटकातून आपणांस साध्य करता येईल.

## ३.२ राष्ट्रीय सुरक्षा संकल्पना –

१९५० च्या दशकामध्ये जॉन हर्ज यांनी राष्ट्रीय सुरक्षेची संकल्पना प्रथम मांडली असे म्हटले जाते. त्यानंतरच्या काळात रॉबर्ट जर्वीस यांनी राष्ट्रीय संकल्पनेच्या विकसाकरिता प्रयत्न

munotes.in

केले. अरनॉला वोल्फर यांनी राष्ट्रीय सुरक्षेची संकल्पना अधिक सुस्पष्ट करण्यात महत्वाचे योगदान दिले. 'डिस्कॉर्ड ॲण्ड कोलाबरेशन' या ग्रंथात त्यांना राष्ट्रीय सुरक्षा या संकल्पनेची सविस्तर व सुस्पष्ट मांडणी केलेली दिसते. त्यापुढील काळात राष्ट्रीय सुरक्षा या संकल्पनेचा विविधांगानी विचार मांडला जावू लागला. जसे की रॉबर्ट जर्वीस यांनी सुरक्षेच्या संदर्भात सिस्टिम लेव्हल ॲनलालिसिस पर्यंत चर्चा घडवून आणली तर जर्ट क्रेल यांनी सुरक्षेचा संदर्भ हा लष्करी व शांतता संशोधना पर्यंत पोहचवला. तर ब्रॅडेट आयोगाने मात्र सुरक्षेची संकल्पना केवळ लष्करी खर्च व लष्करापर्यंतच मर्यादित ठेवली. राष्ट्रीय सुरक्षा ही संकल्पना पुढील काही व्याख्यांच्या आधारे अधिक स्पष्ट करता येईल.

**१) वॉल्टर लिपमन :-**

राष्ट्रीय सुरक्षा म्हणजे अशी स्थिती ज्यामध्ये युद्ध टाळण्याकरिता राष्ट्रास कायदेशीर हितसंबंधाचा त्याग करावा लागत नाही व राष्ट्रीय सुरक्षिततेस धोका निर्माण झाला तरी तो धोका युद्धाच्या माध्यमातून दूर केला जातो.

**२) हेरॉल्ड लास्वेल :-**

राष्ट्रीय सुरक्षा म्हणजे राष्ट्र-राज्याचे परकिय हुकूमशाही पासूनचे स्वातंत्र्य होय.

**३) अरनॉल्ड वोल्फर :-**

अरनॉल्ड वोल्फर यांच्या मते, 'राष्ट्रीय सुरक्षेचा वस्तुनिष्ठ अर्थ असा आहे की प्राप्त केलेल्या मुल्यांना धोका नसणे व व्यक्तिनिष्ठपणे अशा मुल्यांवर हल्ला होईल या भीतीची अनुपस्थिती

**४) हेरॉल्ड ब्राऊन :-**

राष्ट्रीय सुरक्षा म्हणजे देशाची भौतिक अखंडता व प्रदेश जपण्याची क्षमता, उर्वरित जगाशी त्याचे आर्थिक संबंध वाजवी अटींवर टिकवून ठेवण्याची बाहेरून येणाऱ्या व्यत्ययापासून त्याचे स्वरूप, संस्था व शासन जतन करणे व त्याच्या सीमांवर नियंत्रण ठेवणे होय.

**५) नॅशनल डिफेन्स कॉलेज ऑफ इंडिया १९९६ :-**

राष्ट्रीय सुरक्षा हे राजकीय लवचिकता व परिपक्कता मानवी संसाधने, आर्थिक संसरचना व क्षमता, औद्योगिक पाया व नैसर्गिक संसांधनांची उपलब्धता व शेवटी लष्करी सामर्थ्य यांचे योग्य व आक्रमक मिश्रण आहे.

**६) प्रभाकरन पॉलेसी :-**

राष्ट्रीय सुरक्षा म्हणजे सर्व साधनांचा समतोल साधून कोणत्याही वेळी राष्ट्र-राज्य म्हणून आपल्या लोकांच्या स्पष्ट कल्याणासाठी व त्याच्या अस्तित्वासाठी असलेल्या बहु आयामी धोक्यांवर मात करण्याच्या राष्ट्राच्या क्षमतेची मोजता येणारी अवस्था होय.

**राज्याचे स्वरूप व राष्ट्रीय सुरक्षेची व्याप्ती :-**

राज्याचे स्वरूप व राष्ट्रीय सुरक्षेची व्याप्ती पुढील विचारवंताच्या भूमिकेतून अधिक स्पष्ट होते.

**१) थॉमस हॉब्ज यांचे सुरक्षेविषयक विचार :-**

थॉमस हॉब्ज यांनी राष्ट्रीय सुरक्षाविषयक बाबींवर असे प्रतिपादन केले आहे की, ‘राष्ट्राने शक्ती प्राप्त करण्यासाठी कायम तयारी ठेवणे आवश्यक असते. सार्वभौम राज्य आपली सुरक्षितता राखण्याकरिता कोणतीही राजकिय तडजोड स्वीकारू शकत नाही. सार्वभौम राज्याने राजकीय तडजोड केली तर अराजकमय परिस्थिती निर्माण होऊ शकते. हॉब्जच्या मते, सार्वभौम राष्ट्रे अंतर्गत व बहिर्गत शांतता प्रस्थापित करीत असतात मात्र त्यासाठी त्यांना मोठी किमंत मोजावी लागते.

**२) कार्ल मार्क्स यांचे सुरक्षाविषयक विचार :-**

कार्ल मार्क्स यांचे यासंदर्भात असे प्रतिपादन आहे की, राज्य ही हिंसा व वर्चस्व यावर आधारलेली संस्था आहे. नागरी समाजामध्ये अहंकारी वृत्ती व संघर्ष ही राज्याची गरज असते. तिचा उच्च वर्गाच्या हितसंबंधातील हा संघर्ष नैसर्गिक असून तो वरिष्ठ वर्गीयांनी लादलेला संघर्ष असतो. राज्य ही संरक्षक करणारी संस्था असते. त्यामुळे जर संपत्तीचे विकेंद्रिकरण करून खाजगी मालमत्ता नष्ट केली तर राज्यसंस्थेतील हिंसाचार संपेल, जनता शोषणमुक्त होईल व राज्यसंस्थाच विलयास जाईल व सुरक्षषचे सर्व प्रश्न निकाली निघतील.

## ३.३ राष्ट्रीय सुरक्षा विकास व बदलते स्वरूप / संदर्भ :-

सत्ता, न्याय, शांतता, समानता, स्वातंत्र्य या शब्दांचे स्वत:चे अस्तित्व आहे. त्याप्रमाणेच राष्ट्रीय सुरक्षेतही स्वत:चे अस्तित्व असल्याचे दिसते. ऐतिहासिक दृष्टीकोनातून विचार करता, राष्ट्र राज्याच्या उद्यानंतर राष्ट्रीय संकल्पनेचा अधिक विकास झालेला आहे. त्याचबरोबर राष्ट्रीय सुरक्षा, आंतरराष्ट्रीय सुरक्षा, जागतिक सुरक्षा यासारखे पैलू ही पुढे विकसित होत गेलेले आपणास दिसतात. काही तत्ववेत्त्यांनी राष्ट्रीय सुरक्षेत ऐतिहासिक व सैद्धांनिक जोड दिलेली आहे. त्यामुळे राष्ट्रीय सुरक्षेची संकल्पना अधिकाधिक व्यापक होत गेलेली आपणास दिसते. राष्ट्रीय सुरक्षेपासून एका समुहाची सुरक्षा, व्यक्तिची सुरक्षा त्याबरोबरीने राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय व जागतिक सुरक्षा आस ही हा विकास घडून आलेला दिसतो. राष्ट्रीय सुरक्षा या संकल्पनेच्या विस्ताराबरोबरच तिच्या व्याप्ती मध्ये लष्करी, राजकीय, आर्थिक, सामाजिक पर्यावरणीय, मानवीय अशा विविधांगाचाही अंतर्भाव झाला आहे.

**राष्ट्रीय सुरक्षेचे बदलते संदर्भ :-**

समकालिन बहुध्रुवीय आंतरराष्ट्रीय राजकारणामध्ये राष्ट्रीय सुरक्षेची संकल्पना ही बहुआयामी झाली आहे. राष्ट्रीय सुरक्षा ही संकल्पना केवळ लष्करी व आर्थिक शक्तिशी निगडीत न राहता ती मानवी सुरक्षा, गरिबी, अन्नसुरक्षा, नैसर्गिक साधनसाम्रगीचे योग्य व्यवस्थापन याच्याशी निगडीत आहे. ???? युद्धोत्तर काळात वरील विषयांची मांडणी

विकसनशील व अविकसनशील राष्ट्रे राष्ट्रीय सुरक्षेच्या संदर्भात करत आहेत. लष्करी शक्ती ही आपल्या राष्ट्राच्या सुरक्षेची हमी जरी घेत असली तरी लष्करी शक्तीच एक प्रकारे सामाजिक विकासाच्या कार्यक्रमांना खीळ घालत असते. त्यामुळे लष्करी शक्ती सुद्धा संघर्षाचे एक कारक होऊ पाहत आहे.

राष्ट्रीय संकल्पनेचे संदर्भ हे विकसित, अविकसित व विकासशील राष्ट्रांच्या दृष्टीने विभिन्न असल्याचे प्रत्ययास येते. जेसे की, विकसनशील राष्ट्रांच्या दृष्टीने राष्ट्रीय सुरक्षा म्हणजे त्यांच्या व्यापारास असलेला धोका होय तर काही विकसनशील राष्ट्रे मात्र आपल्या मुलभूत राष्ट्रीय मूल्यांना धोका म्हणजे राष्ट्रीय सुरक्षेस धोका असे मानतात. ??? युद्धानंतरच्या काळात राष्ट्रीय सुरक्षेच्या दृष्टीकोनात मुलभूत स्वरूपाचे बदल घडून आल्याचे दिसते. समकालिन जगामध्ये राष्ट्रीय सुरक्षा म्हणजे केवळ शत्रूपासून वा सीमांचे संरक्षण नसून सुरक्षेचे व्यवस्थापन करीत असताना केवळ लष्करी शक्तीचा वापर महत्वाचा नसून इतर घटक ही महत्वाचे आहेत. त्यामध्ये गरिबी, लहान शस्त्रांचा प्रसार व व्यापक, अंमली पदार्थांचा व्यापार, भूक बळी, आरोग्य-विषयक प्रश्न हे स्थानिक प्रश्न असून जागतिक पातळीवर दहशत वाद व पर्यावरण हे प्रमुख आव्हान म्हणून राष्ट्रीय सुरक्षे समोर उभे आहेत.

समकालीन संदर्भात एका बाजूने राष्ट्रीय सुरक्षेची संदर्भ अधिक व्यापक होत आहेत तर जागतिकीकरणाच्या प्रक्रियेने राज्याच्या भूमिका मात्र मर्यादित होत आहे. त्याचाही प्रभावही राष्ट्रीय सुरक्षेच्या एकूण धारणांवर होताना दिसतो आहे. विज्ञान, तंत्रज्ञानामध्ये घडून आलेल्या क्रांतीकारी बदलांमुळे सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक व लष्करी क्षेत्रात ही क्रांतीकारी बदल घडून आलेले दिसतात. विकसनशील राष्ट्रांवर या प्रक्रियेचा एकूण प्रभाव अधिक आहे. त्यामुळे 'राष्ट्रीय सुरक्षेच्या संकल्पनेमध्ये आंतरराज्य सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय इत्यादी घटकांना महत्व प्राप्त झाले आहे. संघर्ष, स्थलांतर, रोगराई, अंमली पदार्थांचा व्यापार, बेरोजगारी इत्यादी घटक आपणास प्रामुख्याने प्रभाव पडतांना दिसत आहेत. संयुक्त राष्ट्रांचे सरचिटणीस राहिलेले डॉ. घाळी यांनी १९९२ साली यासंदर्भात आपली भूमिका स्पष्ट करतांना म्हटले होते की, 'जागतिक नेत्यांनी चांगले सरकार देऊन परस्परावलंबी जगाबाबत मांडणी केली. त्यामुळे या दशकात सुरक्षेची संकल्पना बदलून आंतरराज्य सुरक्षा ते स्पर्धात्मक सुरक्षा व स्पर्धात्मक सुरक्षा ते सर्वसमावेशक सुरक्षा, सर्वसमावेशक सुरक्षा ते सहकारी सुरक्षा अशा पद्धतीची मांडणी करणे आवश्यक आहे.

**राष्ट्रीय सुरक्षेचे बदलते स्वरूप :-**

राष्ट्रीय सुरक्षश समकालीन जगामध्ये बहुआयामी स्वरूपात विकसित होतांना दिसते आहे त्यातील काही प्रमुख घटकांचा आढावा पुढील प्रमाणे घेता येईल.

**१) स्पर्धात्मक सुरक्षा :-**

स्पर्धात्मक सुरक्षेची संकल्पना ही १६४८ च्या वेस्टफेलिया शांततेच्या करारातून उद्यास आली असे म्हटले जाते. घराणेशाही ते राष्ट्र राच्याचा उदय व त्यानंरच्या कालखंडात स्पर्धात्मक सुरक्षेची संकल्पना प्रामुख्याने प्रत्ययास येऊ लागली. राष्ट्र-राज्याच्या उद्यानंतर राष्ट्राच्या सार्वभौमत्वास महत्व प्राप्त झाले व सार्वभौमत्वाची सुरक्षा ही राष्ट्रराज्याची जबाबदारी बनली. त्यामुळे राष्ट्रराज्यामध्ये एक प्रकारे स्पर्धा

सुरू होऊन राष्ट्रीय सुरक्षेच्या संकल्पनांना वेगळे वळन लागले. राष्ट्रवाद व सार्वभौमत्व या बाबींना महत्वाचे स्थान प्राप्त झाले. त्याबरोबरच वैचारिक व अधिक भूभाग मिळविण्याकरिता व आपली सत्ता प्रस्थापित करण्याकरिता मोठी स्पर्धा सुरू झाली. एका बाजूने मुक्त व्यापार व दुसऱ्या बाजूने लोकशाही संस्थेचे बळकटीकरण तर तिसऱ्या आघाडीवर स्पर्धात्मक राजकारणाची उभारणी होऊन आंतरराज्य सुरक्षेच्या संकल्पनेत मोठा बदल झाला.

शीतयुद्धोत्तर काळात बदल होऊन स्पर्धात्मक सुरक्षेद्वारा एका पद्धतीची असुरक्षितता निर्माण होऊन राष्ट्र-राज्यास धोका निर्माण झाला. त्यामुळे आण्विक प्रशेधनासारख्या सिध्दांताना संख्यत्मक पातळीवर मान्यता मिळावी व स्पर्धात्मक सुरक्षेच्या संकल्पनेमुळे संरक्षण खर्चात वाढ, लष्करी स्पर्धा यातून राष्ट्र राज्याचा कल लष्करी करण्याकडे रूपांतरित होण्याचा दिसू लागला.

स्पर्धात्मक सुरक्षेच्या संकल्पनेत महत्वाचा दोष दिसतो तो म्हणजे, सैन्य, संघर्ष, युद्ध सदृश्य परिस्थिती व आक्रमक कार्यवाही हीच एक संरक्षणात्मक दृष्टीने महत्वाची बाब आहे. असे सिंध्दात राजकीय व लष्करी पातळीवर मांडले गेले. त्यामुळे स्पर्धात्मक सुरक्षेच्या संकल्पनेत काही राष्ट्रे लष्करी शक्तीच्या बळावर इतर राष्ट्रांच्या सार्वभौमत्वालाच धोका निर्माण करण्याचे काम स्पर्धात्मक सुरक्षेद्वारे करू लागली आहेत असे दिसते. त्यामुळे स्पर्धात्मक सुरक्षेच्या संकल्पनेत नव्याने बदल होने गरजेचे आहे.

**२) समान व सर्वसमावेशक सुरक्षेची संकल्पना :-**

सर्वसमावेशक सुरक्षेची संकल्पना ही समान व शीतयुद्धाच्या कालखंडामध्ये नवउदारमतवादाच्या कर्मठ विचारांद्वारा उद्यास आली. वास्तववादी सिंध्दाताच्या आधारे आंतरराष्ट्रीय राजकारणामध्ये वास्तववादी सिंध्दाताच्या दृष्टीने लष्करी शक्तीद्वारे राष्ट्राची सुरक्षा व अखंडताही टिकू शकते, अशा पद्धतीची मांडणी करण्यात आली. १९८०च्या दशकानंतर जागतिकीकरणाच्या प्रक्रियेतून परस्परावंलबंन घडून आले हे संरक्षण विश्लेषकांनी दाखवून दिले. याबरोबरच उदारमतवादाच्या सैध्दांतिक चौकटीमध्ये यास समाजातील वेगवेगळ्या घटकांकडून आव्हान मिळाले. शिवाय आंतरराज्य संबंध हे बळाच्या लष्करी वापराद्वारे आर्थिक व राजकीय एकत्रीकरणाच्या प्रक्रियेस आव्हान निर्माण करत होते.

यादृष्टीने काही महत्वाच्या घटना ही घडून आल्या. १९८० मध्ये विली. ब्रँन्ट यांच्या अध्यक्षतेखाली उत्तर दक्षिण आयोगाची निर्मिती करण्यात आली व त्यात राष्ट्रीय सुरक्षेच्या असमारिक आव्हानांचा व आंतरराज्य अवलंबन यांचा समावेश करण्यात आला. त्यानंतर १९८२ मध्ये पाल्के आयोग यांनी विली ब्रँन्ट यांच्या सूचनेस मान्यता देऊन एकत्र सुरक्षेच्या संकल्पनेस प्राधान्य दिले. त्यातून स्पर्धात्मक सुरक्षेच्या संकल्पनेत बदल घडून प्ररोधन व सत्ता यांच्या ऐवजी सहकार्य व विश्वास बांधणीस महत्व प्राप्त होऊन सुरक्षेच्या संकल्पनेत महत्वाचे बदल घडून आले. त्यामुळे युरोप व आशियाई राष्ट्रातील सुरक्षेच्या संकल्पनेत बदल होऊन जागतिक व विभागीय सुरक्षेच्या वातावरणाची निर्मिती करण्यात आली. जपान या राष्ट्राने आर्थिक व

सामरिक धोरणाबरोबरच सर्वसमावेशक सुरक्षेला महत्व प्राप्त करून दिले. त्याबरोबरच दक्षिण पूर्व आशियातील राष्ट्रांनी, विशेषत: मलेशिया व इंडोनेशिया या राष्ट्रांनी, सर्वसमावेशक संकल्पनेची गरज लक्षात घेऊन अंतर्गत स्थैर्य, राष्ट्रीय विकास, सामाजिक शांतता इत्यादी बाबींवर लक्ष केंद्रित केले.

**३) सहकार्य सुरक्षा :-**

१९९० साली संयुक्त राष्ट्रांच्या महासभेत कॅनडाचे तत्कालीन परराष्ट्रमंत्री जो क्लार्क यांनी सहकाय सुरक्षा ही संकल्पना मांडली होती. या संकल्पनेतून क्लार्क यांनी हे स्पष्ट केले की, 'संघर्ष हाच केवळ सुरक्षेचा मुख्य प्रश्न नसून त्याबरोबरीने राष्ट्र-राज्य हा घटक ही महत्वाचा आहे. याशिवाय अ-राज्य घटकांचीही एकूण प्रभाव व भूमिका निर्णायक आहे. या सर्वांचा एकत्रित विचार होणे आवश्यक आहे. यातून 'समान सुरक्षा', सहकार्य सुरक्षा व सर्वसमावेशक सुरक्षा यातील भिन्नता दर्शविणाऱ्या बाबी अधिक स्पष्ट झाल्या. १९९०च्या दशकामध्ये अमेरिका व रशिया या महासत्ता राष्ट्रांबरोबर यूरोपियन राष्ट्रांनी लष्करी सहकार्य व एकमेकांना पुरक अशा सहकार्य सुरक्षेस मान्यता दिली. परंतु वास्तवात सुरक्षेच्या असा मारिक आव्हानांना कुठल्याही पध्दतीचे स्थान मिळू शकले नाही व त्याकडे अधिकाधिक दुर्लक्ष होत गेले. त्याबरोबरच असामाईक आव्हानांना आपारंपारिक सुरक्षेचे प्रश्न असे संबोधले गेल्यामुळे सहकार्य सुरक्षेची संकल्पना कायम संदिग्ध स्वरूपात राहिली.

शीतयुद्धोत्तर काळामध्ये सुरक्षेची संकल्पना अधिकाधिक बहुआयामी होऊन त्यात अन्न सुरक्षा, जागतिक तापमान, आंतरराज्य गुन्हे, बेकायदेशीर स्थलांतर, मानवी समूहास भेडसावणारे विविध आरोग्याचे प्रश्न अशा विविध विषयांचा समावेश या संकल्पनेत होत गेला. त्यामुळे राष्ट्रीय सुरक्षेची ही संकल्पना बदलत्या काळानुरूप अधिकच व्यापक होत गेल्याचे निदर्शनास येते. आशिया, पॅसिफिक राष्ट्रांनी युरोपमध्ये झालेल्या सुरक्षेच्या संदर्भातील प्रश्नांची मांडणी आपल्या राष्ट्रात त्याची अंमलबजावणी करून सर्वसमावेशक सुरक्षेचा विचार केलेला दिसतो.

**व्यक्तींची सुरक्षा व राष्ट्रीय सुरक्षा :-**

आंतरराष्ट्रीय राजकारणामध्ये सुरक्षा हा घटक प्रामुख्याने 'सामूहिक घटक' या अर्थाने वापरला जातो. परंतु व्यक्तीच्या सुरक्षितेच्या दृष्टीने ही यामध्ये विविध घटक अंतर्भुत व कार्यरत असलेले दिसतात. त्यामध्ये प्रामुख्याने आरोग्य, स्वातंत्र्य व संपत्ती यांचा समावेश करता येईल. शिवाय प्रत्येक घटकाची सुरक्षा करण्याकरिता प्रत्येक व्यक्ती कार्यरत असते. उदा. रोगराई, दारिद्रय दूर करण्याकरिता प्रत्येक व्यक्ती प्रयत्न करीत असते व पुढे तेच प्रश्न हे सामाजिक ठरत असतात. त्यात प्रामुख्याने चार धोके पाहावयास मिळतात.

**अ) शारीरिक धोका –** यामध्ये प्रामुख्याने जखम, वेदना व मृत्यु हे प्रत्ययास येते.

**ब) आर्थिक धोका –** यामध्ये संपत्ती पासून वंचित ठेवणे मुख्य प्रवाहापासून व्यक्तींना जाती व धर्माच्या नावाने दूर ठेवणे, नागरी अधिकारांपासून वंचित ठेवणे इत्यादीचा अंतर्भाव होतो.

**क) अधिकारांपासून वंचिततेचा धोका :-** यामध्ये प्रामुख्याने सार्वजनिक ठिकाणी लोकांची मानहानी करून वर्चस्व प्रस्थापित करणे यासारख्या बाबींचा प्रामुख्याने समावेश होतो.

**ड) आपल्या वर्चस्व व अधिकारांना धोका :-** याअंतर्गत व्यक्ती आपली सुरक्षा टिकविण्याचा प्रामुख्याने प्रयत्न करत असतात. हॉब्ज या संदर्भात असे म्हणतात की, 'व्यक्ती व सामूहिक समूह हे स्वातंत्र्य प्रस्थापित करण्याकरिता प्रयत्न करीत असतात. परंतु केनेथ वॉल्ज यासंदर्भात असे प्रतिपादन करतात की, जर राज्यांना स्वातंत्र्य हवे असेल तर तथे असुरक्षितता ही स्वीकारलीच पाहिजे. जॉन लॉक यासंदर्भात आपली भूमिका स्पष्ट करताना म्हणतात, 'राज्य हे लोकांच्या सुरक्षेचे साधन बनत असते, त्यामुळे लोक एक समूहाने राहत असतात व त्याद्वारे स्वातंत्र्य व संपत्तीचे रक्षण करण्यात यश मिळवतात.

एकदंरीत व्यक्तीपेक्षा राज्य हे अधिक महत्वाचे आहे व राज्याचे सुरक्षेचे कार्य अधिक महत्वाचे ठरते. व्यक्ती ही राज्याच्या सुरक्षेस धोका उत्पन्न करू शकते हे पुढील चार संदर्भात प्रामुख्याने निदर्शनास येते.

१. एक व्यक्ती वा व्यक्तिंचा समूह एकत्र येऊन राज्याच्या सुरक्षेस धोका निर्माण करू शकतात. उदा. दहशतवाद, फुटीरतावाद चळवळी, अंतर्गत बंडाळी इ.

२. अंतर्गत प्रश्नांच्या संदर्भात लोकांचे सहकार्य उदा. नाझीवादास असलेल्या जनमताचा पाठिंबा, हुकूमशहांना अधिमान्यता

३. लोकांच्या मतानुसार राज्याच्या सुरक्षेस धोका निर्माण केला जाऊ शकतो.

४. राजकिय नेत्यांद्वारा ही राष्ट्रीय सुरक्षिततेस धोका निर्माण केला जाऊ शकतो.

वरील विश्लेषणातून साधारणत: हे स्पष्ट होते की, सुरक्षेचा अर्थ विकसित होत असताना राज्याच्या सुरक्षेत व्यक्तीची भूमिका ही महत्वाची असते. त्याबरोबरच व्यक्तीची सुरक्षाही सकारात्मक व नकारात्मकही असू शकते.

## ३.४ राष्ट्रीय सुरक्षितता व भारत

पाश्चिमात्य राष्ट्रातील आधूनिक विचारवंतांचा व संरक्षण विश्लेषकांचा विचार पाहता भारतीय दृष्टीकोनातून राष्ट्रीय सुरक्षा विषयक मांडणी नेमकी काय आहे याचा आढावा घेणे ही अत्यावश्यक ठरते. राष्ट्रीय सुरक्षितते संदर्भातील भारतीय दृष्टीकोन, राष्ट्रीय सुरक्षिततेचे भारतीय स्वरूप याची मांडणी पुढील काही मुद्दयांच्या आधारे आपणास करता येईल.

**१) राष्ट्रीय सुरक्षा दोन प्रवाह :-**

भारतीय सुरक्षाविषयक बाबींचा अभ्यास करताना भारतामध्ये सुरक्षाविषयक दोन प्रवाह प्रामुख्याने कार्यरत असल्याचे दिसतात. त्यातील एक प्रवाह म्हणजे शेजारील राष्ट्रांबाबत कोणताही संघर्ष उद्‌भवला तर त्याचे निवारण करणे व दुसरा प्रवाह म्हणजे कोणत्याही संघर्षाचे निवारण हे शांततेच्या प्रक्रियेने राबविणे. प्रथम प्रवाहामध्ये

सामाजिक, आर्थिक, राजकीय व लष्करी घटक आहेत तर दुसऱ्या प्रवाहामध्ये अल्पकालिन धोरणांचा प्रभाव पहावयास मिळतो.

### २) बहुआयामी स्वरूप :-

राष्ट्रीय सुरक्षा ही संकल्पना जशी जागतिक संदर्भात बहुआयामी स्वरूप धारण करून आहे तसेच बहुआयामी स्वरूप भारतीय राष्ट्रीय सुरक्षा दृष्टीकोनास ही प्राप्त आलेले दिसते. भारतीय राष्ट्रीय सुरक्षा विषयक बाबींमध्ये प्रामुख्याने राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक, लष्करी, विज्ञान व माहिती तंत्रज्ञान यासारख्या घटकांचा अंतर्भाव होतो.

### ३) स्वातंत्र्योत्तर कालिन प्रारंभिक टप्पा मर्यादित स्वरूपाचा :-

स्वातंत्र्योत्तर काळानंतर भारतीय राज्यकर्त्यांनी सुरक्षितता विषयक जी धोरणे प्रत्यक्षात अंमलात आणली व त्यांच्या एकूण धारणा पाहता त्यांची भावना केवळ परराष्ट्र धोरण, लष्करी संघर्ष, लष्करी शक्ती एवढ्या पुरतीच मर्यादित होती. त्यामुळे राष्ट्रीय सुरक्षिततेच्या चर्चेमध्ये सामाजिक प्रश्न, अंतर्गत समस्या, दहशतवाद यासारखे प्रश्न हे राष्ट्रीय सुरक्षिततेच्या चौकटीमध्ये अभ्यासले गेले नाहीत. भारतीय संरक्षण तत्ववेत्यांनी, राजकीय नेतृत्वाने अंतर्गत प्रश्नांचा विशेषत: सामाजिक प्रश्नास सुरक्षेच्या चौकटी जवळही केल्या नाहीत. जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत राष्ट्रीय सुरक्षेच्या चौकटीमध्ये भारताच्या सार्वभौमत्व, प्रादेशिक एकता व अखंडता टिकविण्या बरोबरच मानवी विकास व नैसर्गिक साधन सामग्रीचा वापर व विकास हा शेवटच्या घटकापर्यंत पोहचणे गरजेचे आहे. भारतीय राष्ट्रीय सुरक्षितते संदर्भात मांडणी करणारे विश्लेषक हे प्रामुख्याने उच्चवर्गीय समाजाचे वर्चस्व मान्य असल्या कारणाने राष्ट्रीय सुरक्षिततेच्या व्यापक भूमिकेबाबत व आधुनिक मुल्यांसंदर्भात त्यांच्या मनाची द्विधा अवस्था असल्याचे प्रत्ययास येते.

राष्ट्रीय सुरक्षेची व्याप्ती ही केवळ लष्कर, सैन्य एवढ्यापुरतीच मर्यादित न करता ही संकल्पना बहुआयामी आहे. यामध्ये तंत्रज्ञान व सामरिक घटकासह राजकीय, आर्थिक व सामाजिक घटकांचा उहापोह होतो. परंतु आजतागायत सर्वसामान्य भारतीयांच्या मनात राष्ट्रीय सुरक्षा म्हणजे केवल देशाची एकता व अखंडता टिकविणे अशा पध्दतीची मांडणी होत असल्याकारणाने जे पाश्चिमात्य राष्ट्रांचे अनुकरण करताना त्यांनी याची व्याख्या करीत असताना बहिर्गत सुरक्षेचे व्यवस्थापन करणे एवढ्या पुरतेच ते मर्यादित ठेवले आहे.

### ४) भारतीय संविधानातील व्यापक धारणा :-

भारतीय संविधानाने राष्ट्रीय सुरक्षितता या घटकांची व्यापक धारणा अंगिकृत केलेली दिसते. भारतीय संविधानात राष्ट्रीय सुरक्षेची प्रमुख तत्वे अतिशय स्पष्ट शब्दात नमूद करण्यात आली आहेत. त्यामध्ये प्रामुख्याने संसदीय लोकशाहीचे संरक्षण, समतेवर आधारित समाजनिर्मिती, अंतर्गत शांतता व आर्थिक विकास व परकीय राष्ट्रांबाबत शांतता व सलोख्याचे संबंध प्रस्थापित करणे, त्याबरोबरच देशामध्ये लोकशाही, धर्मनिरपेक्षता व समानता आणणे ही राष्ट्रीय सुरक्षेची मुख्य मुल्ये आहेत. परंतु भारतीय संविधानाने प्रस्तुत केलेल्या या राष्ट्रीय सुरतेच्या घटकांकडे दुर्लक्ष करून

राष्ट्रीय सुरक्षा म्हणजे केवळ पाकिस्तानशी वा शत्रु राष्ट्राबरोबरची लढाई, युद्ध होय अशी मांडणी राजकीय पक्ष, राजकिय प्रचारक, विश्लेषक करीत असल्याकारणाने आजही राष्ट्रीय सुरक्षेच्या संदर्भात सामान्य भारतीय अनभिज्ञ असल्याचे दिसते.

### ५) राष्ट्रीय सुरक्षाविषयक विचारांची फेर मांडणी करणे गरजेचे :-

शीतयुद्ध काळामध्ये राष्ट्रीय सुरक्षा ही बळाचा वापर, युद्ध, मर्यादित युद्ध, प्ररोधन, लष्करी करार, सत्तासंतूलन, शस्त्र कपात व संघर्ष निवारण, संघर्ष व्यवस्थापन यासारख्या बाबींशी प्रामुखने निगडीत होते. सोव्हिएट रशियाचे १९९० साली विघटन झाले व त्यानंतरच्या काळात राष्ट्रीय सुरक्षेच्या चौकटीमध्ये दहशतवाद, नक्षलवाद, अंतर्गत बंडाळी, सामाजिक प्रश्न, स्थलांतर, दारिद्रय, आरोग्य, मानवी हक्क, सामाजिक विषमता असे प्रश्न उद्यास आलेले आहेत व हे प्रश्न राष्ट्रीय सुरक्षेस सर्वात धोकादायक आहेत. आज एकवेळा परकीय आक्रमने आपर सैन्य बळाचा वापर करून परतवू शकतो परंतु अंतर्गत बंडाळी व समस्या कशा सोडविणार. त्यामुळे राष्ट्री सुरक्षिततेच्या एकूण चौकटीमध्ये सामाजिक प्रश्नांसह इतर प्रश्नही कसे महत्वाचे आहेत हे अवलोकन करणे गरजेचे झाले आहे.

जागतिकीकणाच्या आगोदर राष्ट्रीय सुरक्षिततेची व्याप्ती ही काहीशी मर्यादित होती. राष्ट्रीय सुरक्षितता या संकल्पने मध्ये प्रामुख्याने देशाचे सार्वभौमत्व टिकविणे, परकिय राष्ट्रांपासून सुरक्षा करणे, राष्ट्राची एकता व अखंडता टिकविणे व आपल्या क्षमतेनुसार या धोक्यांना सामोरे जाणे म्हणजे राष्ट्रीय सुरक्षितता अशी काहिशी स्थिती होती. शीतयुद्धाच्या समाप्तीनंतर जगामध्ये निर्माण झालेल्या विश्वरचनेत सर्वसमावेशक सुरक्षिततेची संकल्पना उद्यास आली. त्यामध्ये सामाजिक विकास, आर्थिक विकास, राजकीय-सांस्कृतिक व लष्करी घटकांचा समावेश करून राष्ट्रीय सुरक्षेची व्याप्ती विस्तारली आहे. राष्ट्रीय सुरक्षा म्हणजे केवळ परकीय राष्ट्रांपासून आपल्या भूमीची सुरक्षाच नव्हे तर आर्थिक विषमता दूर करणे, विकासाची मूल्ये, नवी हक्कांचे संरक्षण, सामाजिक, राजकीय व आर्थिक न्याय, संसदीय लोकशाही प्रणालीचे संरक्षण इत्यादी घटकांचा समावेश राष्ट्रीय सुरक्षितता या संकल्पनेत अंर्तभूत झाला.

### ६) संविधाननिक मूल्यांचा राष्ट्रीय सुरक्षा धोरणात अभाव :-

भारत जगातील सर्वात मोठा लोकशाही देश म्हणून ओळखला जातो. लोकसंख्या व प्रक्रिया अशा दोन्हीं अर्थाने भारतास हे संबोधन सार्थ वाटते. भारतीय संविधान कारांनी भारतीय लोकशाहीच्या उभारणीकरिता 'एक व्यक्ती एक मूल्य' या तत्वाची अपेक्षा व्यक्त केली होती. हे तत्व भारतीय समाज जीवनात कार्यान्वित झाले नाही तर संविधानाचा डोलारा उध्वस्त होऊ शकेल अशी रास्त भीतीही व्यक्त केली होती. स्वातंत्र्योत्तर काळात या दृष्टीने सामाजिक व आर्थिक लोकशाहीचे प्रतिमान गतिमान करणे या तत्वास राष्ट्रीय ?????? दृष्टीने प्राधान्य मिळावयास हवे होते वास्तवात मात्र भारतामध्ये राष्ट्रीय सुरक्षेची व्याख्या व तिची संकल्पना आपल्या संरक्षण व सामरिक विशलेषकांनी संकूचित प्रकारे स्पष्ट केलेली दिसते. आजही केवळ परराष्ट्रीय धोरण बर्हिगन सुरक्षा, लष्करी शक्ती या विषांच्या अवतीभवती राष्ट्रीय सुरक्षेची संकल्पना केंद्रित आहे. वास्तविक राष्ट्रीय सुरक्षेमध्ये सामाजिक सुरक्षा, सामाजिक

विकास, देशातील सर्वात शेवटच्या व्यक्तीचा विकास या बाबींना राष्ट्रीय सुरक्षेच्या संकल्पनेत कोठेही थारा नाही. आधूनिक भारताची अखंडता व सार्वभौमत्व टिकविण्याकरिता सामाजिक विकासाची गरज आहे. यासंदर्भात संरक्षणतज्ञ के. सुब्रमण्यम यांचे विधान महत्वाचे आहे. ते म्हणतात, 'भारताने इॅगेलेटेरिअन समाज निर्मिती करावी तरच खऱ्या अर्थाने भारताची अखंडता व सार्वभौमत्व अबाधित राहिल.

**७) राष्ट्रीय सुरक्षिततेस असणाऱ्या अतंर्गत धोक्याकडे दुर्लक्ष :-**

भारतीय राष्ट्रीय सुरक्षिततेचा दृष्टीकोन पाहताना एक बाब प्रकर्षाने आढळते की, भारतीय राष्ट्रीय सुरक्षिततेच्या दृष्टीने जसे बाह्य धोक्यांना गांभिर्याने पाहिले जाते तसे अंतर्गत धोक्यांना मात्र गांभिर्याने घेतले जात नाही. वास्तवात भारताच्या बहिर्गत सुरक्षेचा विचार करतो तेवढाच अंतर्गत सुरक्षेचा विचार करणेही गरजेचा आहे. एखाद्यावेळी बहिर्गत धोका टाळण्याकरिता आपण सैनिकी बळाचा वापर करून लष्करी क्षमतेद्वारे तो धोका टाळू शकतो. परंतु पेप्सी, कोकाकोला, पिझ्झा हट व दहशतवादी कृत्ये याद्वारे आपल्या अंतर्गत सुरक्षेस जे धोके निर्माण झाले आहेत त्यांची सुरक्षा आपण कसे करणा आहोत? याबाबत अंतर्गत धोक्यांबाबत राष्ट्रीय सुरक्षितता अध्यापही दूरच असल्याचे दिसते.

**८) राष्ट्रीय सुरक्षिततेस तात्कालिक स्वरूप :-**

स्वातंत्र्योत्तर काळात भारतीय राष्ट्रीय सुरक्षिततेच्या संदर्भात एक बाब प्रकर्षाने जाणवते की, आपल्याकडे राष्ट्रीय सुरक्षेची संकल्पना केवळ तात्पुरती होती व ती ही परकिय राष्ट्राद्वारे आक्रमण झाल्यानंतर आपले संरक्षणव सुरक्षा धोरण ठरविले गेले. आज ही राष्ट्रीय सुरक्षेची मूल्ये काय आहेत हे सामान्य भारतीय नागरिकांना सांगता येणार नाही. अनेक प्रसंगामध्ये ही बाब सातत्याने जाणवते. त्यामुळे अंतर्गत सुरक्षेचा प्रश्न व त्याचे व्यवस्थापन करणे याबाबत मोठा प्रश्न निर्माण झालेला आहे. आपल्याकडे मोठ्या कार्यकाला करीता सुरक्षाविषयक धोरण ठरविले गेले नाही. केवळ युद्धजन्य परिस्थितीत व युद्धाच्यावेळी तात्पुरती उपाययोजना अमंलात आणली जाते. त्यामुळे सामान्य लोकांना त्याचा भार अधिक सोसावा लागतो.

**९) राजकीय एकमताचा अभाव :-**

जागतिक सुरक्षितता व शांततेचा आढावा घेतांना एक बाब निदर्शनास येते की विकसनशील राष्ट्रांमध्ये राजकीय एकमताचा अभाव पाहावयास मिळतो. विविध अंतर्गत प्रश्न सुटण्याऐवजी ते आव्हान ठरू पाहत आहे व त्या प्रश्नांमुळे बरीचशी राष्ट्रे होरपळून गेली आहेत. त्यात प्रामुख्याने युगोस्लाव्हिया, सोमालिया, बल्गेरिया, अफगानिस्तान, इराक, कांगो, श्रीलंका व पाकिस्तान हे देश आपणांस दिसतात. त्या राष्ट्रांमध्ये प्रामुख्याने वांशिक घटकावर राजकीय प्रश्नावर स्वत:च्या मुळे आंतरराष्ट्रीय सुरक्षाविषयक विविध प्रश्न निर्माण केले आहे. भारतही त्यास अपवाद असलेला दिसत नाही. जसे की भारतातही दहशतवादासारख्या ज्वलंत प्रश्नावरही राजकीय एकमत होत नाही. किंबहूना त्या विषयास धार्मिक रंग देऊन अंतर्गत सुरक्षा व्यवस्तापनचा प्रश्न कसा बिकट होईल यासंदर्भात चर्चा केली जाते.

## १०) भारतीय राष्ट्रीय सुरक्षितता सामायिक घटक :-

भारतीय राष्ट्रीय सुरक्षेसंदर्भात सामायिक घटकांना अलिकडच्या काळात महत्व प्राप्त झाले आहे. २१ जानेवारी २०१३ रोजी रामण्णा स्मृती व्याख्यानमाले मध्ये बोलताना तत्कालिन राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार श्री. शिवशंकर मेनन म्हणाले होते राष्ट्रीय संरक्षणाचा विचार करताना आपल्याला आता ऊर्जा सुरक्षा, अन्न सुरक्षा, तंत्रवैज्ञानिक सुरक्षा, सामाजिक सलोखा व संस्थात्मक जाळे याचा विचार करायला हवा. श्री. मेमन यांच्या मते अंतर्गत व बाह्य सुरक्षा यामध्ये आता फारच थोडा फरक शिल्लक राहिला आहे. ६ फेब्रुवारी २०१३ रोजी राष्ट्रीय संरक्षण क्षेत्रातील सुप्रसिद्ध विश्लेषक के. सुब्रहाण्यम यांच्या स्मृती व्याख्यानमालेत गृहमंत्री पी. चिंदबर यांनी राष्ट्रीय सुरक्षेस असणाऱ्या धोक्याचे अवलोकन मांडले होते.  त्यात म्हणतात राष्ट्रीय सुरक्षा ही कोळ्याच्या जाळ्याप्रमाणे गुंतागुंतीचे असते. यातील प्रत्येक घटकाचा इतर अनेक घटकांशी संबंध येतो. उदा. सागरी मार्गांनी असणाऱ्या धोक्यांचा ऊर्जा सुरक्षेसी संबंध आहे. नैसर्गिक आपत्तीचा अन्न सुरक्षेशी संबंध आहे. तर धार्मिक व सांस्कृतिक संघर्षाचा सामाजिक सुरक्षेशी संबंध आहे.

## ११) राष्ट्रीय सुरक्षेच्या मुलभूत आधारावरील अपयश :-

राष्ट्रीय  सुरक्षेचे तीन मुलभूत आधारस्तंभ मानले जातात. पहिला आधारस्तंभ म्हणजे मनुष्यबळ, दुसरा आधारस्तंभ विज्ञान व तंत्रज्ञान आणि तिसरा महच्वाचा आधारस्तंभ वित्त, या तीन आधार स्तंभाच्या आधारे भारतीय राष्ट्रीय सुरक्षेचा समकालिन संदर्भ आपण तपासला तर आपणास काय दिसते. जगातील सर्वात तरुण देश म्हणून भारताकडे आज पाहिले जात आहे. त्या विश्वासावरच भारत महासत्ता होणार अशा घोषणा दिल्या जात आहेत परंतु हे तरूण मनुष्यबळ राष्ट्रीय सुरक्षेसाठी आवश्यक असणाऱ्या बांधिलकीची पूर्तता करण्यास पात्र आहे का? आज ही शासकीय आकडे सांगतात पहिल्या वर्गात नोंदणी केलेल्यापैकी केवळ ७३ टक्के मूलेच पाचव्या वर्गात गेली. तर आठव्या वर्गात जाईपर्यंत हे प्रमार ५९.४ टक्क्यापर्यंत खाली येते. हेच प्रमाण पदवी स्तरावर पोहोचेपर्यंत केवळ १८.८ टक्क्यापर्यंत निम्मस्तरावर पोहोचते. प्राथमिक शिक्षणाच्या स्तरावर आपल्याकडे अध्यापही आठ लाख शिक्षकांची कमतरता आहे. अध्यापही २० हजार महाविद्यालये व १५०० विद्यापीठे स्थापन करणे गरजेचे आहे. आजही भारतात बालमृत्युचा दर प्रतिमाही ४४ व माता मृत्युचा दर प्रतिलक्ष २१२ आहे. म्हणजेच या दोन्ही बाबतीत भारतास 'मिलेनियम डेव्हलपमेंट गोल्स' साध्य करता येणार नाहीत. लिंग गुणोत्तर १००० मुलांमागे ९१४ पर्यंत खाली येणे हा राष्ट्रीय सुरक्षेचा प्रश्न नाही का?

राष्ट्रीय सुरक्षेचा दुसरा आधारस्तंभ म्हणून विज्ञान, तंत्रज्ञानाचा उल्लेख केला जातो. अलीकडच्या काळात जी राष्ट्रे प्रगत झाली त्या सर्व राष्ट्रांनी विज्ञान तंत्रज्ञानाचा राष्ट्रीय सुरक्षेसाठी मोठया प्रमाणात वापर केला. राष्ट्रीय सुरक्षेच्या दृष्टीने भू-सागरी, हवाई व अवकाश अशी चार प्राकृतिक कार्यक्षेत्र मानली जातात. भारताची पाकिस्तान, चीन, नेपाळ, भूतान, बांग्लादेश, म्यानमार या देशांशी एकूण सुमारे १५०० कि.मी. लांबीची भू-सीमा आहे. त्यांच्या संरक्षणाकरिता १९१ बटालियन्स कार्यरत आहेत.

परंतु यातील बहुतांशी बटालियन्स अद्यापही उंटावरून टेहळणी करतात. याचाच अर्थ तंत्रज्ञानाचा वापर अतिशय मर्यादित आहे. ७५१६ कि.मी सागरी किनारा आपणास लाभला आहे. २६/११ चा दहशतवादी हल्ला होऊनही सागरी किनाऱ्यांची अत्याधूनिक संरक्षक यंत्रणा करण्यात आपल्याला अपयश आलेले आहे. आजही आपण केवळ हिंदू महासागरातील नौदलावर अवलंबून आहोत. संरक्षक दलातील हवार्स दलात मात्र तंत्रज्ञानाचा सर्वाधिक वापर आपण करतो. अवकाशातील उपग्रहांचा वापर हा आपण विकास व शांततामय कामासाठी करतो. अवकाशाच्या लष्करीकरणा विरूद्धच्या आंतरराष्ट्रीय करारांचे ते पालन म्हणून स्वागतार्ह बाब आहे. परंतु विज्ञान व तंत्रज्ञानाकडे पाहण्याची भारतीयांची पुनरूज्जीवनवादी दृष्टी शासकीय स्तरावरून फुलवली जाताना दिसते आहे. त्यामुळेच अखिल भारतीय विज्ञान व तंत्रज्ञान परिषदांमध्ये भुतकाळातील प्राचीन दंतकथांना वैज्ञानिक शोध म्हणून प्रस्तुत केले जात आहे, हे तेवढेच चिंताजनक आहे.

वित्त हा राष्ट्राचा सामर्थ्याचा मुलभूत कणा असतो. मागील काही दशकात जागतिक अर्थकारणात एक बाजारपेठ व कौशल्य विकास या अंगाने भारतीय अर्थव्यवस्था आकाराला येत आहे. जागतिक मंदीतही भारतीय अर्थव्यवस्थेने आपल्या विकासाचा वेग वाढता ठेवला ही बाब निश्चितच भूषणवाह आहे. रिझर्व्ह बँकेची भूमिका यामध्ये महत्वाची होती. परंतु अलीकडच्या काळात संविधानि संस्थांची जी मोडतोड चालली आहे. ज्या पद्धतीने स्वायत्त संस्थांचे संकेत पायदळी तुडवले जात आहेत. त्यातून भारतीय अर्थव्यस्थेचा रथ रूततो आहे की काय? अशी शंका येण्यास वाव आहे. नोटाबंदी, जीएसटी याने यात अधिक भर पडली आहे. या पार्श्वभूमीवर देशात वैचारिक असाहिष्णूता, जातीय व धार्मिक तेढ, भाषा व प्रादेशिक अस्मिता, जमाववादी व गुन्हेगारी प्रवृत्ती डोके वर काढत आहेत. भूक, भय आजही कायम असेल तर यासंदर्भांना मागे सारून भारत राष्ट्रीय सुरक्षा व समृद्धीचा मार्ग स्वीकारून या सर्व धोक्यांना मागे सारेल का? हा प्रश्न आजही कायम आहे.

**भारतीय राष्ट्रीय सुरक्षितते समोरील आव्हाने :-**

भारताचे सुरक्षाविषयक प्रश्न मागील काही दिवसांपासून बिकट होताना दिसत आहे. भारताला बहिर्गत प्रश्नांसह अंतर्गत प्रश्न, त्यात प्रामुख्यने असामारिक सुरक्षेचे प्रश्न, भेडसावत आहेत. सोव्हिएट रशियाच्या विघटनानंतर अमेरिकेचे लष्करी व आर्थिक प्रभुत्व इराक व अफगाणिस्थान मध्ये केलेल्या एकतर्फी लष्करी कार्यवाही द्वारे सिद्ध झाले आहे. अमेरिकेसह इतर P. S देशाद्वारे आंतरराष्ट्रीय शांतता व सुरक्षितता टिकविण्याची परिस्थिती सध्या राहिलेली नसून आंतरराष्ट्रीय राजकारणात मानवी हक्क व सामाजिक सुरक्षा हे प्रश्न ही आंतरराष्ट्रीय सुरक्षेच्या चौकटीत मांडता येणार आहेत. आजच्या माहिती व तंत्रज्ञानाच्या क्रांतीमुळे वेळ व काळाचे आकूंचन होऊन नवीन अराजकीय घटक राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय राजकारणात प्रमुख घटक ठरलेले दिसतात.

जागतिकीकरणाच्या प्रक्रियेने भारत इतिहासाच्या वेगळ्या टप्प्यावर येऊन ठेपला आहे. भारत हा विविध जाती धर्माच्या व संस्कृतीचा देश आहे. शिवाय गरीब व श्रीमंत यांच्यात मोठी तफावत आहे. तरीही भारत आज जागतिक महासत्तेकडे वाटचाल करताना पाहावयास

मिळतो. आर्थिक विकासात व परकीय गुंतवणूकीत मोठया प्रमाणात वाढ झाली आहे. याचे महत्वाचे कारण म्हणजे भारताची धर्मनिरपेक्ष राज्यघटना की जिच्यामुळे भारतातील सर्व जातीसमूहांना सामाजिक-आर्थिक-राजकीय विकास साधण्याची संधी आहे. संसदीय लोकशाहीच्या ताकदीमुळे भारताने नैसर्गिक व सामरिक साधन सामग्रीचा योग्य वापर करून लष्करी व औदयेगिक क्षेत्रात मोठी झेप घेतली आहे. तांत्रिक मानवी बळ, मोठी बाजारपेठ इत्यादी घटकांमुळे येणाऱ्या काळात भारतास आंतरराष्ट्रीय राजकारणात निश्चितच स्थान असणार आहे. १९९८च्या आण्विक चाचणीने भारताचे अणुशक्तीधारी स्थान अधिक भक्कम झाले. त्याचबरोबर भारत आज संरक्षण सिद्धता, उपग्रह-तंत्रज्ञान, आण्विक तंत्रज्ञान, क्षेपनास्त्रे इत्यादी क्षेत्रात आपल्या देश उल्लेखनीय कार्य करीत आहे.

अंतर्गत सुरक्षेचा विचार करताना भारतामध्ये सामाजिक, राजकीय, आर्थिक क्षेत्रात विविध आव्हाने निर्माण झाली आहेत. मागील दशकात केंद्रामध्ये राजकीय अस्थैर्य, सामाजिक विषमता, जातीय व धार्मिक संघर्षातील वाढ, बाल कामगारांचे प्रश्न, शिक्षण व आरोग्य यांचे मुलभूत प्रश्न, दहशतवादाला, धार्मिक प्रश्नांची जोड, उत्तर-पूर्व राज्यातील बंडखोरीचे प्रश्न, सीमेपलेकडील दहशतवाद, काश्मिर मधील कमी तीव्रतेचा संघर्ष, गरीब श्रीमंता मधील वाढती दरी, पंजाबमधील दहशतवादाला पुन्हा खतपाणी मिळण्याची शक्यता आसाममधील उल्का द्वारे निर्माण झालेले प्रश्न, त्रिपुरा, नागालैंड मधील न सुटलेले प्रश्न हे सध्याचे राष्ट्रिय सुरक्षेपुढील प्रश्न भेडसावणारे प्रश्न आहेत. ह्यामुळे राष्ट्रीय सुरक्षेचे सामरिक व असामरिक प्रश्नांचे संदर्भ बदलणार आहेत. राष्ट्रीय सुरक्षेच्या चौकटीत अंतर्गत प्रश्नांचा सर्वांगीण अभ्यास होण्याची गरज आहे. बर्हिगत सुरक्षेचा विचार करताना पाकिस्तानद्वारे आण्विक व लष्करी बळाचा धोका आपल्याला भेडसावत आहे. पाकिस्तानद्वारे सातत्याने संघर्ष निवारणाबाबत ठोस निर्णय पुढे येत नाही. भारताच्या विभागीय लष्करी शक्तीला चीनद्वारे लगाम लावण्याचे काम चीन प्रत्यक्ष व अप्रत्यक्षरित्या करीत आहे. पाकिस्तान सोबत भारताची चार युद्धे होऊनही भारताच्या संसदेवर हल्ला झाल्यानंतर 'ऑपरेशन पराक्रमद्वारे' भारताने कोटयावधी रूपयाचा चुराडा केला तरी कोणताही ठोस निर्णय होऊ शकला नाही. त्यानंतरच्या काळातही पाकिस्तानकडून सातत्याने दहशतवादी हल्ले होतांना दिसत आहेत. चीनकडूनही भारतास दिघकालीन धोका निर्माण झालेला दिसतो. सोव्हिएट रशियाच्या विघटनांनतर चीन जागतिक स्तरावर एक महासत्ता राष्ट्र म्हणून पुढे आले आहे. अमेरिकेस शह देवू शकेल एवढे लष्करी सामर्थ्य चीनने निर्माण केले आहे. त्यातच चीनने भारताविरोधात उत्तर व पूर्वेकडे केलेली लष्करी तयारी, सिलेटर असलेले नियंत्रण व लांब पल्ल्याच्या क्षेपणास्त्रांद्वारे भारताच्या महत्वाच्या शहरांवर हल्ले करण्याच्या व्यूहरननीतीमुळे चीनकडून भारताच्या सुरक्षेपुढे आव्हान निर्माण झाले आहे.

भारत – बांग्लादेशामध्ये जरी तणावपूर्ण संबंध नसले तरी पाणी वाटपाच्या प्रश्नावर धार्मिक प्रश्नाबाबत दोन्हीं देशांदरम्यान मतभिन्नता आहे. बांग्लादेशी घुसखोरी, स्थलांतर यासारख्या प्रश्नांमुळे भारताच्या सुरक्षिततेस धोका निर्माण झालेला आहे. भारत-नेपाळ संबंधामध्ये बरेच चढउतार आपणांस पाहावयास मिळतात. नुकत्याच झालेल्या राजकीय बदलामुळे दोन्ही देशादरम्यान सलोख्याचे संबंध निर्माण होण्यास मदत होणार आहे. परंतु नेपाळमध्ये शांतता, विकास व लोकशाहीचे बळकटीकरण होणे गरजेचे आहे. दक्षिण आशियातील राष्ट्रांमध्ये जोपर्यंत शांतता व विकास होत नाही तोपर्यंत खऱ्या अर्थाने भारताला आंतरराष्ट्रीय राजकारणात आपले प्रभूत्व गाजवता येणार नाही.

भारत व भुतान यांच्या सामरिक संबंधाला ऐतिहासिक व धार्मिक पार्श्वभूमी आहे. बौध्द धर्माचा प्रचार व प्रसार भारतातूनच झाल्यामुळे भुतानला भारताकडून बऱ्याचशा अपेक्षा आहेत. भुतानच्या भूसामरिक महत्वामुळे दक्षिण आशियात लष्करी शक्तीचे संदर्भ बदलू शकतात. चीनद्वारे भुतानमध्ये होत असलेला हस्तक्षेप भावी काळात भारतातसाठी डोकेदुखी ठरू शकतो.

भारत-मालदिव यांच्यातील सुरक्षाविषयक संबंधाणा दक्षिण आशियात महत्व आहे. आकाराने लहान असलेल्या मालदिवला सुरक्षा-विषयक अनेक समस्या भेडसावतात. मालदीवने संयुक्त राष्ट्राच्या आमसभेच्या ठरावानुसार हिंदी महासागर हे zone of peace असणार. भारत मालदीव संबंधात विविध सुरक्षाविषयक प्रश्नांसंदर्भात जागतिकीकरणाच्या चौकटीत विचार करणे आवश्यक आहे. हिंदी महासागरात अमेरिकेसह इतर प्रबळ राष्ट्रांनी चालविलेल्या कारवाया निश्चित कटकटीच्या ठरणाऱ्या आहेत.

मागील काही दशकांपासून भारत-मालदीव संबंधात विविध सुरक्षाविषयक प्रश्नांसंदर्भात जागतिकीकरणाच्या चौकटीत विचार करने आवश्यक आहे. हिंदी महासागरात अमेरिकेसह इतर प्रबळ राष्ट्रांनी चालविलेल्या कारवाया निश्चितच कटकटीच्या ठरणाऱ्या आहेत.

मागील काही दशकांपासून भारत-श्रीलंका यांच्यात सुरक्षाविषयक विविध करार होऊनही वांशिक प्रश्नामुळे श्रीलंकेतील अंतर्गत समस्येचे प्रश्न अतिशय बिकट आहेत. भारताचे तत्कालिन पंतप्रधान राजीव गांधीनी श्रीलंकेच्या वांशिक प्रश्नात केलेला लष्करी हस्तक्षेप हा श्रीलंकेची एकता व अखंडता टिकविण्या करीता होता मात्र तामिळ लिट्टें कडून त्यांची हत्या करण्यात आली. आज लिट्टे प्रमुख प्रभाकरनला संपवण्यात श्रीलंकन सरकारला यश मिळाले असले तरी श्रीलंकन सरकार समोर तमिळी लोकांच्या पूनर्वसनाचा प्रश्न कायम आहे. तमिळ जनता जोपर्यंत श्रीलंकेच्या मुख्य प्रवाहात येणार नाहीत तोपर्यंत खऱ्या अर्थाने श्रीलंकेमध्ये शांतता प्रस्थापित होऊ शकणार नाही.

एकंदरित भारताच्या सभोवतालच्या राष्ट्रांमध्ये विविध सामाजिक, लष्करी, सांस्कृतिक, आर्थिक प्रश्न आहेत. त्यामुळे भारताचे परराष्ट्रीय धोरण ठरविताना या सर्व बाबींचा विचार होणे गरजेचे आहे.

## ३.५ भारताचे आण्विक धोरण –

आज जगातील सर्वच राष्ट्रे अण्वस्त्र संपन्न झालेली आहेत. या अण्वस्त्रांचा वापर विकासात्मक व स्वसंरक्षणाच्या दृष्टीने केला जात आहे. दुसऱ्या महायुद्धाच्या दरम्यान नागासाकी व हिरोशिमा यावरिल प्रथम अणूबॉम्बच्या वापरामुळे होणारे परिणाम देखील दिसून आले. अणू म्हणजे अतिसुक्ष्म कण होय. एखाद्या पदार्थांचे तुकडे तुकडे करून सर्वात शेवटी जे अति लहान कण शिल्लक राहतील त्यांना अणू म्हणता येईल. पाण्याच्या एका थेंबात ६०००, ०००,०००,०००,०००,०००,००० अनू असतात. यावरून अणूच्या सुक्ष्मपणाची कल्पना येइल. पूर्ण पृथ्वीचा किमान शंभर वेळा विध्वंस करता येईल एवढी अण्वस्त्रे आज सज्ज आहेत. असा अनुमान आहे. त्यापैकी सर्वाधिक अण्वस्त्रे ही अमेरिकेकडे (१५ ते २० हजार), रशियाकडे (१० ते १५ हजार), ब्रिटनकडे (८ ते १० हजार), फ्रान्सकडे (५ ते ७ हजार) व चीन कडेही (५ ते ७ हजार) अण्वस्त्रे आहेत. ही संख्या यापेक्षाही वास्तवात

अधिक असू शकते कारण कोणताही देश यासंबंधीची सत्यता गुप्त ठेवण्याचाच प्रयत्न करीत असतात.

भारताने आपले परराष्ट्र धोरण व राष्ट्रीय सुरक्षितता बदलत्या जागतिक परिस्थितीमध्ये बदलण्यास १९७०च्या दशकापासून प्रारंभ केला. १९७४ साली भारताने यशस्वी अणुचाचणी करून भारताने आपली अण्वस्त्र क्षमता प्रथमच जगासमोर सिद्ध केली. तेव्हापासून प्रामुख्याने भारतीय आण्विक धोरणासाठी गंभीर चर्चा सुरू झाली. भारतानेमात्र अण्वस्त्रधारी म्हणून क्षमता सिद्ध झाल्यानंतरही भारत अणूविज्ञानाचा वापर शांततामय कार्याकरिता करेल असे जाहीर केले.

भारताची अण्वस्त्रविषयक भूमिका ही स्वातंत्र्य पूर्व काळापासूनच शांततेच्या तत्वाशी बांधिल असल्याचे दिसते. २९ सप्टेंबर १९४६ रोजी यासंदर्भात म. गांधीनी आपली भूमिका मांडताना म्हटले होते, "माझ्या मताप्रमाणे सर्व स्त्री-पुरुष व बालकांच्या विनाशासाठी अणूबॉम्बचा उपयोग करणे म्हणजे विज्ञानाचा विनाशकारी उपभोग आहे." त्यामुळे स्वातंत्र्यानंतर भारताने आपल्या विदेशी धोरणात सामान्य व महत्वाच्या उद्देशाकरीता आण्विक शास्त्रास्त्रे नष्ट करण्यावर जोर दिला आहे.

भारताच्या आण्विक धोरणामध्ये प्रामुख्याने दोन प्रवाह आढळतात. १) शांतीपूर्ण विधायक कार्याकरिता अणूतंत्रज्ञानाचा विकास २) सैनिकी विकासाला वापर. भारताने अणूधोरणांमध्ये दुसऱ्या प्रवाहास कायम प्राधान्य दिलेले आहे. १९४८ च्या प्रारंभी आंतरराष्ट्रीय परमाणू ऊर्जा आयोगाच्या अहवालावर चर्चा सुरू असताना भारताने कोणत्याही देशाला अण्वस्त्रे निर्माण करण्याची परवानगी देऊ नये तसेच या अणुशक्तीचा उपयोग शांततेकरिता व विधायक कार्यासाठी करावा असे स्पष्ट मत मांडले होते. परंतु बदलत्या राजकीय परिस्थितीनुसार केवळ भारताने एकटयाने अशी भूमिका घेवून चालणारे नाही. कारण शेजारील पाकिस्तान अणुशक्तीचा वापर लष्करी उद्दिष्टाने करीत असेल तर भारतासही शांततेकरिता अणूशक्ती या धोरणाचा फेरविचार करणे आवश्यक आहे असा इशारा तत्कालीन पंतप्रधान व्ही.पी.सिंग यांनी दिला होता.

**भारताचे आण्विक कार्यक्रम :-**

प. जवाहरलाल नेहरू व भाभा हे आण्विक कार्यक्रमाचे दोन प्रमुख आधारस्तंभ होत. आण्विक कार्यक्रमाचे जवळजवळ एक ??? असे वैज्ञानिक तंत्रज्ञानात्कम नेतृत्व भाभांकडे होते तर या कार्यक्रमाकरीता आवश्यक ते सारे पाठबळ नेहरूंनी पुरवले होते. स्वातंत्र्यानंतर लगेचच १९४८ साली 'अणूऊर्जा आयोगाची' स्थापना करण्यात आली. त्याचे नेतृत्व होमी भाभा यांच्याकडे सोपविण्यात आले. १९५४ साली विज्ञान तंत्रज्ञान मंत्रालयातंर्गत अणूऊर्जा विभाग निर्माण करून त्याचे सचिवपदही भाभा यांनाच दिले गेले. १९५६ साली अणूऊर्जा आयोगाची पुनर्रचना करून आण्विक धोरण ठरविण्याचे सर्व अधिकार त्यांनाच देण्यात आले. १९५६ साली 'अप्सरा' ही भारताची पहिली संशोधनपयोगी अणुभट्टी कार्यान्वीत झाली. तिच्याकरीता समृद्ध युरेनियम पुरवण्याचा करार ब्रिटनबरोबर करण्यात आला. त्यानंतरची दुसरी संशोधन उपयोगी अणुभट्टी 'सायरस' ही १९६० साली कार्यान्वित झाली. त्यामध्ये जड पाण्याचा वापर केला गेला आहे. तिसरी अणुभट्टी 'झार्लेना' १९६१ साली नैसर्गिक युरेनियम वापराची उभारण्यात आली. भारतामध्ये युरेनियमचे जाळे मर्यादित आहेत. परंतु



munotes.in

थोरियम मात्र मोठ्या प्रमाणात उपलब्ध आहे. हे लक्षात घेऊन अणूऊर्जा विकासाकरिता तीन टप्प्यांचा कार्यक्रम आखण्यात आला. तो असा की, पहिल्या टप्प्यात नैसर्गिक युरेनियम हे इंधन आणि जड पाणी हे शीत जनक वापरून ऊर्जा तसेच प्लूटेनियमचे उत्पादन करणे, दुसऱ्या टप्प्यात प्लूटोनियम इंधन म्हणून वापरणाऱ्या द्रुतगती प्रजनन अणुभट्ट्या तयार करणे, तिसऱ्या टप्प्यात थेरियम इंधन वापरणाऱ्या द्रुतगती प्रजनन अणुभट्ट्या तयार करणे. भारतामध्ये अणूऊर्जेचा कार्यक्रम सुरू झाला त्या सुमारास थेरियम हे अणुभट्ट्यातील इंधन म्हणून वापण्याविषयीचे संशोधन चालू होते. यूरेनियमचा वापर तंत्रज्ञानाने सिद्ध झालेला होता. त्यामुळे अशा प्रकारचे दिशादर्शक धोरण तयार झाले.

भारताचे आण्विक धोरण ऊर्जेची वाढती मागणी भागविण्याकरिता महत्वपूर्ण होती. अणूऊर्जा आयोगाच्या स्थापनेनंतरच्या पहिल्या दहा-बारा वर्षानंतर अणूऊर्जाच्या यशापयाशाची चर्चा सुरू झाली. कारर तिन्ही अणूभट्ट्यातून वीजनिर्मितीची सुरूवात नव्हती. त्याकरीता मोठया प्रमाणात खर्च करण्यात आला होता. त्यामुळे अशी टिका होऊ लागली होती. अखेर अणूऊर्जा आयोगास पडताळणीचे अधिकार देऊन १९५६ साली तो कार्यान्वीत आला. अणूऊर्जा निर्मितीला चालना देण्याकरिता स्वयंपूर्णतेच्या तत्वास बगल देऊन अणूभट्टीच्या बांधणीकरिता कॅनडा व अमेरिकेशी बोलणी करण्यात आली. तारापूर येथील १५० मेगावॅटच्या दोन अणूभट्ट्या बांधण्यास अमेरिकेने मदत देऊ केली. यावेळी आंतरराष्ट्रीय अणूऊर्जा आयोगाचे निर्बंध टाळण्यात भारताला यश आले. त्याऐवजी अमेरिकेच्या काही अटी भारताने मान्य केल्या. रावताभाटा (राजस्थान) येथे ९० मेगावॅटची अणूभट्टी बांधण्याकरिता कॅनडाने सहाकर्य केले. या कालावधीत भारताने आंतरराष्ट्रीय अणूऊर्जा आयोगाच्या निर्बंधाना नकार दिला. याऐवजी परस्परांच्या अणूभट्ट्यांची पडताळणी करण्याची भारताची सूचना कॅनडाने मान्य केली. 'अप्सरा' या संशोधनपयोगी भट्टी करिता इंधन आणण्याचा ब्रिटनबरोबर करार आंतरराष्ट्रीय अणुऊर्जा आयोगाच्या स्थापनेपूर्वींचा असल्यामुळे हे इंधन ही आंतरराष्ट्रीय निर्बंधापासून मुक्त राहिले. यातून दोन गोष्टी स्पष्टपणे जाणवतात.

१) आर्थिक व धोरणात्मक क्षेत्रात संपूर्ण स्वातंत्र्य मिळून देखील भारताचा आण्विक कार्यक्रम नियोजित उद्दिष्टये गाठण्यात सुरवातीपासूनच कमी पडत होता.

२) आण्विक कार्यक्रम फक्त ऊर्जानिर्मितीसाठी नसून त्यामागे अण्वस्त्र निर्मितीचा छूपा कार्यक्रम होता.

तारापूरची अणुभट्टी १९६९ पासून कार्यान्वीत झाली तर रावताभाटा येथील पहिली भट्टी १९७३ पासून सुरू झाली. १९६८ साली भारताने अण्वस्त्र प्रसार बंदी करारावर स्वाक्षरी करण्यास भारताने नकार दिला. यामागे चीनची १९६४ ची आण्विक चाचणी न्यास कारणीभूत होती. चीनशी १९६२ साली झालेले युद्ध त्यातील मानहानी जनक हार व जीनची अण्वस्त्रक्षमता यामुळे भारताच्या सुरक्षेला असलेला धोका लक्षता घेऊन अण्वस्त्र विषयक धोरण आणण्याची गरज त्यातून व्यक्त झाली. याचाच परिणाम भारताने अण्वस्त्र प्रसार बंदी करारास नकार देण्यात आला. तसेच या करारास पाच अण्वस्त्रक्षम देशांशिवाय इतर देशांनी अण्वस्त्र बनवू नयेत असा या कराराचा हेतू होता. त्यामुळे भारताने हा करार नाकारला.

munotes.in

| भारतीय अणूऊर्जा प्रकल्प | | | |
|---|---|---|---|
| | Power Station | Locatiga | State |
| 1 | Kaiga Plant Power Plant | Kaiga | Karnataka |
| 2 | Kakrapar Atomic Power Station | Kakrapar | Gujrat |
| 3 | Kudankulem Nuclear Power Plant | Kudankulam | TamilNadu |
| 4 | Madras Atomic Power Staton | Kalpakkam | TamilNadu |
| 5 | Narora Atomic Power Station | Narrora | U. P. |
| 6 | Rajasthan Atomics P. S. | Rawatbhta | Rajasthan |
| 7 | Tarapur Atomics P. S. | Tarapur | Maharashtra |

| नवीन अणूप्रकल्पाची निर्मित विद्युत केंद्र | | |
|---|---|---|
| | **विद्युत केंद्र** | **राज्य** |
| १ | गोरखपुर | हरियाना |
| २ | चूटका | मध्य प्रदेश |
| ३ | माही बन्सवारा | राजस्थान |
| ४ | कैभा | कर्नाटक |
| ५ | मद्रास | तामिळनाडू |
| ६ | कुडक कुलम | तामिळनाडू |
| ७ | जैतापूर | महाराष्ट्र |
| ८ | कोवाडा | आंध्रप्रदेश |
| ९ | मीधी वरदी | गुजरात |

munotes.in

१९५० च्या दशकात भारतातील अवकाा विषयक संशोधनाचाही पाया घातला गेला. संरक्षक, उत्पादनात स्वयंपूर्णतेचे उद्दिष्ट डोळ्यासमोर ठेवून संरक्षण संशोधन विकास संघटनेचे स्थापना केली. १९८३ साली DRDD मध्ये एकात्मिक क्षेपणास्त्र विकास कार्यक्रमाची सुरूवात झाली. इतर पाच राष्ट्रांबरोबर म्हणजे अमेरिका, रशिया, चीन, फ्रान्स आणि इस्राईल यांच्यानंतर भारत हे क्षेपणास्त्र निर्मिती मधील सहावे राष्ट्र ठरले. जमिनीवरून जमिनीवर मारा करणारे पृथ्वी, जमिनीवरून आकाशात हल्ला करणारी त्रिशुल आणि आकाश, रणगाडी विरोधी नाग आणि अग्नि हे बॅलेस्टिक क्षेपणास्त्र ही सारी देशातंर्गत संशोधनातून सिद्ध करण्याचे उद्दिष्ट या कार्यक्रमासमोर होते. परंतू क्षेपणास्त्र निर्मिती कार्यक्रमाची माहिती घेतल्यास निराशाजनक माहिती समजते. वरील क्षेपणास्त्रांपैकी फक्त पृथ्वी भूसेनेच्या शस्त्रगारात सामावून घेणत आले आहे. त्याचा प्रत्यक्ष वापर झाला नाही. बाकी क्षेपणास्त्रांना मात्र यश आले नाही.

**१) भारतातील अणू प्रकल्प व जडपाणी :-**

या अणूशक्ती संशोधन केंद्राची स्थापना १९५७ मध्ये करण्यात आली. त्याला अणुशक्ती केंद्र, तुर्भे असे म्हटले जाते. हे सर्वात मोठे वैज्ञानिक केंद्र आहे. त्यानंतर १९६७ मध्ये त्याचे नाव बदलण्यात आले व त्याला भाभा अणूशक्ती संशोधन केंद्र हे नाव देण्यात आले. अणूतंत्रज्ञान विकसित करण्यात भाभा केंद्राने महत्वाची कामगिरी बजावली आहे. अणूवीज केंद्राची उभारणी, अणूइंधन प्रक्रिया, लेसर शेती संशोधन अशा अनेक क्षेत्रात या ठिकाणी संशोधन कार्य चालते.

भारतामध्ये अणूसंशोधनासाठी व त्याचा विकास करण्यासाठी खालील अणूभट्ट्या निर्माण करण्यात आल्या.

**१) अप्सरा :-**

ही भारतातील पहिली अणूभट्टी आहे. या अणूभट्टीची स्थापन २० जानेवारी १९५१ रोजी करण्यात आली. या अणुभट्टीची क्षमता १ मेगावॅट आहे. ही स्विमिंग राईज अणूभट्टी आहे. ह्या अणूभट्टीमध्ये युरेनियम हे इंधन वापरले जाते.

**२) सायरस :-**

हे भारतातील दुसरे अणूशक्ती केंद्र होय. हिची स्थापना १० जुलै १९६० रोजी करण्यात आली. या अणूभट्टीची क्षमता ४० मेगावॅट आहे. पहिल्यांदा या अणूभय्टीत कॅनडा इंडिया रिॲक्टर (CIR) असे म्हणत नंतर अमेरिकेने जड पाण्याचा पुरवठा केल्यामुळे सायरस हे नाव देण्यात आले. या अणूभट्टीचा उपयोग प्लूटोनिअम उत्पादनाकरिता होतो.

**३) झार्लिन (Zerlina) Zero Energy Reactor for Cattice in Vestigations and New Assemblies) :-**

ही तिसरी अणूभट्टी होय. या अणूभट्टीचे बांधकाम भारतीय शास्त्रज्ञ व इंजिनिअर्स यांनी केलेले आहे. ही नॅचरल युरेनिअम फ्लूएल व हेवी वाटर मॉडरेहेड रिॲक्टर आहे. हिची स्थापना मे १९८४ मध्ये करण्यात आली. ह्याला झिरो एनर्जी रिॲक्टर देखील म्हणतात.

४) **पूर्णिमा (Purnima - Plutonium Reactor For Neutron Investigations in Multiple Assemblie) :-**

पूर्णिमा ही भारतातील चौथी अणुभट्टी होय. हिची स्थानपना २२ मे १९७२ रोजी करण्यात आली. यालाच फास्ट ब्रीडर रिॲक्टर असे म्हणतात. ह्या भट्टीचे निर्माण तामिळनाडूमधील कल्पक्कम येथे करण्यात आले.

५) **ध्रूव :-** ही भारतातील पाचवी अणुभट्टी होय. हिची स्थापना १९८५ मध्ये करण्यात आली. ह्या अणूभट्टीची क्षमता १०० मेगावॅट इतकी आहे.

**२) इंदिरा गांधी अणूशक्ती केंद्र :-**

१९७१ मध्ये इंदिरा गांधी अणूक्ती केंद्राची स्थापना करण्यात आली. या केंद्रामार्फत फास्ट रिॲक्टर औद्यागिकीकरणा करिता उपयोग करण्यात आला. नंतर 'प्रोटोटाइप फास्ट ब्रीडर रिॲक्टर' सुरू करण्याची योजना सुरू आहे.

उन्नत औद्योगिक केंद्र :- हे अणूशक्ती केंद्र मध्य प्रदेशामध्ये इंदूर येथे स्थापन केले गेले. यामार्फत फ्यूजन, लेसर इ. उच्च औद्योगिक क्षेत्रामध्ये संशोधन व विकास कार्य करण्यात येते. याची स्थापना १९८४ मध्ये करण्यात आली.

**अण्वस्त्र सज्जते मागील भारताची राजकीय भूमिका :-**

अणूशक्ती संदर्भात भारताची राजकीय भूमिका स्वातंत्र्योत्तर काळामध्ये लगेचच स्पष्ट करण्यात आली. भारताचा अणूशक्ती विकासाचा कार्यक्रम हा केवळ शांतता व विधायक कामाकरिता असेल हे भारताचे प्रथम प्रधानमंत्री पंडित जवाहरलाल नेहरू यांनी प्रारंभीच स्पष्ट केले होते. त्यामुळेच भारताने प्रारंभापासून अण्वस्त्रमुक्त जगाच्या निर्मितीकरिता सकारात्मक प्रतिसाद दिला. संयुक्त राष्ट्रांच्या प्रयत्नांना ही भारताने सकारात्मक प्रतिसाद दिला. संयुक्त राष्ट्रांच्या महासभे मध्ये १९ नोव्हेंबर १९६५ रोजी सर्वानुमते नि:शस्त्रीकरणाचा व अण्वस्त्रांच्या समूळ उच्चाटनांचा निर्णय मंजूर केला. याच निर्णयाच्या आधारावर १९६८ मध्ये अण्वस्त्र प्रसार बंदीचा करार करण्यात आला. भारत १९६५ मध्ये महासभेने घेतलेल्या निर्णयाशी पूर्ण सहमत होता. परंतु १९६८ मध्ये या करारावर स्वाक्षरी करण्यास भारताने नकार दिला.

१९६८ चा अण्वस्त्र प्रसार बंदी करार हा पक्षपाती आहे हा भारताचा त्यावर प्रमुख आरोप आहे. या कराराने जगाची विभागणी अण्वस्त्र असलेले देश व बिगर अण्वस्त्र देश अशी फाळणी केली. या करारान्वये असे निश्चित होणार होते की १९६८ पर्यंत अण्वस्त्र संपन्नता प्राप्त केली आहे. केवळ त्यानांच अण्वस्त्रे बाळगता येतील. इतर राष्ट्रांना मात्र अण्वस्त्र विकसित करता येणार नाहीत. वास्तविक संयुक्त राष्ट्रांच्या महासभेने संपूर्ण नि:शस्त्रीकरणाचा प्रस्ताव मंजूर केला होता. मात्र हे उद्दिष्ट १९६८ च्या या ठरावाने पूर्णत्वास जाऊ शकत नव्हते. या कराराच्या पक्षपाती स्वरूपामुळे केवळ ४३ देशांनीच या करारास संमती दिली. ५ मार्च १९७० रोजी हा करार अस्तित्वात आला. १९४५ पर्यंत त्यास कालावधी होता. त्यानंतर

या करारास मूदतवाढ देण्याकरिता अमेरिकेने जोरदार प्रयत्न केले. त्यातून अनेक राज्यांनी इच्छा नसतानाही या करारास अनिश्चित काळा करिता मुदतवौ करण्यास संमती दिली. भारत मात्र आपल्या मुळ भूमिकेवर ठाम राहिला. भारताची यासंदर्भात अशी भूमिका आहे की, जोपर्यंत अण्वस्त्रांच्या समूह उच्चाटनाचे वेळापत्रक ठरवले जात नाही व या करारातील पक्षपातीपना दूर करून संपूर्ण नि:शस्त्रीकरणाच्या दिशेने अण्वस्त्र संपन्न देश प्रयत्न करीत नाहीत, तोपर्यंत भारत हा करार मान्य करणार नाही.

१९९५ साली सर्वसमावेशक अणूचाचणी बंदी करार मांडण्यात आला. या करारास ही भारताने नकार दिला. या करारामध्ये ही मोठ्या उणिवा होत्या. त्यातील प्रमुख तीन उणिवा म्हणजे यामुळे कोणत्याही राष्ट्रात अणूचाचणी करता येणार नव्हती. या करारामध्ये सध्या अण्वस्त्रधारी असणाऱ्या राष्ट्रांनी अण्वस्त्र कधी नष्ट करायचा याचा कोणताही कार्यक्रम नव्हता. दूसरे म्हणजे हा करार जरी सर्वसमावेश हे नाव घेऊन आला असला तरी त्यात सर्वसमावेशकता नाही. कारण प्रयोगशाळांमध्ये संगणकाद्वारे करण्यात येणाऱ्या अणूचाचणीच्या बंदी विषयी यात कोणतीही तरतूद नव्हती. तिसरे म्हणजे जी राष्ट्रे या कराराला मान्य करणार नाहीत त्यांच्यावर बळाचा प्रयोग केला जाईल अशी ही तरतूद या करारात होती. यातील पक्षपाती बांबीमुळे भारताने या करारास संमती देण्याचे नाकारले.

**भारताचा अण्वस्त्र धोरण मसूदा :-**

१७ ऑग्स्ट १९९८ रोजी भारताने आपला अणुशक्ती मसुदा घोषित केला. या मसुद्यातून भारताने अण्वस्त्र सज्जते मागील भारताची राजकीय भूमिका स्पष्ट केली. या मसुद्यात भारताने पुढील बाबी मांडल्या.

१. भारताच्या अनुशक्ती कार्यक्रमाचा प्रमुख उद्दे हा अणुशक्तीचा विकासात्मक कार्यक्रमासाठी उपयोग करणे हा आहे.

२. आर्थिक, सामाजिक, विज्ञान, तंत्रज्ञानातील प्रगती प्रमाणेच संरक्षण हे क्षेत्रदेखील विकासात्मक कार्यक्रमाचा भाग आहे. त्यामुळे संरक्षणाकरिता अणूशक्तीचा वापर केला जाईल.

३. भारत आपल्या संरक्षणाकरिता आवश्यक तेवढी कमीत कमी अण्वस्त्र सज्जता प्राप्त करेल याकरीता हा शब्द प्रयोग वापरण्यात आला आहे.

४. भारत अण्वस्त्रांचा उपयोग प्रथम करणार नाही. जर भारताव अण्वस्त्रांचा हल्ला झालाच तर प्रतिउत्तर म्हणून त्याचा वापर करेल.

५. अण्वस्त्रांच्या सुरक्षिततेकरिता व त्यावरील नियंत्रणासाठी सर्वसमावेशक योजना व प्रशिक्षण कार्यक्रमांची आखणी केली जाईल.

## ३.६ भारताची संरक्षर सज्जता :-

देशाचे संरक्षण मजबूत करण्याकरिता संकट येण्याची वाट पाहावयाची नसते असे म्हटले जाते. यादृष्टीने प्रत्येक देश संरक्षण सज्जतेच्या दृष्टीने लष्करी दृष्टया सज्ज होण्यास प्राधान्य देतो. भारतीतील संरक्षण व्यवस्थेच्या विकाससाठी ही १९६४ ते २०१२ या कालखंडात अकरा संरक्षण पंचवार्षिक योजना राबविण्यात आल्या. भारतामधील नागरी नेतृत्व व लष्करी नेतृत्व याच्यामद्ये समन्वय व संवाद वाढावा याकरिता ही संस्थात्मक संरचना उभारण्यात

आल्या. संरक्षण मंत्रालय व सशस्त्र सेवा यांचे संयुक्त प्रतिनिधित्व असणाऱ्या अनेक समित्या स्थापन करण्यात आल्या. तरीही हे सर्व प्रयत्न भारतातील राजकीय नेतृत्वाची ??? व संरक्षण मंत्रालयातील नोकरशहांचे प्राबल्य यामुळे अपयशी ठरले असे म्हटले जाते.

भारतीय लष्कराची युद्ध सज्तता, शस्त्रास्त्रांची गुणवत्ता, लष्कराचे आधुनिकीकरण, शस्त्रास्त्रांच्या बाबतीतले परावलंबित्व याविषयीच्या उणीवा मागील काही काळात प्रकर्षाने पुढे आलेल्या दिसतात. अमेरिका व चीन नंतर भारताचे लष्कर हे जगातील तिसऱ्या क्रमांकाचे मोठे लष्कर आहे. परंतु शस्त्रांस्त्रावर खर्च करण्याच्या बाबत मात्र आपला क्रमांक जगातील पहिल्या २० राष्ट्रांमध्ये ही येत नाही. भारतीय अर्थसंकल्पात संरक्षणाकरिता जी तरतूद करण्यात येते त्यापैकी केवळ ८५ टक्के खर्च हा पगार, भत्ते, निवृत्ती वेतन, कल्याणकारी योजना याबाबींवर केला जातो. शस्त्रास्त्रांच्या संदर्भात भारत ७० टक्के आयातींवर विसंबून आहे. शस्त्रास्त्र खरेदीकरीता भारताला वर्षाला सात अब्ज डॉलर्स खर्च करावे लागतात. २०१० नंतर भारताने आशिया खंडात शस्त्रास्त्र खरेदीच्या संदर्भात सौदी अरेबियास मागे टाकत प्रथम स्थान पटकावले आहे. तरीही तुलनात्मकदृष्टया भारताचे सैनिक शस्त्रास्त्रांच्या बाबत परिपूर्ण नाहीत. आजही भारत लढाऊ विमाने, बॉम्बर्स, रडार, युद्ध नौका, पाणबुडया, शस्त्रास्त्र, दारुगोळा आदि अनेक बाबींसंदर्भात भारत परराष्ट्रांवर अवलंबून आहे.

शस्त्रास्त्र खरेदीबाबत वाढता भ्रष्टाचार हेही भारतीय संरक्षण सिध्दते समोरील एक आव्हान आहे. शस्त्रास्त्र खरेदीची संपूर्ण प्रक्रिया ही भारतातील नौकरशहा व राजकारण्यांच्या प्रभावाखाली असणाऱ्या संरक्षण मंत्रालयात झाले आहे. शस्त्रास्त्र खरेदीची प्रक्रिया ही अतिशय गुंतागुंतीची, अपारदर्शक विलंब लावणारी आहे. परिणामी या प्रक्रियेत भ्रष्टाचारास मोठा वाव निर्माण झालेला दिसतो.

## ३.७ सारांश

राष्ट्रीय सुरक्षा संकल्पनेस स्वमूल्य आहे. शीतयुद्धोत्तर कालखंडामध्ये सुरक्षेच्या संदर्भात बदल झाले आहेत. पूर्वी सैनिकी घटकास महत्वाचे स्थान होते मात्र एकध्रुवीय विश्वरचना व जागतिकीकरणाच्या प्रक्रियेने लष्करी बळाबरोबरच असामारिक घटकांना महत्वाचे स्थान प्राप्त झाले आहे. आर्थिक शक्ती व सुरक्षा या घटकांवर राष्ट्राची सुरक्षा महत्वाची ठरणार आहे.

राष्ट्रीय सुरक्षेची व्याप्ती बहुआयामी आहे. त्यामध्ये सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक व लष्करी घटकांचा समावेश आहे. आज सुरक्षेची व्याप्ती केवळ लष्करापर्यंत मर्यादित न राहता ती सामाजिक, आर्थिक व राजकीय संदर्भात विस्तारली आहे. जोपर्यंत अंतर्गत शांतता व सुव्यवस्था निर्माण होत नाही वा तसा प्रयत्न केला जात नाही तो पर्यंत खऱ्या अर्थाने भारत महासत्ता होऊ शकत नाही. या निष्कर्षाप्रत आपण येतो.

## ३.८ आपण काय शिकलो ?

प्र. १ ला. राष्ट्रीय सुरक्षा ही संकल्पना स्पष्ट करा.

प्र. २ रा. राष्ट्रीय सुरक्षेचे बदलते स्वरूप सविस्तर लिहा.

प्र. ३ रा. राष्ट्रीय सुरक्षेच्या घटकांचे मूल्यमापन करा.

प्र. ४ था जागतिकीकरणशच्या प्रक्रियेने राष्ट्रीय सुरक्षेवर पाडलेल्या प्रभावाची चर्चा करा.

प्र. ५ वा. भारतीय राष्ट्रीय सुरक्षा व शस्त्रसज्जता यावर निबंध लिहा.

प्र. ६ वा. भारताच्या आण्विक धोरणावर निबंध लिहा

प्र. ७ वा. भारताच्या आण्विक धोरणाचे स्वरूप स्पष्ट करा.

**टिप लिहा**

१) राष्ट्रीय सुरक्षा

२) राष्ट्रीय सुरक्षेचे प्रकार

३) राष्ट्रीय सुरक्षेचे घटक

४) राष्ट्रीय सुरक्षेचे स्वरूप

५) राष्ट्रीय सुरक्षा व्याप्ती

६) भारताचे आण्विक धोरण

## ३.९ संदर्भ सूची


१) खरे विजय, डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि राष्ट्रीय सुरक्षा, सुगावा प्रकाशन, पुणे, २०१०

२) कोठारी रजनी, 'नेशन बिल्डींग', अलाईड पब्लिशर्स, नवी दिल्ली, १९७६.

३) देसाई अे. आर., 'सोशिअल बॅक ग्राऊंड ऑफ इंडियन नॅशनेलिझम पॉप्युलर बुक डेपो, मुंबई, १९५९

४) के. सुब्रमण्यम, 'अपर नॅशनल सेक्युरिटी द इकॉनॉमिक ॲन्ड सायंटिफिक रिसर्च फाऊंडेशन' नवी दिल्ली, १९७२

५) जेटली नॅन्सी, ' इंडियाज फॉरेन पॉलिसी चॅलेंजस ॲण्ड प्रॉस्पपेक्टस, विकास पब्लिशिंग हाऊस, नवी दिल्ली, १९९९

६) रॉनी डी, 'ऑन सेक्युरिटी, 'कोलंबिया युनिव्हसिटी प्रेस न्यूयॉर्क, १९९५

७) जॉफरी वाईजमन, 'कॉमन सेक्युरिटी इन द आशिया पॅसिफिक रिजन', द पॅसिफिक रिव्हव्ह, खंड ५, १९८९


❄❄❄❄❄❄❄

# ४

# आर्थिक सत्ता आणि "सॉफ्ट" पॉवर

**घटक रचना**

४.० घटकाची उद्दिष्टे

४.१ प्रस्तावना

४.२ परराष्ट्र धोरणाचे साधन म्हणून व्यापार

४.२.१. जागतिक व्यापार संघटनेमधील भूमिका

४.२.२. मुक्त व्यापार करार

४.३ ऊर्जा सुरक्षा आणि सागरी सुरक्षेचा शोध

४.४ सॉफ्ट पॉवर

४.५ सारांश

४.६ संदर्भ सूची

## ४.० घटकाची उद्दिष्टे

आंतरराष्ट्रीय राजकारणात महत्त्वाचे स्थान मिळवण्याकरता त्या राष्ट्राची आर्थिक सत्ता व सॉफ्ट पॉवर हे घटक महत्त्वाचे ठरतात. या दोन घटकांच्या सत्तेचा आढावा घेणाऱ्या या प्रकरणाची उद्दिष्टे खालीलप्रमाणे:

- भारताच्या परराष्ट्र धोरणात आर्थिक सत्तेचे महत्त्व समजून घेणे
- व्यापार, उर्जा आणि सागरी सुरक्षा यांची आर्थिक सत्तेतील भूमिका अभ्यासणे
- भारताची जागतिक व्यापार संघटनेमधील भूमिका तसेच भारताचे इतर राष्ट्रांसोबत असलेले मुक्त व्यापार करार यांतून व्यापार हे भारताच्या परराष्ट्र धोरणाचे साधन कसे हे स्पष्ट करणे
- भारतीय परराष्ट्र धोरणातील सॉफ्ट पॉवरची भूमिका समजून घेणे

## ४.१ प्रस्तावना

पारंपारिक दृष्ट्या कोणत्याही राष्ट्राच्या परराष्ट्र धोरणात राजकीय, ऐतिहासिक, भौगोलिक यांसारखे घटक हे आंतरराष्ट्रीय संबंध प्रस्थापित करण्यासाठी निर्णायक भूमिका बजावतात. परंतु दुसऱ्या महायुद्धानंतर या घटकांसोबतच आर्थिक सत्ता, राष्ट्रीय सुरक्षा आणि अलीकडे सॉफ्ट पॉवर या घटकांचे स्थान अधिक अधोरेखित झाले. या प्रकरणातून भारताच्या परराष्ट्र धोरणात आंतरराष्ट्रीय संबंध प्रस्थापित करण्याकरता तसेच जागतिक राजकारणात महत्त्वाचे स्थान मिळवण्याकरिता हे घटक काय भूमिका बजावतात हे स्पष्ट होणे अपेक्षित आहे.

munotes.in

## ४.२ परराष्ट्र धोरणाचे साधन म्हणून व्यापार

आर्थिक सत्ता व सुरक्षा हे भारतीय परराष्ट्र धोरणाच्या प्रमुख उद्दिष्टांपैकी एक आहे. ते साध्य करण्यासाठी राष्ट्राचा आर्थिक विकास आवश्यक आहे. यासाठी स्वातंत्र्यानंतर नेहरू काळात झालेल्या जड उद्योगनिर्मिती, पंचवार्षिक योजना, हरितक्रांती यांसारख्या विविध प्रयत्नांतून भारत आर्थिकदृष्ट्या स्वयंपूर्ण बनला. आर्थिक सुरक्षेसाठी हे प्रयत्न महत्त्वाचे असले तरी आर्थिक सत्तेसाठी यापलीकडे जाण्याची गरज होती. यासाठी आंतरराष्ट्रीय व्यापार हे महत्त्वाचे साधन ठरले. विशेषतः जागतिकीकरणानंतर आंतरराष्ट्रीय व्यवस्थेतील आपले स्थान भक्कम करण्यासाठी भारताने आंतरराष्ट्रीय व्यापारात सक्रीय राहणे महत्वाचे होते. तसेच आर्थिक सुरक्षा व सत्ता प्रस्थापित करण्यासाठी विविध राष्ट्रांशी असलेले भारताचे आर्थिक व व्यापार-संबंध सुदृढ करणे गरजेचे होते. याच पार्श्वभूमीवर भारत विविध जागतिक आर्थिक संघटनांचा सदस्य बनला. तसेच विविध राष्ट्रांशी व्यापार-संबंध प्रस्थापित करण्यासाठी व्यापार करारदेखील केले. यामध्ये जागतिक व्यापार संघटना व मुक्त व्यापार करार यांच्यासंदर्भात भारताची भूमिका महत्त्वाची ठरते.

### ४.२.१ जागतिक व्यापार संघटनेमधील भारताची भूमिका:

**पार्श्वभूमी:**

बहुपक्षीय आर्थिक संस्था जगभरातील समकालीन राजकीय आणि आर्थिक परस्परसंवादांना आकार देण्यासाठी महत्त्वपूर्ण भूमिका बजावतात. दुसऱ्या विश्वयुद्धानंतरच्या काळात, जागतिक अर्थव्यवस्था मोडकळीस आली होती. अशा वेळी बहुपक्षीय आर्थिक संस्थाना आंतरराष्ट्रीय आर्थिक व्यवस्थेचे नियमन करण्यासाठी नियमावली, संस्था आणि कार्यपद्धतींची व्यवस्था स्थापित करण्याचा स्पष्ट आदेश होता. ब्रेटन वुड्स ही अशीच एक तत्कालीन बहुपक्षीय आर्थिक संस्था होती. अशा प्रकारे आंतरराष्ट्रीय व्यापार आणि आर्थिक संरचना व्यवस्थापित करण्यासाठी ब्रेटन वुड्स परिषदेत तीन संस्था निर्माण करण्यात आल्या. त्यानुसार आर्थिक व्यवस्था स्थिर करण्यासाठी (चलनांची मूल्ये स्थिर करण्यासाठी) आंतरराष्ट्रीय नाणेनिधी (International Monetary Fund-IMF); जागतिक विकास आणि पुनर्रचनेचे व्यवस्थापन करण्यासाठी जागतिक बँक (World Bank) आणि राष्ट्रांमधील व्यापाराचे नियमन करण्यासाठी आंतरराष्ट्रीय व्यापार संघटना (International Trade Organisation-ITO) यांची कल्पना मांडण्यात आली. परंतु आंतरराष्ट्रीय व्यापार संघटनेचे स्वरूप आणि कार्ये यावर एकमत नसल्याने ही संस्था कधीच अस्तित्वात आली नाही. त्याऐवजी व्यापार आणि शुल्कावरील सामान्य करार (General Agreement on Trade and Tariffs- GATT) या नामांकनासह व्यापारावरील एक साधा करार संपन्न झाला. तथापि, सोव्हिएत युनियनचे विघटन आणि जग अमेरिका-केंद्रित एकध्रुवीयतेकडे वाटचाल करत असताना, गॅट ची जागा जागतिक व्यापार संघटना (World Trade Organisation-डब्ल्यूटीओ) ने घेतली.

**भारत आणि गॅट (GATT):**

ऑक्टोबर १९४७ मध्ये पार पडलेल्या टॅरिफ अँड ट्रेड (GATT) वरील करार करणाऱ्या २३ संस्थापक राष्ट्रांपैकी भारत हे एक राष्ट्र होते. भारताच्या नेत्यांनी गॅट मध्ये झालेल्या चर्चेत

विकसनशील देशांच्या समस्यांचे प्रवक्ते म्हणून काम केले आणि बहुपक्षीय व्यापार वाटाघाटींच्या त्यानंतरच्या फेऱ्यांमध्ये भारताने गॅट च्या आश्रयाखाली अनेकदा विकसनशील देशांच्या गटांचे नेतृत्व केले. याचे कारण तत्कालीन आंतरराष्ट्रीय व्यापाराचे पारडे हे कायम विकसित राष्ट्रांच्या हिताकडे झुकले असून विकसनशील राष्ट्रांच्या विकासाकडे दुर्लक्ष केले गेले. त्यामुळे जागतिक राजकारणात विकसित आणि वसाहतवादातून मुक्त झालेल्या विकसनशील राष्ट्रांचा समतोल राखण्यासाठी नियम-आधारित व्यापार व्यवस्था निर्माण करण्याची गरज आहे, अशी भारताची भूमिका नेहमीच राहिली आहे. याबाबत अनेक दशकांपासून भारतासह विकसनशील देश आणि विकसित राष्ट्रांमध्ये आंतरराष्ट्रीय एकमत होऊ शकले नाही.

गॅटने १९४७ मध्ये सुरुवातीपासूनच व्यापार उदारीकरणाचा पाठपुरावा केला होता. बहुपक्षीय वाटाघाटींच्या सलग फेऱ्यांद्वारे, गॅटने उरुग्वे फेरीच्या शेवटी १९४८ साली विकसित देशांमध्ये जकात कर सरासरी ४० टक्क्यांवरून ४ टक्क्यांपेक्षा कमी करण्यात यश मिळविले. ही साधी कामगिरी नव्हती. मागील कोणत्याही फेरीच्या तुलनेत उरुग्वे फेरी सर्वात महत्वाकांक्षी आणि सर्वात जटिल होती. त्यामुळेच ती पूर्ण व्हायला जवळपास १० वर्षे लागली. टॅरिफ (जकात कर) आणि व्यापार उदारीकरणाच्या उद्दिष्टाव्यतिरिक्त, उरुग्वे फेरीचे मुख्य उद्दिष्ट भविष्यातील गरजा पूर्ण करण्यासाठी बहुपक्षीय व्यापार प्रणाली मजबूत करणे हे होते. अशीही भीती होती की टॅरिफ क्षुल्लक पातळीपर्यंत खाली आल्याने, देशांना स्वतःच्या संरक्षणाच्या हेतूंसाठी गैर-शुल्क(गैर-जकात) उपायांचा गैरवापर करण्याचा मोह होऊ शकतो. व्यापाराची नवीन क्षेत्रे खूप वेगाने विकसित होत होती. या कारणांमुळे गॅटने चार दिशांनी बहुपक्षीय व्यापार प्रणाली मजबूत करण्यासाठी उरुग्वे फेरीत प्रस्ताव मांडला. सर्वात महत्वाची बाब म्हणजे संपूर्णपणे गॅट प्रणालीचे कार्य सुधारणे आणि एक संस्था म्हणून गॅट ची एकूण परिणामकारकता वाढवणे. यामुळे सर्व सदस्यांना गॅट नियम बिनशर्त लागू झाले. संरक्षणात्मक कृती सुरू करण्यासाठी एक नवीन संरक्षण करार विकसित केला गेला. सर्वसमावेशक विवाद निपटारा यंत्रणा बसवण्यात आली. अशा प्रकारे गॅट पाठोपाठ, वस्तू आणि सेवा या दोन्हींमधील आंतरराष्ट्रीय व्यापारासाठी – जागतिक व्यापार संघटना (डब्ल्यूटीओ) – ही एक नवीन संस्था तयार करण्यात आली.

**भारत आणि जागतिक व्यापार संघटनेची (World Trade Organization) स्थापना:**

उरुग्वे फेरीच्या वाटाघाटीनुसार, १ जानेवारी १९९५ रोजी डब्ल्यूटीओ ची स्थापना झाली आणि त्याच तारखेपासून उरुग्वे फेरीच्या निकालांची अंमलबजावणी सुरू झाली. भारत सामान्य कराराचा (General Agreement) मूळ स्वाक्षरी करणारा होता त्यामुळे आपोआपच तो डब्ल्यूटीओचा देखील प्रारंभिक सदस्य बनला. तो गॅट चा सक्रिय सदस्य होता आणि त्याने नेहमी विकसनशील देशांच्या हितासाठी काम केले.

**भारत आणि उरुग्वे फेरी:**

उरुग्वे फेरीत भारत विशेषत: त्याच्या राष्ट्रीय हितांवर परिणाम करणाऱ्या क्षेत्रांमध्ये सक्रिय आणि महत्त्वाचा सदस्य होता. त्याने सेवा, बौद्धिक संपदा, सुरक्षितता, सीमाशुल्क मूल्यांकन, कापड आणि इतर काही करारांवर बारकाईने वाटाघाटी केल्या होत्या. इतर गॅट सदस्यांच्या बऱ्याच अयोग्य मागण्यांचा भारताने जोरदार प्रतिकार केला होता. यापैकी बहुतेक करारांमध्ये

भारताच्या आग्रहास्तव काही तरतुदी समाविष्ट किंवा सुधारित केलेल्या आहेत. उरुग्वे फेरीसारख्या मोठ्या उपक्रमात, अंतिम निकालांमध्ये भारताची सर्व मते समाविष्ट करण्यात यश आले नाही, हेही समजण्यासारखे आहे. किंबहुना अमेरिकेसारख्या बलाढ्य आर्थिक महासत्तेलाही अनेकदा भारताने घेतलेल्या भक्कम भूमिकेपुढे तडजोड करावी लागली आहे. प्रत्येक देशाला एका क्षेत्रात काहीतरी मान्य करून इतरत्र काही नफा मिळवायचा होता. उरुग्वे फेरीच्या अंतिम निकालांत सर्व व्यापारी देशांच्या परस्परविरोधी राष्ट्रीय हितसंबंधांचे नाजूक संतुलन प्रतिबिंबित होते. अर्थात, फेरीचे अंतिम निकाल पूर्णपणे दोषरहित नव्हते.

उदाहरणार्थ, बौद्धिक संपदा हक्कांवरील करार समाधानकारक नाही. त्याच्या अंमलबजावणीचा भारताचा अनुभव फारसा आनंददायी नाही. यूएस मधील काही बेईमान उद्योगांनी, करारातील संदिग्धतेचा फायदा घेत तसेच भारताने त्याच्या स्वदेशी उत्पादनांना प्रदान केलेल्या कायदेशीर संरक्षणाच्या अनुपस्थितीत, ('हळदी' सारख्या युगानुयुगे अस्तित्वात असलेल्या) काही स्वदेशी उत्पादनांच्या वापरावर पेटंट अधिकारांचा दावा केला आहे. आणखी एका अमेरिकन 'बायो-पायरेट'ने बासमती तांदळाच्या पेटंट हक्कावर दावा केला होता. बंदिस्त अर्थव्यवस्थेमुळे, भारत भूतकाळात आपल्या बौद्धिक संपदेचे संरक्षण करण्यात फारसा सतर्क नव्हता. अनेक दशकांपासून, पश्चिमेकडील सुपरमार्केट्स अभिमानाने 'शुद्ध दार्जिलिंग चहा' ची पाकिटे श्रीलंकेची उत्पादने म्हणून दाखवत आली होती! त्याचप्रमाणे, काही देश 'बासमती' तांदळाचे मार्केटिंग करत होते ज्यात भारतातील मूळ उत्पादनाशी साधर्म्य नव्हते. मात्र, भारतीय औषध उद्योग हा डब्ल्यूटीओ करार, विशेषतः बौद्धिक संपदा हक्कांवरील कराराच्या विरोधातील आंदोलनात आघाडीवर आहे. परदेशी उत्पादकांच्या ओघाने औषधांच्या देशांतर्गत किमती वाढतील असा दावा त्यात आहे.

**दोहा फेरी:**

डब्ल्यूटीओ ने नोव्हेंबर २००१ मध्ये दोहा, कतार येथे चौथ्या मंत्रिस्तरीय परिषदेत वाटाघाटीची दोहा विकास फेरी सुरू केली. जागतिकीकरणाला अधिक समावेशक बनवण्याचा आणि जगातील गरीबांना, विशेषतः शेतीतील अडथळे आणि अनुदाने कमी करून, मदत करण्याचा हा महत्त्वाकांक्षी प्रयत्न होता. सुरुवातीच्या अजेंड्यात व्यापाराचे आणखी उदारीकरण आणि नवीन नियम बनवणे या दोन्हींचा समावेश होता, ज्यात विकसनशील देशांना भरीव मदत बळकट करण्याच्या वचनबद्धतेने अधोरेखित केले होते. कृषिप्रधान भारतासाठी ही फेरी अत्यंत महत्त्वाची होती.

परंतु काही वाटाघाटी अत्यंत वादग्रस्त ठरल्या आहेत. जुलै २००६ मध्ये गंभीर विषय बनलेल्या कृषी अनुदानासह अनेक महत्त्वाच्या क्षेत्रांवर अजूनही मतभेद सुरू आहेत.

**दोहा करारावर भारताची भूमिका:**

कृषी क्षेत्र हे भारतातील सर्वात असुरक्षित क्षेत्र आहे. देशातील सुमारे ६५० दशलक्ष लोकांची उपजीविका शेतीवर अवलंबून असल्याने, शेतीवरील वाटाघाटींमध्ये भारताचे हित प्रामुख्याने बचावात्मक आहे. भारताचे हितसंबंध हे विकसित देशांमधील अधिकतम अनुदान कमी करण्यात असून ते विकसित देशांकरता आक्षेपार्ह ठरतात.

भारताचे कृषी क्षेत्रातील हितसंबंध हे नेहमीच ग्रामीण भागातील बहुसंख्य शेतजमीन चालवणाऱ्या लाखो लहान शेतकऱ्यांचे रक्षण करण्याच्या गरजेच्या दृष्टीने ठरले आहेत. शेती ही भारताची सामाजिक जडणघडण ठरवते तसेच ती वाणिज्य प्रश्नापेक्षा जीवनाचा मार्ग आणि उपजीविकेचे साधन आहे. याशिवाय, भारतामध्ये २५ कृषी-हवामान झोन (agro-climatic zones) आहेत जे एकीकडे पीक लागवडीला विविधता देतात आणि दुसरीकडे, शेतात पीकबदलाला अत्यंत कठीण बनवतात. कृषी क्षेत्रातील या गुंतागुंती लक्षात घेता, भारताचे शेतीमध्ये मूलत: संरक्षणात्मक हितसंबंध आहेत. भारताचे बंधन दर आणि लागू केलेले कृषी शुल्क (bound rates and applied agricultural tariffs) हे जगातील सर्वोच्च आहेत.

आपले कृषी संकट लक्षात घेऊन, भारताने ठराविक उत्पादनांना 'विशेष उत्पादने' असे जाहीर करून पुरेसे जकात संरक्षण मिळावे म्हणून प्रयत्न केले. मोठ्या प्रमाणावरील रोजगार निर्मिती आणि उपजीविकेच्या समस्यांमुळे भारत व्यापार उदारीकरणासाठी अतिसंवेदनशील आहे अशी कृषी क्षेत्रातील उत्पादने म्हणजे तृणधान्ये, खाद्यतेल आणि तेलबिया तसेच दुग्धजन्य पदार्थ होत. लहान शेतकऱ्यांनी उत्पादित केलेली आणि त्यामुळे भारतासाठी संवेदनशील आहेत अशी इतर कृषी उत्पादने म्हणजे मसाले, आले, ऊस साखर इ. होत. त्यांचे सखोल जकात दर कपातीपासून संरक्षण करणे आवश्यक आहे.

G-३३ चा एक भाग म्हणून, भारताने विकसनशील देशांना एक विशेष सुरक्षा यंत्रणा (Special Safeguard Mechanism-SSM) असण्याच्या गरजेचे जोरदार समर्थन केले आहे जे त्यांना स्वस्त आयातीचा सामना करताना किंवा जेव्हा आयातीत वाढ होते तेव्हा अतिरिक्त शुल्क लादण्याची परवानगी देते. तथापि, विकसित देश आणि काही विकसनशील देशांनी विशेष सुरक्षा यंत्रणेला लागू करण्यासाठी अत्यंत प्रतिबंधात्मक निकष लागू करण्याचा प्रयत्न केला आहे, ज्यामुळे हे साधन अप्रभावी ठरेल.

जोपर्यंत शेतीचा संबंध आहे, तिथे एकूणच भारताच्या वाटाघाटींच्या भूमिकेत कोणताही मोठा बदल झालेला दिसत नाही. कृषी उत्पादनांवर सखोल दर कपात करण्यास भारताने ठामपणे विरोध केला आहे. त्याच वेळी, भारत विकसित देशांना त्यांच्या शेतातील अनुदान कमी करण्यासाठी आक्रमकपणे दबाव टाकत आहे. तथापि, G२० चा एक भाग म्हणून त्याने ग्रीन बॉक्स आणि ब्लू बॉक्स सबसिडी (उत्पादन मर्यादित करण्यासाठी दिलेले अनुदान) यावरील आपली भूमिका सौम्य केली आहे. २००३ मध्ये कॅनकुन मंत्रीस्तरीय बैठकीत, G२० ने ग्रीन बॉक्स अनुदानावर मर्यादा मागितली होती आणि ब्लू बॉक्स अनुदानाचा कोणताही विस्तार नाकारला होता. तथापि, २००४ जुलै ची संरचना पूर्ण होईपर्यंत या दोन्ही मागण्या सोडून दिल्या आहेत. त्याचप्रमाणे शेतकरी संघटना आणि स्वयंसेवी संस्थांसारख्या भागधारकांनी वारंवार केलेली मागणी म्हणजे कृषी आयातीवर परिमाणवाचक निर्बंध लागू करण्याचा अधिकार मिळविण्यात भारताने कोणतीही प्रगती केलेली दिसत नाही.

भारताची वाटाघाटीची रणनीती बचावात्मक असली तरी, सर्वसाधारणपणे, अशी अनेक उत्पादने आहेत ज्यात त्याचे निर्यातीचे हित असू शकते. यामध्ये तृणधान्ये, मांस, दुग्धजन्य पदार्थ, काही फलोत्पादन उत्पादने आणि साखर यांचा समावेश आहे, जे दर कपातीसह निर्यात संधींमध्ये वाढ पाहू शकतात. भारताच्या वाटाघाटी धोरणाने गेल्या काही वर्षांमध्ये

munotes.in

लक्षणीय वाढ पाहणाऱ्या अन्न-धान्य प्रक्रिया क्षेत्रातील निर्यातीच्या संधीचीही जाणीव ठेवली पाहिजे.

### ४.२.२. मुक्त व्यापार करार (Free Trade Agreement- FTA):

मुक्त व्यापार करार किंवा FTA हा राष्ट्रे किंवा प्रादेशिक गट यांच्यातील व्यापारातील अडथळे कमी किंवा दूर करणारा तसेच परस्पर वाटाघाटीतून व्यापार वाढवण्याचा दृष्टिकोन बाळगणारा करार आहे. तो वस्तू, सेवा, गुंतवणूक, बौद्धिक संपदा, स्पर्धा, सरकारी खरेदी आणि इतर क्षेत्रे या सर्वांच्याच व्यापारास लागू होऊ शकतो. या करारामार्फत वस्तूंच्या व्यापारासंदर्भात असणारे अडथळे म्हणजे सीमाशुल्क किंवा दर, मूळ नियम, नॉन-टेरिफ (बिना-जकात); तर सेवा-व्यापारासंदर्भात असणारे देशांतर्गत नियमांसह पुरवठ्याच्या विविध पद्धतींमधील अडथळे यांवर मार्ग काढला जातो. व्यापार करार हे द्विपक्षीय किंवा बहुपक्षीय असू शकतात. डब्ल्यूटीओच्या आकडेवारीनुसार, १५ जून २०२१ पर्यंत ३४९ व्यापार करार अंमलात आहेत. प्रत्येक डब्ल्यूटीओ सदस्याने किमान एक व्यापार करार केलेला आहे.

**या करारांची मूळ उद्दिष्टे म्हणजे-**

१. व्यापारातील अडथळे दूर करणे २. सदस्य देशांच्या प्रदेशांमधील मालाची सीमापार वाहतूक सुलभ करणे ३. मुक्त व्यापार क्षेत्रात निष्पक्ष स्पर्धेच्या परिस्थितीला प्रोत्साहन देण्यासाठी आणि सर्व सदस्यांना समान लाभ सुनिश्चित करण्यासाठी, त्यांचे संबंधित स्तर आणि आर्थिक विकासाचे स्वरूप लक्षात घेऊन, कराराच्या अंमलबजावणीसाठी प्रभावी यंत्रणा तयार करणे ४. या करारांचे परस्पर फायद्यांचा विस्तार आणि वाढ करण्यासाठी पुढील प्रादेशिक सहकार्यासाठी एक संरचना स्थापित करणे.

**भारत आणि मुक्त व्यापार करार:**

भारताने ११ मुक्त व्यापार करार (FTA) आणि ६ प्राधान्य व्यापार करार (PTA) वर स्वाक्षरी केली आहे. भारतीय संदर्भात, मुक्त व्यापार करार आणि प्राधान्य व्यापार करार दरम्यान मुख्य फरक हा आहे की मुक्त व्यापार करार सर्वसमावेशक आहे तर प्राधान्य व्यापार करार वस्तूंच्या व्यापारापुरते मर्यादित आहे आणि तो केवळ टॅरिफ निर्मूलनाचा प्रयत्न करतो. या करारांतून भारतास होणारे लाभ म्हणजे:

१. निर्यात बाजाराचे विविधीकरण आणि विस्तार

२. कच्चा माल, मध्यम उत्पादने आणि भांडवली वस्तू यांची निवडकपणे स्वस्त उपलब्धी

३. भारताच्या सेवासंदर्भात हिताच्या असलेल्या क्षेत्रांमध्ये प्रवेश

४. उत्पादनाला चालना देण्यासाठी परदेशी गुंतवणूक आकर्षित करणे, रोजगार निर्मिती आणि स्पर्धात्मकता सुधारणे

५. भौगोलिक राजकीय रणनीती जसे की "ॲक्ट ईस्ट" यांना मूर्त स्वरूप देणे. उदा. आसियान, जपान आणि कोरियासह झालेले मुक्त व्यापार करार

भारताने स्वाक्षरी केलेले महत्त्वाचे मुक्त व्यापार करार हे पुढीलप्रमाणे:

### १. भारत-आसियान सर्वसमावेशक आर्थिक सहकार्य करार:

आसियान-भारत मुक्त व्यापार क्षेत्र हे दक्षिणपूर्व आशियाई राष्ट्रांच्या संघटनेचे दहा सदस्य देश आणि भारत यांच्यामधील मुक्त व्यापार क्षेत्र आहे. नोव्हेंबर २००२ मध्ये कंबोडिया येथे झालेल्या पहिल्या आसियान-भारत शिखर परिषदेत द्विपक्षीय व्यापाराच्या मुद्द्यावर चर्चा झाली. ८ ऑक्टोबर २००३ रोजी बाली, इंडोनेशिया येथे येथे झालेल्या दुसऱ्या भारत-आसियान शिखर परिषदेत या कल्पनेवर अधिक चर्चा झाली व प्रारंभिक करारावर स्वाक्षरी करण्यात आली आणि अंतिम करार १३ ऑगस्ट २००९ रोजी झाला. विनामूल्य व्यापार क्षेत्र १ जानेवारी २०१० रोजी लागू झाले परंतु ते केवळ वस्तूंपुरते मर्यादित होते. त्यानंतर, सेवा आणि गुंतवणुकीवर भारत आसियान करारावर नोव्हेंबर, २०१४ मध्ये स्वाक्षरी झाली व १ जुलै २०१५ रोजी तो अंमलात आला. हा करार आता भारत-आसियान सर्वसमावेशक आर्थिक सहकार्य करार (IACECA) म्हणून ओळखले जातो.

२०१० मध्ये भारत-आसियान सीईसीएच्या अंमलबजावणीनंतर, २०१० मध्ये भारत आणि आसियान राष्ट्रांमधील ५२.६ अब्ज युएस डॉलर्स चा व्यापार २०१६ मध्ये ६४.६ अब्ज युएस डॉलर्स झाला. आसियान मध्ये भारताची निर्यात २०१३ मध्ये ३७.८९ अब्ज युएस डॉलर्स वरून २६.३८ अब्ज युएस डॉलर्सवर घसरली. मात्र याच कालावधीत भारताच्या आयातीत ४२.३१ बिलियन युएस डॉलर्स वरून ३८.२२ बिलियन युएस डॉलर्स इतकी घटदेखील झाली आहे.

### २. सार्क प्राधान्य व्यापार व्यवस्था करार (SAPTA):

हा करार म्हणजे सार्कच्या सात सदस्यांमध्ये प्राधान्य व्यापार क्षेत्र निर्माण करण्यासाठी झाला होता. सार्कची सदस्य राष्ट्रे म्हणजे बांगलादेश, भूतान, भारत, मालदीव, नेपाळ, पाकिस्तान आणि श्रीलंका यांच्यात ११ एप्रिल १९९३ मध्ये ढाका येथे करार झाला होता व तो ७ डिसेंबर १९९५ रोजी लागू करण्यात आला.

### ३. दक्षिण आशियाई मुक्त व्यापार करार (SAFTA):

दक्षिण आशियाई मुक्त व्यापार करार (SAFTA) हा सार्क सदस्यांमधील मुक्त व्यापार करार २००६ मध्ये लागू झाला आणि त्यानंतर व्यापार उदारीकरण प्रक्रिया सुरू झाली. साफ्टाने २००७ पर्यंत पहिल्या टप्प्यात २० टक्क्यांपर्यंत दर कपात करण्यास प्रवृत्त केले आणि त्यानंतर २०१२ पर्यंत भारत, पाकिस्तान आणि श्रीलंकेच्या बाबतीत वार्षिक आधारावर दुसऱ्या टप्प्यात शून्य केले. उर्वरित सदस्यांना शुल्क कमी करण्यासाठी तीन वर्षांचा अतिरिक्त कालावधी देण्यात आला होता. उत्पादनांवरील निर्बंध, अनेक सवलती आणि मूळच्या मर्यादित नियमांमुळे साफ्टा आत्मविश्वास मिळवू शकला नसल्यामुळे उच्च आंतरक्षेत्रीय व्यापारात दर कपात करता आली नाही. सदस्यांमध्ये अफगाणिस्तान, बांगलादेश, भूतान, भारत, नेपाळ, श्रीलंका, पाकिस्तान आणि मालदीव यांचा समावेश आहे.

२००६ मध्ये दक्षिण आशियाई मुक्त व्यापार कराराच्या अंमलबजावणीनंतर, इतर सार्क सदस्यांना भारताची निर्यात २००६ मधील ६.२३ अब्ज युएस डॉलर्स वरून

२०१६ मध्ये १६.९३ अब्ज युएस डॉलर्स इतकी वाढली आहे. २०१५ मध्ये सार्क प्रदेशातील सर्व सार्क सदस्यांमधील एकूण निर्यातीमध्ये भारताचा वाटा सुमारे ८३ टक्के होता, तर एकूण आयातीत तो सुमारे १५ टक्के होता. सार्क प्रदेशातील सर्व सार्क सदस्यांमधील निर्यातीसाठी भारताचा चक्रवाढ वार्षिक वाढीचा दर देखील गेल्या दशकात (२००६ ते २०१५) सर्वाधिक ११.९८ टक्के नोंदवला गेला.

**४. भारत- आशिया पॅसिफिक व्यापार करार (APTA) किंवा बँकॉक करार:**

APTA किंवा बँकॉक करार १९७६ मध्ये लागू झाला. सदस्यांमध्ये बांगलादेश, भारत, लाओस, चीन, मंगोलिया, दक्षिण कोरिया आणि श्रीलंका यांचा समावेश आहे. आशिया-पॅसिफिक क्षेत्रातील देशांमधील हा सर्वात जुना प्राधान्य व्यापार करार आहे. व्यापार आणि गुंतवणुकीचे उदारीकरण उपाय निवडणाऱ्या सहा सहभागी राज्यांमध्ये आर्थिक विकासाला गती देणे हे आप्टाचे मुख्य उद्दिष्ट आहे जे आंतर-प्रादेशिक व्यापार आणि व्यापारी वस्तू आणि सेवांच्या कव्हरेजद्वारे आर्थिक बळकटीकरणासाठी योगदान देतील. व्यापार उदारीकरण उपायांचा अवलंब करून आर्थिक विकास आणि सहकार्याला चालना देणे हे त्याचे उद्दिष्ट आहे.

२००१ मध्ये, भारताचा आप्टा सदस्यांसोबतचा व्यापार सुमारे ३ अब्ज युएस डॉलर्स इतका संतुलित स्थितीत राहिला. तेव्हापासून, भारताच्या आयातीत अचानक वाढ होऊन ती २०१६ मध्ये ७४.१८ अब्ज युएस डॉलर्स इतकी झाली. याउलट, भारतातून होणारी निर्यात मंद गतीने वाढून २२.१९ अब्ज युएस डॉलर्स इतकी झाली. २००१ पासून इतर आप्टा सदस्यांच्या बाजूने व्यापारातील अंतर झपाट्याने वाढले आहे.

**५. भारत-मर्कोसुर (MERCOSUR) प्राधान्य व्यापार करार (Preference Trade Agreement):**

MERCOSUR हा दक्षिण अमेरिका प्रदेशातील ब्राझील, अर्जेंटिना, उरुग्वे आणि पॅराग्वे यांचा समावेश असलेला व्यापारी गट आहे. पॅराग्वे येथे २००३ मध्ये भारत आणि मर्कोसुर यांच्यात फ्रेमवर्क करारावर स्वाक्षरी करण्यात आली. फ्रेमवर्क कराराचा पाठपुरावा म्हणून, २००४ मध्ये नवी दिल्ली येथे एक प्राधान्य व्यापार करार (PTA) स्वाक्षरी करण्यात आला. अखेरीस, २००९ मध्ये हा करार लागू झाला. या प्राधान्य व्यापार कराराचे उद्दिष्ट त्यांच्यातील विद्यमान संबंधांचा विस्तार करणे आणि ते मजबूत करणे हे होते. मर्कोसुर आणि भारत आणि दोन गटांमध्ये मुक्त व्यापार क्षेत्र निर्माण करण्याच्या अंतिम उद्देशाने परस्पर निश्चित दर प्राधान्ये देऊन व्यापाराच्या विस्तारास प्रोत्साहन देतात.

२००९ मध्ये भारत-मर्कोसुर पीटीए लागू झाल्यानंतर, व्यापाराचा विस्तार चांगल्या गतीने झाला. व्यापार २००९ मध्ये ७.६५ बिलियन युएस डॉलर्स वरून २०१४ मध्ये २९.०२ बिलियन युएस डॉलर्स झाला. तथापि, पुढील दोन वर्षांच्या कालावधीत व्यापार १४.६ बिलियन युएस डॉलर्सवर घसरल्याने पुनर्प्राप्तीचा भाग चालू शकला नाही. भारताची निर्यात २००९ मध्ये २.३१ बिलियन युएस डॉलर्सवरून २०१६

munotes.in

मध्ये ३.१४ बिलियन युएस डॉलर्स इतकी झाली तर भारताची आयात त्याच कालावधीत ५.३४ बिलियन युएस डॉलर्सवरून ११.४६ बिलियन युएस डॉलर्स झाली. व्यापार अधिशेष मर्कोसुर राष्ट्रांच्या बाजूने राहिला आहे.

**६. भारत-अफगाणिस्तान प्राधान्य व्यापार करार:**

भारत आणि अफगाणिस्तान यांनी मार्च २००३ मध्ये प्राधान्य व्यापार करारावर स्वाक्षरी केली ज्या अंतर्गत भारताने अफगाण सुक्या मेव्याच्या विशिष्ट श्रेणी ५०% ते १००% पर्यंत भरीव शुल्क सवलती दिल्या. या बदल्यात अफगाणिस्तानने चहा, साखर, सिमेंट आणि फार्मास्युटिकल्ससह भारतीय उत्पादनांना परस्पर सवलतींना परवानगी दिली आहे. नोव्हेंबर २०११ मध्ये, भारताने माले येथील सार्क शिखर परिषदेत सर्व सार्क विकसनशील राष्ट्रांसाठी मूलभूत सीमा शुल्क काढून टाकले ज्याने अफगाणिस्तानच्या सर्व उत्पादनांना (दारू आणि तंबाखू वगळता) भारतीय बाजारपेठेत शुल्कमुक्त प्रवेश दिला.

२००३ मध्ये भारत-अफगाणिस्तान पीटीए लागू झाल्यापासून, दोन राष्ट्रांमधील व्यापार २००३ मध्ये ६७.५ दशलक्ष युएस डॉलर्सवरून २०१६ मध्ये ७५५.२९ दशलक्ष युएस डॉलर्स इतका वाढला. याच कालावधीत भारतातील निर्यात ५०.११ दशलक्ष युएस डॉलर्स वरून ४७३ दशलक्ष युएस डॉलर्सपर्यंत वाढली. विशेष म्हणजे, अफगाणिस्तानने एकूण व्यापारातील आपला हिस्सा २००३ मधील २५% वरून २०१६ मध्ये ३८% पर्यंत वाढविण्यात यश मिळवले आहे.

**७. भारत-जपान सर्वसमावेशक आर्थिक भागीदारी करार (CEPA):**

भारत-जपान सर्वसमावेशक आर्थिक भागीदारी करार (CEPA) १ ऑगस्ट २०११ रोजी अंमलात आला आणि हा भारताने आतापर्यंत कोणत्याही देशासोबत केलेला सर्वात व्यापक मुक्त व्यापार करार आहे. त्यात वस्तूंमधील व्यापार, सेवा आणि गुंतवणुकीतील व्यापाराचे उदारीकरण आणि अनेक ओळखल्या गेलेल्या क्षेत्रांमध्ये सहकार्य लागू करण्यासाठी कराराचा समावेश आहे. २०११ मध्ये भारत-जपान CEPA लागू झाल्यापासून, भारत आणि जपानमधील व्यापार २०११ मध्ये १६.८१ बिलियन युएस डॉलर्सवरून २०१६ मध्ये १३.६४ बिलियन युएस डॉलर्सपर्यंत कमी झाला आहे. २०१२ पर्यंत वाढत्या ट्रेंड व्यतिरिक्त, दोन्ही राष्ट्रांमधील व्यापार सातत्याने घसरला आहे. २०११ मधील ५.५९ बिलियन युएस डॉलर्सच्या तुलनेत २०१६ मध्ये भारताची जपानला होणारी निर्यात ३.८३ बिलियन युएस डॉलर्सवर घसरली. त्याच काळात जपानमधून भारताची आयात ११.२२ बिलियन युएस डॉलर्सवरून ९.८१ बिलियन युएस डॉलर्सवर घसरली.

**८. भारत-सिंगापूर सर्वसमावेशक आर्थिक सहकार्य करार (CECA):**

सर्वसमावेशक आर्थिक सहकार्य करार (CECA) हा द्विपक्षीय व्यापार मजबूत करण्यासाठी सिंगापूर आणि भारत यांच्यातील मुक्त व्यापार करार आहे. २९ जून २००५ रोजी त्यावर स्वाक्षरी झाली.

२००५ मध्ये भारत आणि सिंगापूर दरम्यान CECA ची अंमलबजावणी झाल्यापासून, भारताच्या सिंगापूरसोबतच्या व्यापारात सकारात्मक बदल झाला आहे. करारानंतरच्या कालावधीत दोन राष्ट्रांमधील व्यापार ० - ५ अब्ज युएस डॉलर्सवरून ५-२२ अब्ज युएस डॉलर्स पर्यंत बदलला आहे. अलीकडच्या काळात, २०११ मध्ये भारताची सिंगापूरला होणारी निर्यात ११ अब्ज युएस डॉलर्स इतकी वाढली, तथापि, तेव्हापासून २०१६ मध्ये भारताची सिंगापूरला होणारी निर्यात सातत्याने घटून १४.०७ अब्ज युएस डॉलर्स इतकी झाली. आयातीच्या आघाडीवर, भारताने २०१६ मध्ये सिंगापूरमधून ६.७२ बिलियन युएस डॉलर्सची आयात केली.

### ९. भारत-दक्षिण कोरिया सर्वसमावेशक आर्थिक भागीदारी करार (CEPA):

सर्वसमावेशक आर्थिक भागीदारी करार (CEPA) हा भारत आणि दक्षिण कोरिया यांच्यातील मुक्त व्यापार करार आहे. या करारावर २००९ मध्ये स्वाक्षरी करण्यात आली आणि २०१० मध्ये त्याची अंमलबजावणी झाली. २०१० मध्ये भारत-दक्षिण कोरिया सीईपीए लागू झाल्यापासून, दोन्ही राष्ट्रांमधील व्यापार विशेषतः आणि दक्षिण कोरियाच्या बाजूने विस्तारला आहे. भारत आणि दक्षिण कोरिया यांच्यातील व्यापार २०१० मध्ये १३.५६ अब्ज युएस डॉलर्सवरून २०१६ मध्ये १६ अब्ज युएस डॉलर्सपर्यंत वाढला आहे. तर भारताची दक्षिण कोरियाला होणारी निर्यात २०१० मध्ये ३.६३ बिलियन युएस डॉलर्सवरून २०१६ मध्ये ३.४७ बिलियन युएस डॉलर्सपर्यंत घसरली आहे. दुसरीकडे, भारताची आयात दक्षिण कोरियाकडून, CEPA नंतर, २०१० मध्ये ९.९२ अब्ज युएस डॉलर्सवरून २०१६ मध्ये १२.२१ अब्ज युएस डॉलर्सपर्यंत वाढली आहे.

### १०. भारत-संयुक्त अरब अमिराती सर्वसमावेशक आर्थिक सहकार्य करार (CECA) आणि भारत-ऑस्ट्रेलिया आर्थिक सहकार्य आणि व्यापार करार (ECTA):

याशिवाय नुकताच २०२२ साली भारताने संयुक्त अरब अमिराती (UAE) सोबत सर्वसमावेशक आर्थिक सहकार्य करार (CECA) आणि ऑस्ट्रेलियासोबत आर्थिक सहकार्य आणि व्यापार करार (ECTA) केला आहे.

### ११. भारत-युरोपियन युनियन (EU):

युरोपियन युनियन हा भारताचा अमेरिका आणि चीन नंतर तिसरा सर्वात मोठा व्यापार भागीदार जरी असला तरी दोघांमध्ये अजून मुक्त व्यापार करार झालेला नाही. २७ सदस्य राष्ट्रे असलेल्या युरोपियन युनियन सोबत भारताचा सर्वसमावेशक आर्थिक सहकार्य करार व्हावा म्हणून जून २००७ मध्ये वाटाघाटी सुरू झाल्या होत्या. परंतु २०१३ मध्ये चर्चा थांबली कारण दोन्ही पक्षांमध्ये बौद्धिक संपदा अधिकार, ऑटोमोबाईल्स आणि स्पिरिटवरील जकात आणि व्यावसायिकांची ये-जा या महत्त्वाच्या मुद्द्यांवर सहमत होऊ शकले नाही. दोन्ही बाजूंनी २०२१ साली पुन्हा वाटाघाटी सुरू करण्याचा निर्णय घेतला. २०२२ मध्ये झालेल्या बैठकीत दोन्ही बाजूंनी व्यापार आणि तंत्रज्ञान परिषद स्थापन करण्यावर सहमती दर्शवली जी भारत आणि युरोपीय संघाला व्यापार, विश्वासार्ह तंत्रज्ञान आणि सुरक्षा या क्षेत्रातील

munotes.in

आव्हानांना सामोरे जाण्याची परवानगी देईल आणि या क्षेत्रात सहकार्य वाढवेल. युरोपीय संघासोबत समान करार असलेला अमेरिका हा एकमेव दुसरा देश आहे.

भारत आणि युरोपीय संघ यांनी २०२३ च्या उत्तरार्धात किंवा २०२४ च्या सुरुवातीला हा मुक्त व्यापार करार पूर्ण करण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे. १.७ अब्ज लोकांच्या जीवनाला स्पर्श करणारा हा सर्वात महत्त्वाचा व्यापार करार असेल.

याशिवाय इंग्लंड आणि कॅनडा सोबत देखील मुक्त व्यापार करारासाठीच्या वाटाघाटी सुरु आहेत. अमेरिकेसोबत मात्र भारताचा अजूनपर्यंत एकही मुक्त व्यापार करार झालेला नाही. किंबहुना युनायटेड स्टेट्स आणि भारत हे त्यांनी वाटाघाटी करण्यास मदत केली अशा प्रत्येक प्रमुख प्रादेशिक व्यापार करारापासून अनुपस्थित आहेत, ते म्हणजे- व्यापक आणि प्रगतीशील ट्रान्स-पॅसिफिक भागीदारी करार (CPTPP) आणि प्रादेशिक व्यापक आर्थिक भागीदारी (RCEP).

## ४.३ ऊर्जा सुरक्षा आणि सागरी सुरक्षेचा शोध

### ४.३.१ भारताची ऊर्जा सुरक्षा:

आर्थिक परिवर्तन, जागतिक समृद्धी आणि मानव जातीच्या कल्याणासाठी ऊर्जा सुरक्षा महत्त्वपूर्ण आहे. त्यातही ऊर्जा सुरक्षा ही विकसित देशांपेक्षा विकसनशील देशांसाठी अधिक महत्त्वाची आहे. गेल्या ४० वर्षात जगातील ऊर्जेची मागणी ९५% ने वाढली आहे आणि भविष्यातील मागणी, ९०% पेक्षा जास्त असेल असा अंदाज आहे, याचे कारण भारत आणि चीनच्या ऊर्जा मागणीत प्रचंड वाढ झाली आहे. ही संसाधने मर्यादित आहेत आणि ऊर्जा पुरवठा व आर्थिक वाढ यांच्यातील थेट संबंधांमुळे भू-राजनीतीवर लक्षणीय परिणाम होऊन ऊर्जा सुरक्षेचा मुद्दा धोरणात्मक चर्चेच्या केंद्रस्थानी आहे.

भारत, ही सर्वात वेगाने वाढणारी प्रमुख अर्थव्यवस्थांपैकी एक असून जगातील सर्वात वेगाने वाढणारी ऊर्जा ग्राहक देखील आहे. सर्वात जास्त लोकसंख्या असलेले राष्ट्र बनण्याच्या मार्गावर असलेला भारत ऊर्जा साठ्याने संपन्न नाही. भारतासमोर आर्थिक आणि सामाजिक विकासाची उद्दिष्टे पूर्ण करण्याचे आणि लाखो लोकांना गरिबीतून बाहेर काढण्याचे एक मोठे आव्हान आहे. हे साध्य करण्यासाठी देशाला ८ ते १० टक्के शाश्वत विकास दरासाठी प्रयत्न करण्याशिवाय पर्याय नाही. भारताची अर्थव्यवस्था नजीकच्या भविष्यात जगातील इतर सर्व प्रमुख अर्थव्यवस्थांच्या विकास दराला मागे टाकत राहील. परिणामी, गेल्या दीड दशकात ऊर्जा सुरक्षा ही प्रमुख धोरणात्मक समस्यांपैकी एक म्हणून उदयास आली आहे आणि त्यानंतरच्या प्रत्येक भारतीय सरकारांनी भविष्यात येऊ घातलेल्या ऊर्जा संकटाच्या आव्हानांना तोंड देण्यावर भर दिला आहे.

गेल्या दोन दशकांमध्ये, भारताचे ऊर्जा सुरक्षा धोरण विकसित झाले आहे आणि त्या संदर्भातील दृष्टीकोन अधिक समावेशक आहे जो आज आंतरराष्ट्रीय स्तरावर ऊर्जा सुरक्षा धोरणाचा पाठपुरावा करत असलेल्या राजकीय, आर्थिक, सामाजिक आणि पर्यावरणीय समस्या आणि चिंता विचारात घेतो. ऊर्जा सुरक्षेसाठी भारताचा शोध चार 'A' च्या चौकटीत दिसू शकतो: उपलब्धता (Availability), प्रवेश योग्यता (Accessibility), परवडण्यायोग्य

munotes.in

(Affordability) आणि स्वीकार्यता (Acceptability), म्हणजेच सामाजिक आणि राजकीयदृष्ट्या स्वीकारार्ह कार्बन-नियंत्रित वातावरणात परवडणाऱ्या किमतीत सर्व विभाग आणि क्षेत्रांना ऊर्जा उपलब्ध करून देणे.

भारताच्या ५०% पेक्षा जास्त ऊर्जेची गरज देशांतर्गत कोळशाच्या साठ्यातून, मुख्यत्वेकरून विजेसाठी होते. कोळसा हा भारताचा सर्वात महत्त्वाचा ऊर्जास्रोत राहील आणि पुढील दशकांसाठी त्याच्या वाढीसाठी महत्त्वाचा असेल. तथापि, भारताच्या ऊर्जा मिश्रणातील कोळशाची टक्केवारी भविष्यात कमी होईल. जगाच्या १७% लोकसंख्येसह भारताकडे जगातील ज्ञात तेल आणि नैसर्गिक वायू संसाधनांपैकी फक्त ०.८% आहे. आज, देशातील प्राथमिक ऊर्जा वापरापैकी ३६% वाटा तेलाचा आहे. हा आकडा निरपेक्ष आणि टक्केवारी अशा दोन्ही प्रकारे वाढणार आहे. भारताचे देशांतर्गत उत्पादन ही त्याची ऊर्जा मागणी पूर्ण करण्यासाठी पुरेसे नाही. परिणामी, भारत आपल्या कच्च्या तेलाच्या गरजेपैकी ८०% आधीच आयात करतो. नवीन देशांतर्गत तेलसाठ्यांच्या शोधांशिवाय ही आयात वाढतच जाईल. याउलट, नैसर्गिक वायू सध्या भारताच्या प्राथमिक ऊर्जा पुरवठ्यापैकी केवळ ८% पुरवतो आणि त्यातील बहुतांश वायू देशांतर्गत स्त्रोतांकडून, किनाऱ्यावरील आणि किनाऱ्यापासून काही अंतरावरील स्त्रोतांकडून येतो.

केवळ देशांतर्गत वाढलेले उत्पादन तेल, वायू किंवा कोळशाच्या अंदाजित गरजा पूर्ण करण्यासाठी पुरेसे नसल्यामुळे, भारत परदेशातही आपले प्रयत्न वाढवत आहे. अखेरीस, यामुळे ऊर्जा सुरक्षा ही सर्वोच्च परराष्ट्र धोरणातील अग्रक्रमांपैकी एक बनली आहे.

एकूणच, असे मानले जाते की भारताची ऊर्जा सुरक्षा या मार्गांनी वाढवता येईल : अ) ऊर्जा मिश्रण आणि ऊर्जा आयातीचे स्रोत या दोन्हींमध्ये विविधता आणून वाढवणे ; ब) ऊर्जा मालमत्तेच्या विदेशी अधिग्रहणाचा गांभीर्याने पाठपुरावा करणे; आणि क) विदेशी गुंतवणूक आकर्षित करण्यासाठी तसेच देशांतर्गत उत्पादन, वितरण आणि वापर सुधारण्यासाठी धोरणात्मक सुधारणा सुरू करणे.

**ऊर्जा सुरक्षा: देशबाह्य प्रयत्न-**

जागतिक हवामान बदल आणि जगातील ऊर्जा समृद्ध प्रदेशांमधील राजकीय अस्थिरता या वाढत्या चिंतेमुळे भारताचा ऊर्जा सुरक्षा शोध अधिक आव्हानात्मक बनला आहे. भारत आपल्या ऊर्जा स्त्रोतांसाठी प्रामुख्याने कोळसा आणि पेट्रोलियमवर अवलंबून आहे. नवीकरणीय ऊर्जा स्त्रोतांकडे भारताची वाटचाल तसेच देशांतर्गत ऊर्जा स्त्रोत तिच्या वाढत्या ऊर्जेच्या मागणीसाठी पुरेशी ठरणार नाही. भारताला कमी कार्बन उत्सर्जन असलेल्या उर्जा स्त्रोतांकडे लक्ष द्यावे लागेल. या संदर्भात, नैसर्गिक वायू आणि अणुऊर्जा लक्षणीय आहे. नैसर्गिक वायू हा कमी कार्बन उत्सर्जित करणारा ऊर्जेचा स्रोत आहे. भारताचा गॅस वापर जागतिक सरासरीपेक्षा खूपच कमी आहे. मोदी सरकारनेही गॅसचा वापर वाढवून गॅस आधारित अर्थव्यवस्थेकडे वाटचाल करण्यास प्राधान्य दिले आहे. भारत आपल्या शेजारील राष्ट्रांकडून गॅस आयात करण्यासाठी गॅस पाइपलाइन टाकण्याची योजना आखत आहे. अनेक गॅस पाइपलाइन प्रस्तावित आहेत आणि त्या बांधकामाच्या टप्प्यात आहेत. त्यापैकी बहुतेकांमध्ये तीव्र भू-राजकारणाचा समावेश आहे कारण काही प्रस्तावित गॅस पाइपलाइन

पाकिस्तान आणि चीनमधून जाणार आहेत. यांपैकी काही महत्त्वाचे गॅस पाइपलाइन प्रस्ताव पुढीलप्रमाणे आहेत.

**१. तापी पाईपलाईन** (TAPI):

२००२ पासून ७,६०० दशलक्ष युएस डॉलर्स किमतीच्या तुर्कमेनिस्तान अफगाणिस्तान-पाकिस्तान-भारत (TAPI) गॅस पाइपलाइन वर बरीच चर्चा झाली आहे. तुर्कमेनिस्तानमधील वायू साठा, अफगाणिस्तानमधील सुरक्षा परिस्थिती आणि भारत आणि पाकिस्तानमधील स्थानिक तणावपूर्ण संबंधांवर काही अनिश्चितता निर्माण झाली आहे. तरीही सर्व पक्ष या प्रस्तावावर गांभीर्याने विचार करत आहेत. ही १,६८० किमी लांबीची पाइपलाइन तुर्कमेनिस्तानमधील दौलताबाद गॅस फील्डपासून अफगाणिस्तानपर्यंत धावेल, तेथून हेरात ते कंदाहार आणि नंतर पाकिस्तानमधील क्वेटा आणि मुलतानमार्गे महामार्गाच्या बाजूने बांधली जाईल. पाइपलाइनचे अंतिम गंतव्य भारतीय पंजाबमधील फाजिल्का हे असेल. यापूर्वी निरीक्षक म्हणून सहभागी झालेल्या भारताला २००६ मध्ये या प्रकल्पात सामील होण्यासाठी औपचारिकपणे आमंत्रित करण्यात आले होते. मे २००६ मध्ये भारत सरकारने अधिकृतपणे तापी प्रकल्पातील सहभागास मान्यता दिली आणि पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू मंत्रालयाला प्रकल्पात सामील होण्यासाठी औपचारिक विनंती करण्यास अधिकृत केले. एप्रिल २००८ मध्ये अफगाणिस्तान, भारत आणि पाकिस्तान यांनी तुर्कमेनिस्तानकडून गॅस खरेदी करण्यासाठी फ्रेमवर्क करारावर स्वाक्षरी केली. सहभागी देशांनी अफगाणिस्तान आणि पाकिस्तानला पारगमनाची देयके, कर आकारणी च्या मुद्द्यांवर लवकरच चर्चा करण्याची योजना आखली. गेल्या काही वर्षांपासून, अफगाणिस्तानच्या पुनर्बांधणीवरील जवळपास प्रत्येक महत्त्वाच्या बैठकीत तापी वर चर्चाही झाली आहे.

२०१२ मध्ये भारत आणि अफगाणिस्तान तसेच भारत आणि पाकिस्तान त्यांच्या हद्दीतून जाणाऱ्या गॅसच्या ट्रान्झिट फीवर सहमती दर्शवू शकले नसल्याने बांधकाम पुन्हा खंडित झाले होते. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी त्यांच्या रशिया आणि मध्य आशियाई देशांच्या दौऱ्यात ११ जुलै २०१५ रोजी तुर्कमेनिस्तानच्या राजधानीत तुर्कमेनिस्तानचे अध्यक्ष गुरबांगुली बर्डीमुखम्मेदोव्ह यांची भेट घेतली आणि $१० अब्ज डॉलरच्या तापी गॅस पाइपलाइन प्रकल्पाच्या लवकर अंमलबजावणीसाठी आग्रह धरला. तुर्कमेनिस्तानमध्ये पाइपलाइनचे बांधकाम अखेर २०१५ मध्ये सुरू झाले आणि २०१९ च्या मध्यापर्यंत पूर्ण झाले. १६ ट्रिलियन घनफूट गॅसचा साठा असलेल्या तुर्कमेनिस्तानच्या गॅल्कीनिश क्षेत्रातून गॅस वाहून नेला जाईल. एका संयुक्त निवेदनात TAPI प्रकल्पाला दोन्ही देशांमधील आर्थिक गुंतवणुकीचा "मुख्य स्तंभ" असे संबोधण्यात आले आहे आणि दोन्ही नेत्यांनी हे मान्य केले आहे की त्याच्या अंमलबजावणीचा व्यापारावर परिवर्तनीय प्रभाव पडेल.

मात्र, अफगाणिस्तानमधील काम फेब्रुवारी २०१८ मध्ये सुरू झाले असले तरी, अफगाण सरकार आणि तालिबान यांच्यातील लढाईमुळे ते पुन्हा स्थगित करण्यात

आले. १५ ऑगस्ट २०२१ रोजी तालिबानने देशावर नियंत्रण प्रस्थापित केल्यानंतर, त्यांनी ऑक्टोबरमध्ये लवकरच प्रकल्प पुन्हा सुरू करण्याचे आश्वासन दिले आहे.

## २. इराण-पाकिस्तान-भारत पाईपलाईन (IPI):

अनेक अडथळे असूनही, ७,५०० दशलक्ष युएस डॉलर्स, २,३००किमी चा इराण-पाकिस्तान-भारत (IPI) गॅस पाइपलाइन अजूनही अजेंड्यावर आहे. प्रस्तावित आयपीआय पाइपलाइन सुरुवातीला दिवसाला ६० दशलक्ष घन मीटर इराणी वायू ची वाहतूक करेल जो भारत आणि पाकिस्तानमध्ये समान प्रमाणात विभागला जाईल. पाकिस्तानच्या हद्दीतील ८०० किमी लांबीची पाइपलाइन पाकिस्तान आणि भारत या दोन्हींसाठी गॅस वाहून नेणार आहे. इराण आणि पाकिस्तानने आधीच गॅस विक्री करारांना अंतिम रूप दिले आहे. इराणने २०१४ पासून पाकिस्तानला दररोज २१ दशलक्ष घनमीटर इतका नैसर्गिक वायू पुरवठा करण्यासाठी स्वतःला वचनबद्ध केले आहे. २०१० मध्ये परराष्ट्र व्यवहार मंत्र्यांनी भारतीय संसदेत एक विधान केले की भारत अजूनही IPI प्रकल्पाचा पक्ष आहे आणि गॅसची किंमत, गॅस वितरण बिंदू, प्रकल्पाची रचना, खात्रीशीर पुरवठा आणि पाइपलाइनची सुरक्षा, वाहतूक दर आणि पाकिस्तानमधून नैसर्गिक वायूच्या पारगमन शुल्क इत्यादींबाबत सहभागी देशांदरम्यान चर्चा होत होती. जगाच्या इतर भागांप्रमाणे, यूएसए देखील आशियाई ऊर्जा स्पर्धेत स्वतःचे भू-राजकीय हितसंबंध लावण्याचा प्रयत्न करत आहे. त्याने भारताला इराणकडून गॅस घेण्यापासून परावृत्त केले आहे आणि त्याऐवजी TAPI पाइपलाइनला चालना दिली आहे.

या दोन पाइपलाइन प्रस्तावांसोबत एक दशकाहून अधिक काळ गुंतून राहिल्यानंतर, भारतीय धोरणकर्त्यांना हे स्पष्ट होत आहे की या दोन प्रकल्पांपैकी एकही प्रकल्प नजीकच्या भविष्यात सुरू होणार नाही, कारण अफगाणिस्तान आणि पाकिस्तानमधील सुरक्षा परिस्थिती आणखी खालावली आहे आणि भारत-पाकिस्तान संबंधही सुधारले नाहीत. तरीही, नजीकच्या भविष्यात यापैकी कोणताही प्रकल्प प्रत्यक्षात आला, तर तो प्रादेशिक भू-राजकारण आणि भू-अर्थशास्त्रात बदल घडवून आणणारा ठरेल.

## ३. म्यानमार पाईपलाईन:

म्यानमारमधून गॅस आयात करणाऱ्या अंतिम पाइपलाइन प्रकल्पालाही प्रादेशिक भू-राजकारणामुळे फटका बसला. भारत आणि म्यानमारने २००६ मध्ये बांगलादेश ओलांडून ९०० किमी लांबीची पाइपलाइन बांधण्यासाठी करार केला होता. बांगलादेशच्या अनिश्चिततेमुळे प्रकल्पाला विलंब झाला आणि म्यानमार आणि चीन यांच्यातील आणखी एका पाइपलाइन प्रस्तावामुळे प्रकरण आणखी गुंतागुंतीचे झाले. भारत आणि म्यानमारने भारताच्या ईशान्येकडील राज्यांशी थेट पाइपलाइन जोडण्याच्या पर्यायी प्रस्तावांवर चर्चा केल्याचे वृत्त आहे. २०१० च्या सुरुवातीपासून, नवीन बांग्लादेशी सरकारने त्रि-राष्ट्रीय गॅस पाइपलाइनसाठी सहमती दर्शविल्याच्या बातम्या आल्या आहेत. ह्या बाबी लक्षात घेता, म्यानमार-बांगलादेश-भारत गॅस पाइपलाइन पुढील काही वर्षांत प्रत्यक्षात येऊ शकते.

**हायड्रोकार्बन:**

भारताच्या तेल आयातीपैकी दोन तृतीयांश तेल आयात एकाच प्रदेशातून, म्हणजे गल्फ को-ऑपरेशन कौन्सिल (GCC) देशांमधून होत असल्याने, भारत इतर प्रमुख तेल-आयात करणाऱ्या अर्थव्यवस्थांच्या पावलावर पाऊल ठेवत आहे आणि गल्फ राष्ट्रांव्यातिरिक्त इतर राष्ट्रांतून पुरवठा मिळविण्यासाठी महत्त्वपूर्ण प्रयत्न करत आहे. याशिवाय, न दिसणारी राजकीय अस्थिरता, धार्मिक अतिरेकी, दहशतवाद आणि पुरवठा लाईन्सच्या धमक्यांमधून व्यत्यय येण्याची शक्यता यामुळे तेलाला पर्याय म्हणून भारताला परदेशात नवीन हायड्रोकार्बन स्त्रोत शोधण्यास प्रवृत्त केले आहे.

भारताने लॅटिन अमेरिका, आफ्रिका, कॅस्पियन बेसिन, रशिया आणि इंडो-पॅसिफिक प्रदेशातील जलक्षेत्रांमध्ये हायड्रोकार्बन शोधात विविधता आणण्यासाठी पावले उचलली आहेत.

**अणू-ऊर्जा:**

अणुऊर्जा ही पर्यावरणपूरक ऊर्जा स्त्रोत आणि पर्यायी ऊर्जा स्त्रोतांकडे वळण्याच्या भारताच्या प्रयत्नांसाठी महत्त्वपूर्ण आहे. दीर्घकालीन आर्थिक परवडणारी म्हणून आणि पर्यावरणास अनुकूलता लक्षात घेऊन अणुऊर्जेमध्ये भारताच्या ऊर्जा मिश्रणाचा एक महत्त्वाचा स्त्रोत बनण्याची क्षमता आहे. सध्या, अणुऊर्जेचा भारताच्या ऊर्जा मिश्रणाचा सुमारे ३% भाग आहे आणि २०५० पर्यंत भारताच्या ऊर्जा मिश्रणाचा २० ते २५% होण्याची क्षमता आहे. समृद्ध युरेनियम, हलक्या पाण्याच्या अणुभट्ट्या आणि प्रगत तंत्रज्ञानाचा अभाव भारताच्या अणुऊर्जा क्षमतेला बाधा आणत आहे. परंतु भारत-अमेरिका अणु कराराच्या समाप्तीनंतर, भारतातील अण्वस्त्र संघर्ष संपुष्टात आला आणि १९७४ मध्ये भारताच्या पहिल्या अणुचाचणीच्या पार्श्वभूमीवर आलेल्या १९७८ च्या अण्वस्त्र प्रसार कायद्याच्या तंत्रज्ञान नाकारण्याच्या राजवटीपासून भारत मुक्त झाला. या अणु कराराचा उद्देश म्हणजे- भारताला सुरक्षित आण्विक इंधन, प्रगत हलक्या पाण्याच्या अणुभट्ट्या आणि नागरी आण्विक तंत्रज्ञानामध्ये प्रवेश करण्यास सक्षम करून त्याच्या वाढत्या ऊर्जा संकटाचा सामना करण्यास मदत करणे.

भारत-अमेरिका अणु कराराने भारताच्या परराष्ट्र धोरणाच्या गाभ्यामध्ये ऊर्जा सुरक्षितता आणली. भारत-अमेरिका नागरी आण्विक करारानंतर, भारताने फ्रान्स, रशिया, कॅनडा, ऑस्ट्रेलिया, जपान आणि यूकेसह अनेक देशांसोबत नागरी अणु करारांवर शिक्कामोर्तब केले आहे.

अणु पुरवठादार गट (NSG) मधील सदस्यत्वासाठी भारताच्या बोली दरम्यान भारत-चीन ऊर्जा भू-राजनीती पुन्हा उफाळून आली. NSG मध्ये भारताचा समावेश रोखण्यासाठी चीनने आपला प्रभाव आणि विशेषाधिकार वापरले आहेत. ४८ सदस्यीय NSG गटातील बहुसंख्य सदस्यांनी भारताच्या सदस्यत्वाचे समर्थन जरी केले असले, तरी चीनसह न्यूझीलंड, आयर्लंड, टर्की, दक्षिण आफ्रिका आणि ऑस्ट्रियाने भारताच्या प्रवेशाला विरोध केला. एनएसजी सदस्यत्वासाठी भारताने अण्वस्त्र प्रसार बंदी करारावर स्वाक्षरी करावी, असा चीनचा आग्रह राहिला आहे.

**सौर ऊर्जा:**

आंतरराष्ट्रीय सौर आघाडी (ISA) हा प्रकल्प देखील भारतासाठी महत्त्वपूर्ण आहे. या प्रकल्पाची संकल्पना भारत आणि फ्रान्स यांनी हवामान बदलाविरूद्ध प्रयत्नांना एकत्रित करण्यासाठी संयुक्त प्रयत्नांतून केली होती. २०१५ मध्ये पॅरिसमध्ये झालेल्या युनायटेड नेशन्स फ्रेमवर्क कन्व्हेन्शन ऑन क्लायमेट चेंज (UNFCCC) च्या २१ व्या कॉन्फरन्स ऑफ पार्टीज (COP-21) च्या बरोबरीने त्याची संकल्पना करण्यात आली होती. २०२० मध्ये त्याच्या फ्रेमवर्क करारामध्ये सुधारणा करून, संयुक्त राष्ट्रांचे सर्व सदस्य राष्ट्रे आता ISA मध्ये सामील होण्यास पात्र आहेत. सध्या, १०१ देश ISA फ्रेमवर्क करारावर स्वाक्षरी करणारे आहेत, ज्यापैकी ८० देशांनी ISA चे पूर्ण सदस्य होण्यासाठी आवश्यक ते प्रमाणीकरण सादर केले आहे.

**नवीकरणीय ऊर्जा:**

नवीकरणीय ऊर्जेची अपरिहार्यता निर्विवाद आहे आणि देश त्यांच्या ऊर्जा मिश्रणात वाढीव वाटा मिळविण्यासाठी तयारी करत आहेत. या नवीन तंत्रज्ञानातील बाजारपेठांवर वर्चस्व गाजवणाऱ्यांचा भविष्यातील विकास पद्धतींवर सर्वाधिक प्रभाव पडण्याची शक्यता आहे. इतर प्रमुख राष्ट्रे हवामान बदलाला नकार देत असल्याने, चीन आणि भारत दोघेही जागतिक अक्षय ऊर्जेच्या जागेचा वापर करण्यासाठी पुढे जात आहेत, मात्र चीन यात पुढे आहे.

नूतनीकरणक्षम ऊर्जा प्रणालीमध्ये भारत एक नवीन मानक खेळाडू म्हणून उदयास येत आहे. पंतप्रधान मोदी यांनी २०२२ पर्यंत १७५ GW नूतनीकरणक्षम क्षमता निर्माण करून ऊर्जा सुरक्षेसाठी अतूट वचनबद्धतेचा पाठपुरावा केला आहे आणि उर्वरित जगामध्ये काहीही झाले तरी भारत ग्लोबल वॉर्मिंगशी लढा देण्यासाठी वचनबद्ध आहे. पंतप्रधान मोदींना संयुक्त राष्ट्रसंघाच्या सेक्रेटरी जनरल यांच्याद्वारे २०१८ मध्ये "वसुंधरा चॅम्पियन" पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे. भारताच्या या क्षेत्रातील वाढत्या मानक नेतृत्वासाठी ही सकारात्मक बाब आहे जी भू-राजनीतीमध्ये भारताची आंतरराष्ट्रीय स्तरावर प्रतिमा वाढविण्यात मदत करते.

**४.३.२ भारताची सागरी सुरक्षा:**

भारताच्या अर्थव्यवस्थेत आणि ऊर्जा सुरक्षेत सागरी व्यापाराला महत्त्वाचे स्थान आहे. भारताचा बहुतांश व्यापार आणि ऊर्जा पुरवठा हिंदी महासागर क्षेत्रातून (IOR) होतो. या कारणाशिवाय राजकीय-भौगोलिकदृष्ट्या भारतीय धोरणकर्त्यांसाठी सागरी सुरक्षा ही महत्त्वाची चिंता आहे. भारताला ७,५१७ किमीचा समुद्रकिनारा लाभला आहे. यापैकी ५,४२२ किमी क्षेत्र मुख्य जमिनीसह आहे. अंदमान आणि निकोबारला १९६२ किलोमीटरची किनारपट्टी आहे आणि लक्षद्वीपला १३२ किमीची किनारपट्टी आहे. या विशाल किनारपट्टीवर समुद्री चाचेगिरी, बेकायदेशीर लँडिंग, शस्त्रे आणि स्फोटके, घुसखोरी, गुन्हेगारी कारवायांसाठी समुद्र आणि किनारी बेटांचा वापर, अंमली पदार्थ तस्करी आणि मानवी तस्करी यांसारखी अनेक सुरक्षा आव्हाने आहेत.

**भारताचे सागरी हित:**

सागरी सुरक्षेची चिंता ओळखण्यापूर्वी राष्ट्रीय सागरी हितसंबंध समजून घेणे महत्त्वाचे आहे. सागरी हितसंबंधांच्या विस्तृत व्याख्येमध्ये सागरी क्षेत्रातील राष्ट्रीय प्रयत्नांच्या त्या सर्व प्रमुख क्षेत्रांचा समावेश असेल जे देशाच्या अस्तित्वासाठी आणि वाढीसाठी आवश्यक आहेत. राष्ट्रीय सुरक्षेसाठी या हितसंबंधांचे जतन करणे आवश्यक आहे आणि राष्ट्रीय प्रयत्नांच्या या क्षेत्रांना कोणताही धोका असल्यास, लष्करी आणि राष्ट्रीय धोरणे तयार करण्यासाठी त्याचे बारकाईने विश्लेषण करणे आवश्यक आहे.

**१. सागरी प्रदेश:**

भारताला सुमारे ७५१७ किमी लांबीचा समुद्रकिनारा आणि १२०० पेक्षा जास्त बेटे आहेत. यापैकी बरीच बेटे जवळच्या मुख्य भूभागापासून १६०० किमी अंतरावर असलेल्या अंदमान व निकोबार बेटांपैकी सर्वात दूर आहेत. भारताच्या प्रादेशिक समुद्राचा विस्तार १९३,८३४ चौ. किमी आहे तर विशेष आर्थिक क्षेत्र (EEZ) २.०२ दशलक्ष चौ. किमी आहे. हा प्रदेश भारताच्या एकूण भूभागाच्या दोन तृतीयांश टक्के आहे. यामध्ये भारताच्या व्यापार आणि दळणवळण यांसाठी या विशेष सागरी क्षेत्राचा मोठ्या प्रमाणावर वापर करण्यात येतो. देशात उत्पादित होणारे ५१ टक्के खनिज तेल आणि ६६ टक्के नैसर्गिक वायूचे साठे याच सागरी क्षेत्रात येतात. त्यामुळेच या सागरी क्षेत्राचे संरक्षण करणे भारताला अत्यंत आवश्यक आहे.

**२. सागरी संपर्क रेषा/ सी लाइन्स ऑफ कम्युनिकेशन (SLOCs):**

२०१४ मध्ये एकूण जागतिक व्यापारी व्यापाराच्या सुमारे चार पंचमांश भागाला महासागरांनी आधार दिला यावरून सागरी संपर्क रेषांचे महत्त्व मोजता येते. गेल्या दशकात भारताचा सागरी व्यापार हा ३.३ टक्के वाढला आहे जो जागतिक विकास दराच्या दुप्पट आहे. भारतीय बंदरांवर गेल्या दशकात (आर्थिक वर्ष २००५-२०१५) मालवाहतूक दुप्पट होऊन वार्षिक १ अब्ज टन झाली आहे आणि २०२२ पर्यंत वार्षिकी १.७ अब्ज टनांपर्यंत पोहोचण्याची अपेक्षा आहे. हे भारताच्या एकूण ९५ टक्के व्यापाराचे प्रमाण आहे ज्यामध्ये भारताच्या सागरी सुरक्षेच्या दृष्टीने SLOCs आणि हिंदी महासागरातील आंतरराष्ट्रीय शिपिंग लेनचे महत्त्व अधोरेखित होते.

**३. सागरी अर्थव्यवस्था:**

भारतीय अर्थव्यवस्था २०१५-१६ मध्ये एकूण देशांतर्गत तेलाच्या वापराच्या ८१ टक्के इतकी ऊर्जा आयातीवर अवलंबून आहे. ही आयात समुद्रमार्गे वाहतूक केली जाते. भारताचा ९५ टक्के आंतरराष्ट्रीय व्यापार खंडानुसार आणि ७० टक्क्यांहून अधिक हा समुद्रातून केला जातो. भारत हा जगातील चौथ्या क्रमांकाचा मासळी उत्पादक देश आहे, त्यामधील जास्तीत जास्त उत्पादन हे समुद्रातून येणाऱ्या माशांचे आहे. या सागरी अर्थव्यवस्थेला १३ मोठ्या आणि सुमारे २०० किरकोळ बंदरांच्या विस्तृत नेटवर्कद्वारे जोडले जाते. त्याचप्रमाणे सागरमाला प्रकल्पाने बंदरांच्या नेतृत्वाखालील विकास आणि बंदरांपर्यंत मालाची जलद आणि कार्यक्षम वाहतूक करण्यासाठी पायाभूत सुविधांना नव्याने जोर दिला आहे. या नवजात सागरी

अर्थव्यवस्थेच्या संवर्धनासाठी अडथळे आणि संभाव्य धोके दूर ठेवले जातील याची खात्री करण्यासाठी एकत्रित राष्ट्रीय प्रयत्नांची आवश्यकता आहे.

### ४. सागरी गुंतवणूक:

भारताने तत्काळ सागरी शेजारी आणि त्यापुढील अनेक देशांत पायाभूत सुविधा, उद्योग, ऊर्जा आणि सेवा यासारख्या विविध क्षेत्रांमध्ये गुंतवणूक केली आहे. भारत अंटार्क्टिकामध्ये विविध विषयांमध्ये संशोधन करण्यासाठी दोन संशोधन केंद्रे चालवतो, त्यापैकी सर्वात प्रमुख विषय म्हणजे जागतिक हवामान बदल. भारताने आंतरराष्ट्रीय समुद्रतळ प्राधिकरणसह खोल समुद्रातील संसाधने वापरण्याच्या दिशेने महत्त्वपूर्ण प्रगती केली आहे. ओ. एन. जी. सी. विदेश लिमिटेड (ONGC Videsh Ltd) ने व्हिएतनामच्या विशेष आर्थिक क्षेत्र (EEZ) मध्ये व्हिएतनाम सरकारद्वारे वाटप झालेल्या दोन ब्लॉकमध्ये तेल शोधात भारताने गुंतवणूक केली आहे. चीनने ही गुंतवणूक दक्षिण चीन समुद्रात येत असल्यामुळे त्यास विरोध केला आहे. भारत आजही या क्षेत्रात सुरक्षिततेच्या दृष्टीने गुंतवणूक करण्याचा प्रयत्न करत आहे.

### ५. भारतीय डायस्पोरा:

प्राचीन काळापासून, भारताचे हिंदी महासागर प्रदेश (IOR) मधील अनेक देशांशी व्यापार आणि सांस्कृतिक संबंध आहेत. फक्त आखाती आणि मध्य पूर्वेमध्ये अनिवासी भारतीयांची संख्या ८० लाखांहून जास्त आहे. हे सर्व अनिवासी भारतीय दरवर्षी जवळपास ८३ बिलियन यूएस डॉलर्स इतकी रक्कम आपल्या मायदेशी पाठवतात. यापैकी काही देशांमधील अस्थिर परिस्थितीमुळे भूतकाळातील संकटांदरम्यान आपल्या नागरिकांना स्थलांतरित करण्यास प्रवृत्त केले गेले आहे. उदाहरणार्थ, एप्रिल २०१५ मध्ये येमेन आणि जुलै २००६ मध्ये लेबनॉनमधून झालेले स्थलांतर. या प्रदेशातील बरेचसे देश ही किनारपट्टीची राष्ट्रे आहेत, ही बाब लक्षात घेता तेथे राहणाऱ्या अनिवासी भारतीयांची सुरक्षा ही सागरी सुरक्षा संदर्भात महत्त्वाची आहे.

### ६. हिंदी महासागर प्रदेशातील (IOR) मधील भारताचे ऐतिहासिक सांस्कृतिक आणि व्यापार संबंध:

संपूर्ण इतिहासात हिंदी महासागरातील भारताचे स्थान या प्रदेशातील व्यापार आणि सांस्कृतिक देवाण-घेवाणमध्ये केंद्रस्थानी आहे. कंबोडिया, इंडोनेशिया, मलेशिया आणि मॉरिशस यांच्याशी भारतीय संबधांचे ऐतिहासिक पुरावे अस्तित्त्वात आहेत आणि तेथील मंदिरांमध्ये आणि दंतकथांमध्ये भारतीय संस्कृतीचे प्रकटीकरण स्पष्टपणे दिसून येते. या क्षेत्रामध्ये भारताचे हित जपण्यासाठी या संबंधांची जोपासना करणे महत्त्वाचे आहे कारण ते थेट या देशांच्या धोरणांवर आणि त्याद्वारे मोठ्या प्रमाणावर या प्रदेशावर प्रभाव टाकू शकतात. हिंदी महासागर प्रदेशातील देशांतर्गत दळणवळण पुन्हा जोडण्यासाठी आणि पुन्हा प्रस्थापित करण्यासाठी भारताच्या सांस्कृतिक मंत्रालयाने जून २०१४ मध्ये 'मौसम' प्रकल्प सुरू केला. हिंदी महासागराच्या किनारपट्टीच्या विविध भागांना तसेच किनारी केंद्रांना त्यांच्या अंतराळ प्रदेशांशी जोडणाऱ्या प्रमुख प्रक्रिया आणि घटनांचे परीक्षण करण्याचा या प्रकल्पाचा

हेतू आहे. यासारखे आणि केरळ सरकारच्या 'स्पाईस रूट' सारख्या प्रकल्पांच्या पुढील प्रकल्पांना प्रोत्साहन दिल्यास हिंदी महासागर प्रदेशातील (IOR) भारताचे सागरी हित बळकट होईल. क्वाड (QUAD) सारख्या संघटनादेखील या प्रदेशाच्या सुरक्षिततेसाठी काही उपक्रम राबवत आहेत, ज्यामध्ये भारत एक सहयोगी देश आहे.

**भारताची सागरी सुरक्षेसाठी चिंतेचे विषय:**

**१. चोक पॉइंट्सचे नियंत्रण:**

हिंदी महासागरात होणारा प्रवेश हा भौगोलिकदृष्ट्या अरबी समुद्र आणि बंगालच्या उपसागराकडे आणि दक्षिण हिंदी महासागरातून जाणाऱ्या अनेक चोक पॉइंट्सद्वारे नियंत्रित केला जातो, जे भारतीय सागरी हितसंबंधांचे रक्षण करण्यासाठी महत्त्वपूर्ण आहेत. भारत यापैकी बहुतेक चोक पॉइंट्सपासून समान अंतरावर आहे ज्यामुळे या विशाल सागरी जागेच्या सुरक्षेत महत्त्वाची भूमिका बजावता येते. १९८० च्या इराण-इराक युद्धाने होर्मुझच्या सामुद्रधुनीतून भारतीय ऊर्जा आयातीला धोका निर्माण झाला. बाब-एल-मंदेबची सामुद्रधुनी आणि एडनचे आखात हे ऊर्जा प्रवाहाच्या सुरक्षिततेसाठी तितकेच महत्त्वाचे आहेत. या क्षेत्रात जर भारतीय सागरी वाहतुकीवर हल्ला झाल्यास किंवा एखादा पेचप्रसंग उद्भवल्यास भारतीय ऊर्जा पुरवठा गंभीरपणे संकटात येऊ शकतो, ज्याचा थेट अर्थव्यवस्थेवर मोठा परिणाम होईल. मलाक्का सामुद्रधुनी १७व्या आणि १८व्या शतकात डच लोकांनी हिंदी महासागरातील व्यापारावर केलेले विस्कळीत नियंत्रण लक्षात आणून देते. त्यामुळे हे क्षेत्र वैमनस्यपूर्ण हितसंबंधांच्या नियंत्रणापासून मुक्त राहणे आणि सागरी वाहतुकीचा मुक्त प्रवाह कायम राहणे अत्यंत महत्त्वाचे आहे. या अत्यावश्यक सागरी मार्गांवर नेव्हिगेशनचे स्वातंत्र्य राखण्यासाठी योगदान देण्याच्या आंतरराष्ट्रीय प्रयत्नांमध्ये भारत हा नेहमीच बरोबरीचा भागीदार राहिला आहे. तथापि, अलिकडच्या काळात पाहिल्याप्रमाणे, यापैकी बरेच प्रदेश अस्थिरतेचा सामना करू शकतात, ज्याचा नंतर प्रादेशिक आणि जागतिक व्यापारावर देखील दुर्बल परिणाम होऊ शकतो.

२. सागरी संपर्क रेखा **(SLOC) साठी धोके:**

IOR मधील सागरी संपर्क रेखा (SLOCs) अनेक वर्षांपासून पारंपारिक आणि अपारंपारिक धोक्यांमुळे येणाऱ्या व्यत्ययास संवेदनाक्षम आहेत. तथापि, भारताच्या व्यापारासाठी समुद्रावरील वाढत्या अवलंबित्वामुळे या SLOCs चे अशा धोक्यांपासून संरक्षण करण्यासाठी हस्तक्षेप करणे आवश्यक आहे. विशाल हिंदी महासागरातील या SLOCs ची सुरक्षा सुनिश्चित करण्यासाठी या प्रदेशातील इतर देशांचे तसेच प्रदेशाबाहेरील देशांचे सहकार्य आवश्यक आहे. २००२ पासून भारतीय नौदलाने केलेल्या अशा प्रयत्नांमध्ये भारत एक अग्रेसर राष्ट्र आहे. एडनच्या आखातातसुद्धा भारताने अनेक राष्ट्रांच्या मालवाहू जहाजांना सुरक्षा पुरवली आहे.

**३. चाचेगिरी:**

१९९०च्या दशकानंतर सोमालियातील चाचेगिरीमुळे अरबी समुद्रातील जागतिक मालवाहतुकीस फार मोठा धोका निर्माण झालेला आहे. परंतु आंतरराष्ट्रीय समुदायाने

केलेल्या सामूहिक प्रयत्नांमुळे चाचेगिरीच्या हल्ल्यांमध्ये घट झाली आहे. भारताने केवळ सर्व देशांच्या असंख्य व्यापारी जहाजांना एस्कॉर्टच केले नाही तर त्याच्या सागरी सुरक्षा दलांच्या एकत्रित प्रयत्नांमुळे लक्षद्वीप आणि मालदीव बेटांपर्यंत पूर्वेकडे पंख पसरलेल्या या चाचेगिरीवर नियंत्रण मिळवले गेले आहे. मात्र सोमालियातील राजकीय अस्थिरता, गरिबी, दुष्काळ आणि बेरोजगारी यांमुळे ही समस्या पुन्हा जोर धरू शकते. या व्यतिरिक्त बांगलादेश, मलेशिया आणि इंडोनेशियाच्या किनाऱ्याजवळ, अँकरेजमध्ये मोठ्या प्रमाणात दरोडे टाकले गेले आहेत व या आकडेवारीने चाचेगिरीत वाढ दर्शविली आहे. जरी आंतरराष्ट्रीय समुदायाद्वारे चाचेगिरीविरोधी कारवाईची हमी दिली जात नसली तरी समुद्रकिनारी असलेल्या राष्ट्रांनी कृती करणे आवश्यक आहे.

इंडोनेशिया, मलेशिया आणि फिलीपिन्सच्या सरकारांनी संयुक्त गस्त घालण्याचा नुकताच घेतलेला निर्णय योग्य दिशेने टाकलेले पाऊल आहे, जे या समुद्री चाच्यांना परावृत्त करेल आणि आंतरराष्ट्रीय सागरी समुदायाला असलेली भीती दूर करेल. IOR मध्ये चाचेगिरी विरोधी प्रयत्नांसाठी भारताची वचनबद्धता आहे. २००८ मध्ये भारतीय नौदलाने सुरू केलेल्या इंडियन ओशन नेव्हल सिम्पोजियम सारख्या प्रयत्नांद्वारे ही वचनबद्धता अधोरेखित केली गेली आणि या धोक्यांचा सामना करण्यासाठी यंत्रणा आणि कार्यपद्धती निर्माण करण्यात हिंदी महासागरातील सर्व राष्ट्रांचे प्रयत्न दिसून आले.

**४. तस्करी:**

हिंदी महासागर प्रदेश हे अंमली पदार्थ उत्पादनातील जगातील सर्वात कुप्रसिद्ध क्षेत्रे- गोल्डन क्रिसेंट आणि गोल्डन ट्रँगल- यांचे घर आहे. अंमली पदार्थांच्या तस्करांनी स्थापित केलेले ट्रान्स-नॅशनल नेटवर्क देखील शस्त्रास्त्रांची आणि मानवी तस्करी यासाठी प्रसिद्ध आहे.

म्यानमार तसेच समुद्र किनारी असलेल्या इतर देशांनाही या दुहेरी संकटांचा मोठ्या प्रमाणात सामना करावा लागला आहे. या नेटवर्क्सचा सागरी विशालतेमुळे यावर नियंत्रण मिळवण्यासाठी मर्यादा येतात. गेल्या काही वर्षांतील भारतीय तटरक्षक दलाच्या प्रतिबंधांमुळे या अमानवी तस्करीवर काही प्रमाणात मर्यादा आली आहे.

**५. सागरी दहशतवाद:**

हिंदी महासागर प्रदेशात सागरी दहशतवादासारख्या घटना काहीशा कमी असल्या तरी धोका कायम आहे. यासाठी सतत अल-कायदा, आयसिस यांसारख्या संघटना वेगवेगळी जहाजे, युद्धनौका ताब्यात घेण्याचा प्रयत्न करीत असतात. तसेच एखाद्या देशाच्या सागरी मार्गातून दहशतवादी दुसऱ्या देशात दहशतवादी हल्ले करत असतात. उदाहरणार्थ, भारतात २००८ साली भारतात मुंबई या शहरावर दहशतवाद्यांनी केलेला हल्ला.

तरीदेखील अधूनमधून वेगवेगळ्या ठिकाणी दहशतवादी शस्त्रांचा बेकायदेशीर व्यापार तसेच अमली पदार्थांची तस्करी करीत असतात. त्यामुळे भारताला सदैव याबाबतीत दक्ष राहावे लागते.

munotes.in

### ६. अतिरिक्त प्रादेशिक लष्करी उपस्थिती:

१५ व्या शतकात पोर्तुगीजांच्या आगमनापासून आजपर्यंत हिंदी महासागर नेहमीच बाह्य शक्तींच्या लष्करी उपस्थितीचा साक्षीदार आहे. वासाहतिक घुसखोरीचे मूळ व्यावसायिक हितसंबंधांमध्ये होते, परंतु सध्याच्या अतिरिक्त-प्रादेशिक लष्करी उपस्थितीचा उद्देश विविध राष्ट्रांच्या धोरणात्मक हितासाठी आहे. चाचेगिरीच्या धोक्याला आळा घालण्यासाठी चालू असलेल्या आंतरराष्ट्रीय नौदल प्रयत्नांचा देखील राष्ट्रांना ऑपरेशनल इंटेलिजेंस आणि विस्तारित लष्करी सागरी पाऊलखुणाच्या संदर्भात फायदा झाला आहे. या प्रदेशात डच आणि चिनी लोकांसारख्या पाणबुड्यांच्या तैनातीचे ऑपरेशनल कौशल्य मिळवणे आणि या भागात तणाव वाढवणे याशिवाय दुसरा कोणताही उद्देश नाही. यामध्ये चीनची वाढती विस्तारवादी महत्वाकांक्षा व त्यांनी वेगवेगळ्या देशात व्यावसायिक उद्देशाच्या आडून उभारलेले लष्करी तळ उदाहरणार्थ, मलेशिया, जिबूती, ग्वादर, दक्षिण चिनी समुद्र येथील लष्करी उपस्थिती भारताची चिंता वाढवणारी आहे.

### ७. बेकायदेशीर बिना-नोंदवलेली आणि अनियंत्रित (Illegal Unreported Unregulated) मासेमारी :

munotes.in

जगभरातील सागरी समुदायांसाठी बेकायदेशीर बिना-नोंदवलेली आणि अनियंत्रित मासेमारी ही एक मोठी समस्या आहे आणि यावर नियंत्रण ठेवण्यासाठी आंतरराष्ट्रीय आणि राष्ट्रीय सागरी कायद्यांची अंमलबजावणी करण्यासाठी किनारपट्टीवरील राज्यांच्या सरकारांना कठोर आव्हान आहे. बेकायदेशीर मासेमारीच्या जागतिक वन्यजीव निधीच्या अहवालात असे आढळून आले आहे की पश्चिम आणि पूर्व हिंदी महासागरात सर्वेक्षण केलेल्या ८७ टक्के माशांच्या साठ्यांमध्ये उच्च स्तरावर बेकायदेशीर मासेमारी होत आहे. हे चिंतेचे एक प्रमुख कारण आहे, विशेषत: सोमाली राष्ट्रपतींनी एका ऑप-एडमध्ये केलेले विधान हे सिद्ध करते. ते विधान म्हणजे -'... बेकायदेशीर मासेमारी जहाजांच्या अतिक्रमणामुळे सोमालियामध्ये चाचेगिरीची लाट पसरली ज्यामुळे जागतिक सागरी शिपिंगला मोठा फटका बसला. उद्योगांचे अब्जावधी डॉलर्सचे महसूल बुडाले'. अनेक आसियान देशांना देखील या समस्येचा, विशेषत: चिनी मासेमारी जहाजांमुळे, सामना करावा लागला आहे. सी शेफर्ड नावाची एनजीओ या बेकायदेशीर मासेमारीविषयी अध्ययन करत आहे. तिने भारत सरकारला याबाबतीत अहवाल दिला आहे. भारतात मुख्यतः बांगलादेश आणि तैवानमधून मासेमारी करणारे ट्रॉलर बेकायदेशीरपणे बंगालच्या उपसागरातील भारताच्या प्रादेशिक पाण्यात प्रवेश करत असल्याच्या घटना घडल्या आहेत, मात्र त्याविषयी अधिकृत कोणताही पुरावा दिसून आलेला नाही. मुंबई हल्ल्यानंतर किनारपट्टीच्या सुरक्षेवर भर देण्यात आला आहे. सागरी सुरक्षा एजन्सीजच्या तीव्र गस्ती बेकायदेशीर मासेमारीसाठी एक मोठा प्रतिबंध आहे. तथापि, उंच समुद्र तसेच लहान शेजारील राष्ट्रांचे किनारपट्टी क्षेत्र या धोक्यासाठी अत्यंत असुरक्षित आहेत. भारताने अलीकडच्या काळात सेशेल्स आणि मॉरिशस सारख्या लहान राष्ट्रांच्या विशेष आर्थिक क्षेत्रांच्या (EEZ च्या) गस्त घालण्यासाठी नौदल मालमत्ता प्रदान केली आहे, ज्यामुळे त्यांची सागरी सुरक्षा क्षमता वाढण्यास मदत झाली आहे.

वर वर्णन केलेले बहुतेक धोके आंतरराष्ट्रीय स्वरूपाचे आहेत आणि त्यांच्या प्रसाराचा सामना करण्यासाठी सहयोग आणि विकास यंत्रणांमध्ये अनेक प्रादेशिक तसेच अतिरिक्त-प्रादेशिक भागधारकांचे सहकार्य आवश्यक आहे. तथापि, हिंदी महासागरात अतिप्रचंड सुरक्षा यंत्रणा अस्तित्वात नाही. या क्षेत्राच्या विद्यमान सुरक्षा यंत्रणेवर नजर टाकल्यास हिंदी महासागर प्रादेशिक क्षेत्रात भारताला एक उभरती शक्ती म्हणून सागरी सुरक्षिततेच्या क्षेत्रात एक महत्त्वाची भूमिका पार पाडावी लागेल.

### ८. हिंदी महासागर प्रादेशिक क्षेत्रामध्ये सुरक्षा यंत्रणा:

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी त्यांच्या सागरमाला या प्रकल्पामध्ये - हिंदी महासागर प्रादेशिक क्षेत्रामध्ये सर्वांसाठी सुरक्षा आणि विकास हे भारताचे धोरण राहिले आहे. या प्रदेशात सागरी सुरक्षेला चालना देण्यासाठी भारताने नेहमीच सहकार्याचा दृष्टिकोन आणि सर्व राष्ट्रांच्या सहभागाचे समर्थन केले आहे.

### ९. इंडियन ओशन रिम असोसिएशन (IORA):

आंतर-प्रादेशिक आर्थिक सहकार्य आणि विकासाला चालना देण्यासाठी १९९७ मध्ये **इंडियन ओशन रिम असोसिएशन** सुरू करण्यात आले. तथापि, **इंडियन ओशन रिम असोसिएशन** चा सनद हा एक सहमतीचा करार आहे आणि त्यामुळे स्वाक्षरी करणाऱ्यांवर कायदेशीर बंधनकारक नाही. प्रदेशाच्या शाश्वत वाढ आणि संतुलित विकासाला चालना देण्यासाठी **इंडियन ओशन रिम असोसिएशन** कडे आता सहा प्राधान्य क्षेत्रे आहेत ज्यापैकी सागरी सुरक्षा आणि सुरक्षितता ही पहिली प्राथमिकता आहे. सागरी सुरक्षा आणि सुरक्षितता व आपत्ती व्यवस्थापन ही क्षेत्रे संभाव्य IONS (इंडियन ओशन नेव्हल सिम्पोजियम) उपक्रमांशी सुसंगत असले पाहिजेत. तथापि, या मुद्द्यांवर विचारमंथन करण्यासाठी त्यांच्याकडे कोणताही संस्थात्मक दुवा नाही.

munotes.in

### १०. इंडियन ओशन नेव्हल सिम्पोजियम (IONS):

इंडियन ओशन नेव्हल सिम्पोजियम (IONS) हा २००८ मध्ये स्थापन करण्यात आलेला एक स्वयंसेवी उपक्रम आहे जो हिंदी महासागर प्रदेशातील किनारी राष्ट्रांच्या नौदलांमधील सागरी सहकार्य वाढविण्याचा प्रयत्न करतो. सदस्यांमधील सागरी सुरक्षेची चिंता कमी करण्यासाठी आखलेल्या विविध बहुराष्ट्रीय सागरी सहकारी यंत्रणेची स्थापना करण्याचेही इंडियन ओशन नेव्हल सिम्पोजियम चे उद्दिष्ट आहे. तथापि, हा निव्वळ नौदल उपक्रम आहे.

### ११. आशियातील जहाजांविरुद्ध चाचेगिरी आणि सशस्त्र दरोडे यांचा सामना करण्यासाठी प्रादेशिक सहकार्य करार (ReCAAP):

ReCAAP हा प्रादेशिक सरकार-दर-सरकार करार आहे, जो आशियातील चाचेगिरी आणि सशस्त्र दरोडे विरुद्ध सहकार्य वाढवण्यासाठी सप्टेंबर २००६ मध्ये अंमलात आणला गेला. हा बहुपक्षीय करार आहे ज्यामध्ये आशिया, युरोप, यूएसए आणि ऑस्ट्रेलिया या देशांचा समावेश आहे. ReCAAP माहिती सामायिकरण केंद्र (ISC) हे चाचेगिरी-संबंधित माहितीचा प्रसार करणे सुलभ करते परंतु थेट कारवाई सुरू

करण्याचा आदेश देत नाही किंवा सागरी सुरक्षा वाढविण्यासाठी कारवाई करणे हे स्वाक्षरी करणाऱ्या राष्ट्रांवर बंधनकारक नाही.

**१२. आसियान प्रादेशिक मंच (ARF):**

आसियान प्रादेशिक मंचाची उद्दिष्टे समान हिताच्या राजकीय आणि सुरक्षा मुद्द्यांवर संवाद आणि सल्लामसलत वाढवणे आणि आशिया पॅसिफिक प्रदेशात आत्मविश्वास निर्माण करणे तसेच प्रतिबंधात्मक राजनयासाठी प्रयत्न करणे ही आहेत. या दोन मुख्य उद्दिष्टांमध्ये वाजवी प्रमाणात यश मिळाले आहे, परंतु चीनसोबत मात्र आसियानच्या प्रयत्नांमध्ये समान प्रमाणात यश दिसून आले नाही.

## ४.४ परराष्ट्र धोरणातील ‘सॉफ्ट पॉवर’

सॉफ्ट पॉवरवर लक्ष केंद्रित करणारे अभ्यास आंतरराष्ट्रीय संबंध संशोधनात तुलनेने मर्यादित आहेत, परंतु सॉफ्ट पॉवर हे साधन म्हणून राष्ट्रांमधील संबंधांमध्ये नेहमीच वापरले जात आहे. १९९० च्या दशकात ‘जोसेफ नाय ज्युनियर’ यांनी ही संज्ञा विकसित आणि लोकप्रिय करून त्यांच्या अनेक संदर्भांमध्ये त्याचा वापर केला आणि त्यावर चर्चा केली. सॉफ्ट पॉवर ही तशी आंतरराष्ट्रीय संबंधांमध्ये अलीकडे विकसित झालेली व आधुनिक संकल्पना असून तिचा अर्थ हा हार्ड पॉवरच्या विरोधात समजला जातो. नाय हे सॉफ्ट पॉवरला सत्तेचा ‘दुसरा चेहरा’ मानतात. नायच्या म्हणण्यानुसार, देशाची सॉफ्ट पॉवर तीन संसाधनांवर अवलंबून असते - संस्कृती, राजकीय मूल्ये आणि परराष्ट्र धोरणे. सॉफ्ट पॉवर ही राजकीय मूल्ये, सांस्कृतिक मुल्ये आणि संकल्पनांच्या क्षेत्रातून उद्भवलेली अशी सत्ता आहे, जी हार्ड पॉवर च्या विरोधी आहे. हार्ड पॉवर म्हणजे अशी लष्करी सत्ता, जी राजकीय हिंसाचार किंवा आक्रमकता आणि आर्थिक दबाव यावर आधारित सत्ता आहे.

**सॉफ्ट पॉवर: परराष्ट्र धोरणाचे एक साधन**

स्वातंत्र्य मिळाल्यानंतर लगेचच, भारताने नैसर्गिक प्रगतीमध्ये मूल्ये आणि शांततापूर्ण सहअस्तित्वावर आधारित सॉफ्ट पॉवरचे धोरण स्वीकारले. नवीन शीतयुद्धाच्या संघर्षाच्या पार्श्वभूमीवर, **भारत** कोणत्याही एका गटात सामील झाला नाही. १९५५ ची बांडुंग परिषद ही अलिप्ततावादी चळवळीचा पाया बनली. वसाहतवादाला विरोध, सार्वत्रिक नि:शस्त्रीकरण, विवादांचे शांततापूर्ण निराकरण, वर्णद्वेषाला विरोध आणि पाश्चात्य साम्राज्यवादाच्या अभिव्यक्तींचा सामना करण्यासाठी वचनबद्ध असलेला भारत तिसऱ्या जगाचा आवाज बनला.

भारताच्या राजनयासाठी एक महत्त्वाचे कार्य म्हणजे "जबाबदार सत्ता" आणि ‘पश्चिमेचा विश्वासार्ह भागीदार’ म्हणून भारताची प्रतिमा वाढवणे. त्यामुळे मे १९९८ मध्ये अण्वस्त्रांच्या चाचण्यांनंतर लगेचच भारताने पुढील चाचण्यांवर स्वेच्छेने स्थगिती जाहीर केली, अणुकार्यक्रमावर अमेरिकेशी गंभीर संवाद साधला आणि १९९९ मध्ये एक सिद्धांत स्वीकारला की, जो कोणत्याही राष्ट्राच्या विरोधात प्रथम अण्वस्त्राचा अवलंब करणार नाही.

१९९० च्या दशकात भारतीय प्रादेशिक धोरण सॉफ्ट पॉवर रणनीतींवर अधिक लक्ष केंद्रित करते. सॉफ्ट पॉवर साधनांच्या वापराची उदाहरणे म्हणजे गुजराल सिद्धांत ची अंमलबजावणी

munotes.in

जी भारताच्या सामर्थ्य वाढीच्या संकल्पनेवर आधारित आहे, परंतु शेजारील देशांसोबतच्या कमकुवत सहकार्याच्या किंमतीवर नाही.

परिणामी, भारताने या प्रदेशात विविध देशांशी सहकार्य करण्यावर भर दिला - त्याने दक्षिण आशियाई प्रादेशिक सहकार्य संघटनेशी (SAARC) सहकार्य सुरू केले, प्राधान्य व्यापार क्षेत्र स्थापन करण्याच्या कल्पनेला समर्थन दिले. या प्रदेशातील संयुक्त राजनैतिक क्रियाकलापांचा परिणाम म्हणून, दक्षिण आशियाई प्राधान्य व्यापार क्षेत्र (SAPTA) १९९५ मध्ये तयार केले गेले आणि २००४ मध्ये सदस्यांनी दक्षिण आशियाई मुक्त व्यापार क्षेत्र (SAFTA) स्थापन करण्याच्या करारावर स्वाक्षरी केली.

२००० मध्ये भारताने रशिया आणि चीनसोबत धोरणात्मक भागीदारी स्थापन केली. २००५ च्या करारात भारताला शांघाय सहकार्य संघटनेमध्ये निरीक्षकाचा दर्जा मिळाला. सहकार्याच्या गतिमान विकासामुळे आणि दोन राष्ट्रांमधील व्यापार वाढल्यामुळे, भारत आणि चीन यांच्यातील संबंधांचे वर्णन करण्यासाठी 'चिंडिया' म्हणजे 'चीन+इंडिया', ही संज्ञा तयार करण्यात आली. भारत-चीन संबंधांमध्ये अनिश्चित विवादास्पद समस्या आणि परस्पर चिंता कायम असूनही अतिशय मोठ्या प्रमाणावर आर्थिक देवाणघेवाण सुरू आहे.

अमेरिका आणि पाकिस्तान यांच्या सहकार्याच्या संबंधामुळे भारत आणि अमेरिका यांचे संबंध प्रभावित होत होते. भारत आणि पाकिस्तान यांच्यात मोठ्या प्रमाणात सीमा संघर्ष, काश्मीरचा दहशतवाद, कारगिल युध्द, संसदेवरील हल्ला, मुंबईवरील हल्ला, अशा प्रकारच्या अनेक दहशतवादी हल्ल्यांमुळे भारत पाकिस्तान संबंध अतिशय संघर्षाच्या पातळीवर गेलेले होते. तरीदेखील भारताने संयमाची भूमिका घेऊन पाकिस्तानवर कोणत्याही प्रकारचा सशस्त्र हल्ला केला नाही. वादावर शांततापूर्ण तोडगा काढण्यासाठी राजनैतिक चर्चा सुरू केली. परिस्थिती शांतपणे हाताळण्यासाठी आणि राजनयिक पातळीवर संघर्ष मिटवण्याचा प्रयत्न केल्यामुळे भारताला आंतरराष्ट्रीय मान्यता मिळाली.

भारताची सॉफ्ट पॉवर प्रभावीपणे मजबूत करणाऱ्या परराष्ट्र धोरणाचे उदाहरण म्हणजे भारताचे अफगाणिस्तानशी असलेले संबंध. या देशात तालिबानची सत्ता संपुष्टात आल्यानंतर, भारताने अफगाणिस्तानला मानवतावादी मदत; तिथे पायाभूत सुविधांच्या बांधकामाला पाठिंबा देणे आणि अफगाण विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती प्रदान करण्यावर लक्ष केंद्रित केले होते. संयुक्त राष्ट्रांच्या चौकटीत भारताने पॅलेस्टाईनला दिलेला पाठिंबाही त्याच्या प्रतिमेसाठी फायदेशीर ठरला. या हालचालीमुळे भारताला अरब देशांमध्ये ओळख मिळाली आणि – महत्त्वाचे म्हणजे – भारत आणि इस्त्रायलमधील संबंधही बिघडले नाहीत. मध्य आशियामध्ये सक्रिय होण्यासाठी प्रयत्नशील असताना, भारताने त्या प्रदेशात विशेषत: कझाखस्तान आणि उझबेकिस्तान आणि आखाती राज्ये यांच्याशी सहकार्य केले.

OECD (ऑर्गनायझेशन फॉर इकॉनॉमिक कोऑपरेशन अँड डेव्हलपमेंट) च्या ODA (ऑफिशियल डेव्हलपमेंट असिस्टन्स) निधी अंतर्गत सहाय्याच्या पुनर्वितरणात भारत सहभागी नसतानाही गरीब देशांना, विशेषतः आफ्रिकेतील गरीब राष्ट्रांना मदत वाढवण्याचा प्रयत्न करत आहे. भारतीय मदत खर्चाची रक्कम दरवर्षी सुमारे १.३ अब्ज युएस डॉलर्स आहे. अनेक निर्बंध लागू न करता ही मदत दिली जाते आणि ती पूर्णपणे मानवतावादी आहे, ज्यामुळे भारतीय सॉफ्ट पॉवरचा प्रभाव लक्षणीयरित्या वाढतो (कुगील, २००९).

### ४.४.१. सॉफ्ट पॉवरः ऐतिहासिक व सांस्कृतिक दुवे

पवन के. वर्मा यांच्या मते, भारताची संस्कृती ही तिच्या सॉफ्ट पॉवरचा मुख्य स्त्रोत आहे. भारत अशा मोजक्या देशांपैकी एक मानला जातो ज्यांची संस्कृती पाश्चात्य मूल्यांना पर्याय बनू शकते. भारतीय संस्कृतीच्या समृद्धता आणि विविधतेने प्राचीन काळापासून परदेशी लोकांना आकर्षित केले आहे. यांत व्यापारी, प्रवासी, धार्मिक छळापासून पळून जाणारे लोक, आध्यात्मिक ज्ञानाच्या शोधात असणारे तसेच ख्रिस्ती मिशनरी, परदेशी सैन्य आणि वासाहतिक यांचाही समावेश होतो. परिणामी, भूतकाळात भारत केवळ दक्षिणपूर्व आशियाच नव्हे तर प्राचीन रोम, ग्रीस किंवा पर्शियासारख्या दूरच्या देशांशीसुद्धा अनेक दुवे जोडू शकले (वॉल्पर, २०१०).

भारताची सॉफ्ट पॉवर सांस्कृतिक आणि संस्थात्मक सॉफ्ट पॉवर संसाधनांचा व्यापकपणे समावेश करू शकते. अनेक देशांतील मोठ्या भारतीय डायस्पोरा यांनी याला चांगला पाया दिला आहे. भारतीय डायस्पोरा अलीकडे अनेक पटींनी वाढला आहे कारण भारतीयांनी उच्च शिक्षण आणि रोजगाराच्या संधींसाठी जगभर प्रवास केला आहे. भारतीय कला, चित्रपट, साहित्य, सौंदर्य स्पर्धा, वसाहतविरोधी इतिहास, लोकशाही संस्था, मुक्त प्रसारमाध्यमे, स्वतंत्र न्यायव्यवस्था, धर्मनिरपेक्षता, कुशल इंग्रजी बोलणारे कामगार, अन्न, हस्तकला, योग, बेंगळुरूसारख्या ठिकाणी माहिती तंत्रज्ञान क्षेत्राची जलद वाढ यांसारख्या अनेक घटकांनी भारताची सॉफ्ट पॉवर वाढवण्यास हातभार लावला आहे. इंदिरा नूयी, सुंदर पिचाई, सत्या नडेला यांसारख्या जागतिक कंपन्यांचे सीईओ असोत किंवा प्रियांका चोप्रा सारख्या चित्रपटसृष्टीतील व्यक्तिमत्त्वे, हे सर्वच भारतीय सॉफ्ट पॉवरचा प्रचार करतात.

**संगीत आणि चित्रपट**: भारतीय पॉप संस्कृतीचे घटक, जसे की संगीत आणि चित्रपटांनी इतर देशांमध्येही बरेच चाहते मिळवले आहेत. भारतीय संगीत आणि चित्रपटांना जागतिक व्यापारात स्वतःचे स्थान आहे आणि ते परदेशात, विशेषतः आशिया, युरोप आणि आफ्रिकेत लोकप्रिय झाले आहेत. बीटल्स आणि पंडित रविशंकर तसेच ए. आर. रेहमान यांनी लोकप्रिय केलेले भारतीय संगीत आता बॉलिवूडच्या नेतृत्वाखालील भारतीय चित्रपटांमुळे जगभर लोकप्रिय झाले आहे. भारतीय सिनेमॅटोग्राफी, मुख्यतः बॉलीवूडशी निगडीत, वर्षाला सुमारे १,७०० चित्रपट तयार करते. बॉलीवूड लोगोखालील चित्रपट प्रामुख्याने आशियाई बाजारपेठांमध्ये प्रदर्शित होतात, परंतु त्यापैकी अनेक चित्रपट आंतरराष्ट्रीय महोत्सवांमध्येही यश मिळवतात (लिपका-चुडझिक, २००९). ग्रेट ब्रिटनच्या सहकार्याने तयार केलेला स्लमडॉग मिलेनियर हा चित्रपट, ज्याने अनेक ऑस्कर जिंकले आहेत, हे त्याचे उत्तम उदाहरण आहे. इतर कोणत्याही गैर-इंग्रजी भाषिक देशातील चित्रपटांपेक्षा भारतातील बॉलिवूड चित्रपट यूएसमध्ये अधिक व्यवसाय करतात. बॉलीवूडमधील चित्रपटांत कौटुंबिक मूल्यांना दिलेल्या महत्त्वामुळे ते सोव्हिएत युनियनमधील सरकारी अधिकाऱ्यांमध्ये लोकप्रिय बनले होते. चीन, जपान, दक्षिण कोरिया इत्यादी पूर्व आशियाई देशांमध्ये बॉलीवूड चित्रपटांचे मोठ्या प्रमाणावर कौतुक केले जाते. काही हिंदी चित्रपटांना चीन आणि दक्षिण कोरिया, जपानमध्ये १९४० आणि १९५० च्या दशकात यश मिळाले होते आणि ते आजपर्यंत लोकप्रिय आहेत, याचे उदाहरण म्हणजे दंगल सारखे चित्रपट. पाकिस्तान मधील 'कोक स्टुडीओ' मधील गाणी आणि भारतातील बॉलिवूड चित्रपट यांचे एकमेकांमधील लोक-राजनयिक संबंध सुधारण्यासाठीचे योगदान महत्त्वाचे ठरू शकते.

**भाषा संस्कृती**: संस्कृत ही जगातील सर्वात जुनी भाषा आहे आणि सर्व इंडो-युरोपियन भाषांची जननी आहे. २५ वर्षांत, अंदाजे ७ दशलक्ष लोकांनी भारत आणि परदेशात संस्कृत भारतीद्वारे ऑफर केलेल्या संस्कृतच्या वर्गांना हजेरी लावली आहे. उत्तर अमेरिका - प्रामुख्याने यूएस मध्ये संस्कृत शैक्षणिक संस्थांची संख्या सर्वाधिक आहे. अमेरिकेतील डझनभर विद्यापीठांमध्ये इंडो-युरोपियन भाषा म्हणून संस्कृत शिकवली जात आहे. हेडलबर्ग, लीपझिग, हम्बोल्ट आणि बॉन येथील विद्यापीठांसह जर्मनीतील अनेक शहरांमध्ये आता काही दशकांपासून संस्कृत शिकवली जात आहे.

संस्कृत सोबतच हिंदीसुद्धा दक्षिण आशियातील सर्वात लोकप्रिय भाषा आहे. तसेच २०२२ मध्ये गीतांजली श्री यांची 'टॉम्ब ऑफ सॅण्ड' ही 'मॅन बुकर' या साहित्यातील आंतरराष्ट्रीय पुरस्काराची मानकरी ठरलेली हिंदीतून भाषांतरित झालेली सर्वांत पहिली कादंबरी ठरली.

याव्यतिरिक्त, इतर राष्ट्रांवर प्रभाव टाकण्याची भारताच्या संस्कृतीची क्षमता इथे बोलल्या जाणाऱ्या इंग्रजी भाषेमुळे बळकट झाली आहे. स्वातंत्र्य परत मिळाल्यानंतर अनेक वर्षे ती सहायक भाषा म्हणून काम करत होती. भारतात १२२ भाषा आणि २३४ बोली भाषांमध्ये इंग्रजीचा वापर अधिक महत्त्वाचा आहे (स्कोब्रटल, २००९). आजूबाजूच्या अनेक भाषांसह, इंग्रजी अनेक गटांना जोडते ज्यामुळे ती जागतिक समुदायामध्ये भारताचा प्रभाव वाढविण्यास अनुमती देणारा एक महत्त्वाचा घटक बनते.

**साहित्य संस्कृती**: साहित्यामुळेदेखील सॉफ्ट पॉवर वाढते. अरुंधती रॉय, किरण देसाई, अरविंद अडिगा, गीतांजली श्री यांच्यासारखे भारतीय लेखक मॅन बुकर या साहित्यातील मानाच्या आंतरराष्ट्रीय पारितोषिकाचे अनेक वेळा मानकरी ठरले आहेत. २००१ मध्ये भारताला विद्याधर सूरजप्रसाद नजपॉल यांनी साहित्यात नोबेल पारितोषिक मिळवून दिले होते (कुगील, २०१४).

**योगसंस्कृती**: आंतरराष्ट्रीय जगतात सर्वात मोठे आणि दीर्घकाळ टिकणारे भारतीय यश म्हणजे योग, जो आजकाल जगाच्या कानाकोपऱ्यात ताणतणाव दूर करणाऱ्या व्यायामाचा एक प्रकार म्हणून प्रसिद्ध आहे (कुगील, २०१४). उत्तर फ्रान्समध्ये स्वामी सत्यानंद सरस्वती यांच्या शिष्यांनी "शिक्षणातील योगावर संशोधन" (R.Y.E) नावाची संस्था स्थापन केली आहे. दक्षिण अमेरिकेत, विविध ख्रिश्चन संप्रदायातील पुजारी, नन आणि भिक्षूंना त्यांच्या मठ, कॉन्व्हेंट आणि शाळांमध्ये योग शिकवला जातो. युनायटेड स्टेट्स ऑफ अमेरिका, ऑस्ट्रेलिया, युरोप आणि दक्षिण अमेरिकेच्या काही भागात कारागृहात देखील योग प्रशिक्षणाने खूप जोर पकडला आहे.

**खाद्यसंस्कृती व मसाले**: युरोपीय वासाहतिक राष्ट्रांना भारतातील ज्या अनेक गोष्टींनी आकर्षित केले त्यातली एक म्हणजे भारतीय मसाले. केशर, मोहरी, अजवाइन, दालचिनी, लवंगा, काळी वेलची, चक्रीफूल, धनिया आणि चिंचोके यांसारखे मसाले अधिक लोकप्रिय आहेत. यूएस मध्ये भारतीय मसाल्यांनी 'मिस्ट्रेस ऑफ स्पाइसेस' सारख्या चित्रपटांमध्ये आणि 'द बिग बँग थिअरी' सारख्या अनेक लोकप्रिय टेलिव्हिजन मालिकांमध्ये लोकप्रियता मिळवली आहे.

कबाब, चिकन टिक्का मसाला, बिर्याणी, करी, मसाला डोसा आणि रोटी आणि नान यांसारखे भारतीय खाद्यपदार्थ प्रचंड लोकप्रिय आहेत आणि आता यूके, यूएसए, कॅनडा, मध्य पूर्व सारखे देश तसेच अगदी चीनमध्ये सुद्धा मुख्य किराणा दुकानांमध्ये पॅकेज केलेले भारतीय खाद्यपदार्थ उपलब्ध आहेत. हे भारताच्या अन्नातून परदेशात असलेली सॉफ्ट पॉवर दर्शवते.

जगभरातील भारतीयांच्या मालकीच्या अनेक फास्ट फूड साखळ्यांनी 'नानविच' सर्व्ह करण्यासाठी सँडविच आणि पिटा पॉकेट्स शोधून काढल्या आहेत, जिथे ते बटर चिकन, चिकन टिक्का, कढई आणि पनीर माखनवाला सारख्या लोकप्रिय भारतीय ग्रेव्हीसह नान ब्रेड भरतात.

इंग्लंड, अमेरिका, कॅनडा, चीन, ऑस्ट्रेलिया यांसारख्या देशांत भारतीय रेस्टॉरंट्सची संख्या लक्षणीय आहे.

**क्रीडा संस्कृती**: भारतीय सॉफ्ट पॉवरमध्ये भारतीय खेळांचा समावेश होतो ज्यात कबड्डीची लोकप्रियता हे अलीकडील एक उदाहरण आहे. २०१० मध्ये भारत १९ व्या कॉमनवेल्थ गेम्सचा आयोजक होता, त्याच्या उद्घाटन सोहळ्याचे प्रमाण बीजिंगमधील ऑलिम्पिक गेम्सशी जुळते.

**शिक्षण:** सॉफ्ट पॉवरचे आणखी एक साधन म्हणजे शिक्षण, ज्यात परदेशी लोकांसाठी असलेल्या कार्यक्रमांना विशेष महत्त्व आहे.

**पर्यटन**: त्याचप्रमाणे, 'अतिथी देवः भव' या संस्कृतीतून आलेला भारत एक पर्यटन स्थळ म्हणून जगाच्या नकाशावर आपली ओळख बनवत आहे.

**भारतीय मानके आणि मूल्ये**: भारत हे हिंदू, बौद्ध, जैन आणि शीख या धर्मांचे जन्मस्थान आहे. तसेच इतर अनेक धर्मसुद्धा भारतात नांदत आहेत. ही धर्म सहिष्णुता भारतीय धर्मनिरपेक्ष संस्कृतीतूनच उदयास येते. भारतीय 'धर्मनिरपेक्षता'-ज्याचा अर्थ विविध धर्मांचे सुसंवादी सहअस्तित्व असा आहे- ही पश्चिमेकडील वर्चस्व असलेल्या 'धर्मनिरपेक्षता' - जिथे धर्म आणि राज्य वेगळे करण्यावर जोर दिला जातो- या संकल्पनेला प्रभावी पर्याय ठरते. याशिवाय सत्य आणि अहिंसा ही भारतीय मुल्ये आज जगभरात भारताची ओळख ठरली आहेत. लोकशाही आणि स्वातंत्र्यासाठी भारतीय समर्थन हे एक मूल्य आहे जे त्याची सॉफ्ट पॉवर मजबूत करते. बहुतेक आशियाई देशांप्रमाणेच, भारतामध्येही एक अतिशय स्थिर आणि स्वतंत्र न्यायव्यवस्था आहे आणि काही प्रमाणात प्रसारमाध्यमे देखील आहेत. या दोन्ही संस्था महत्त्वाच्या सार्वजनिक समस्या सोडवण्यासाठी सक्रिय भूमिका बजावतात. भारताची लोकशाही परिपूर्ण नसली तरी अनेक आव्हाने असतानाही ती टिकून आहे. भारताने लोकशाही परंपरा प्रस्थापित करून आणि जपून, हे सिद्ध केले आहे की अशा नियम आणि मुल्यांवर केवळ विकसित पाश्चिमात्य देशांची मालकी नाही.

तसेच, भारताची सॉफ्ट पॉवर ही आता पाककृती, योग आणि बॉलीवूडच्या पलीकडे पसरलेली आहे. भारत १९४७ पासून नेपाळ आणि भूतान सारख्या लहान शेजारी देशांना आर्थिक मदत करत आहे. आशिया आणि आफ्रिकेत वसाहतवादाच्या विरोधात तसेच शीतयुद्धादरम्यान अलिप्ततावादी चळवळीत भारताकडे एक नेता म्हणून पाहिले जाते.

munotes.in

भारताने या आशियाई आणि आफ्रिकन राज्यांना सातत्याने तांत्रिक सहाय्य, प्रशिक्षण तसेच परदेशी मदत दिली आहे.

**इंडियन कौन्सिल फॉर कल्चरल रिलेशन्स (ICCR):**

भारतीय संस्कृतीचे संरक्षण आणि संवर्धन करण्यात मुख्य भूमिका ही १९५० मध्ये स्थापन झालेल्या इंडियन कौन्सिल फॉर कल्चरल रिलेशन्स (ICCR) या शासकीय संस्थेची आहे. भारतीय संस्कृती केंद्रे आणि परदेशातील विद्यापीठांमध्ये भारतीय अभ्यास विभागांची निर्मिती यांना समर्थन करणे, परदेशी लोकांना भारतातील अभ्यासक्रमासाठी शिष्यवृत्ती देणे, सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन आणि भारतीय कलाकारांसाठी परदेशी सहलीना प्रोत्साहन देणे, यांसारखी ICCR या संस्थेची उद्दिष्ट्ये आहेत.

**सॉफ्ट पॉवर मर्यादा:**

तांत्रिक प्रगतीच्या क्षेत्रात यश असूनही, भारत हा समृद्ध देश नाही, ज्यामुळे तो इतर देशांसाठी सामाजिक विकासाचे मॉडेल म्हणून काम करू शकत नाही. निःसंशयपणे, भारताच्या अर्थव्यवस्थेचे महत्त्व वाढले आहे, परंतु त्यामुळे भारतीय समाजातील गरिबी दूर झालेली नाही. एकीकडे, भारतामध्ये तंत्रज्ञान आणि व्यवस्थापनाच्या जागतिक दर्जाच्या संस्था आहेत, परंतु तरीही ते आपल्या लोकसंख्येच्या मोठ्या भागासाठी मूलभूत शिक्षण देखील प्रदान करण्यात अक्षम आहे. भारताच्या सॉफ्ट पॉवर क्षमतांसमोरील आव्हान हे तिची गुंतागुंतीची सामाजिक व्यवस्था आहे. याला महिलांवरील बलात्कार आणि हिंसाचार, जातीय तसेच धार्मिक हिंसाचार, भारतीय समाजातील पुराणमतवाद आणि पितृसत्ताकता यांसारखे घटक कारणीभूत आहेत.

शांतताप्रिय आणि सहिष्णू संस्कृतीच्या राष्ट्रीय प्रतिमेला मोठा डाग म्हणजे धार्मिक भेदांमुळे होणारी सांप्रदायिक हिंसा आणि दंगली. राज्य प्राधिकरणांद्वारे मानवी हक्कांचे उल्लंघन देखील भारताच्या या नकारात्मक चित्राला कारणीभूत आहे, जे त्याच्या सॉफ्ट पॉवरच्या मर्यादा परिभाषित करते (स्कोब्रटल, २००९). २०१४ पासून भारताच्या परराष्ट्र धोरणातील सॉफ्ट पॉवरच्या महत्त्वावर जोर देण्यात आला. विशेषत: त्याच्या आध्यात्मिक, सांस्कृतिक आणि तात्विक परिमाणांचा वापर करून त्यावर जोर दिला गेला (कुगिएल, २०१४). या राजकीय कार्यक्रमाचे एक ध्येय म्हणजे ५ T: परंपरा(tradition), प्रतिभा(talent), पर्यटन(tourism), व्यापार(trade) आणि तंत्रज्ञानाचा(technology) वापर करून भारताची प्रतिमा मजबूत करणे.

**४.४.१ भारतीय डायस्पोरा**:

'डायस्पोरा' या शब्दाचा उगम ग्रीक शब्द 'डायस्पेरिन' पासून झाला आहे, ज्याचा अर्थ एखाद्या विशिष्ट देशाचा नागरिक असलेल्या आणि सामान्य वंश किंवा संस्कृती सामायिक केलेल्या परंतु विविध कारणांमुळे त्यांच्या मातृभूमीच्या पलीकडे राहणाऱ्या कोणालाही संदर्भित करतो.

भारतात, 'डायस्पोरा' हा शब्द अनिवासी भारतीय (एनआरआय), भारतीय वंशाच्या व्यक्ती (पीआयओ), आणि भारताचे परदेशी नागरिक (ओसीआय) यांना संदर्भित करतो. २०१५ मध्ये या सर्वांना एकाच श्रेणीमध्ये एकत्र केले गेले - भारताचे परदेशी नागरिक (ओसीआय).

munotes.in

ब्रिटीश प्रशासनाच्या काळात, मोठ्या संख्येने भारतीयांनी फिजी, केनिया आणि मलेशिया यांसारख्या पूर्वीच्या वसाहतींमध्ये करारबद्ध मजूर म्हणून स्थलांतर केले. विविध सामाजिक वर्गातील भारतीयांनी युनायटेड किंगडम, युनायटेड स्टेट्स आणि आखाती देशांसारख्या देशांमध्ये स्थलांतर करून स्वातंत्र्यानंतरही हे चालू ठेवले. गुगल, मायक्रोसॉफ्ट, ट्विटरच्या सीईओपासून ते नोबेल पारितोषिक विजेते शास्त्रज्ञ हर गोविंद खोराना, अशी परदेशातील भारतीयांची यादी आणि जगासाठी त्यांचे योगदान महत्त्वाचे आहे.

डायस्पोरा हे राष्ट्राच्या अभिमानाचे प्रतीक आहेत आणि ते त्यांच्या देशाचे आंतरराष्ट्रीय स्तरावर प्रतिनिधित्व करतात. भारतीय सॉफ्ट पॉवरचा प्रसार करण्याची, भारताच्या राष्ट्रीय हितासाठी लॉबी करण्याची आणि भारताच्या वाढीसाठी आर्थिकदृष्ट्या योगदान देण्यात डायस्पोरा महत्त्वाची भूमिका बजावतात. भारतीय डायस्पोराचे सर्वात मोठे आर्थिक योगदान हे ते भारतात परत पाठवत असलेल्या पैशांच्या (remittances) बाबतीत आहे. भारताच्या विकासात परदेशी भारतीय समुदायाच्या योगदानाची नोंद करण्यासाठी दरवर्षी ९ जानेवारी रोजी 'प्रवासी भारतीय दिवस' साजरा केला जातो.

संयुक्त राष्ट्रे संघटनेच्या 'इंटरनॅशनल मायग्रेशन २०२० हायलाइट्स' अहवालानुसार, २०२० मध्ये देशातील १८ दशलक्ष लोकांसह भारताची जगातील सर्वात जास्त डायस्पोरा लोकसंख्या आहे, ज्यामध्ये संयुक्त अरब अमिराती (यूएई), अमेरिका (यूएस) आणि सौदी अरेबिया सर्वात मोठ्या संख्येने भारतातून स्थलांतरित लोकांचे स्वागत करतात. भारताचा मोठा डायस्पोरा संयुक्त अरब अमिराती (३.५ दशलक्ष), युनायटेड स्टेट्स ऑफ अमेरिका (२.७ दशलक्ष) आणि सौदी अरेबिया (२.५ दशलक्ष) मध्ये वितरीत झाला आहे. याशिवाय ऑस्ट्रेलिया, कॅनडा, कुवेत, ओमान, पाकिस्तान, कतार आणि युनायटेड किंग्डम हे मोठ्या संख्येने भारतीय स्थलांतरितांचे आयोजन करणारे इतर देश आहेत. चीन आणि रशियामध्ये देखील डायस्पोरा समुदाय पसरलेले आहेत. जागतिक बँकेच्या अहवालानुसार, २०२१ मध्ये भारताला अंदाजे ८७ अब्ज डॉलर्सचे रेमिटन्स प्राप्त झाले. या निधीपैकी २०% पेक्षा जास्त रक्कम ही एकट्या अमेरिकेतील डायस्पोरा समुदायाकडून आलेली आहे.

**डायस्पोराबाबत भारताचे धोरण:**

परदेशी भारतीयांसाठी वकिली केल्याने यजमान देशांचा अपमान होऊ शकतो, ही भारताला सुरुवातीला काळजी होती कारण या भारतीयांच्या कल्याणाची आणि सुरक्षेची संपूर्ण जबाबदारी ही ते राहत असलेल्या परदेशी यजमान राष्ट्रांकडेच असते. म्हणूनच १९५० च्या दशकात भारताचे परराष्ट्र धोरण गैर-हस्तक्षेपाचे मॉडेल म्हणून तयार केले गेले. उदाहरणार्थ श्रीलंका, म्यानमार इत्यादी ठिकाणी जेव्हा जेव्हा स्थलांतरित भारतीय अडचणीत आले.

तथापि, राजीव गांधी हे १९८० च्या दशकात डायस्पोरा धोरणात बदल करणारे पहिले पंतप्रधान होते, ज्यांनी परदेशात राहणाऱ्या भारतीयांना, त्यांच्या राष्ट्रीयत्वाची पर्वा न करता, परदेशातील चीनी समुदायांप्रमाणेच राष्ट्र उभारणीच्या प्रयत्नांमध्ये सामील होण्याचे आवाहन केले.

२००० नंतर, अटल बिहारी वाजपेयी सरकारच्या अंतर्गत, परदेशी भारतीय व्यवहार मंत्रालय, भारतीय वंशाचे व्यक्ती (पीआयओ) कार्ड, प्रवासी भारतीय दिवस, प्रवासी भारतीय सन्मान

munotes.in

पुरस्कार, भारताचे प्रवासी नागरिक, परदेशात राहणाऱ्या भारतीय नागरिकांसाठी कार्ड, अनिवासी भारतीय निधी आणि मतदानाचा हक्क यासह अनेक सकारात्मक उपाययोजना सुरू करण्यात आल्या. याव्यतिरिक्त, परराष्ट्र व्यवहार मंत्रालयाने २०१५ मध्ये ई-माइग्रेट प्रणाली सुरू केली, ज्यासाठी सर्व परदेशी नियोक्त्यांनी डेटाबेसमध्ये नोंदणी करणे आवश्यक आहे.

**भारतीय डायस्पोराचे प्रमुख विभाग:**

सुमारे ८.५ दशलक्ष भारतीय हे आखाती देशांमध्ये राहतात आणि काम करतात. हे जगातील सर्वात मोठ्या स्थलांतरित लोकांपैकी एक आहेत.

२०१५ पर्यंत ४ दशलक्ष भारतीय हे युनायटेड स्टेट्समध्ये स्थलांतरित रहिवासी आहेत. यामुळे भारतात जन्मलेले परंतु परदेशी लोक हे मेक्सिकन लोकांनंतर अमेरिकेतील दुसऱ्या क्रमांकाचे स्थलांतरित गट बनले आहेत.

परराष्ट्र मंत्रालयाच्या अहवालानुसार, डिसेंबर २०१८ पर्यंत ३०,९९५,७२९ अनिवासी भारतीय (NRI) आणि भारतीय वंशाच्या व्यक्ती (PIO) भारताबाहेर राहत होते.

**भारतीय डायस्पोराचे महत्त्व:**

**स्वातंत्र्य चळवळ**: दक्षिण आफ्रिकेतील भारतीयांविरुद्ध संस्थात्मक भेदभाव संपवण्याचा महात्मा गांधींचा संघर्ष आधुनिक भारतातील डायस्पोराबद्दल भावनिक भावना टिकवून ठेवण्यासाठी एक प्रेरणादायी आख्यायिका बनला. जसजसे स्वातंत्र्य चळवळीने स्वदेशात वेग घेतला, तसतसे परदेशातील अनेक भारतीय समुदायांवर त्याचा प्रभाव पडू लागला.

**सांस्कृतिक विस्तार**: भारतातून यूके, कॅनडा आणि इतर अनेक देशांमध्ये शिख हे सर्वात मोठे स्थलांतरित आहेत.

**भारतीय डायस्पोराचे जगामध्ये योगदान**: जगातील भारतीय डायस्पोरा दोन प्रमुख श्रेणींमध्ये विभागले जाऊ शकतात-

अ. **तंत्रज्ञान पदवीधर**: यांत अभियांत्रिकी आणि व्यवस्थापन पदवीधर आहेत, जे मुख्यतः यूएस आणि युरोप परंतु इतरही पाश्चात्य देशांमध्ये स्थित असून उच्च-मूल्याच्या नोकऱ्यांमध्ये आहेत.

ब. **मानवी श्रम**: यामध्ये तुलनेने कमी-कुशल लोकसंख्येचा समावेश होतो, ज्यांना प्रामुख्याने अरब किंवा पश्चिम आशियाई देशांमध्ये मानवी मजुरीसाठी नियुक्त केले जाते.

**रेमिटन्स**: भारताला २०२१ मध्ये अंदाजे ८७ अब्ज डॉलर्स रेमिटन्स प्राप्त झाले आणि यात यूएसए मधील भारतीय डायस्पोराचा सर्वाधिक म्हणजे २०% पेक्षा अधिक वाटा आहे. जागतिक रेमिटन्समध्ये भारतीयांचा वाटा १३% आहे. भारतीयांनी भारतात परत पाठवलेला रेमिटन्स भारतीय GDP च्या अंदाजे ३.२% इतका आहे.

**बदलाचे एजंट**: गुंतवणूक सुलभ करणे आणि वाढवणे, औद्योगिक विकासाला गती देणे आणि आंतरराष्ट्रीय व्यापार आणि पर्यटनाला चालना देणे यांत भारतीय डायस्पोरा महत्त्वाची भूमिका बजावतात.

**तंत्रज्ञानाचा विकास आणि उद्योजकता**: बेंगळुरू, गुरुग्राम आणि हैदराबाद हे आयटी हब म्हणून भरभराटीला आले आहेत ज्यात केवळ बहू-राष्ट्रीय कंपन्याच नाही तर अनेक भारतीय स्टार्ट-अप देखील आहेत.

**भारताचा जागतिक मतप्रभाव वाढवणे**: राजकीय दबाव आणि मंत्री आणि राजनैतिक पातळीवरील लॉबिंग व्यतिरिक्त, भारत विविध राष्ट्रांवर प्रभाव टाकण्यासाठी आपल्या डायस्पोराचे सहकार्य घेऊ शकतो.

**डायस्पोरा राजनय**: डायस्पोरा राजनय हा यजमान देशाची संस्कृती, राजकारण आणि अर्थशास्त्र अशा प्रकारे प्रभावित करतो जो यजमान आणि मायदेश दोहोंसाठी परस्पर फायदेशीर असतो. भारताचा डायस्पोरा समुदाय परराष्ट्र धोरण आणि संबंधित सरकारी क्रियाकलापांसाठी आवडीचा विषय म्हणून अधिक महत्त्वाचा बनला आहे. २००८ मधील यूएस-भारत नागरी आण्विक करार विधेयकासाठी लॉबिंग करणे आणि त्यांच्याकडून पैसे पाठवणे ही याची उदाहरणे आहेत.

**भारतीय डायस्पोरासाठीचे विविध उपक्रम:**

**प्रवासी भारतीय दिवस**: ९ जानेवारी हा दिवस प्रवासी भारतीय दिवस (पीबीडी) साजरा करण्यासाठी निवडण्यात आला कारण या दिवशी १९१५ मध्ये महात्मा गांधी- महान प्रवासी- दक्षिण आफ्रिकेतून भारतात परतले. त्यांनी भारताच्या स्वातंत्र्यलढ्याचे नेतृत्व केले आणि भारतीयांचे जीवन कायमचे बदलले. पीबीडी अधिवेशन दर दोन वर्षांनी एकदा आयोजित केले जाते. २०२१ साली १६ वे पीबीडी अधिवेशन आभासी पद्धतीने नवी दिल्लीत पार पडले. "आत्मनिर्भर भारतासाठी योगदान" ही या अधिवेशनाची थीम होती. या प्रसंगी, पीबीडी अधिवेशन, प्रवासी भारतीय सन्मान पुरस्कार आणि 'भारत को जानीये' प्रश्नमंजुषा यासारखे अनेक कार्यक्रम आयोजित केले जातात. प्रादेशिक अधिवेशनेही घेतली जातात.

**वंदे भारत मिशन**, ज्यामध्ये कोरोनाच्या काळात ४५ लाखांहून अधिक भारतीयांची सुटका करण्यात आली.

**स्किल्ड वर्कर्स अरायव्हल डेटाबेस फॉर एम्प्लॉयमेंट सपोर्ट (SWADES)**, आखाती आणि इतर भागातून स्थलांतरितांना परत आणण्यासाठीचा एक उपक्रम आहे.

प्रवासी भारतीयांशी उत्तम संपर्क आणि संवादासाठी **जागतिक प्रवासी रिश्ता पोर्टल** सुद्धा तयार केले आहे.

**शिक्षण**: सर्व वैद्यकीय, अभियांत्रिकी आणि इतर व्यावसायिक महाविद्यालयांमध्ये NRI जागा राखीव आहेत. इतर युवा-केंद्रित आउटरीच कार्यक्रमांमध्ये 'भारत को जानो ऑनलाइन प्रश्नमंजुषा' समाविष्ट आहेत.

**मतदानाचा हक्क**: लोकप्रतिनिधी (सुधारणा) विधेयक २०१७, सेवा मतदारांच्या धर्तीवर परदेशातील भारतीयांना 'प्रॉक्सी मतदान' ची सुविधा विस्तारित करते.

**भारत जाणून घ्या कार्यक्रम(Know India Programme)**: डायस्पोरा सहभागासाठी हा एक प्रमुख उपक्रम आहे जो भारतीय वंशाच्या तरुणांना (१८-३० वर्षे) त्यांच्या भारतीय मुळांशी परिचित करतो आणि समकालीन भारत नव्याने तयार करण्यात हातभार लावतो.

**किमान रेफरल वेतन** २०१४ ही विविध देशांत स्थलांतरित भारतीय कामगारांसाठी वेतन योजना आहे.

**पासपोर्ट सुविधा सुलभ करणे**: मुख्य पोस्ट कार्यालये पासपोर्ट केंद्र म्हणून सुरू केली गेली ज्यामुळे हजारो लोकांना पासपोर्टसाठी अर्ज करता येईल.

**परदेशी भारतीय व्यवहार मंत्रालयाचे परराष्ट्र व्यवहार मंत्रालयात विलीनीकरण** करण्यात आले.

भारताने युनायटेड स्टेट्स, ऑस्ट्रेलिया आणि फिजीसह ४३ देशांतील अभ्यागतांना **आगमनानंतर व्हिसा** मिळण्याची परवानगी दिली. यापूर्वीच्या प्रक्रियेत व्हिसा मिळवायला आठवडे लागायचे.

**ओव्हरसीज इंडिया फॅसिलिटेशन सेंटर**ची स्थापना भारत सरकारद्वारे भारतीय उद्योग परिसंघ (CII) च्या भागीदारीत, परदेशातील भारतीयांचे भारतासोबत आर्थिक संबंध सुलभ करण्यासाठी करण्यात आली.

सरकारने २०१५ मध्ये **ऑपरेशन राहत** आणि दक्षिण सुदानमधून **ऑपरेशन संकट मोचन**द्वारे येमेनमधील भारतीय डायस्पोरांची सुटका केली.

सरकारने तरुणांवर अधिक भर देत '**तुमचा देश जाणून घ्या** (**Know Your Country**)' ही योजना सुरू केली आहे.

"**प्रवासी कौशल विकास योजना**" परदेशी रोजगार शोधणाऱ्या भारतीय तरुणांना लक्ष्य करते.

भारत सरकार **सोशल मीडिया**वर सक्रिय आहे जिथे सरकार त्वरित प्रतिसाद देते आणि सोशल मीडियाद्वारे भारतीय डायस्पोराच्या समस्या सोडवते.

**डायस्पोरासोबत सांस्कृतिक संबंधांना प्रोत्साहन**: यामार्फत भारतीय संस्कृती आणि आधुनिक भारतातील नवीन उपक्रम आणि घडामोडींचे प्रदर्शन करण्याचा उद्देश.

**डायस्पोरा मुलांसाठी शिष्यवृत्ती कार्यक्रम**: २००६-२००७ मध्ये परदेशी भारतीयांच्या (पीआयओ/एनआरआय) मुलांसाठी भारतीय विद्यापीठे/संस्थांमधील उच्च शिक्षण सुलभ व्हावे आणि भारताला उच्च शिक्षणाचे केंद्र म्हणून प्रोत्साहन देणे या उद्देशांनी सुरू केले.

**प्रवासी तीर्थ दर्शन योजना**: वर्ष २०१८-१९ मध्ये, मंत्रालयाने ४५-६० वयोगटातील परदेशी भारतीयांसाठी (पीआयओ) इंडियन रेल्वे केटरिंग अँड टुरिझम कॉर्पोरेशन (IRCTC)

च्या संयुक्त विद्यमाने विशेष 'भारत जाणून घ्या (Know India Programme)' कार्यक्रम सुरू केला आहे.

**इंडिया सेंटर फॉर मायग्रेशन**: ही जुलै, २००८ मध्ये सोसायटी नोंदणी कायदा १८६० अंतर्गत स्थापन केलेली ना-नफा तत्त्वावर चालणारी संस्था आहे. हे केंद्र 'आंतरराष्ट्रीय स्थलांतर' संबंधित सर्व बाबींवर परराष्ट्र मंत्रालयाकडे संशोधन थिंक टँक म्हणून काम करते.

**इंडियन कम्युनिटी वेल्फेअर फंड**: २००९ मध्ये स्थापन करण्यात आलेल्या या निधीचा, परदेशातील भारतीय नागरिकांना संकटकाळात आणि आणीबाणीच्या वेळी 'सर्वाधिक पात्र प्रकरणांमध्ये' मदत करणे हा उद्देश आहे.

**प्रवासी भारतीय विमा योजना**: ही सर्व इमिग्रेशन चेक रिक्वायर्ड (ECR) देशांमध्ये जाणाऱ्या ECR श्रेणीतील कामगारांसाठी एक अनिवार्य विमा योजना आहे.

**प्री-डिपार्चर ओरिएंटेशन ट्रेनिंग**: मंत्रालयाने सुरक्षित, व्यवस्थित, कायदेशीर आणि मानवी स्थलांतर प्रक्रियेसाठी जोरदार प्रयत्न केले आहेत. यामध्ये स्थलांतरित कामगारांचे कल्याण आणि संरक्षण आणि जागरुकता निर्माण करण्यासाठी व्यापक अशी संस्थात्मक संरचना समाविष्ट आहे.

**वैभव समिट**: 'वैश्विक भारतीय वैज्ञानिक' किंवा वैभव समिट हा भारतातील रहिवासी आणि परदेशातील शास्त्रज्ञांना भारतासमोरील सद्य समस्या सोडवण्यासाठी एका समान व्यासपीठावर एकत्र आणण्याचा कार्यक्रम आहे.

ऑक्टोबर २००८ पासून परराष्ट्र मंत्रालय कार्यान्वित "**ट्रेसिंग द रूट्स**" या नावाने ओळखली जाणारी एक योजना भारतीय वंशाच्या लोकांची (PIO) भारतातील मुळे शोधण्यात मदत करत आहे.

**डायस्पोरासमोरील आव्हाने:**

१. अनेक देशांमध्ये राष्ट्रवादी आणि अति-राष्ट्रवादी सरकार सत्तेवर आल्याने वर्णद्वेष, जातीयवादामुळे स्थानिकांकडून द्वेषयुक्त भाषण आणि भारतीयांविरुद्ध गुन्ह्यांच्या वाढत्या घटना.

२. जागतिकीकरणाच्या वाढत्या विरोधामुळे (बाहेरील लोकांमुळे स्थानिक नागरिकांना वाटणारी नोकरी आणि शैक्षणिक संधी गमावण्याची भीती यातून आलेल्या) यूएसए, ऑस्ट्रेलिया इत्यादींसह अनेक देशांमध्ये व्हिसा नियम कठोर झाले आहेत.

३. सांप्रदायिक संकट, वाढत्या दहशतवादी कारवाया आणि मध्य पूर्व देशांमध्ये युद्धामुळे डायस्पोरावर हल्ले होण्याची शक्यता आहे.

४. डायस्पोरांचे समर्थन आणि त्यांचे हित प्रत्येकवेळी भारताचे प्राधान्य असण्याची गरज नसते.

५. आणखी एक आव्हान हे आहे की रेमिटन्सेस (remittances) नेहमी फायदेशीर हेतूंसाठी वापरली जाऊ शकत नाहीत. उदाहरणार्थ, खलिस्तान चळवळीसारख्या

अतिरेकी चळवळींसाठी पुरवण्यात आलेल्या परकीय निधीमुळे भारताला समस्यांचा सामना करावा लागला.

६. डायस्पोरांना संबोधित करताना, भारताने काही लाल रेषा ओलांडू नयेत याची काळजी घेतली पाहिजे. उदाहरणार्थ, आपल्या डायस्पोरासोबत संबंध सुधारताना यजमान राष्ट्रांच्या अंतर्गत राजकारणात सक्रिय हस्तक्षेप केल्याने चीन अनेक देशांमध्ये अडचणीत सापडला आहे.

७. पश्चिम आशियामध्ये सतावणारे प्रश्न जसे कि- नोकऱ्यांमध्ये कपात, शिया-सुन्नी संघर्ष आणि कट्टर इस्लामवाद, फिलीपिन्समधील कुशल कामगार आणि नेपाळमधील स्वस्त कामगारांची तीव्र स्पर्धा यासारखी धोरणे डायस्पोरासाठी शोषक आहेत.

८. कॅनडामध्ये भेदभावपूर्ण पद्धती, यूएस मध्ये कठोर H1B व्हिसा नियम, ब्रेक्झिट नंतर यूकेमध्ये व्हिसा नियमांची पुनरावृत्ती यांसारखे प्रश्नदेखील भारतीय डायस्पोरासमोर आहेत.

**काही उपाययोजना:**

१. परदेशातील ब्लू-कॉलर कामगारांच्या समस्यांचे निराकरण करणे.

२. यजमान देशांसह मानक कामगार निर्यात कराराची (Standard Labour Export Agreement) वाटाघाटी करणे.

३. परदेशी कामगारांचे निरीक्षण आणि पर्यवेक्षण करणे.

४. परदेशातील कामगारांना भेडसावणाऱ्या जोखमा लक्षात घेणाऱ्या अनिवार्य विमा योजना करणे.

५. दुसऱ्या पिढीतील पीआयओमध्ये पर्यटनाला चालना देण्यावर भर, अनिवासी भारतीय/पीआयओशी विवाहित भारतीय महिलांचे कल्याण.

६. आर्थिक प्रगती

७. डायस्पोरिक व्यावसायिक जे उत्पादन उद्योगांमध्ये वरिष्ठ पदांवर काम करत आहेत ते भारताला आउट-सोर्सिंगसाठी एक महत्त्वाचे ठिकाण म्हणून प्रसिद्धी देण्यास उपयुक्त ठरू शकतात.

८. सरकारने विशेष आर्थिक क्षेत्रे, विशेषत: NRIs/PIOs द्वारे उभारल्या जाणाऱ्या प्रकल्पांसाठी, स्थापन करण्याचा विचार केला पाहिजे.

९. इस्रायल बाँड्सच्या धर्तीवर एनआरआय/पीआयओ गुंतवणूक आकर्षित करण्यासाठी सरकारने विशेष पायाभूत सुविधा बाँड जारी करण्याचा विचार करावा.

१०. डायस्पोराशी संवाद साधणे- डायस्पोरा देशाच्या विकासात योगदान देईल अशी आपण अपेक्षा करत असल्यास त्यांना सन्मानित वाटणे महत्त्वाचे आहे. त्यामुळे,

munotes.in

त्यांच्या समस्या समजून घेण्यासाठी आणि त्यानुसार धोरणे आखण्यासाठी दुतर्फा संवाद असणे महत्त्वाचे आहे.

११. जागरुकता निर्माण करणे- अनेक सदस्यांनी त्यांच्या कल्याणासाठी राबविण्यात येणाऱ्या विशिष्ट योजनांची माहिती नसल्याकडे लक्ष वेधले आहे. तंत्रज्ञानाचा योग्य वापर करून माहितीचा चांगला प्रवाह आणि डायस्पोरा लोकांना त्यांना लाभ देणाऱ्या योजनांची जाणीव करून देण्याची गरज आहे.

१२. डायस्पोरा सदस्यांचे भारतात आगमन झाल्यावर त्यांच्या प्रवेशाच्या ठिकाणी एक मैत्रीपूर्ण स्वागत; विनम्र सेवेद्वारे चिन्हांकित असलेल्या इमिग्रेशन आणि सीमाशुल्क मंजुरीसाठी सुलभ प्रक्रिया इत्यादी प्रयत्न आवश्यक आहेत.

१३. भारतीय डायस्पोरावर एक संसदीय स्थायी समिती स्थापन केली जाऊ शकते. डायस्पोरा प्रकरणांमध्ये स्वारस्य असलेले सदस्य त्यात असले पाहिजेत.

१४. भारताच्या परराष्ट्र धोरणाचे उद्दिष्ट स्वच्छ भारत, स्वच्छ गंगा, मेक इन इंडिया, डिजिटल इंडिया आणि स्किल इंडिया यांसारख्या महत्त्वाच्या प्रकल्पांमध्ये डायस्पोरास सहभागी करून घेणे.

## ४.५ सारांश

जागतिकीकरणानंतर महासत्तेची व्याख्या ही निव्वळ राजकीय अथवा आक्रमक सत्ता अशी न राहता त्यास आर्थिक, सांस्कृतिक असे आयाम लाभू लागले आहेत. आज प्रत्येक राष्ट्र आर्थिक महासत्ता बनण्याचे स्वप्न पाहत आहे. हे स्वप्न आता केवळ विकसित पाश्चिमात्त्य राष्ट्रांपुरते मर्यादित राहिले नसून विकसनशील राष्ट्रे देखील आर्थिक विकासाची महत्त्वाकांक्षा बाळगून आहेत. याला भारत देखील अपवाद नाही. निश्चितच यामुळे भारतीय परराष्ट्र धोरणात मुक्त आंतरराष्ट्रीय व्यापार, जागतिक आर्थिक संघटनांमध्ये सक्रीय सहभाग ही उद्दिष्टे महत्त्वाची बनली आहेत, हे लक्षात घेतले पाहिजे. तथापि भारताचे भौगोलिक-राजकीय स्थान पाहता हा आर्थिक विकास ऊर्जा आणि सागरी सुरक्षेशिवाय शक्य नाही, हे विसरून चालणार नाही. त्याचप्रमाणे केवळ आर्थिक सत्तेच्या जोरावर धुरिणत्व प्रस्थापित करता येत नाही तर त्याकरता तांत्रिक, सांस्कृतिक, मुल्यांची सत्ता अर्थात सॉफ्ट पॉवरची भूमिका देखील महत्त्वाची ठरते. एकंदरीत एकविसाव्या शतकात कोणत्याही राष्ट्राचे परराष्ट्र धोरण हे आर्थिक सत्ता, सुरक्षा व सॉफ्ट पॉवर यांशिवाय अपुरे ठरेल हे वरील घटकांतून समजून येते.

## ४.६ संदर्भ सूची:

१. सिकरी, राजीव. (२०१७). *"भारताच्या परराष्ट्र धोरणाचा पुनर्विचार आव्हाने आणि नीती"*, सेज प्रकाशन, नवी दिल्ली.

२. ŁOŚ, Robert. (2019). "Soft Power of India", Published by Historia i Polityka, No. 28(35), http://dx.doi.org/10.12775/HiP.2019.011.

३. पाटील, वा. भा. (फेब्रुवारी, २०१७). *"भारताचे परराष्ट्रीय धोरण"*, प्रशांत प्रकाशन.

४. देवळाणकर, शैलेन्द्र. (डिसेंबर, २०१७). *"भारताचे परराष्ट्र धोरण नवीन प्रवाह"* सकाळ पेपर्स प्रा. लि. प्रकाशन, पुणे

५. तोडकर, बी. डी. (जुलै, २०२२). भारत आणि जग, डायमंड प्रकाशन, पुणे

६. पाटील, व्ही. बी. "*भारताचे परराष्ट्र धोरण*

❄❄❄❄❄❄❄

munotes.in